म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२६९
१८६४.

# महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण

卐卐卐卐

डॉ. श्री. व्यं. केतकर

REFBK-0013727

व्हीनस प्रकाशन



डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

मराठी ग्रं ... स्थळप्रत.
अनुक्रम
क्रमांक

# महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण

अथवा

महाराष्ट्रीय वाङ्मयाभिरुचीच्या
इतिहासांतील एक प्रकरण

## विभाग पहिला

ब्रिटिश सत्तेपूर्वीचा काल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3५२.९१८ वि: निबंध.
क्रमांक १५६९ नों दि: २७।२।६५
१३५२६

लेखक

श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए., पीएच्. डी.

संपादक, महाराष्ट्रीय ज्ञानकोश व इतर अनेक ग्रंथांचा कर्ता

REFBK-0013727

मूल्य रु. ७·००

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली : १९२८
आवृत्ति दुसरी : डिसेंबर १९६४

© सौ. वीरा शर्मा

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनवार पेठ : पुणें २

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार पेठ : पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... विः ..................
क्रमांक .................... नों: दि: ..............

इतः इतः—

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी ' महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण ' हा प्रदीर्घ निबंध लिहिल्याला आज ३५ वर्षें होऊन गेलीं आहेत. या निबंधाचें दुसरें वर्णनात्मक शीर्षक ' महाराष्ट्रीय वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासांतील एक प्रकरण– विभाग पहिला– ब्रिटिश सत्तेपूर्वीचा काल ' असें आहे. या उपशीर्षकावरून महाराष्ट्रीयांच्या वाङ्मयाभिरुचीचा इतिहास त्यांना सांगावयाचा होता असें वाटतें. तथापि काव्यपरीक्षणाचा इतिहास हा लोकाभिरुचीच्या इतिहासाचा भाग आहे असें डॉ. केतकर सांगतात ( पृ. ३ ) व तेवढ्याच भागापुरतें आपलें हें विवेचन मर्यादित करण्याचा त्यांचा मूळ हेतु होता असें त्यांच्या दोन-तीन विधानांवरून वाटतें. ते म्हणतातः— अभिरुचीच्या इतिहासाचें जें एक अंग काव्यपरीक्षण हें आहे, त्या अंगाचाच इतिहास येथ प्राधान्याने द्यावयाचा आहे; एकंदर अभिरुचीचा इतिहास द्यावयाचा नाही ' ( पृ. ७ ). प्रस्तुत निबंधाच्या मधल्या भागांत त्यांनी हीच गोष्ट पुनः पुनः सांगितली आहे. ते सांगतातः—' महाराष्ट्रीयांचें **काव्यपरीक्षण** हा प्रकृत विषय आहे, महाराष्ट्रीय काव्याचें परीक्षण हा नाही, आणि ह्यासाठी महाराष्ट्रीयांनी जेथे जेथे स्वभाषेंतील किंवा अन्य भाषेंतील काव्याचें परीक्षण केलें असेल, तेथे तेथे व्यक्त केलेले विचार आपणांस येथे संग्राह्य आहेत ( पृ. १३२ ). पुढे ३-४ पानांनंतर केतकर पुनः सांगतात, ' प्रकृत प्रसंगीं आपला चौकशीचा विषय मर्यादित आहे. भाषान्तर तपासतांना **काव्यपरीक्षणात्मक** विचार करून मूळांत जे फेरफार केले असतील, तेच लक्षांत घ्यावयाचे आहेत, आणि मांडावयाचे आहेत ' ( पृ. १३६ ). पुढेहि ' आपल्यास भाषान्तरापासून **काव्यपरीक्षण** काढण्यास असलींच स्थळें शोधलीं पाहिजेत ' असें म्हणून आपल्या मर्यादित हेतूचा पुनरुच्चार केतकरांनी केला आहे. तेव्हा काव्यपरीक्षणाचा इतिहास, काव्याचें परीक्षण नव्हे, हाच प्रस्तुत निबंध लिहिण्याचा उद्देश होता हें स्पष्ट आहे.

डॉ. केतकर या विषयाकडे कां वळले याला कांही इतिहास आहे. तो त्यांनी या निबंधाच्या प्रस्तावनेंत सांगितला आहे. केतकरांनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या, त्यांविषयी जी बरीच प्रशंसात्मक किंवा निंदात्मक टीका झाली तीवरून आपल्या कादंबऱ्यांतील ज्या गोष्टींविषयी वाचकांत ( अनुकूल मत प्रकट करणाऱ्यांतहि ) 'अभिज्ञता' दिसावयास पाहिजे होती, त्या गोष्टींविषयी निंदक आणि मित्र या दोघांतहि चांगली जाणीव दिसली नाही. तेव्हा ग्रंथपरीक्षणात्मक तत्त्वांच्या बाबतींत आपणच कांही सांगितलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. तथापि केवळ स्वसमर्थनार्थच न लिहितां जरा व्यापक, तात्त्विक, आणि स्वग्रंथनिरपेक्ष असें पुस्तक लिहावें असें ठरविलें. असें करितांना इतर लेखकांच्या परीक्षणांचा आढावा घेण्याचा विचार त्यांना सुचला. महाराष्ट्रांत एतद्विषयक विचार कितपत झाला आहे, तें पाहूनच आपल्याला काव्यरसज्ञतेविषयी जें कांही सांगावयाचें आहे तें सांगावें असें वाटलें. म्हणून विविधज्ञानविस्ताराच्या आरंभापासून ( इ. स. १८६७) मराठींमध्ये झालेलीं पुस्तकपरीक्षणें पाहिलीं. त्यांचा संग्रह चालू असतां 'काव्यपरीक्षणाची जाहिरात दिली. त्या वेळीं अर्वाचीन काव्यपरीक्षणच डोळ्यांपुढे होतें. जाहिरात देतांना जुन्या मराठी ग्रंथकारांमध्ये जी काव्यचिकित्सात्मक बुद्धि दिसून येते, तिचा आढावा घेऊन मग अर्वाचीन काव्यपरीक्षण मांडावें असें वाटलें, आणि त्याचें फल म्हणून प्रस्तुत निबंध लिहिला गेला. अर्वाचीन काव्यपरीक्षण राहून गेलें. काव्यरसज्ञतेविषयी तात्त्विक, विशिष्ट ग्रंथनिरपेक्ष असें जें कांही सांगावयाचें ठरविलें होतें तेंहि अर्थात् झालें नाही, आणि हें सारें जें आपल्या कादंबऱ्यांच्या समर्थनार्थ करावयाचें होतें, तें समर्थनहि राहून गेलें.

परंतु ज्या ब्रिटिशसत्तापूर्व महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणाचा इतिहास द्यावयाचें केतकरांनी अखेरीस ठरविलें, तें काव्यपरीक्षण मुळांतच त्याचा इतिहास सांगण्याइतकें विस्तृत वा भरीव नाही हें त्यांच्या लक्षांत यावयास फार वेळ लागला नसावा. निबंधाच्या पहिल्या परिच्छेदांत 'मराठी कविता जितकी जुनी आहे तितकेंच तिचें परीक्षणहि जुनें आहे' असा निर्वाळा देऊन प्रारंभ केला खरा, परंतु या म्हणण्याला प्रत्यक्षांत विशेष अर्थ नाही हे त्यांना पुढे सांगावें लागलें. आपल्या जुन्या वाङ्मयांत अधूनमधून कांही

अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नोंद दि ..................


काव्यविषयक विचार प्रकट झाले असले, तरी ज्याला ग्रंथपरीक्षण किंवा काव्यपरीक्षण असें म्हणतां येईल असें खरोखर फारसें कांही झालेलें नाही हें त्यांनी मधूनमधून स्पष्टपणें सांगितलें आहे. ते म्हणतात, ' जुन्या कवींनी आपले अभिप्राय पूर्वीच्या कवींवर व्यक्त केले आहेत, पण त्यांत त्या कवींच्या काव्यगुणावर विवेचन नाहीच असें म्हटलें तरी चालेल (पृ. ४३.)' पुनः एकदा, ' त्यांचे ( संतकवींचे ) इतर संतकवींविषयी जे अभिप्राय आहेत, ते ते संत या नात्याने त्यांच्याविषयी आदर दाखविण्याच्या स्वरूपाचे आहेत. कवींनी आपल्या पूर्वगामींच्या ग्रंथांची काव्यदृष्टीने चिकित्सा केली नाही ( पृ. ५७ ), असें ते सांगतात. एकनाथांनी आपल्यापूर्वीच्या कवींविषयी स्तुतिपर अभंग लिहिले अथवा त्यांचीं चरित्रें सांगितलीं, परंतु त्यांच्या-विषयी मत व्यक्त केलें नाही ( पृ. ४० ) असें त्यांनी आणखी एके ठिकाणीं म्हटलें आहे. आपल्याच कवितेवर आपणच मत व्यक्त करण्याची प्रथा दिसते, पण ह्या व्यक्त केलेल्या मताने परीक्षणपद्धति स्पष्ट होते असें म्हणतां येत नाही असेंहि त्यांनी सांगितलें आहे ( पृ. ६८ ). सर्व जुन्या कवींत मोरोपंतांनी इतर कवींच्याविषयी अधिक लिहिलें आहे, परंतु त्याचाहि काव्यपरीक्षणदृष्ट्या कांही उपयोग नाही हें केतकरांनी स्पष्ट केलें आहे. ते म्हणतात, ' प्रत्येकाची स्तुति करूनहि मार्मिकता दाखविण्याचा प्रयत्न करणें हें मोरोपंतांना शक्य होतें, पण मोरोपंतांची इच्छा परीक्षणदृष्टीची नव्हती, केवळ काव्य करण्याची होती ( पृ. १७० ). त्यांतून कोठे कांही मतप्रदर्शन मोरोपंतांकडून झालेंच असलें, तर त्यांत यमकमूलकतेचा भाग बराच असे असें त्यांना वाटतें आणि ते म्हणतात, ' यमकसाधू मोरोपंताच्या अभिप्रायास महत्त्व देण्याची चुकी फार लोकांकडून झाली आहे ( पृ १७२ ). सन्मणि-मालेंत कोणत्याहि कवीवर मोठें मार्मिक मत वा विधान मोरोपंतांनी केलेलें नाही असें केतकर त्रिवार सांगतात ( पृ. १७१, १७२, १७३ ). शेवटीं समारोपांत निष्कर्ष म्हणून केतकर म्हणतात : पूर्वगामींच्या काव्याचें पृथक्करण करून गुणावगुणांचें परीक्षण करण्याची पद्धति नव्हती ( पृ. २२२ ). व्यक्तीवर केलेल्या श्रद्धेच्या मागणीमुळे परीक्षणपरता दुर्बल झाली होती, परीक्षण करण्यासाठी जें मानसिक स्वातंत्र्य अवश्य लागतें तें मानसिक स्वातंत्र्य संप्रदायबद्ध संतकवींना नव्हतें ( पृ. २२२ ), अशी या परीक्षण-

वाङ्मयाच्या अभावाची मीमांसाहि त्यांनी कांहीशी केली आहे. सारांश, जुन्या मराठीमधील काव्यपरीक्षण देण्याचा प्रयत्न म्हणजे ' अगा जें झालेंचि नाही ' त्याची वार्ता पुसण्यासारखा होता.

मग ज्याला केतकरांच्याच निष्कर्षाप्रमाणे मुळांत फारसा आधार किंवा विषय नव्हता, त्याविषयी डॉ. केतकरांनी एवढा प्रपंच तो काय आणि कसा केला अशी जिज्ञासा वाचकाला साहजिकच वाटते. प्रत्यक्ष परीक्षणाच्या दृष्टीने कांही हातीं लागत नसल्याने अप्रत्यक्षपणें झालेल्या मतप्रदर्शनावरच केतकरांना भर द्यावा लागला आहे. प्रस्तावनेंतच डॉ. केतकर म्हणतात, ' जर परीक्षण स्पष्ट शब्दांनी व्यक्त होत असलें, तर मत अप्रत्यक्ष कसें व्यक्त होतें तेंच गोळा करून मुद्रणपूर्व-काळाचें परीक्षण मांडिलें आहे.' परीक्षण स्पष्ट शब्दांनी होतें; मतप्रकटन अप्रत्यक्षपणें होऊं शकतें असेंच त्यांना यामध्ये म्हणावयाचें आहे. केतकर म्हणतात, ' एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास हें सर्व परीक्षण अहेतुक झालें आहे, यापेक्षा निराळ्या तऱ्हेने म्हणजे सहेतुक झालें नाही ' ( पृ. २१३ ). वस्तुतः तें परीक्षण या नांवास पात्रच ठरत नाही; तें अप्रत्यक्षपणें झालेलें मतप्रदर्शन होय. त्याचा इतिहास म्हणजे वाङ्मयाभिरुचीचा इतिहास म्हणावा लागेल. त्याला मराठी काव्याचें परीक्षण अधिक उपयोगी पडलें असतें. पण केतकरांनी तें करावयाचें नाही असें आरंभींच ठरविलें होतें. महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण म्हणजे त्यांच्या काव्याचें परीक्षण नव्हे, त्यांनी केलेलें काव्याचें परीक्षण असा स्पष्ट खुलासाहि केलेला होता.

महाराष्ट्रीयांच्याकडून अहेतुकपणें जें मतप्रकटन झालें तें मुख्यतः तीन मार्गांनी झालें असें त्यांनी सांगितलें आहे. ते तीन मार्ग म्हणजे आदरव्यक्ति, भाषान्तर आणि अनुकरण हे होत. त्यांतहि आदरव्यक्ति या 'क्रिये'ला काव्यपरीक्षणाच्या दृष्टीने राहोच, परंतु अनुकूल मतप्रकटनाच्या दृष्टीनेहि कांही महत्त्व नसल्याचें केतकरांनी सांगितलें आहे. कारण हा आदर कवि म्हणून व्यक्त झालेला नसून संत म्हणूनच बहुधा व्यक्त झालेला होता. संतांना 'काव्याची प्रेरणा ज्या भक्तीमुळे होई, त्या भक्तीची व त्या कवींच्या आत्मज्ञानाची अभिज्ञताच या आदरव्यक्तीमध्ये असे ( पृ. ४४ ). एवढेंच नव्हे,

क्रमांक (७) १५६६.... नों: दि: २२।२।६५

तर ज्या मानाने व्यक्तीचें महत्त्व संतमंडळांत असे, त्या मानाने त्या व्यक्तीवर उत्तरकालीन कवींकडून काव्यपुष्पें अधिक उधळलीं जात ( पृ. ४४ ). दासोपंतांइतकें वाङ्मय फारच थोड्या कवींनी लिहिलें असून आणि त्याची विद्वत्ता इतर अनेक कवींपेक्षा अधिक असून त्याची प्राचीन कवींमध्ये मोठी चहा होती असें नाही असेंहि उदाहरणादाखल त्यांनी सांगितलें आहे. अभिज्ञतेचा दुसरा मार्ग म्हणजे दुसऱ्या भाषेंत भाषान्तर करण्याचा. अशीं ( संस्कृत ) भाषान्तरें होण्याचा मान विवेकसिंधु व अमृतानुभव या ग्रंथांना लाभला असल्याचें त्यांनी दाखवून दिलें आहे. परंतु हीं उदाहरणें अपवादभूतच आहेत, व त्या मार्गानें झालेलें मतप्रकटन हाताला फारसें लागत नाही हें उघडच आहे. तिसरा मार्ग अनुकरणाचा. अनुकरणासारखा स्तुतीचा दुसरा कोणताच प्रकार नाही हें मान्य करावयास हवें. डॉ. केतकरांनी नामदेवाच्या ' मनास उपदेशा 'चें अनुकरण एकनाथ, रामदास आणि वामन यांनी केल्याचें निदर्शनास आणलें आहे; आणि त्यांतून या उत्तरकालीन कवींनी मूळाबद्दलची आपली अभिज्ञता, अनुकूलता, प्रीति, पसंती कशी व्यक्त केली आहे तें सांगितलें आहे. अनुकरणाचीं आणखी पुष्कळच उदाहरणें केतकरांना देतां आलीं असतीं. सीतास्वयंवरें, रुक्मिणीस्वयंवरें, भारतरामायणांचे अनुवाद, दशम आणि एकादश स्कंधावरील टीका, अभंग, पोवाडे आणि लावण्या यांत पुष्कळच भाग अनुकरणात्मक आहे याबद्दल दुमत होणार नाही. परंतु यांतून सामान्य स्थूल असें अनुकूल मतप्रकटन होत असतें. त्यांतून परीक्षणाचे कण मिळूं शकतील; नाही असें नाही. तथापि परिश्रमाच्या मानाने प्राप्ति फारच अल्प होईल. या मार्गानें होणाऱ्या मतप्रकटनाचाहि केतकरांनी फारसा पाठपुरावा केला नाही, नुसतें दिग्दर्शन केलें आहे.

अप्रत्यक्ष किंवा अहेतुक परीक्षणाचे हे तीन प्रकार दिग्दर्शित केल्यावर आणखीहि १–२ प्रकारांचें दिग्दर्शन केतकरांनी या ग्रंथांत केलें आहे. पहिला प्रकार हा संस्कृत ग्रंथांच्या मराठी अनुवादांमधून व्यक्त होणाऱ्या मतांचा आहे. याबद्दलचें विवेचन त्यांनी भाषान्तरकार आणि त्यांचें मूळ परीक्षण या प्रकरणांत केलें आहे. संस्कृतमधील भारत, भागवत आणि रामायण यांचे किंवा त्यांतील फुटकळ कथांचे अनुवाद मराठीमध्ये पुष्कळच झालेले आहेत. यांना भाषान्तर म्हणणें बरोबर नाही, ते मराठी कवींनी

केलेले मूळ कथेचे अनुवाद आहेत; मूळ कथा आपल्या शब्दांनी आपल्या पद्धतीने सांगितल्या आहेत. केतकरांनी त्यांचा उल्लेख मात्र भाषान्तर याच शब्दाने केला आहे. या बाबतींत त्यांचें मत पुढे दिलेल्या उताऱ्यावरून स्पष्ट होईल:– " मराठींतील भाषान्तरें पुष्कळच आहेत, आणि त्या भाषान्तरांत कवीचें मूळग्रंथावर परीक्षण दिसून येतें. भाषान्तरांमधील भेदस्थळें गोळा केलीं म्हणजे भाषान्तरकारांचीं मूळग्रंथविषयक मतें कळतात. भारत, भागवत, रामायण हे ग्रंथ मोठाले आहेत; त्यांत प्रसंग अनेक आणि अत्यंत विविध आहेत; आणि त्यांपैकी अनेक प्रसंगीं भाषान्तरकारांना मूळग्रंथांतील वर्णन अपूर्व किंवा कमी सरस वाटून त्यांनी आपापल्या मतीने फरक केले आहेत " (पृ. १४८ ). केतकरांनी मोरोपंतांचें उदाहरण घेऊन त्यांचें मूळपरीक्षण विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. ' मूळ भारतीय वातावरणास चिकटून राहणाऱ्या मोरोपंताच्या ग्रंथाचें मूळ ग्रंथाशीं परीक्षण मराठी भाषान्तरतत्त्वें आणि भाषान्तरकाराचीं काव्यपरीक्षणतत्त्वें उत्तम तऱ्हेने उजेडांत आणील यांत शंका नाही असें ते सांगतात. केवळ मोरोपंतांच्याच बाबतींत हा खटाटोप फारच मोठा झाला असता; इतर ग्रंथकारांचें दूरच राहो. म्हणून केतकरांना याविषयी दिग्दर्शन करण्यापलीकडे महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणाविषयी अधिक सांगतां आलें नाही यांत नवल नाही. याहि बाबतींत भाषान्तरकार जे फेरफार करितो, त्यांतील '**कांहीं फेरफारांत तो काव्यपरीक्षणात्मक तत्त्वें वापरतो, सर्वच फेरफारांत वापरीत नाही** ' हेंहि ते सांगून ठेवतात (पृ. १३६ ). आपल्या भारताच्या ' भाषान्तरां 'त मोरोपंतांनी अनेक ठिकाणीं मूळांत नसलेले नीतिपर सामान्य विचार अर्थान्तरन्यासाच्या रूपाने घातले आहेत. त्यामुळे भाषान्तराची किंमत वाढत असली तरी ' कवीचा मूळावर अभिप्राय व्यक्त होत नाही ' ( पृ. १३७ ) हेंहि त्यांनी सांगितलें आहे.

यानंतर संतचरित्रपर वाङ्मयाचा परामर्श त्यांनी घेतला आहे. जुन्या वाङ्मयनिर्मात्यांत अनेक संतकवि होते. या संतांच्या चरित्रांत त्यांचें काव्याविषयी मतप्रकटन, म्हणजे केतकरांच्या मताने काव्यपरीक्षण, झालें असण्याचा संभव होता. संतचरित्रें म्हणजे कविचरित्रेंच होतीं. पण या मार्गाने काव्यपरीक्षण हातीं लागत नाही असेंच केतकरांना सांगावें लागलें आहे. 'मराठी संतकवींचे

चरित्रकार कांही उपयुक्त काव्यचर्चा करीत असतील अशा अपेक्षेने जर आपण त्यांचे काव्यग्रंथ चाळूं लागलों तर मात्र निराशा होईल. चरित्र-कारांचें संत म्हणून व्यक्तीकडे लक्ष होतें,' कवि म्हणून नव्हतें; म्हणून हें झालें असें या वस्तुस्थितीचें कारण म्हणून ते सांगतात. यांतील मोरोपंत आणि महिपति हे बाजूला काढून त्यांनी जे निष्कर्ष काढले, ते या निराशेचाच पुनरुच्चार करीत आहेत. मोरोपंतांच्या सन्मणिमालेंत कोठेच मार्मिकता दिसून येत नाही असें त्यांनी पुनः पुनः सांगितलें आहे, आणि 'महिपतीच्या भक्तविजयांत अनेक चरित्रें आलीं आहेत, त्यांतून प्रस्तुत पुस्तकांत घेण्याजोगें थोडेंच आहे' ( पृ. १७८ ) असा निर्णय दिला आहे. महिपतीविषयींचें अधिक विवेचन पाहून काव्यपरीक्षणाच्या दृष्टीने विशेष फायदा होत नाही असेंच म्हणावें लागतें. मराठी वाङ्मयांतील काव्यग्रंथांचा पाठभेदाचा अभ्यास हाहि काव्यपरीक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरण्यासारखा आहे. नवीन आलेल्या पाठांमुळें मूळच्या पाठाबद्दल नापसंती व्यक्त होऊन मूळ ग्रंथांतील शब्दयोजनेबद्दल मतप्रकटन होतें. मूळांत अशिष्ट शब्द असल्यास त्या ठिकाणीं शिष्ट शब्द घालण्याचा प्रयत्न होतो. अशिष्ट वाङ्मयाचें शिष्टीकरण होतें असा वाङ्मयपरीक्षण शोधण्याचा आणखीहि एक मार्ग केतकरांनी सुचविला आहे. या दृष्टीने उदाहरणें म्हणून संस्कृत-मधील एकदोन पाठभेदांचा उल्लेख त्यांनी केला आहे. परंतु मराठीबाबत तेवढेंहि न करितां फक्त अंगुलिनिर्देशावरच भागविलें आहे.

सारांश, महाराष्ट्रीयांच्या काव्यपरिक्षणाचा इतिहास लिहिण्याची जी प्रतिज्ञा डॉ. केतकर यांनी केली होती, ती सिद्धीला गेली असें म्हणवत नाही. यांत त्यांचा दोष विशेष नाही; कारण प्रत्यक्ष किंवा सहेतुक असें ग्रंथपरीक्षण, अर्थात् काव्यपरीक्षणहि, जुन्या मराठीमध्ये झालेंच नाही. कवींविषयी जें कांही मतप्रकटन झालें, तेंहि कवि म्हणून होण्यापेक्षा आदरणीय व्यक्ति म्हणून झालें. अप्रत्यक्ष अथवा अहेतुक अशा मत-प्रकटनाला अनेक वेळां परीक्षणाचें स्वरूप नव्हतेंच; फक्त पसंती किंवा आवड त्यांतून व्यक्त होई. ज्या मार्गांनी यापेक्षा थोडें अधिक कळावयाचें, त्या मार्गांचें दिग्दर्शन करणें एवढेंच शक्य होतें. त्यावरून त्या मार्गांनी गेल्यास महाराष्ट्रीयांचा काव्यविवेक अधिक कळून येईल एवढें लक्षांत येतें

इतकेंच; तो कोणत्या स्वरूपाचा होता हें अर्थात् कळत नाही. काव्यपरीक्षण हें काव्याभिरुचि समजण्याचें एक साधन आहे हें खरें, पण तिचा इतिहास लिहावयाचा नाही हें बंधन केतकरांनी प्रथमच आपल्यावर घालून घेतलें होतें. म्हणून मग मुख्य विषयापासून कांहीसें दूर जाऊनच त्यांना प्रपंच करावा लागला. ' शिवकालीन वाङ्मया 'वरील मोठें प्रकरण त्या कालांतील वाङ्मयाचा कोश म्हणून फार उपयुक्त असलें, तरी मूळ विषय-विवेचनास त्याचा कांही उपयोग झाला असें दिसत नाही. ' गीर्वाण वाङ्मयशास्त्रें व मराठी ग्रंथकार ' या अगदी लहान प्रकरणाची हीच स्थिति आहे. ' चरित्रकार ' हें प्रकरणहि कोशाच्या स्वरूपाचेंच उतरलें आहे. शेवटल्या तीन-चार प्रकरणांचीहि तशीच गत आहे. ग्रंथारंभीं डॉ. केतकरांना काव्यपरीक्षणाबाबत विशेष आशा वाटत असावी. परंतु पुढे पुढे या प्रयत्नामधून फारसें निष्पन्न होत नाही असें दिसून आलें असावें. म्हणून इतर चर्चेने आणि माहितीने भरपाई करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षणच केवळ द्यावयाचें हें बंधन घालून घेण्यापूर्वी महाराष्ट्रीयांच्या अभिज्ञतेचा इतिहास द्यावा असें त्यांच्या मनांत असावें. तसें ते म्हणतातहि. तें असें:— लोकांच्या अभिज्ञतेचाच इतिहास निराळा काढून मांडल्यास एकंदर वाङ्मयाच्या इतिहासास मदत केल्यासारखेंच होईल ( पृ. ६ ). ही अभिज्ञता दोन तऱ्हांनी व्यक्त होते. लोक जेव्हा काव्य-विषयक तात्त्विक चर्चा करितात तेव्हा आपलीं मतें प्रदर्शित करितात, व त्याप्रमाणेच दुसऱ्या एखाद्या कवीवर मत देतात तेव्हा ती प्रदर्शित करितात असेंहि पुढे ते म्हणतात, आणि नंतर या दोन्ही प्रकारचें साहित्य जमा करून महाराष्ट्राच्या काव्यविषयक सापेक्ष अभिरुचीचा आणि निरपेक्ष कल्पनांचा इतिहास आपणांस द्यावयाचा आहे असें आश्वासनहि देतात ( पृ. ७ ). पुढे मात्र हें विधान नियमित करून घेऊन केवळ काव्यपरीक्षणाचाच विचार हें आपलें मर्यादित क्षेत्र असल्याचें ठरवून विवेचन करितात.

परंतु जुन्या मराठी वाङ्मयांत ग्रंथपरीक्षण जसें झालें नाही, तशी तात्त्विक चर्चाहि फारशी झाली नाही. कारण काव्यचर्चा करणें हा लेखकांचा उद्देशच

नसे. याला कांहीसा अपवाद रामदासांचा. काव्य या शब्दाच्या स्वतःच्या अर्थानें का होईना, रामदासांनी बरेंच कांही लिहिलें आहे. त्याची चर्चा करितांना डॉ. केतकर यांनी त्याचें साहित्यशास्त्रच बनविलें आहे. रामदासांनी साहित्यशास्त्रीय विचार अगदी स्वतंत्र केला आणि तो संस्कृत ग्रंथकारांच्या पुढे नेला आहे ( पृ. ७८ ) असेंहि ते सांगतात. रामदासांनी कवित्व कसें असावें, आणि तें कसें नसावें, तसेंच तें किती प्रकारचें असतें, त्याचप्रमाणे त्याचें प्रयोजन काय असावें, इत्यादि गोष्टी दासबोधांत दशक १४, समास ३ मध्ये सांगितल्या आहेत. त्याचप्रमाणे दशक १, समास ७ मध्ये कवीश्वर कसे असतात, तेंहि विस्ताराने सांगितलें आहे. यामुळे हा सर्व विचार केतकरांना रामदासांचें साहित्यशास्त्र म्हणून एका प्रकरणांत मांडितां आला. प्राचीन मराठीमधील इतर कोणाहि कवींपेक्षा रामदासांनी अधिक काव्यविचार मांडिला यांत शंका नाही. रामदास कवि हा शब्द ज्ञानी या अर्थाने योजतात हें केतकरांनी दुसरीकडे निदर्शनास आणलें आहे ( पृ. १८ ). त्यामुळे त्यांचें काव्यप्रयोजनहि वेगळें ठरतें. ‘ जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे । भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ’, असें त्यांचें मत आहे. रामदासांनी केलेले धीट, पाठ इत्यादि काव्याचे प्रकार नवीन आहेत, परंतु त्यांत तर्कशास्त्रीय शुद्धि राखली नाही असें केतकर सांगतात. जो पारमार्थिक नव्हे तो ग्रंथच नव्हे असें जें रामदास म्हणतात, तें मत जरासें आग्रही दिसतें असेंहि ते सांगतात. लौकिक ग्रंथास तो ग्रंथच नव्हे असें जें रामदास म्हणतात ती केवळ आलंकारिक भाषा आहे, असें ते म्हणतात. रामदासांना सावरून घेण्याचा डॉ. केतकरांचा प्रयत्न आहे असें वाटतें. रामदासांचीं साहित्यशास्त्रीय सर्व मतें अगदी बरोबर आहेत असें नाही असें म्हणूनहि या विचारांच्या मांडणींत साहित्यशास्त्रीय विचार पुढे सरकला आहे खास असें आपलें मत ते देतात ( पृ. ९१ ). मराठींत यापूर्वी इतक्या विस्ताराने तर नाहीच, परंतु लक्षांत येईल एवढाहि काव्यविषयक विचार सहेतुकपणें कोणी मांडिला नव्हता, रामदासांनी तो मांडला या अर्थाने रामदासांनी साहित्यशास्त्रीय विचार पुढे सरकविला हें म्हणणें योग्य ठरेल, परंतु त्याआधी संस्कृतमध्ये होऊन गेलेल्या विचाराच्या पुढे तो रामदासांनी नेला असें जें केतकरांना म्हणावयाचें आहे, तें

त्यांनीच रामदासांच्याविषयी लिहितांना म्हटल्याप्रमाणे ' आग्रही ' अथवा ' आलंकारिक ' म्हणावें लागेल.

रामदासांनी धीट, पाठ, धीटपाठ आणि प्रासादिक असे जे कवींचे प्रकार सांगितले आहेत, ते आपल्या कालांतील कवींवरूनच केले असावेत; तेव्हा त्यांच्या कालांत कोणकोणते कवि झाले व त्यांनी काय काय लिहिलें त्याची एक प्रदीर्घ यादी त्यांनी पुढील प्रकरणांत दिली आहे. तींत नुसते काव्यग्रंथ नसून शास्त्रीय ग्रंथही आले आहेत संस्कृत आणि हिंदी कवि व काव्यें यांचींहि नांवें आलीं आहेत. परंतु या ३५ पानी दीर्घ प्रकरणाचा काव्यपरीक्षणदृष्ट्या केतकरांनी कांही उपयोग करून घेतला असें दिसत नाही. तसा उपयोग होण्यासारखा नसावाहि.

महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणाविषयी आणि त्यांच्या काव्यचर्चेविषयी एवढें सांगितल्यावर त्यांच्या काव्याभिरुचीबद्दल डॉ. केतकरांनी विवेचन केलें आहे. मात्र काव्याभिरुचि असें न म्हणतांना काव्यग्राहकता असा शब्द त्यांनी योजिला आहे. यांत काव्य शब्दाने खरोखरचें काव्य त्यांना अभिप्रेत नव्हतें आणि ग्राहकता शब्दाने उच्च अभिरुचीहि अभिप्रेत नव्हती. काव्य म्हणजे कोणतीहि गोष्ट आकर्षक करण्याचा गुण एवढीच त्यांची कल्पना आहे. पद्य हें या दृष्टीने उपयोगी पडतें म्हणून त्याला तें काव्यांत महत्त्व देतात. ' साधेंच वाक्य पद्यांत सांगितलें असतां ते लोकांच्या मनांत लवकर **अडकतें** व आकर्षकहि होतें,' असें ते म्हणतात ( पृ. १९१ ). या दृष्टीने यमक-अनुप्रासादिकांचाहि उपयोग होतो, कारण त्यामुळे अर्थ लोकांकडून ग्रहण केला जातो. लोकांमध्ये काय ग्रहण होईल याविषयीची वस्तुस्थिति पाहून काव्यनियम काढण्याची कृति अजून झाली नाही. लोकप्रियता अगर लोकग्रहण या काव्याच्या अंतिम कसोट्या ठरवून धैर्याने त्याप्रमाणे प्रत्यक्षमूलक शास्त्ररचना करणें ही क्रिया साहित्यशास्त्रांत अजून व्हावयाचीच आहे असें त्यांचें मत होतें. काव्यग्रहण म्हणजे समाजाने वाङ्मयांतील भाग उपयोगी करून घेणें होय असें ते सांगतात. त्यामुळे केतकरांनी महाराष्ट्रीय समाजाने ग्रहण केलेल्या इ. स. १९०० च्या सुमाराचें वाङ्मय पुढीलप्रमाणे ठरतें :—( १ ) अडगुलं मडगुलं इत्यादि मुलांस

झोपविण्यास उपयुक्त गीतें किंवा तुळशीखाली पोथ्या वाचणाऱ्या रामाच्या ओव्या, ( २ ) मुंजीपूर्वी मुलें म्हणत असलेलीं स्तोत्रें अथवा त्यांनी पाठ केलेले कांही श्लोक, ( ३ ) मुली पाठ करीत असलेलीं रामकृष्णांचीं गाणीं. याशिवाय निश्चयात्मक **नित्य** वापरलें जाणारें कोणतेंच मराठी वाङ्मय सर्वतोमुखीं नाही. याशिवाय नैमित्तिक उपयोगांत येणाऱ्या वाङ्मयांत आरत्या, तसेंच पांढरपेशा समाजाच्या गरजेचें पण धंदेवाईक लोकांच्या हातांत गेलेलें वाङ्मय म्हणून संस्कारप्रसंगीं लागणारे मंत्र, लग्नमुंजीनंतरचे गोंधळ व त्यांत म्हटले जाणारे पोवाडे, गव्हले, शेवया, वाती करावयास जमलेल्या बायकांचीं सीतासावित्रीचीं गाणीं, भोजनप्रसंगीं म्हणावयाचे श्लोक इत्यादि गोष्टींचा उल्लेख केतकरांनी केला आहे. महाराष्ट्रीयांच्या काव्य-ग्राहकतेविषयी लिहीत असतांना केतकर हे महाराष्ट्रीयांची थट्टाच करीत आहेत की काय असें वाटतें. बाकी काव्य म्हणजे कोणतीहि गोष्ट ऐक-णाराच्या मनांत **लवकर अडकून** राहील असें करण्याचा म्हणजेच आकर्षक करण्याचा गुण, आणि ग्राहकता म्हणजे दररोजच्या जीवनांत उपयोग करून घेण्याची वृत्ति, असेच ज्यांचे अर्थ आहेत, त्यांनी असेंच लिहावें यांत आश्चर्य नाही.

काव्यपरीक्षण, काव्याभिरुचि आणि काव्यग्राहकता यांविषयी केतकरांनी जें सांगितलें आहे, तें या स्वरूपाचें आहे. केतकरांच्या या लेखनाचें महत्त्व एवढ्याने संपत नाही. किंबहुना त्यांनी ज्या इतर गोष्टी सांगितल्या आहेत त्यांनीच त्याचें महत्त्व विशेष जाणवतें. जुन्या मराठी वाङ्मयाच्या अभ्यासांत आणखी किती व कशी भर टाकतां येण्यासारखी आहे, तो अधिक भरीव व व्यापक कसा होईल याविषयी त्यांनी केलेलें दिग्दर्शन फार महत्त्वाचें आहे. ठिकठिकाणीं ते याविषयी सूचना देतात. आपल्या प्रस्तावनेंत त्यांनी त्या एकत्रित करून पुन्हा मांडिल्या आहेत. गेल्या पस्तीस वर्षांत त्या दिशेने कांही प्रयत्न झाले आहेत, परंतु अजूनहि कित्येक सूचनांच्या दिशेने कांही प्रयत्न झाला आहे असें दिसत नाही उदाहरणार्थ, लोकप्रिय कवीच्या काव्याचे पाठभेद लक्षांत घेऊन त्यामागील हेतूंचा शोध घेतला गेलेला दिसत नाही, अशिष्ट वर्गाचें वाङ्मय शिष्टवर्गाचें होत जातें व लोकमतांत फेर पडतांना ग्रंथावृत्तींतच फेर पडत जातात याचाहि अभ्यास व्हावयाचाच आहे.

मराठींतील चरित्रवाङ्मयाचा अभ्यास करून हीं चरित्रें कोणत्या साहित्यावर तयार झालीं व कोणी कोणापासून माहिती उसनी घेतली हेंहि अजून अभ्यासाचा विषय झालेलें नाही. त्यांनी निर्दिष्ट केलेल्या दिशांनी जाणें हें काम कष्टाचें आहे हें खरें, आणि आजच्या जमान्यांत तें लोकांच्या डोळ्यांत भरणारें आहे असेंहि दिसत नाही. परंतु तें झाल्यास जुन्या मराठी वाङ्मयावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे यांत शंका नाही.

केतकरांनी मराठी वाङ्मयाविषयी ठिकठिकाणीं आपले विचार प्रकट करून ठेवले आहेत, तेहि महत्त्वाचे आहेत. मराठी वाङ्मय हें जवळ जवळ पूर्णपणें लोकाश्रयी आहे, त्यामुळे राजाश्रयी वाङ्मयाचे घाणेरडे गुण त्यास लागले नाहीत, संतवाङ्मय हें पूर्वीच्या संस्कृत वाङ्मयापेक्षा निराळ्याच प्रवृत्तीमधून निर्माण झालेलें आहे, ज्ञानेश्वराचे पूर्वगामी हे परंपरागत संप्रदायाविरुद्ध असलेले धार्मिक प्रतिस्पर्धीच ठरतात; संस्कृत अक्षरगणवृत्तांचा स्वीकार न करण्यांत वृत्तांमुळे रसापकर्ष होतो ही संतांची भावना होती; जनता फार टीका करीत नाही, पण ग्रंथकाराचें भवितव्य निश्चयेंकरून ठरविते; मराठीला द्राविड, तेलगू व कानडी या भाषांशी तुलना करितां गौणत्व येतें; संगीत–रत्नाकराचा कर्ता शार्ङ्गदेव, बोपदेव, हेमाद्रि, भास्कराचार्य यांसारखे एकंदर ग्रंथकार घेतले, तर ज्ञानेश्वराच्या एकसूर्यतेची कल्पना कमी होऊं लागेल; मुकुंदराज, ज्ञानेश्वर, महानुभाव यांच्या अगोदर मराठी-मध्ये काव्यें करणारा एक जुना वर्ग होताच आणि तो म्हटला म्हणजे लावण्या, पोवाडे करणारांचा होय; दासबोध हें काव्य नसून एक मोठें विचारभांडार आहे; कुणब्यांचें वाङ्मय अश्लील असतें व ब्राह्मणांचें नसतें असें नाही; ब्राह्मणांमध्ये संत आणि भक्त बरेच झाले आहेत पण ब्राह्मणांची एकंदर वृत्ति भक्तीकडे फारशी दिसत नाहीं; हीं आणि अशींच इतर महत्त्वाचीं आणि विचारास चालना देणारीं विधानें त्यांनी या ग्रंथांत इतस्ततः विखरून दिलेलीं आहेत. केतकरांचीं कांही मतें वाचकास धक्का देणारींहि आहेत. उदाहरणार्थ, ( १ ) लावण्या करणाऱ्या मंडळींचा कवि शब्दावर हक्क ब्रह्मज्ञानावर ओवीबद्ध लिहिणारांपेक्षा जास्त आहे ( पृ. १८ ); मराठींत उच्च स्वरूपाचें वाङ्मयच झालें नाही ( पृ. २०७ ); ज्ञानदेव हा केवळ उच्च विषय अत्यंत सोप्या भाषेंत प्राकृत लोकांसाठी सांगणारा शिक्षक दिसतो

(पृ. ३१); भयंकर मत्सरपिशाचिकेने तुकारामबोवांस पछाडलें होतें (पृ. ७४); तुकारामाच्या अभंगांत निर्भय मनोवृत्तीच्या व्यक्तीचें तेज मुळींच दिसत नाही ( पृ. २१२ ); फारशी भाषेशीं झगडा करण्याचें श्रेय त्यांचें (संतांचें) नाही ( पृ. १०६ ). हीं विधानें पटण्यासारखीं न वाटलीं तरी त्यांचा विचार केला पाहिजे असें मात्र वाटतें. केतकरांचा हा ग्रंथ मुख्य विषयाच्या मानाने या इतर मतप्रकटनामुळेच विचारप्रक्षोभक झाला आहे असेंहि म्हणतां येईल.

डॉ. केतकर यांची वाङ्मयविषयक दृष्टि प्राधान्याने समाजशास्त्रीय होती. या गोष्टीचा परिणाम त्यांच्या सर्वच विवेचनावर झाला आहे. काव्य म्हणजे कोणतीहि गोष्ट आकर्षकपणें सांगण्याची पद्धति असें त्यांचें मत होतें. वर्णनीय विषय रोचक व्हावा एतदर्थ त्यांत मिसळावयाचा गुण किंवा द्रव्य म्हणजे काव्य असें काव्याचें भाववाचक लक्षण ते करितात ( पृ. १९२ ). काव्य म्हणजे ललित वाङ्मयाचा एक विशिष्ट प्रकार ही त्यांची भावना नव्हती. कवीचा धंदा जाहिरात करण्याचा आहे असें ते सहजपणें लिहून जातात ( पृ. ८९ ), तसेंच काव्याची गरज काढतांना काव्याचें सामाजिक कार्य ओळखलें पाहिजे असेंहि ते बजावतात ( पृ. १८९ ). काव्यपरीक्षणावरील हा ग्रंथ सामान्य वाचक अनेक वेळा काव्याचा अलीकडील विशेषार्थ मनांत धरून वाचत असतो; पण विवेचन कांही वेगळेंच चाललें आहे हें पाहून तो गोंधळून जातो. मुख्य विषयापासून केतकर त्याला इकडे तिकडे दूर नेतात आणि आपण वाट चुकून भलतीकडेच आलों काय असें त्याला वाटूं लागतें. अशा वाचकाला परत वाटेवर आणून सोडण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रास्ताविकामध्ये केला आहे. यापेक्षा त्याचें निराळें समर्थन करण्याची मला आवश्यकता वाटत नाही.

२५ नोव्हेंबर, १९६४. —रा. श्री. जोग

---

# ग्रंथसंक्षेप

**प्रकरण १ लें ( पृ. १–३ )**

## प्रास्ताविक

मराठी काव्यपरीक्षणाचा इतिहास कवितेबरोबरच जन्माला आला ( पृ. १ ). संस्कृत साहित्यकारांचें मराठी वाङ्मयाकडे दुर्लक्ष झालें ( पृ. १ ). साहित्य-शास्त्रज्ञांनी प्राकृत वाङ्मयाकडे दुर्लक्ष केल्यामुळें या शास्त्राचा विकास थांबला ( पृ. २ ). साहित्य-शास्त्राचे नियम केवळ मार्गदर्शक आहेत ( पृ. २ ). काव्यपरीक्षणाचा इतिहास लोकाभिरुचीच्या इतिहासाचा भाग आहे ( पृ. ३ ).

**प्रकरण २ रें ( पृ. ४–१६ )**

## काव्य-परीक्षक आणि जनता

जनता हें काव्याचें शेवटचें न्यायासन आहे ( पृ. ४ ). रामचंद्र बडव्याने ‘ सुश्लोक वामनाचा ’ ही आर्या लिहिली तेव्हापासून लोकमतांत विशेष बदल झाला नाही ( पृ. ५ ). टीका अधिक उपयुक्त करण्याच्या व टीकाकारवर्ग अधिक जबाबदार करण्याच्या दृष्टीने काव्य-परीक्षणाचा इतिहास महत्त्वाचा आहे ( पृ. ८ ). समकालीनांकडून चहा कांहींच झाली नाही हें भवभूतीच्या बाबतींत खरें नाही ( पृ. ८ ). महाराष्ट्रीय वाङ्मय लोकाश्रयानेच वाढलें आहे ( पृ. ९ ). मराठी कवितेस दरबारी कवितेचे दुर्गुण लागले नाहीत ( पृ. १० ). मोगरे यांचें मराठी भाषाविकासावर काव्य ( पृ. १० ). हालाच्या सप्तशतीवरून प्राकृत वाङ्मयास आश्रय देण्याची राजे लोकांची पद्धति सिद्ध होत नाही ( पृ. १२ ). टीकाकारांची टीका प्रामाणिक असल्यास ती लोकमतप्रदर्शक असते म्हणून उपयुक्त आहे ( पृ. १३ ). चांगलें वाङ्मय पोसण्याइतकी जनता सुशिक्षित आहे काय ? ( पृ. १४ ). लोकाभिरुचि दुर्लक्षणें ग्रंथ-लेखकांस शक्य आहे काय ? ( पृ. १५ ).

अनुक्रम क्रमांक वि: नों: दि: स्थळप्रत.

प्रकरण ३ रें ( पृ. १७–२८ )

## भारतीय काव्य-परंपरा व मराठी संतकवी

संतकवी भारतीय कविपरंपरेंतील व्यक्ति नव्हत्या ( पृ. १७ ). कवि म्हणजे शहाणा या अर्थानें संतांस कवि म्हणतां येईल ( पृ. १७ ). संतकवींना कवि म्हणून व त्यांना लागू पडणारें वर्णन कविलक्षण समजून अर्वाचीन कवींचा उपहास करण्याची प्रवृत्ति ( पृ. १८ ). संस्कृत अध्यात्मवाङ्मयाचें विस्तरण मराठी कवींचे ग्रंथ होत ( पृ. १९ ). नवव्या शतकापासून ज्ञानेश्वरकालापर्यंत संस्कृत व कानडी वाङ्मयाचें कोश, व्याकरण, साहित्य-शास्त्र, नाट्यकथा व काव्य, संगीत व ज्योतिष या बाबतींत सिंहावलोकन आणि त्यावरून महाराष्ट्राचें वाङ्मय संस्कृत व मराठी या दोन भाषांत होतें याचें स्पष्टीकरण ( पृ. २३ ). मराठी वाङ्मय आणि महाराष्ट्राची संस्कृति ही एकच धरतां कामा नये ( पृ. २७ ).

प्रकरण ४ थें ( पृ. २९–३२ )

## संतकवींचे पूर्वगामी

संतकवींचे पूर्वगामी द्राविडांतील आळवार होते. आणि नाथसंप्रदाय आणि रामानंद यांस संतकवींचे पूर्वगामी म्हटलें पाहिजे ( पृ. ३१ ).

प्रकरण ५ वें ( पृ. ३३–४२ )

## मराठी वाङ्मयाचा पहिला काळ व कवींचें आपल्या अस्तित्वाचें समर्थन

ज्ञानेश्वरपूर्वकालांत मराठींत शिष्ट वाङ्मय नसल्यामुळे ज्ञानेश्वरकाळीं मराठींत ग्रंथ-लेखन करतांना देशभाषेंत लेखनाबद्दल माफी मागण्याची किंवा समर्थन करण्याची तऱ्हा पडली, ती महिपतीच्या काळापर्यंतहि दिसून येते. दासोपंत संस्कृतपेक्षा मराठींतच लिहिणें जास्त चांगलें असें समजत होता. व संस्कृतमध्ये लिहिणें हा दांभिक पक्ष समजत होता. दासोपंताच्या वृत्तींत आणि मराठीच्या अर्वाचीन अभिमान्यांच्या वृत्तींत फरक आहे ( पृ. ३३ ).

**प्रकरण ६ वें ( पृ. ४३–५० )**

## अभिज्ञतेचे तीन प्रकार
## —आदरव्यक्ति, भाषान्तर व अनुकरण

संतमंडळी एकमेकांविषयी आदर दाखवीत पण तो कवि म्हणून न दाखवितां संत म्हणून दाखवीत. मराठी ग्रंथांचीं संस्कृतमध्ये रूपान्तरें होत आणि कवि एकमेकांचें अनुकरण करीत. मनास बोध नामदेव, एकनाथ, रामदास व वामन या चौघांनी लिहिला आहे ( पृ. ४३ ).

**प्रकरण ७ वें ( पृ. ५१–५६ )**

## स्वकाव्यसमर्थन आणि त्याचें महत्त्व

मराठी कवि स्वकाव्याचें समर्थन करीत. ती समर्थन करण्याची पद्धति अशी होती कीं, आपण ईश्वरी प्रेरणेमुळे बोलत आहों असें ते दाखवीत. या प्रकारची प्रवृत्ति आपले विचार व्यक्त करणारे कवीच दाखवीत असें नव्हे तर महिपतीसारखे चरित्रकारदेखील दाखवीत ( पृ. ५१ ).

**प्रकरण ८ वें ( पृ. ५७–६७ )**

## संतकवींची आपल्या वैशिष्ट्याविषयी जाणीव

आपल्या काव्याचीं परीक्षणतत्त्वें निराळीं आहेत अशी संतकवींना जाणीव होती. तथापि, आपल्या वृत्तीचें साहित्य-शास्त्रदृष्ट्या समर्थन करण्याची बहुतेक कवींना ताकद नव्हती आणि यासाठी ईश्वरी प्रेरणेचें विधान पुष्कळ प्रसंगीं होत होतें ( पृ. ५७ ). संतकवींनी रसास प्राधान्य दिलें आहे, आणि यासाठी सरळ अकृत्रिम काव्याचा आग्रह धरला आहे. संतकवींची काव्यविषयक वृत्ति आणि मोरोपंताची काव्यविषयक वृत्ति ही भिन्न होती. मोरोपंतावर रानड्यांनी टीका केली. तीविषयी चिपळूणकर व पांगारकर यांची वृत्ति ( पृ. ६४ ).

**प्रकरण ९ वें ( पृ. ६८–७५ )**

## स्वतःवर अभिप्राय व्यक्त करण्याची पद्धति

संतकवि स्वतःच अभिप्राय देत ती पद्धत आजच्या स्थितींत खपण्यासारखी नाही. तुकाराम आत्मस्तुतीबरोबर दुसऱ्यांची निंदा करीत होता. तुकारामांस कोणत्या कवींविषयीं इतका मत्सर होत होता हें सांगतां येत नाही ( पृ. ६८ ).

**प्रकरण १० वें ( पृ. ७६–९२ )**

## रामदासांचें साहित्यशास्त्र

संतकवींच्या काव्यांतील भक्ति उत्तरकालीन स्तोत्ररूपी संस्कृत वाङ्मयापेक्षा उच्च प्रकारची आहे. रामदासांनी संतकवींच्या काव्याचें साहित्यशास्त्र सांगितलें आहे. तें दासबोध दशक १ समास ७, व दशक १४ समास ३ यांत सापडेल. रामदास कवितेचे धीट, पाठ व प्रासादिक असें वर्गीकरण करतात. त्याचें इंप्रेशनिस्ट, इमिटेटिव्ह व इन्स्पायर्ड असें भाषान्तर होऊं शकेल. रामदासांना काव्य सरळ पाहिजे. क्लृप्त्यांचें नको आहे. काव्य हें जर मनावर अवलंबून आहे आणि मनाचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकारचे भेद आहेत, आणि त्यांत सात्त्विक हें श्रेष्ठ प्रकारचें मन आहे तर सात्त्विक काव्यदेखील श्रेष्ठ आहे. त्याचे विषय राजे नाहीत तर ईश्वर, ऋषि व शास्त्र हे आहेत ( पृ. ७६ ).

**प्रकरण ११ वें ( पृ. ९३–१२६ )**

## शिवकालीन वाङ्मय आणि तत्संबद्ध वातावरण

शिवकालीन संस्कृत आणि मराठी वाङ्मय अत्यंत विविध होतें व आकाराने फार मोठें होतें. राजाश्रयाने संस्कृत कविता आणि मराठी पोवाडे एवढेंच काव्य झालें. आणि या काळांत वाङ्मयोत्पादनाचीं स्थानेंदेखील पंचवीस-तीस होतील. व मराठी कवि सुमारें ६० वर दिसतात. मराठी

भाषेवरील फारशी आवरणें काढून टाकण्याची खटपट झाली. कोश-वाङ्मय झालें, अगदीं ऐहिक प्रकारचें वाङ्मय झालें व पुष्कळशा संस्कृत ग्रंथांचीं भाषान्तरें झालीं. 'ॲलिगोरिकल' वाङ्मय झालें. संस्कृत वाङ्मय शिवकालांत पुष्कळच झालें आहे. शिवभारत आणि पर्णालपर्वतग्रहणाख्यान या दोन संस्कृत काव्यासंबंधीं माहिती ( पृ. ९३ ).

**प्रकरण १२ वें ( पृ. १२७–१२९ )**

## गीर्वाण वाङ्मयशास्त्रें व मराठी ग्रंथकार

छंदःशास्त्रावर निरंजनमाधवाने ग्रंथ केला. परशुराम कवीने जोडाक्षरापूर्वीचें अक्षर गुरु होतें याला मराठी अपवाद दाखवून दिले ( पृ. १२७ ).

**प्रकरण १३ वें ( पृ. १३०–१४८ )**

## भाषान्तरकार आणि त्यांचें मूलपरीक्षण

भाषान्तरकार भाषान्तर करतांना मूळाचा स्वीकार किंवा त्याग करून मूळाविषयी आपलें मत व्यक्त करतात, तर या दृष्टीनें अभ्यास करून मराठी कवींचीं ग्रंथपरीक्षण-तत्त्वें काढतां येतील. या नियमाचें-विशेषतः मोरोपंताचे वृद्धि-संकोच घेऊन स्पष्टीकरण व त्यावरून मोरोपंताच्या काव्यपरीक्षण-वृत्तीचा अजमास ( पृ. १३० ).

**प्रकरण १४ वें ( पृ. १४९–१६९ )**

## चरित्रकार

चरित्रकारांस चरित्रविषय झालेल्या व्यक्तींवर मत देण्याची संधि होती. पण त्या संधीचा उपयोग काव्यपरीक्षणाच्या दृष्टीनें चरित्रकारांनीं केला नाही. संतकवींच्या याद्या व संतकवींवर असलेलें वाङ्मय या प्रकरणांत जितकें सविस्तर देतां येईल तितकें दिलें आहे ( पृ. १५० ).

**प्रकरण १५ वें ( पृ. १७०–१८६ )**

## महिपति आणि मोरोपंत

मोरोपंतांनी सन्मणिमालेंत फारशी मार्मिकता दाखविली नाही. त्यांच्या संतचरित्राविषयी तेंच विधान करावें लागेल. महिपतीचें ग्रंथकर्तृत्व तपासतांना त्याने जी मार्मिकता दाखविली आहे ती चरित्रांत चरित्रविषय होणाऱ्या व्यक्तींच्या काव्यांचे उतारे घेऊन दाखविली आहे. त्याच्या चरित्रांतील उताऱ्यांवरून ज्या कवीचें जें काव्य आहे म्हणून सांगितलें जातें त्या कवीचें तें काव्य आहे कीं नाही, हें ठरवण्यास कांही प्रमाणांत उपयोग होईल. काव्यपरीक्षणासाठी दैवी उपाय योजण्याची वृत्ति महिपतीने दाखविली आहे ( १७० ).

**प्रकरण १६ वें ( पृ. १८७–१८८ )**

## अशिष्ट वाङ्मयाचें शिष्टीकरण

जेव्हा ग्रंथ पिढ्यान्‌पिढ्या प्रचलित राहतो तेव्हा त्याचें स्वरूप पाठान्तरें उत्पन्न होऊन बदलूं लागतें. सूतवाङ्मय ब्राह्मणवाङ्मय झालें. तें होतांना हीच क्रिया होत होती ( पृ. १८७ ).

**प्रकरण १७ वें ( पृ. १८९–२०५ )**

## महाराष्ट्राची काव्यग्राहकता

काव्याचा सामाजिक उपयोग समाजाच्या सुस्थितीस अवश्य असणाऱ्या गोष्टी गौरविण्यासाठी आहे. काव्य समाजाची गरज आहे. तथापि, समाज ज्या मानाने वाङ्मय ग्रहण करतो त्या मानाने समाजाची उच्चनीचता ठरते. समाजामध्ये अनेक ठिकाणांहून येणाऱ्या काव्याचे तुकडे जिरतात. ज्ञानेश्वर, महिपति, शिवदिनकेसरी, माणिकप्रभु, प्रेमाबाई, हरिकवि, काशिकवि, एकनाथ, चोखामेळा, गोपाळनाथ यांचीं लोकांत पसरलेलीं पदें ( पृ. १८९ ).

**प्रकरण १८ वें ( पृ. २०६-२१४ )**

## सामाजिक परिस्थिति, ग्रंथपरीक्षण आणि ग्रंथक्षेत्र

ग्रंथाभिरुचि व ग्रंथक्षेत्र हीं त्याचप्रमाणे सामाजिक कारणांनी मर्यादित झालीं आहेत. अखिल हिंदुस्थानाशीं संबंधाच्या आवश्यकतेमुळे शास्त्रांची भाषा संस्कृत राहिली व केवळ सामान्य ग्रंथ प्राकृतमध्ये झाले. जीं शास्त्रें संस्कृत भाषेच्या अनुषंगाने निर्माण झालीं तीं मराठी भाषेला लागलीं नाहीत. ज्या सामाजिक वर्गाचा गौरव कवितेने झाला किंवा झाला नाही त्यांचीं कारणें ( पृ. २०६ ).

**प्रकरण १९ वें ( २१५-२२० )**

## ग्रंथाभिरुचि आणि ग्रंथविक्रय

मराठी राज्यांत पुस्तकाच्या नकला करून विकण्याचा धंदा कसा होता ह्याची माहिती नाही. अव्वल इंग्रजींतील ग्रंथप्रसिद्धीची माहिती. गोविंद रघुनाथ केतकर. आमच्या घरचीं हस्तलिखितें ( पृ. २१५ ).

**प्रकरण २० वें ( २२१-२२४ )**

## उपसंहार

ह्या पुस्तकांत अप्रत्यक्ष मतव्यक्तीचे व परीक्षणांचे प्रकार मांडले आहेत. इंग्रजी राज्यामध्ये नवीन शिक्षणामुळे संस्कृत ग्रंथांचें पुनरवलोकन निराळ्या दृष्टीने झालें, पाश्चात्य वाङ्मयाची ओळख झाली. त्यामुळे जुनें साहित्य-शास्त्र आणि नवीन कल्पना यांच्या एकीकरणाने निराळ्या तऱ्हेचें परीक्षण-वाङ्मय तयार झालें आहे. तें या पुस्तकाच्या उत्तर भागांत सांपडेल ( पृ. २२२ ).

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

# प्रस्तावना

महाराष्ट्रीय काव्यपरीक्षणाच्या इतिहासाचा हा पूर्वभाग आहे. यांत पेशवाई समाप्त होण्यापूर्वीच्या कालांतील ग्रंथाभिरुचीचें आणि काव्यपरीक्षणाचें विवरण आहे. अर्वाचीन काव्यपरीक्षणाचा एक स्वतंत्र ग्रंथ पुढे प्रसिद्ध होईल. अमेरिकेस जाण्याच्यापूर्वी म्हणजे १९०६ पूर्वी मराठी कवींच्या ग्रंथांचें बरेंच वाचन झालें होतें, किंबहुना तोंपर्यंत काव्यसंग्रह व महाराष्ट्र कवि यांमध्ये प्रसिद्ध झालेले ग्रंथ चाळलेले होते व कांही ग्रंथ चांगलेच वाचले होते. हिंदुस्थान सोडल्यानंतर पुढे फारसें वाचन झालें नाही. ज्ञानकोश चालू असतां पुन्हा एकदा दीड–दोन महिने स्थूल अवलोकन व मधून मधून वाचन झालें. ज्ञानकोश आटपल्यानंतर छापखाना आणि संपादकवर्ग गुंतवून ठेवण्यासाठी जीं कांही कार्यें योजिलीं व आरंभिलीं त्यांतच ‘ नवसंहिता ’ म्हणून एक ग्रंथ करावा हा एक विचार ठरला. या संकल्पाचें स्वरूप येणेंप्रमाणे आहे:—वेदकालापासून चालू काळापर्यंतच्या वाङ्मयांत माझ्या दृष्टीने मला जो अत्यंत उपयोगी, आकर्षक किंवा उच्च प्रकारचा सामाजिक आणि धर्मशास्त्रीय भाग दिसून आला त्याची संहिता करावी आणि धार्मिक भावनांच्या उत्कटतेमुळे आकर्षक झालेलें असें वाङ्मय एके ठिकाणीं द्यावें या हेतूच्या सिद्ध्यर्थ कांही निरीक्षण पुन्हा झालें. संस्कृत ग्रंथ वाचले होते; पण मराठी ग्रंथ काळजीपूर्वक वाचले नाहीत म्हणून त्यांच्यांतील भाग निवडणें केवळ दुसऱ्या कोणावर न सोंपवितां स्वतः तेंहि वाङ्मय डोळ्यांखालून पुन्हा घालवावें अशी इच्छा उत्पन्न झाली. हें वाचन करतांना संतकवींचे ग्रंथ आणि यांवरील अर्वाचीन लेखकांनी लिहिलेले वर्णनात्मक किंवा ऐतिहासिक टीकाग्रंथहि वाचण्यांत आले व त्यामुळे कांही वाङ्मय पुन्हा वाचलें गेलें. तें वाचतांना असें वाटूं लागलें की, मराठी कवींच्या ग्रंथांचा ज्या अनेक दिशांनी अभ्यास व्हावयास पाहिजे, त्यांपैकी बऱ्याच दिशांनी अभ्यास व्हावयाचा आहे. तथापि हा व पूर्वीचा झालेला अभ्यास प्रस्तुत पुस्तक लिहिण्यास प्रेरक झाला नाही.

हें वाचन चालू असतां दुसरी एक गोष्ट झाली. माझ्या कादंबऱ्यांविषयी जी बरीचशी प्रशंसात्मक किंवा निंदात्मक टीका प्रसिद्ध झाली तीवरून मला असें दिसून आलें की कादंबऱ्यांतील माझ्या मताने ज्या गोष्टींविषयी अभिज्ञता वाचकांत दिसावयास पाहिजे होती त्या गोष्टींसंबंधाने निंदक व मित्र या दोघांतहि चांगली जाणीव दिसली नाही अशा स्थितींत ग्रंथपरीक्षणात्मक तत्त्वांच्या बाबतींत आपणच कांही सांगितलें पाहिजे असें वाटूं लागलें. पण तेव्हा असें वाटूं लागलें की, आपण स्वकीय वैयक्तिक ग्रंथाचें केवळ समर्थन करण्याच्या उद्देशाने ग्रंथ लिहिण्याऐवजीं व्यापक ग्रंथ कां लिहूं नये ? तेव्हा जरा व्यापक, तात्त्विक आणि स्वग्रंथनिरपेक्ष असें पुस्तक लिहावें असें मनांत ठरलें, व त्याची योजना मनांत करतांना इतर लेखांच्या परीक्षणात्मक लेखकांचा आढावा घेण्याचा विचार सुचला. महाराष्ट्रांत [काव्यपरीक्षणात्मक] विचार कितपत झाला आहे याविषयी कांही आढावा घेऊन नंतर आपणांस काव्यरसज्ञतेविषयी जें काय सांगावयाचें असेल तें सांगावें असें वाटलें. आणि विविधज्ञानविस्ताराच्या पहिल्या वर्षापासून ( कांही दुर्मिळ अंक मिळाले नाहीत ) बहुतेक पुस्तकपरीक्षणें वाचून टाकलीं. तेव्हा असें दिसून आलें कीं, काव्यपरीक्षणात्मक बहुतेक महत्त्वाचे विचार महाराष्ट्रीय लेखकांच्या लेखणींतून कोणत्या ना कोणत्या तरी पुस्तकाचें निरीक्षण करतांना व्यक्त झालेच आहेत. अनेक परीक्षणांत कांही महत्त्वाचे विचार व्यक्त झालेले असतात तर कांही किरकोळ दोष दाखविलेले असतात; ते किरकोळ दोष व चुकीने ग्रंथकारास दिलेले दोष हीं सोडून दिलीं व शंभर दीडशें परीक्षणें गोळा केलीं आणि त्यांतील तात्त्विक विचार निवडून मांडला तर काव्यपरीक्षणात्मक एक उत्तम ग्रंथ तयार होईल, व त्याबरोबरच इतिहासहि देतां येईल. ज्याप्रमाणे कायदा शिकतांना खटल्यांचे निवाडे घेऊन कायदा शिकण्याची पद्धत आहे त्याप्रमाणे साहित्यशास्त्र शिकावयाचें तें प्रसिद्ध आणि परिचित ग्रंथांवर झालेल्या टीकांचा संग्रह करून अभ्यासकाने कां शिकूं नये ? टीका जर चांगल्या नसत्या तर गोष्ट निराळी. तथापि मराठीमध्ये पुस्तकपरीक्षण चांगल्या प्रकारचें झालें आहे असें दिसून आलें. दुष्टबुद्धीने आणि ग्रंथकाराच्या हेतूचा विपर्यास करून मुद्दाम खोटें लिहिणारें परीक्षण जरी अनेक ठिकाणीं दिसतें तरी त्याबरोबर प्रामाणिक टीकाहि पुष्कळच झाली आहे; आणि प्रामाणिकपणा व शोधकबुद्धि जेथे व्यक्त झाली आहे

अशी टीकाहि पुष्कळच झाली आहे. हा संग्रह तयार होत असतां काव्यपरीक्षणाची जाहिरात दिली. व जाहिरात देतांना मुख्यतः अर्वाचीन परीक्षणेंच देण्याचा विचार होता. आणि तीं परीक्षणें देतांना परीक्षणदृष्टि कोठे चुकली याविषयी टीपाहि द्यावयाच्या होत्या. तथापि जाहिरात प्रत्यक्ष लिहितांना असें वाटूं लागलें की जुन्या मराठी ग्रंथकारां-मध्ये जी काव्यचिकित्सात्मक बुद्धि दिसून येते तिचा आढावा घेऊन नंतर अर्वाचीन काव्यपरीक्षण मांडावें. तथापि जुन्या ग्रंथकारांच्या मार्मिकते-विषयी लिहितांना लिखाण लांबलें. जें केवळ वीस-पंचवीस पानांत आटपा-वयाचें होतें तें साठसत्तर पानांपर्यंत वाढलें असें दिसून आलें तेव्हा जुन्या कवींनी व लोकांनी दाखविलेल्या ग्रंथाभिरुचीचा आढावा लांबविला. अर्वाचीन टीकाकारांच्या टीकांचा संग्रह होऊन तो तसाच पडला आहे. तोहि प्रमाणाबाहेर वाढला. जुन्या कवींच्या मार्मिकतेविषयी जें लिखाण झालें त्यानेच हें पुस्तक भरलें आहे; तर अर्वाचीन टीकाकारांचा संग्रह विद्यासेवकाचीं सुमारें तीनशें पानें व्यापील असें दिसतें. तो संग्रह आतां स्वतंत्रपणे छापून काढण्याचा विचार आहे.

ग्रंथपरीक्षणपद्धति अर्वाचीन म्हणजे मुद्रणोत्तरकालीन आहे; तरी त्या पूर्वीच्या काळीं ग्रंथपरीक्षण होतेंच. मनुष्यास मतें हीं असतातच. निंदकवर्ग त्याप्रमाणे प्रशंसा करणारा वर्ग हे दोन्ही ज्या समाजांत आहेत त्या समाजांत परीक्षण नाहीं असें कसें म्हणतां येईल? जर परीक्षण स्पष्ट शब्दांनी व्यक्त होत असलें तर मत अप्रत्यक्ष कसें व्यक्त होतें तेंच गोळा करून मुद्रणपूर्वकाळाचें परीक्षण मांडलें आहे.

हें परीक्षण मांडतांना लेखकवर्गाने व्यक्त केलेली वृत्ति जरी प्रामुख्याने मांडली आहे तरी लेखकवर्गाबाहेरची जी जनता आहे तिचें परीक्षण-देखील विचाराचा विषय केला आहे. नाटकास जाणारा प्रत्येक प्रेक्षक नाट्यपरीक्षक असतो. तो त्याच्याविषयी पसंती कृतीने व्यक्त करतो. उपाहारगृहांत जाऊन फराळ करणारा मनुष्य भोजनपरीक्षक असतो; त्यास खाद्यांत कमजास्त काय झालें हें सांगण्याइतकें पाकशास्त्र समजत नसेल; तथापि आपणांस खाद्य आवडतें कीं आवडत नाहीं हें सांगण्यास तो समर्थ

असतो हें खास. त्याप्रमाणेच ज्ञानेश्वराच्या कालापासून आजपर्यंत जीं सव्वासहाशें वर्षें झालीं तितक्या काळांत कवित्व होत होतें त्याबरोबर सामान्य जनतेकडून कवितापरीक्षणहि होत होतें; त्याशिवाय कवींविषयी लोकांत तारतम्य झालें नसतें. तारतम्य उत्पन्न झालें हें दिसतच आहे. कारण कांहींचे ग्रंथ लोकप्रिय झाले व टिकले; तर कांहींचे टिकले नाहीत. ज्या ग्रंथांस चिरजीविता प्राप्त झाली त्या ग्रंथांविषयी लोकांत आवड उत्पन्न झाली होती व ज्यांस ती मिळाली नाही त्याविषयी लोकांस आवड उत्पन्न झाली नाही हें सरळ सत्य आहे. चिरजीविता हें साध्य आहे आणि इतर गोष्टी केवळ उपकरणात्मक आहेत.

“ अवश्यक तो शेवट । मागें अवघी ही खटपट ।
चालों जाणे वाट । ऐसा विरळा एखादा ।। ”

प्रस्तावनेंत काव्यपरीक्षण व अभिरुचि याविषयी फार थोडेंच लिहावयाचें आहे. जें काय लिहावयाचें आहे तें मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासंबंधाने होय. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासास युनिव्हर्सिट्या उत्तेजन देत आहेत तथापि संशोधक दृष्टीने वाङ्मयाभ्यासाचें काम युनिव्हर्सिट्यांतून अजून फारसें सुरू झालें नाही. जुन्या वाङ्मयामध्ये अभ्यासावयाचें तें काय असा प्रश्न अजून विचारण्यांत येतो; आणि यासाठी मराठी वाङ्मयाचा अभ्यास किती आणि कसा व्हावयाचा आहे याविषयी कांही विचार येथे प्रदर्शित करतों.

मराठी भाषेचा किंवा वाङ्मयाचा पद्धतशीर अभ्यास करूं इच्छिणाराने संस्कृत पांडित्य दुर्लक्षितां कामा नये. किंबहुना संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासाच्या पूर्ततेसाठी प्राकृत वाङ्मयाचा अभ्यास अवश्य आहे ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. वाङ्मय हें साहित्य आहे. हें साहित्य अनेक शास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी वापरावयाचें असतें. ज्यांना मराठी भाषेचें व्याकरण अभ्यासावयाचें आहे त्यांना संस्कृत व्याकरण व वैदिक व्याकरण अवश्य यावयास पाहिजे. त्याशिवाय मराठी भाषेंत आलेलीं रूपें कशीं आलीं हें समजावयाचें नाही त्याप्रमाणेच मराठी वाङ्मय हें संस्कृत वाङ्मयाचें उत्तररूप आहे हेंहि लक्षांत घेऊन वाङ्मयाभ्यास केल्याशिवाय गत्यंतर नाही.

मराठी वाङ्मयाचा अभ्यास करतांना केवळ मराठींत जें साहित्य सांपडेल तेवढ्यावरच तो अभ्यास रचतां कामा नये. तर भोंवतालची भावनात्मक व विचारात्मक परिस्थिति लक्षांत वारंवार घेतली पाहिजे. त्याशिवाय मराठी ग्रंथांचें ऐतिहासिक स्वरूप समजणारच नाही. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वराच्या ग्रंथांविषयी विवेचन करतांना नाथसंप्रदायी एकंदर ग्रंथांत ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या पुस्तकांचें स्थान पाहिलें पाहिजे; व यासाठीं नाथसंप्रदायी वाङ्मय ज्या ज्या भाषांत असेल त्या त्या भाषांतून वाचलें पाहिजे. आणि भगवद्गीतेस अपरिचित असा नाथसंप्रदायी विचार घुसडला गेला आहे काय हें पाहिलें पाहिजे; शिवाय माझ्या मतें ज्ञानेश्वरपूर्वकालीन महानुभावांचीं गीतेवरील भाष्यें वाचल्याशिवाय ज्ञानेश्वरीचें ऐतिहासिक कारण स्पष्ट होणार नाही. व महानुभावांचें भागवतविवरण लक्षांत घेतल्याशिवाय एकनाथाचें भागवतविवरण स्पष्ट होणार नाही. तर या प्रकारच्या तौलनिक अभ्यासास लागलेंच पाहिजे.

या पुस्तकांत ‘ रामदासाचें साहित्यशास्त्र ’ या नांवाचें एक प्रकरण आहे. त्याविषयी हें सांगितलें पाहिजे कीं हें प्रकरण लिहितांना जें विचारपूर्वक वाचन झालें त्यामुळे दासबोधाचें महत्त्व माझ्या मनांत वाढलें. दासबोध पूर्वी वाचला होता पण त्याचें नवीन विचाराच्या दृष्टीने महत्त्व भासलें नव्हतें. हायस्कूलमध्ये किंवा कॉलेजांत असतां जें वाचन झालें त्या वाचनांत आणि आजच्या वाचनांत फरक असणारच. वेद, षड्दर्शनें व धर्मशास्त्रें आणि इतर शास्त्रीय ग्रंथ यांचें वाचन झाल्यानंतर जेव्हा आपण मराठी ग्रंथांकडे वळूं लागतों तेव्हा मराठी ग्रंथांत संस्कृत विचारापेक्षा नवीन विचार काय आहे तो समजूं लागतो. शिवाय कांही ग्रंथांचें रहस्य मनुष्याचा स्वतःचा अनुभव जसजसा वाढतो तसतसें समजूं लागतें. दासबोधासारखा ग्रंथ घ्या. मला वाटतें कीं हा ग्रंथ व्यक्तीस आयुष्याच्या अगदीं अननुभविक कालांत समजावयाचाच नाही. या ग्रंथांतील जो लौकिक विचाराचा भाग आहे त्याचें महत्त्व अलीकडे पुष्कळ वाढूं लागलें आहे. दासबोधास रामदासाच्या कित्येक शिष्यांनी ज्याप्रमाणे यास काव्यग्रंथ म्हटलें आहे त्याप्रमाणे मी त्यास काव्यग्रंथ मुळीच मानीत नाही. मी त्यास आयुष्यविषयक तत्त्वज्ञानाचा बोधग्रंथच

मानितों, व हा ग्रंथ केवळ मराठीमध्ये अपूर्व झाला असें न समजतां हिंदुस्थानच्या प्राकृत वाङ्मयांत हा एक अपूर्व ग्रंथ झाला आहे असें समजतों. हें जें माझें मत आहे तें केवळ या ग्रंथांतील व्यावहारिक भागावरून झालें आहे. मी या ग्रंथाचा आध्यात्मिक दृष्टीने विचारच केलेला नाही. या ग्रंथांत दिसून येणारें साहित्यशास्त्र पुढे दिलेंच आहे; पण साहित्यशास्त्राशिवाय यांत मानसशास्त्र आणि समाजशास्त्र आहे तें खरोखरच चित्तवेधक आहे.

प्रस्तुत पुस्तकांत ज्या अभ्यासाच्या दिशांकडे व पद्धतीकडे लक्ष ओढलें गेलें आहे त्या येणेप्रमाणेः—

( १ ) मराठी कवींचा अभ्यास करतांना तत्कालीन संस्कृत वाङ्मयहि पाहिलें पाहिजे, कारण महाराष्ट्र त्या वेळेस दोन्ही भाषांत विचार व्यक्त करीत होता. दोन्ही वाङ्मयाचें बरोबरच अवलोकन केल्याशिवाय महाराष्ट्राच्या वाङ्मयविकासाचें व त्याप्रमाणेच वैचारिक आणि वैज्ञानिक इतिहासाचें स्वरूप समजावयाचें नाही.

( २ ) महाराष्ट्रामध्ये जे पंथ प्रचार करीत असतात त्या पंथांचें महाराष्ट्रीय वाङ्मय आणि इतर भाषांतील वाङ्मय यांचा एकत्र अभ्यास करून पंथेतिहासविषयक ग्रंथ लिहिले पाहिजेत. त्याशिवाय धार्मिक चळवळ समजावयाची नाही. महाराष्ट्रीय वाङ्मयाच्या प्रारंभकालाचें ज्ञान होण्यासाठी नाथपंथाचा आणि रामानंदपंथाचा इतिहास सविस्तर पाहिजे; त्याचप्रमाणे महाराष्ट्रांत निघालेल्या आणि बाहेर प्रचार करणाऱ्या महानुभाव संप्रदायाचादेखील इतिहास लिहिला गेला पाहिजे.

( ३ ) मराठींत जें चरित्रवाङ्मय आलें आहे त्यांत उल्लेखिलेल्या व्यक्तींचा कोश करून प्रत्येक व्यक्तीसंबंधाने निरानिराळ्या ग्रंथांत जी माहिती येते तिची तुलना होऊन चरित्रें तयार व्हावयास पाहिजेत. हीं चरित्रें तयार करतांना प्रत्येक चरित्र कोणत्या साहित्यावर तयार झालें, कोणी कोणापासून माहिती उसनी घेतली आहे याचें विवेचन पाहिजे.

( ४ ) जे कवी लोकप्रिय असतात, त्यांच्या काव्याचे जे पाठभेद दृष्टीस पडतात त्या पाठभेदांचा अभ्यास व्हावयास पाहिजे; व जे पाठभेद सहेतुक झाले असतील त्यांच्या हेतूचा शोध झाला पाहिजे.

( ५ ) तसेंच जे भाषान्तरकार कवी आहेत त्यांच्यापुढे असलेल्या संस्कृत ग्रंथाच्या कोणत्या आवृत्त्या होत्या वगैरे चौकशी झाली पाहिजे, त्याशिवाय जेव्हा एक कवि दुसऱ्या कवीस मूळ संस्कृत कथा बिघडविली असा आक्षेप करतो त्या आरोपाचें परीक्षण होणार नाही. या संशोधनापासून जें सांपडेल तें संस्कृत ग्रंथांच्या आवृत्त्यांच्या इतिहासाशीं जोडलें पाहिजे.

( ६ ) अशिष्टवर्गाचें वाङ्मय शिष्टवर्गाचें होत जातें व लोकमतांत फेर पडतांना ग्रंथावृत्तींतच फेर पडत जातात, ही क्रियादेखील अभ्यासविषय झाली पाहिजे.

श्रीधर व्यंकटेश केतकर

# ....आहे ....असावें

[ महत्त्वाच्या शुद्धि, दुरुस्ती तेवढ्या येथें दिल्या आहेत. काना-मात्रा-वेलांटी-अनुस्वार उडाल्याच्या, ह्रस्व-दीर्घांच्या, विरामचिन्हांच्या किरकोळ, सहज लक्षांत येणाऱ्या शुद्धि येथें टिपल्या नाहीत.

—ग्रंथाच्या प्रथमावृत्तींतहि कांही चुका, शंकास्थळें राहिलेलीं आहेत. अशीं स्थळेंहि येथें सूचित केलीं आहेत. ]

| पृ. | ओ. | ...असें आहे | ...असें असावें |
|---|---|---|---|
| ४ | ४ | आशीहि | अशीहि |
| ५ | ३ | ...कीं अपकर्ष | ...कीं त्याचा अपकर्ष... |
| ६ | १ | अभंग वाणी | अभंगवाणी |
| | ३ | प्रल्हाद बडव्याप्रमाणें | रामचंद्र बडव्याप्रमाणें |
| | २८ | ज्ञानेश्वरी पाठी | ज्ञानेश्वरीपाठी |
| ७ | ९ | तत्त्वज्ञानाच्या | तत्त्वज्ञाच्या |
| १० | ३ | आपलें परीक्षण | आपलें मत परीक्षण |
| | २९ | धिःक्कार | धिक्कार |
| | | रसिक जन गणीं | रसिकजनगणीं |
| ११ | १ | | [ ही ओळ अशी आहे ] ' भेणें जी पंडितांच्या बहुदिवसवरी नीच-संगेंचि राही ' |
| | ९ | रसिकजन गणीं | रसिकजनकरीं |
| | १३ | त्या ज्या... | त्वां ज्या... |
| | १४ | | [ ही ओळ अशी आहे– ] ' तूझा साहील आतां चिरविरह कशी ती महाराष्ट्रभाषा ! ' |

| पृ. | ओ. | ... असें आहे | ... असें असावें |
|---|---|---|---|
| ११ | २४ | ज्ञानेश्वर काल | ज्ञानेश्वरकाल |
| १२ | २० | शोकी | षोकी |
| १४ | ७ | हत्यादि | इत्यादि |
| १९ | ५ | वाङ्मय शाखा | वाङ्मय-शाखा |
| | ६ | अध्यात्मिक | आध्यात्मिक |
| २१ | १७–१८ | धोई गोवर्धन | धोई, गोवर्धन |
| २३ | १२ | राजांकरुय्यक | राजानकरुय्यक |
| | १६ | टीकाविषयक | टीकाविषय |
| २५ | २८ | चंपु | चंपू |
| २६ | ३ | ...लिंगायत कानडींत | ...लिंगायत ग्रंथकारांनीं कानडींत |
| | ५ | कानडी ही विषयांचें... | कानडी ही सर्व विषयांचें... |
| | ९ | छंदोबुधि | छंदोंबुधि |
| ३० | १७ | गाहिनीनाथ | गहिनीनाथ |
| ३१ | १ | एकनाथानें चोवीस गुरु केले... | ...(एकनाथानें कीं दत्तात्रेयांनीं ?) |
| ३३ | १७ | सप्तशती आहे हा | सप्तशती हा |
| ३४ | १८,२० | मुकुंदराय | मुकुंदराज |
| ३५ | २७ | सांधें | सांधें |
| ३७ | ८ | भाषा वैभवें | भाषावैभवें |
| | २८ | प्रकारागणित | प्रकारागणिक |
| ३८ | ९ | नामाधिले | नामाथिले |
| ३९ | १३ | उदरापूर्तिकारणें | उदरपूर्तिकारणें |

४० [ ओळ २६ आणि २७ यांच्या मध्यें– म्हणजे '... यंत्र भेदोनि पाडलें ' या मुक्तेश्वराच्या उताऱ्याच्या समाप्तीनंतर–गळलेला पुढील मजकूर वाचावा– ] " हा मुक्तेश्वराचा ताशेरा विष्णुदास नामा या कवीवर आहे

असें रा. भावे आपल्या महाराष्ट्र सारस्वतांत दाखवितात. याच काळांत रामदासांनीं मराठी भाषेंत ग्रंथ लिहिण्याचें समर्थन वारंवार केलें आहे. तें समर्थन दाखविणारा एकच उतारा पुढें देतों."

| पृ. | ओ. | ...असें आहे | ...असें असावें |
|---|---|---|---|
| ४१ | ७ | सार्थकथा | सार्थकता |
| | ९ | बोधिली | रोधिली |
| ४२ | १३ | तें–दोर पात्रा–वांचोनी | तें दोर–पात्रावांचोनी |
| ४४ | ३ | महीपति | महिपति |
| | २० | तेथें | तेणें |
| ४६ | १५ | गुरभिवत्स | सुरभिवत्स |
| ४७ | १८ | ज्ञानेश्वराचादेखील | ज्ञानेश्वरीचीदेखील |
| ५२ | १५ | तुकारानामें | तुकारामानें |
| ५३ | १४ | उतारे न दिल्यास | उतारे दिल्यास |
| ६२ | २३ | तवतोयै... | तव तोयै... |
| | २४ | ...सहस्रः | ...सहस्रैः |
| ६५ | १० | प्राप्यतया तिरोषात् | प्राप्य तयातिरोषात् |
| | | वसंति | वसन्ती |
| ६६ | २२ | आचारसी | आचरसी |
| ६९ | २० | ...वामनपंडित येणेप्रमाणें मत... | ...मत वामनपंडित येणेप्रमाणें... |
| ७४ | २० | विस्मरणीय | चिरस्मरणीय |
| ७५ | २ | विसरला | विरसला ( असाहि पाठभेद ) |
| ८० | २८ | तिच्या | तिचे |
| ८२ | १४, २१ | धीट पाठ | धीटपाठ |
| ८३ | १, ३ | धीट पाठ | धीटपाठ |
| ८४ | २८ | धीट पाठ | धीटपाठ |

| पृ. | ओ. | ...असें आहे | ...असें असावें |
|---|---|---|---|
| ८६ | १९, २१, २३, २५ | रजो गुण | रजोगुण |
| ८७ | ६ | हिंपुटी । करी | हिंपुटी करी । |
| ८९ | १७ | काव्यें | कार्यें |
| ९० | ७ | सिद्धान्ताचें | सिद्धान्तांचें |
| ९१ | ४ | उच्च नीचत्व | उच्चनीचत्व |
| ९३ | १७ | शोभेनासें | ( ' शोभेसें ' हवें ! ) |
| ९४ | ११ | या स्वतंत्र शृंगारिक | ' या ' नको |
| ९८ | ७ | माहाराष्ट्र सारस्वत | महाराष्ट्र सारस्वत |
| ९९ | २५ | अग्निनदास | ' आगीनदास ' असावें. |
| ( ११८ | १ | आग्रीनदास | ' आगीनदास ' असावें. |
| १०० | १० | मिनवेल डी आलेमडा | मिनवेल डी आल्मेडा |
| १०१ | ३ | गिरधर | गिरिधर |
| १०४ | २० | नीत्यानंद देवदत्त | नित्यानंद देवदत्त |
| १०५ | २ | (इ. स. १९२५) | (इ. स. १६२५) |
| | ३ | ( ,, १९२५) | (इ. स. १६२५) |
| १०८ | ३ | परामर्ष | परामर्श |
| ( १६३ | ५ | परामर्ष | परामर्श ) |
| १०८ | १० | वाङ्मयविषयक अभिरुचि | वाङ्मयविषयक जी अभिरुचि |
| १०९ | १८ | सबुद्धिराव | सुबुद्धिराव |
| ११३ | २२ | श्रीजय रामकविकृत | श्रीजयरामकविकृत |
| ११५ | २१ | अधिक | अधिकार |
| | २८ | धोडीशी | थोडीशी |
| १२० | २४ | भूमि वलये | भूमिवलये |
| १२३ | २१ | ...दिलीं आहेत— | ...दिलीं आहेत. |
| १२४ | २३ | हुजूर | हजर |

| पृ. | ओ. | ...असे आहे | ...असें असावें |
|---|---|---|---|
| १२६ | ११ | आजीबात | अजीबात |
| १२८ | २५ | आणि क | आणिक |
| १२९ | ४ | मुस्कृत | सुकृत |
| १३० | (प्रकरण नांव) | मूळ परीक्षण | मूळपरीक्षण |
| | २२ | येई | येईल |
| १३१ | २३ | समानस्थितिदर्शक | समाजस्थितिदर्शक |
| १३२ | ११ | रामाविषयक | रामविषयक |
| १३३ | १० | धरला | धरलेला |
| १३८ | १५ | गोडसरस | गोड सरस |
| १४० | २२ | कृतवर्म | कृतवर्मा |
| १४१ | ६ | ह्रुदप्रवेश | ऱ्हदप्रवेश |
| | १३ | आखाडा | आराखडा |
| १४२ | ७ | (१६–१२) | (१६–१९) |
| | ८ | (३५–१५) | (३५–५१) |
| १४३ | २३ | षादपांकुरा | पादपांकुरा |
| १४४ | १ | कृष्ण विजयाच्याकडे | कृष्णविजयाच्याकडे |
| | १८ | सिद्ध हा | सिद्ध हो |
| | १९ | किती | किति |
| १४९ | ४ | चरित्राविषयीं | चरित्रविषय |
| | १७ | सन्मणिभाषेंत | सन्मणिमालेंत |
| १५२ | २६ | हेमराज | हेगराज |
| १५४ | १९ | | '(१)' हा आंकडा अनावश्यक |
| | २४ | कमाबाई | कर्माबाई |
| १५५ | ४ | नारायणबाबा, शिवदिन | नारायणबाबा शिवदिन |
| १६८ | ९ | वसंताच्याईक्षणमात्रें, | वसंताच्या ईक्षणमात्रें, |
| १७१ | ११ | न सोपानें | नसो पानें |
| १७२ | १३ | कामदासाची | कामदा साची |

अनुक्रम ३७९९८ वि: निबंध
क्रमांक १५६९ नों दि: २१।१।६५


| पृ. | ओ. | ...असें आहे | ...असें असावें |
|---|---|---|---|
| १७५ | १४ | [ ही ओळ अशी हवी–] | ‘बहु शोभला शिवाजीबावा सद्वृत्त शुद्ध लेण्यांत ।’ |
| | २२ | कफ़कीर | कफ कीर |
| १७६ | १८ | [ ही ओळ अशी हवी–] | ‘ज्याच्या सद्भंगातें सेवी जन, जैंवि बाल आम्यातें’ |
| | २४ | महिपतिवरि प्रसाद काय | ...महिपतिवरि वर-प्रसाद |
| १८१ | २४–२५ | वेणूबाईचे व आकाबाईचे | वेणुबाईचे, बहिणाबाईचे व आकाबाईचे |
| १८८ | १५ | “ रात्रिरेवंव्यरंसीत् ” | “ रात्रिरेव व्यरंसीत् ” |
| १९४ | ३ | ...ग्रहण वाङ्मयांतील... | ...ग्रहण म्हणजे वाङ्मयांतील |
| | २१ | तेजावलयें | तेजोवलयें |
| १९५ | २४ | ...आईकडून मूल ऐकत | ...आईकडून ऐकत... |
| १९६ | ५ | ...मराठी असेल, | ...मराठी कवि असेल, |
| २०२ | १७ | वसति | वसती |
| | २१ | नवरी | न वरी |
| २०३ | १५ | आपुला | अपुला |
| २०४ | १९ | मनमुंडा | मन मुंडा |
| | | मुंडितांमुंडा | मुंडितां मुंडा |
| २०७ | १ | कारणारांकडूनच | करणारांकडूनच |
| | ३ | ज्या ग्रंथोत्पत्तीस | ग्रंथोत्पत्तीस ज्या |
| २०८ | २ | रत्नमाळ | रत्नमाला |
| २१० | ५ | ‘ ज्ञानदेव तु | ‘ ज्ञानादेव तु |
| २१२ | १६ | ...शतकें आला... | ...शतकें चालत आला... |
| २१३ | २ | विस्मरण | विवरण |
| २२१ | १-२ | परंपरेंतील मराठींत | ...परंपरेंतील आहेत. मराठींत... |
| २२२ | १३ | ग्रंथावलाकन | ग्रंथावलोकन |

# ग्रंथपूरक टिप्पण

## पृ. २९, कानडा विठ्ठल

विठ्ठल ही कर्नाटकीय देवता म्हणून महाराष्ट्रांत मानली गेली कीं नाही हा प्रश्न आहे. कानडा या शब्दाचा अर्थ अगम्य असा प्रो. दांडेकर यांनी दाखविला आहे. पण दोनदां कानडा शब्द आला म्हणजे दुसऱ्यांदा जो कानडा शब्द येतो त्याचा अर्थ कर्नाटकीय असा धरण्यास हरकत नाहीं असें सांगितलें आहे. पण त्या विधानाविषयी पूर्णपणे खात्री देतां येत नाही. अमृतराय कवीचें " कानुड्यानें माझें मन मोहिलें " हें पद काव्यसंग्रहांत ( ग्रंथांक २६ पुरवणी पृ. १४ ) छापलें आहे. हेंच पद पुष्कळांनी वीस पंचवीस वर्षांपूर्वी बायकांच्या तोंडीं ऐकलें असेल. मी ऐकलें त्यांत " कान्हुड्यानें माझें मन मोहिलें " असें ऐकलें होतें. तर कान्हुडा या शब्दापासून कानडा असा शब्द आला असणें शक्य आहे. कान्हु हें कन्ह म्हणजे कृष्ण याचेंच स्वरूप आहे. पूर्वी प्रथमा एकवचनी उकारान्त असे त्यामुळें जानु, कान्हु हीं नांवें ज्ञान व कृष्ण या अर्थानें प्रचारांत आलीं व तीं अजून चालूच आहेत. विठ्ठल या शब्दाची व्युत्पत्ति देतांना कै. राजवाडे यांनी विठ्ठल हें विष्णु या शब्दाचें कर्नाटकी रूप आहे असें एकदां मांडलें होतें, पण पुढे तें मत त्यांनी सोडून देऊन विटेवर उभा राहणारा तो विठ्ठल असें स्पष्टीकरण केलें आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# १ : प्रास्ताविक

प्रत्येक कृति उत्पन्न होते तेव्हांपासूनच तिचें परीक्षण लोकांकडून होऊं लागतें. तें परीक्षण शब्दांनीं नेहमीं व्यक्त होतें असेंहि नाहीं. तें परीक्षण अगर मत शब्दांनीं जरी व्यक्त झालें नाहीं तरी तें कृतीनें व्यक्त होतें. लढवय्ये–मुत्सद्दी यांना हा नियम जसा लागू आहे तसाच तो कवींनाहि लागू आहे. मराठी कविता जितकी जुनी आहे तितकेंच तिचें परीक्षणहि जुनें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठी कवितेचा जर इतिहास लिहावयास पाहिजे तर त्याबरोबर तिच्याबरोबर जन्मास आलेल्या परीक्षणाचाहि इतिहास लिहिला पाहिजे; किंबहुना कवितापरीक्षणाच्या इतिहासाशिवाय कवितेचाहि इतिहास अपूर्ण होईल असें म्हटलें तरी चालेल.

काव्यपरीक्षणाच्या इतिहासाचें वाङ्मयेतिहासांत जसें महत्त्व आहे तसेंच त्याचें साहित्यशास्त्राच्या इतिहासांत महत्त्व आहे. संस्कृतामध्यें जें साहित्य-शास्त्र झालें तें लक्षांत घेऊन जुनें मराठी वाङ्मय उत्पन्न झालेलें नाहीं. संस्कृत साहित्यशास्त्रावरील अनेक ग्रंथ प्रचलित देशी भाषांतील वाङ्मयाचा बराच विकास झाल्यानंतर झाले आहेत. उदाहरणार्थ, जगन्नाथरायाचा रसगंगाधर हा ग्रंथ तर अत्यंत अर्वाचीन होय. हा ग्रंथ तयार झाला होता तेव्हां हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली इत्यादि भाषांत वाङ्मयहि पुष्कळ तयार झालें होतें. पण संस्कृत साहित्य-शास्त्रावरील ग्रंथकारांनीं या नव्या वाढीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. नवीन प्रकारच्या ग्रंथांकडे लक्ष देऊन जे कांहीं तात्त्विक नियम निघतील त्या नियमांचा अंतर्भाव जुन्या साहित्यशास्त्रांत करण्याची क्रिया अजूनहि झाली नाहीं. या नवीन विकासा-कडे कोणत्या दृष्टीनें पहावें हेंदेखील संस्कृत साहित्यकारांस समजलें नसावें असें दिसतें. अर्वाचीन काळच्या वाङ्मयपंडितांस जुन्या साहित्यशास्त्रास अर्वाचीनत्व आणणें हें एक महत्त्वाचें अभ्यासक्षेत्र आहे.

नवीन वाङ्मयावर तत्कालीनांकडून विचार झाला नाहीं असें नाहीं. पण त्या विचाराचेंहि महत्त्व संस्कृत साहित्यशास्त्रकारांस नव्हतें. त्यास कारणें अनेक आहेत. या नवीन उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयाला एक तर काव्य म्हणण्याची इच्छा नव्हती; किंवा प्राकृताचें वाङ्मय, आणि त्यावर प्राकृतांची टीका, हीं विचारांत काय घ्यावयाचीं अशा प्रकारची वृत्ति संस्कृत साहित्यशास्त्राच्या ग्रंथकारांत असावी.

पण साहित्यशास्त्रकारांची ही प्राकृत वाङ्मयाकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ति बरोबर नव्हती. कारण या वृत्तीनें त्यांनीं आपल्या ग्रंथांची वाढ खुंटविली असेंच म्हणावें लागेल. ज्ञानेश्वरीसारख्या वेदान्तग्रंथाला काव्य या सदरांत घालतां येत नाहीं म्हणून त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें तर त्यांत त्यांचा दोष नाहीं. तथापि 'पृथ्वीराज रासा', 'अल्हखंड' वगैरे हिंदी ग्रंथांचा तरी त्यांनीं विचार करणें अवश्य होतें. त्यांनीं त्या वेळेसच जर विचार केला असता तर आतांपर्यंत भारतीय साहित्यशास्त्राला निराळें वळण लागून गेलें असतें.

लोकांची आवडनिवड, कवीची कृति आणि साहित्यशास्त्र यांचा अन्योन्यसंबंध कसा काय असतो याविषयीं अगोदर थोडेंसें लिहिलें पाहिजे.

साहित्यशास्त्र हें वाढतें शास्त्र आहे. नवें वाङ्मय उत्पन्न होतें तसतशी त्यावर लोकांची आवडनिवड व्यक्त होते, आणि ती आवडनिवड नियम उत्पन्न करून शास्त्र वृद्धिंगत करते.

साहित्यशास्त्राचे नियम तयार झाले म्हणजे काव्यपरीक्षक त्या नियमाप्रमाणें कवि चालला आहे किंवा नाहीं हें पाहूं लागतात. काव्यपरीक्षकांच्या या प्रकारच्या टीकेमुळें कित्येक लेखक भितात, तर कित्येक दांडगाई करून पुढें जातात. ते असें समजतात कीं, साहित्याचे नियम सूचक किंवा मार्गदर्शक आहेत, त्यांचें दास्य उपयोगी नाहीं; ज्या अर्थीं साहित्यशास्त्र हें लोकांच्या आवडीनिवडीचें शास्त्र आहे त्या अर्थीं लोकांची आवड-निवड ही प्रधान आहे, आणि साहित्यशास्त्राचे जमा झालेले नियम अ-प्रधान होत. लोकांची व्यक्त झालेली आवडनिवड नियम शोधूं पाहणाऱ्या तत्त्ववेत्त्यांच्या साहित्यशास्त्राच्या घटनेस मदत करते. हें तत्त्व ओळखून धैर्यवान् कवी आपली

कृति साहित्याचे नियम झुगारून प्रत्यक्ष जनतेपुढें नेली पाहिजे आणि तीवर प्रत्यक्ष जनतेचें मत घेतलें पाहिजे, हें ओळखतात. या प्रकारचे कवी काव्यौघास निराळें वळण देतात, एवढेंच नव्हे तर साहित्यशास्त्राचीहि सुधारणा करतात.

लोकांची आवडनिवड निर्दोष असते असें नाहीं, पण ती समजून घेतली पाहिजे. उत्तम कलेचा कविदेखील प्रथम लोकांना अप्रिय असणें शक्य आहे; पण कवि चांगला असला तर त्याच्याशीं जनतेचा विरोध फार दिवस रहात नाहीं. उत्तम कवि आपली आवड लोकांच्या मनांत स्थापन करील. कवीच्या अभिरुचीप्रमाणें लोकाभिरुचि तयार होणें शक्य आहे, ही गोष्ट दूरदर्शी कवि समजून असतो.

लोकांच्या आवडीनिवडीचें परीक्षण करणें व ती आवड जाणून लिहिणें ही क्रिया प्रत्येक लेखक करीत असतो. जो लेखक आपण असें करीत नाहीं असें म्हणतो, तो एक तर आपण काय करीत आहों याविषयीं अज्ञानी असला पाहिजे, किंवा आपल्या स्वतंत्र वृत्तीविषयीं खोटी बढाई मारणारा असला पाहिजे.

लोकांच्या आवडीनिवडी कांहीं अंशीं प्रत्यक्ष ग्रंथांच्या वाचनानें उत्पन्न झालेल्या असतात, तर कांहीं अंशीं पूर्वग्रंथांवर व्यक्त झालेल्या मतांमुळेंच उत्पन्न झालेल्या असतात. त्या व्यक्त झालेल्या मतांचा परिणाम उत्तरकालीन अभिरुचीवर घडतो. हें लक्षांत घेऊन टीकावाङ्मय लोकाभिरुचीचें निर्णायक कितपत झालें हें आपणास पाहिलें पाहिजे. अभिरुचीचा आपण इतिहास लिहूं लागलों तर काव्यपरीक्षणाचा इतिहास हा लोकाभिरुचीच्या इतिहासाचा भाग होईल, व अभिरुचीचा इतिहास हा वाङ्मयेतिहासाचा भाग होईल. वाङ्मयाचा इतिहास अभिरुचीच्या इतिहासावांचून समजावयाचा नाहीं. आणि यासाठीं लोकांचीं काव्यविषयक मतें निरनिराळ्या काळीं कशीं व्यक्त झालीं व बदलत गेलीं हें पाहिलें पाहिजे; आणि त्यांत कांहीं विकास झाला असेल तर तोहि शोधून काढला पाहिजे.

० ० ०

जनता हें काव्याचें शेवटचें न्यायासन आहे. आणि काव्यपरीक्षक हें मधलें न्यायासन आहे. ज्याप्रमाणें शेवटचें न्यायासन पुष्कळदां खालच्या कोर्टाचा निकाल कायम करतें व कांहीं प्रसंगीं अगदीं फिरवून टाकतें त्या प्रकारची स्थिति वाङ्मय-क्षेत्रांतहि आहे. किंबहुना अशीहि उपमा देतां येईल कीं, काव्याचा विरुद्ध परीक्षक हा वादी आहे आणि ग्रंथकार हा प्रतिवादी आहे, आणि काव्याकडे अनुकूल वृत्तीनें पाहून त्याचें परीक्षण करणारे टीकाकार हे प्रतिवादीचे वकील आहेत; व काव्याविरुद्ध खटला जनतेच्या दरबारांत अनेक वर्षें चालत राहून त्याचा निकाल होतो, आणि तोदेखील न कळत होतो. जनता एकच निकाल देते, आणि तो म्हटला म्हणजे काव्य जिवंत राहणार कीं मरणार याविषयींचा असतो. ज्याप्रमाणें खालच्या कोर्टाचा निकाल व विरुद्ध किंवा तर्फेच्या वकिलांचीं बोलणीं हीं अंतिम न्यायाधिशाचें मत बनविण्यास उपयोगी पडतात, त्याप्रमाणेंच काव्य-परीक्षकवर्गाचें म्हणणें जनतेस आपला निर्णय ठरविण्यास उपयोगी पडतें. आणि या दृष्टीनें टीकाकारांच्या वाङ्मयाचें महत्त्व आहे. ज्याप्रमाणें वेडें-वांकडें आणि चुकांनीं भरलेलें भाषण करूं नये म्हणून वकिलांच्या भाषणांवर कोर्टाची टेहेळणी असते त्याप्रमाणें दीर्घकालानें निकाल देणारी जी जनता तिच्या तर्फेनें टीकाकारांच्या वाङ्मयावरहि विचार झाला पाहिजे. चांगल्या टीकेची प्रशंसा व अप्रामाणिक टीकेची निर्भर्त्सना हीं जर समाजांत नसतील तर टीकाकार हे अगदीं बेजबाबदार होतील. प्रामाणिक व मार्मिक टीकेबद्दल अभिज्ञतादेखील ताबडतोब होत नाहीं. ती व्यक्त होण्यासाठीं-देखील काळ लोटावा लागतो. वाङ्मयपरीक्षणाचे इतिहास यासाठींच उपयोगी पडतात.

काव्यपरीक्षणाच्या इतिहासाचें दुसरें एक महत्त्व आहे. तें म्हटलें म्हणजे

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
वि.


टीकाकार-लेखकास त्याचें कार्य काय आहे तें समजून यावें. मार्मिक, जबाबदार आणि दूरदृष्टि टीकाकारास आपण टीका करतांना वाङ्मयाच्या विशिष्ट विकासास मदत करीत आहों कीं अपकर्ष करीत आहों याची कल्पना असणें अवश्य आहे. काव्यपरीक्षण कोणत्या बाजूंनीं चालू आहे, कोणत्या बाजूंनीं चालू नाहीं हें टीकाकारास समजलें पाहिजे. काव्यपरीक्षणाचा व अभिरुचीचा स्थूल इतिहास टीकाकारास ठाऊक असला म्हणजे त्याची टीकादेखील उत्तरोत्तर अधिक सुशिक्षित होत जाईल.

महाराष्ट्रीय काव्यपरीक्षणाच्या इतिहासांत आपणास कांहीं विकास दृष्टीस पडतो. मुद्रणकलेच्या काळापूर्वीं टीकालेखन फारच संक्षिप्त प्रकारें होई; तर मुद्रणकलेच्या आगमनानंतरच्या काळांत विस्तृत होऊं लागलें. तथापि पूर्वपरंपरेची छाप एकाएकीं सुटली नाहीं. टीकाकारांची वृत्ति पूर्वीं काय होती व ती बदलत कशी गेली हेंदेखील पाहणें एक तऱ्हेचा इतिहास दाखवील, आणि तो इतिहास महाराष्ट्रांतील वाङ्मयेतिहासाचा किंवा बौद्धिक इतिहासाचा महत्त्वाचा भाग होईल.

मराठी काव्याचें परीक्षण करण्याची पद्धति, ब्रिटिश राज्यानंतर जेव्हां निबंध लिहिण्याची पद्धत सुरू झाली तेव्हांपासूनच उत्पन्न झाली असें म्हणतां येणार नाहीं. त्यापूर्वींच्या काळांतदेखील लोकांना मतें होतीं. व तीं मतें ते व्यक्त करीत असत. त्या मतांचें विवरण मात्र करण्यांत येत नसे. ज्याप्रमाणें जेवणारा मनुष्य कोणाचा स्वयंपाक चांगला हें सांगूं शकतो पण स्वयंपाक चांगला कां हें त्याला सांगतां येणार नाहीं त्याप्रमाणेंच काव्याचें आहे. ज्याला जें काव्य आवडतें तें तो पाठ करतो किंवा गातो; आणि या रीतीनें तो आपली आवड व्यक्त करतो. अमुक एक काव्य लोकप्रिय कां झालें हें तत्त्ववेत्ता सांगावयाचा प्रयत्न करतो. पण तो जनतेच्या आवडीनिवडीचें स्पष्टीकरण करतो.

आपल्या पूर्वजांनीं जुन्या कवींविषयीं ज्या आवडी व्यक्त केल्या त्यांच्या आवडीच्या अवलोकनापलीकडे आपण आज बरेच गेलों आहों, व थोडीशी विवेचक शक्तीहि खर्च केली आहे. तथापि पूर्वींच्या लोकमतांत महत्त्वाचा बदल झाला आहे असें वाटत नाहीं.

**सुश्लोक वामनाचा अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची**
**ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥**

असें प्रल्हाद बडव्याप्रमाणें आजचा वाचकदेखील म्हणेल.

महाराष्ट्रीयांच्या काव्याभिज्ञतेचा इतिहास द्यावयाचा म्हणजे दोन गोष्टी करावयाच्या. काव्यविषयक जी सामान्य चर्चा निरनिराळ्या ग्रंथकारांनीं केली असेल तिचें स्वरूप दाखवावयाचें. आणि त्याप्रमाणेंच विशिष्ट कवि घेऊन त्याच्या काव्याची अभिज्ञता समकालीनांनीं व उत्तरकालीनांनीं कशी दाखविली हें दाखवावयाचें. चालू समाज जेव्हां अभिज्ञता दाखवितो तेव्हां ती अभिज्ञता त्या कालांतीलच तरुणांच्या मनावर परिणाम करून वाङ्मयाच्या पुढील प्रवाहाचें स्वरूप ठरविते. उलटपक्षीं जें वाङ्मय उत्पन्न होतें त्याच्या ग्रहणानें कांहीं अंशीं समकालीनांची व बऱ्याच अंशीं उत्तरकालीनांची अभिरुचि बनते. एवंच, काव्याची अभिज्ञता आणि उत्पादन या गोष्टी स्परस्परांवर परिणाम करणाऱ्या आहेत. वाङ्मयाचा इतिहास लिहितांना जें वाङ्मय उत्पन्न झालें त्याच्याकडेसच लोकांचें लक्ष वेधतें आणि वाङ्मयेतिहासांत निरनिराळ्या काळांतील वाङ्मयाचें स्वरूप पाहून आजचा लेखक अभिप्राय देतो. तथापि प्रत्येक काळांत लोकमत होतें आणि तें परिणामकारी होतें, आणि भावी वाङ्मयाच्या स्वरूपाचें कांहीं अंशीं निर्णायक होतें ही गोष्ट प्राधान्यानें पुढें आणण्यासाठीं लोकांच्या अभिज्ञतेचाच इतिहास निराळा काढून मांडल्यास एकंदर वाङ्मयाच्या इतिहासास मदत केल्यासारखेंच होईल. एवढेंच नव्हे तर ज्या बाजूकडे पुष्कळ लोकांचें लक्ष जात नाहीं ती बाजू चवाट्यावर मांडल्यासारखेंच होईल.

काव्याभिज्ञता दोन तऱ्हेनें व्यक्त होते : लोक जेव्हां काव्यविषयक तात्त्विक चर्चा करतात तेव्हां आपलीं मतें प्रदर्शित करतात, व त्याप्रमाणेंच दुसऱ्या एखाद्या कवीवर मत देतात तेव्हां ती प्रदर्शित करतात. या दोन्ही तऱ्हांनीं महाराष्ट्रीय अभिरुचीचा इतिहास देतां येण्याजोगा आहे. "कवित्व हें नोहे टांकसाळी नाणें" असें जेव्हां तुकाराम वदतो तेव्हां तो काव्यविषयक निरपेक्ष विचार व्यक्त करतो. तसेंच

**"ज्ञानेश्वरी पाठीं । जो वोंवी घालील मऱ्हाटी ।**
**तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेवली"**

असें जेव्हां एकनाथ सांगतो तेव्हां तो कवितेविषयीं सापेक्ष मत व्यक्त करतो. आपणांस या दोन्ही प्रकारचें साहित्य जमा करून महाराष्ट्राच्या काव्यविषयक सापेक्ष अभिरुचीचा आणि निरपेक्ष कल्पनांचा इतिहास द्यावयाचा आहे.

पण हें विधानदेखील थोडेंसें नियमित केलें पाहिजे. अभिरुचीचा इतिहास द्यावयाचा म्हणून सांगितलें तेथें एकंदर अभिरुचीचा इतिहास द्यावयाचा विचार नाहीं. तर अभिरुचीच्या इतिहासाचें जें एक अंग काव्यपरीक्षण हें आहे त्या अंगाचाच इतिहास प्राधान्यानें द्यावयाचा आहे. हा इतिहास देण्याजोगा विषय आहे किंवा नाहीं याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. समाजांतील प्रत्येक क्रिया तत्त्वज्ञानाच्या विचाराचा विषय झाली पाहिजे, आणि तत्त्वज्ञांनीं विचार करतांना त्या क्रियेचें दीर्घकालीन स्वरूप अवलोकिलें पाहिजे.

वाङ्मयाच्या क्षेत्रांत काम करणारे जे अनेक प्रकारचे लोक आहेत ते कांहीं विशिष्ट क्रिया करीत असतात. निरनिराळ्या क्रियांचा अन्योन्याश्रय आणि हेतू कांहीं अंशीं तत्कालीन क्रियांच्या अवलोकनानें दृष्टीस पडतो, तर कांहीं क्रियांची उपयुक्तता दीर्घकालानेंच दृष्टीस पडते. यासाठीं समाजशास्त्रांत प्रत्येक कार्यसमुच्चयाचें आणि तदंतर्गत क्रियांचें दीर्घकालीन स्वरूप पाहण्याची पद्धति पडली आहे. टीकाकारांच्या प्रयत्नाचा परिणाम कांहीं अंशीं तात्कालिक दिसून येतो तर कांहीं अंशीं दीर्घकालानें दिसून येतो. तसेंच असेंहि दिसून येतें कीं, कांहीं कृत्य कायमचा परिणाम कोणताच घडवीत नाहीं. तर त्या तऱ्हेच्या कृत्याच्या निष्फलतेचीहि जाणीव झाली पाहिजे. समाजांत होणाऱ्या प्रत्येक क्रियेची कार्यप्रवीणता किंवा एफीशिअन्सी तपाशीत बसण्यानें ती क्रिया अधिक कार्यप्रवीण होण्यास मदत होते. टीकेची कार्य-प्रवीणता वधावयाची म्हणजे निदान कांहीं तरी काळ जावा लागतोच, व या दृष्टीनें टीकेविषयीं ऐतिहासिक विचार करण्याची आवश्यकता उत्पन्न होतेच. वर्तमानपत्रें व मासिकें यांतून टीका करण्याची पद्धत सुरू झाल्यास जवळ जवळ दोन पिढ्या झाल्या. या दोन पिढ्यांत अनुभवानें टीकाकार काय शिकले आणि उत्तरकालीनांनीं पूर्वकालीनांपेक्षां काय प्रगति दाखविली हें पाहण्याजोगें आहे.

**काव्यपरीक्षकांची टीका जनतेच्या अभिज्ञतेची दर्शक आहे काय ?**

महाराष्ट्रीय अभिरुचीच्या इतिहासास काव्यपरीक्षकांच्या विवेचनाचें आणि अभिज्ञतेचें महत्त्व आहेच. तथापि जनतेची अभिज्ञता केवळ तेवढ्यावरून काढतां येणार नाहीं. काव्यपरीक्षकांची अभिज्ञता ही वाचकवर्गाच्या किंवा श्रोतृवर्गाच्या आवडीनिवडीची कितपत दर्शक आहे हा प्रश्न उरतोच. ग्रंथाची लोकप्रियता केवळ मध्यस्थांच्या शिफारशीवर अवलंबून असते अशांतला भाग नाहीं. उच्च प्रतीच्या ग्रंथाची योग्यता जनतेस आपोआप समजते, आणि परीक्षकांची शिफारस केवळ दुय्यमपणा पावते. जनतेंतील सामान्य व्यक्ति स्वतः परीक्षण करून दुसऱ्यास कळविणारी असते. ग्रंथकारांमध्यें ईर्ष्या, असूया, द्वेष इत्यादि भाव असतात हें जनता ओळखते, आणि जेव्हां उत्तम प्रकारच्या ग्रंथकारास इतर ग्रंथकार मत्सरानें छळूं लागतात तेव्हां जनता छळल्या जाणाऱ्याचें महत्त्व ताबडतोब ओळखते. याचीं उदाहरणे आपणांस आजच्या कालांत, तशींच प्राचीन कालांतदेखील देतां येतील. तुकारामास वह्या बुडवावयास लावण्याची क्रिया केवळ धंद्यांतील मत्सराची दर्शक आहे, पण तीच गोष्ट तुकारामाच्या वाणींत कांहीं तरी नवें तेज आहे याची तत्कालीन लोकांत जाहिरात करती झाली. जनतेच्या परीक्षणांत दोष असतात पण तेच दोष धंदेवाईक टीकाकारांच्या लेखांतहि असतात. जेव्हा अगदीं अपरिचित प्रकारचें वाङ्मय डोळ्यांसमोर येतें तेव्हां जनतेस त्या प्रकारच्या वाङ्मयाची आवड उत्पन्न झाली नसल्यामुळें जनता तिकडे प्रथम लक्ष देत नाहीं. तसेंच टीकालेखकासदेखील त्या प्रकारच्या वाङ्मयाची अभिज्ञता उत्पन्न झाली नसल्यामुळें टीकाकारदेखील त्या नवीन प्रकाराची निंदाच करतात. या प्रकारच्या गोष्टी आपणांस प्रत्येक देशाच्या वाङ्मयाच्या इतिहासांत दिसून येतात. उत्तम कवि असून त्याची समकालीनांत चहा झाली नाहीं अशामध्यें भवभूति कवीचें नांव घेतां येईल. तथापि या कवीस उत्तरकालीं जें महत्त्व मिळालें त्यावरून समकालीनांस रुचलें नाहीं तरी हरकत नाहीं, आपलें वाङ्मयविषयक ध्येय सोडूं नये, अशा तऱ्हेचा उपदेश हाच कवि अजून सर्व भारतीय कवींस करीत आहे असें म्हणतां येईल. जनता उदासीन असली तरी कवीनें निराश होऊं नये; ज्यास उच्च प्रकारचें वाङ्मय

पाहिजे असेल त्यास दीर्घकालीन आशावादी बनलें पाहिजे, या भावनांचा भवभूति फार जुना शिक्षक होय.

महाराष्ट्रीय वाङ्मय राजाश्रयानें वृद्धिंगत न होतां केवळ लोकाश्रयानें वृद्धिंगत व्हावयाचें, हा महाराष्ट्राला कित्येकांच्या मतें शाप लागला आहे; किंवा माझ्या मतें महाराष्ट्राला हें वरदान मिळालें आहे. त्याचा पहिला अनुभव महाकवि भवभूति यासच मिळाला आहे. भवभूति हा लोकाश्रयावर अवलंबून राहणारा कवि, आणि त्याच्या वाङ्मयविषयक उच्च ध्येयामुळें समकालीनांकडून गौरव होत नाहीं अशा कचाटींत सांपडला असतांदेखील त्यानें संस्कृत भाषेला भूषणास्पद होतील अशीं तीन नाटकें लिहिलीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. भवभूति हा वऱ्हाडचा. विदर्भदेश हा महाराष्ट्रांत सर्वांत अगोदर सुधारलेला, आणि येथील राजावलिदेखील फार जुनी, असें असता त्यास राजाश्रय न मिळतां आपलीं नाटकें जत्रांच्या ठिकाणीं प्रगट करावीं लागलीं. यावरून त्याची लोकांकडून कांहीं तरी चहा होत असली पाहिजे. नाहीं तर जत्रांच्या ठिकाणीं त्यास आपलीं नाटकें दाखविण्याची संधीच मिळाली नसती. शिवाय जर त्यास त्याच्या काळांतच चहाते मिळाले नसते तर त्याचीं नाटकें टिकलींहि नसतीं; पण तीं ज्या अर्थी टिकलीं आहेत त्या अर्थीं जनतेस चांगलें वाङ्मय टिकविण्याइतकें बल आहे खचित. भवभूतीनें लोकांची अनभिज्ञता पाहून जे उद्गार काढले आहेत त्यांचा अर्थ एवढाच कीं, भवभूतीची अवहेलना दरबारी मंडळींकडून झाली असेल. विदर्भाच्या राजघराण्यानें त्यास आश्रय दिला नसेल, व राजाश्रयास असलेल्या इतर कवींनीं त्यास राजद्वारापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला असेल. भवभूतीच्या कहाणीवरून त्याची लोकात चहा नव्हती असा अर्थ निघत नाहीं. तेव्हा एकंदरींत जनतेच्या अभिज्ञतेविरुद्ध निकाल देण्यास जडच जाईल. याशिवाय आपणांस असेंहि दिसून येईल कीं, जें चांगलें होतें तेंच टिकलें, असा ढोपट नियम केला तर त्यास थोडेच अपवाद आढळतील. दिवसानुदिवस संशोधक नवीन नवीन ग्रंथ शोधून काढीत आहेत. पण अव्वल इंग्रजीच्या कालांत जे ग्रंथ लोकांत प्रचलित होते तेच ग्रंथ अजूनहि लोकप्रिय आहेत, आणि संशोधकांनीं शोधून काढलेले ग्रंथ छापण्यास मारामार पडते. व छापल्यास ते खपण्याची मारामार पडते. काव्यसंग्रहाचे ग्रंथ छापावयास किती अडचण

पडत होती तें निर्णयसागरनें मधून मधून प्रसिद्ध केलेल्या कहाण्यांवरून कळून येणार आहे.

सामान्य वाचक आपलें परीक्षण घेऊन किंवा टाळून व्यक्त करीत आहे. प्रजासत्तात्मक राज्यांत जेव्हां 'रेफरँडम 'नें म्हणजे सर्व जनतेपुढें कायदा ठेवून कायद्यावर जनतेचें मत घेण्यांत येतें, तेव्हां जनता 'होय' किंवा 'नाहीं' एवढेंच उत्तर देते. आणि या रीतीनें अगदीं एका शब्दांत आपला निकाल देऊन टाकते. नाटकें, सिनेमा, गाणीं याविषयीं हाच नियम सांगतां येईल. जनता फार टीका करीत नाहीं, पण ग्रंथकाराचें भवितव्य निश्चयेंकरून ठरविते, आणि ती त्याचप्रमाणें भविष्यकालास आपला आदेश देऊन टाकते. जनतेच्या अभिज्ञतेवर महाराष्ट्राची भिस्त आहे, आणि यासाठीं सुशिक्षित अभिरुचीचा जनतेंत प्रसार होणें अवश्य आहे.

मराठी कवितेस दरबारचा आश्रय नाहीं आणि त्यामुळें दरबारी आश्रयाचे दुर्गुणहि तिला लागले नाहींत. राजांच्या खोट्या प्रशस्ती मराठींत नाहींत. जेव्हां दरबारचा आश्रय मराठी कवींना मिळाला तेव्हां त्यांची नीति बिघडून तेदेखील खोटें लिहिण्यास कसे प्रवृत्त झाले याला उदाहरण वऱ्हाडच्या देवनाथ कवीचें आहे. हा शिंदे सरकारचे तुकडे खात होता; आणि नाना फडणिसाला शिव्या देणारा एक हिंदींत पोवाडा त्यानें केला आहे. शिंद्यानें विश्वासघातानें नानाला तुरुंगांत टाकलें, त्याबद्दल त्यानें नानालाच दोष दिला आहे. या प्रकारचें तुरळक उदाहरण सोडून दिलें तर मराठी कवि सामान्यतः स्वतंत्रच असत असें दिसून येतें. मराठी भाषेला राजाश्रय नाहीं ही स्थिति भवभूतीच्या कालापासून आहे असें वाटतें. ज्ञानेश्वरानंतर हिंदुराज्य गेलें त्या वेळेस मराठी कवितेस मुसलमान राजांकडून आश्रय मिळाला नाहीं यांत नवल नाहीं. मराठी राज्यांतदेखील ही कवींच्या उपेक्षेची स्थिति फारशी पालटली नव्हती. याविषयीं प्रसिद्ध मोगरे कवीनें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यावर लिहिलेल्या विलापिकेमध्यें जें श्लोक-चतुष्टय घातलें आहे त्यांतील म्हणणें जरी अक्षरशः खरें नाहीं तरी तत्त्वतः खरें आहे. तें श्लोकचतुष्टय येणेंप्रमाणें :

**नाहीं राजाश्रयाचा अनुभव अजुनी लेश ज्या दुर्भगेला**
**जीचा धिःक्कार बुद्धया रसिक जन गणीं आजपर्यंत केला.**

भेणें जी पंडितांच्या बहुत दिवस जी नीचसंगेंचि राही
शास्त्रीं ठेवूं दिला न क्षणहि पद जिला सोंवळया ब्राह्मणांही
जीला पाहुनिया निराश्रित अशी आश्वासिली वामनें
मोरोपंतचि जीकडे वळवुनी घे पंडितांचीं मनें
तात्यांनीं वरितां परत्र दिधलें त्वत्तातहस्तीं जिला
होता वाटत जीस तातसमची तो कृष्णशास्त्री भला
जीला शृंगारवीराद्यखिलनवरसां सादरें सेववोनी
होतां कालानुसारें तरुण मग अलंकारुनी ग्रंथरत्नीं
जीला तूंचि स्वहस्तें रसिकजन गणीं योग्य अर्पावयाला
जीच्या आम्ही वऱ्हाडी मुदित परिणया जाहलों यावयाला
कोणी वैधव्य आलें म्हणति जन तुझ्या जीस देहावसानीं
विष्णो तूझी परी जी म्हणवुनि भगिनी आपणां धन्य मानी
त्या ज्या धर्मस्वसेचे बहुत पुरविले लाड देवोनि शिक्षा
कैसा तूझा अतां ही विरह सहन करी ती महाराष्ट्र भाषा

या ओळींतील मुख्य चुकीचें विधान आहे तें हें कीं, शृंगारादि नवरसांनीं भाषेला मंडविण्याचें श्रेय जें विष्णुशास्त्र्यांस दिलें आहे तें चुकीचें आहे. वस्तुतः हें श्रेय त्यांच्याकडे नसून वामनादि कवींकडे आहे.

मराठी वाङ्मय प्रारंभापासूनच लोकाश्रयी होतें. त्यास राजदरबाराचा फारसा स्पर्श झाला नाहीं; आणि त्याचे परिणाम वाङ्मयाच्या स्वरूपावर दिसून येत आहेत. ज्ञानेश्वर देवगिरी राजधानीपासून फार दूर होता. ज्ञानेश्वराची ख्याति देवगिरीला पोंचून त्याचा कदाचित् सत्कारहि झाला असता, पण तसा काळच आला नाहीं. ज्ञानेश्वरीनंतर देवगिरीचें राज्यच लयास गेलें. ज्ञानेश्वराविषयीं आदर बोपदेवानें आपल्या शुद्धिपत्रांत व्यक्त केलाच आहे ( भिंगारकरकृत ज्ञानेश्वर काल पहा ), आणि बोपदेव हा तर देवगिरीच्या दरबारांत वजनदार मनुष्य होता; व देवगिरीचें राज्य टिकलें असतें तर ज्ञानेश्वराच्या ग्रंथाचा आदर होऊन पुढें मराठी भाषेंत झालेल्या

ग्रंथांस महत्त्व प्राप्त झालें असतें. देवगिरीच्या दरबारांत ग्रंथांची चहा अगदींच नव्हती असें नाहीं. ' चतुर्वर्गचिंतामणि ' या ग्रंथाचा विद्वान् कर्ता हेमाद्रि हा तर तेथें प्रधानच होता. आणि बोपदेव हादेखील ग्रंथकार होता. अशा सुशिक्षित राज्यांत मराठी ग्रंथांची प्रतिष्ठा वाढलीच असती. तथापि ज्ञानेश्वरासारख्या मनुष्याला राजदरबारीं झालेल्या मानामुळें ग्रंथरचनेकडे प्रवृत्ति झाली असती असें नाहीं. मराठी राज्य जरी गेलें तरी ज्ञानेश्वरीमुळें मराठी ग्रंथरचनेचा संप्रदाय स्थापन झाला हें खचित. त्याच्या ग्रंथास राजेलोकांनीं पुढें आणलें नसून लोकांनींच पुढें आणलें, व राज्य जरी नष्ट झालें तरी ज्ञानेश्वरी टिकली. एवढेंच नव्हे तर लोकांतील मान्यतेनें आणि त्यांत उत्पन्न झालेल्या भागवत संप्रदायामुळें ग्रंथ जिवंत राहण्याची परंपरा कायम झाली.

महाराष्ट्रीय वाङ्मयाला राजाचा आश्रय असे याला कोणी हालाच्या सप्तशतीचें उदाहरण देतील. पण त्यावरून कवींस राजाश्रय होता असें सिद्ध होणार नाहीं. कारण हालाची सप्तशती हा संग्रह आहे. त्या लावण्या लिहिणारे कवी निरनिराळ्या काळीं होऊन गेले. संग्रह राजानें करविला असेल पण त्यावरून कवींस राजाश्रय होता हें सिद्ध होणार नाहीं. शातवाहन राजे हे जरी ब्राह्मण होते तरी पुढें त्यांचे लग्नव्यवहार इतर लोकांशीं होऊन त्यांच्यामध्यें उच्च संस्काराचा लोपहि झाला असेल. महाराष्ट्रांतील राजेलोकांची संस्कृति उच्च दर्जाची कोठेंच दिसत नाहीं. ज्याप्रमाणें तमाशास उत्तेजन देणारा एखादा राजा महाराष्ट्रांत आजकालच्या दिवसांतहि दिसतो त्याप्रमाणेंच त्या वेळेस लावण्यांचा शोकी एखादा शातवाहन असला म्हणजे राजे लोकांची कवितेबद्दल अभिरुचि दिसून आली असें नाहीं. तथापि ज्यानें जें केलें त्याबद्दल त्याला श्रेय दिलें पाहिजे म्हणून वाङ्मयाविषयीं उदासीन राजवर्गात हाल हा एक अपवाद होता असें म्हटलें पाहिजे.

मराठी राज्यामध्यें शिवाजीच्या काळांत वाङ्मयाला उत्तेजन मिळालें, आणि संभाजीनेंदेखील वाङ्मयास उत्तेजन दिलें होतें. तथापि एकंदरींत वाङ्मयास उत्तेजन देण्यांत मराठी राज्यांत औदासीन्यच आहे. शिवाजी व संभाजी यांनींदेखील मराठी काव्यास उत्तेजन दिल्याचा पुरावा फारसा नाहीं. मराठी राज्य गेलें आणि सुधारलेलें इंग्रज सरकार आलें. त्या सरकारनें

मराठी भाषेच्या उत्तेजनास अनुकूल अशी स्थिति न ठेवतां मराठी भाषेस मारक अशीच परिस्थिति ठेवली आहे.

एवंच, मराठी वाङ्मय हें जवळजवळ पूर्णपणें लोकाश्रयी आहे. त्यामुळें या वाङ्मयास राजाश्रयी वाङ्मयाचे घाणेरडे गुण लागले नाहींत. ज्या अर्थीं हें वाङ्मय उत्तरोत्तर लोकाश्रयीच होत जाणार त्या अर्थीं वाङ्मयाचे वाचक आणि उत्पादक यांच्यामध्यें असणारे जे परीक्षक त्यांच्यावरील जबाबदारी अधिक वाढली आहे; आणि यामुळें त्यांच्या प्रयत्नांची छाननी करणेंहि या कालांत विशेष आवश्यक आहे. टीकाकारांत प्रामाणिकपणा आणि अभिज्ञता हींदखील वाढत गेलीं पाहिजेत.

लोकांचें जें मत असतें तेंच मत टीकाकारांच्या लेखांत अंशतः व्यक्त होतें. मात्र टीका प्रामाणिक असली पाहिजे. टीकाकाराचा हेतु ग्रंथाविषयीं आपलें खरें मत व्यक्त करण्याचा मात्र असला पाहिजे. तो विद्वान् आणि अभिज्ञ नसला तरी प्रामाणिक पाहिजे. जो विद्वान् नाहीं पण प्रामाणिक आहे त्याच्या टीकेचाहि उपयोग आहे. तशी टीका जनतेच्या मताची निदर्शक होते. पण टीकाकाराचा हेतु जेव्हां प्रामाणिक मत व्यक्त करण्याव्यतिरिक्त असतो तेव्हां मात्र तें टीकाकारांचें मत जनतेच्या मताचें निदर्शक नसल्यामुळें निरुपयोगी होतें. अप्रामाणिक टीका अनेक रीतींनीं दृष्टीस पडूं लागते. टीकाकार कधीं कधीं हातांशीं आलेल्या ग्रंथाची थट्टा करून वाचकांचें मनोरंजन कसें करावें या दृष्टीनें लिहूं लागतो. असल्या टीकेबद्दल कानउघाडणी वारंवार झाली पाहिजे, व त्या प्रकारच्या टीकेस महत्त्व न देण्याचें लोकांस शिकविलें पाहिजे. लोकांस असल्या टीकाकारांसंबंधानें जागरूक केलें म्हणजे पुरे आहे. म्हणजे जनता केवळ उपहासात्मक टीकेकडे लक्ष देणार नाहीं. जर विचारास घेतलेला ग्रंथ चांगला असेल तर त्याच्या उपहासाच्या योगानें टीकाकाराचें लघुत्व मात्र नजरेस येतें; आणि जर तो चांगला नसेल तर टीकाकाराच्या कोट्यांमुळें गचाळ ग्रंथ मात्र लोकांच्या नजरेस येतो, व ज्या ग्रंथाकडे कोणी लक्ष दिलें नसतें त्या ग्रंथास एक तऱ्हेचें चिरकालत्व प्राप्त होतें. अप्रामाणिक टीकेचा दुसरा एक प्रकार म्हटला म्हणजे तो ग्रंथ विशिष्ट कार्यासाठीं ज्या दृष्टीनें लिहिला असेल ती

दृष्टि टाकून त्याला भलतीच कसोटी लावणें. उदाहरणार्थ, कोणताहि चांगला ग्रंथ घेतला तर तो लहान मुलांच्या हातीं पडला तर काय परिणाम होतील या दृष्टीनें त्याचें परीक्षण करणें. उदाहरणार्थ, एखाद्यानें गुन्हेगारी कशी होते व गुन्हेगार शोधून काढतां कसा येतो यासंबंधानें १०० गुन्ह्यांच्या संशोधनाचा इतिहास प्रसिद्ध केला, व एखाद्या टीकाकारानें ग्रंथकाराच्या हेतूकडे न पाहतां त्यावर टीका आरंभली तर ती टीका अयोग्य होय. असो; ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि ग्रंथ वारंवार चर्चेचे विषय झाले आहेत. आणि एकनाथांपासून आजपर्यंत अनेक लोक त्याविषयीं मत व्यक्त करीत आहेत. एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, तुकाराम, रामदास, ही सर्व मंडळी समकालीन व्यक्तींच्या व उत्तरकालीन समाजाच्या चर्चेचा विषय झालाच आहे. त्या चर्चा लक्षांत घेऊन त्यांनीं काव्याभिज्ञता कशी दाखविली त्याची चर्चा पुढें येईलच.

आजचें महाराष्ट्रीय वाङ्मय पूर्णपणें लोकाश्रयानेंच वाढत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि चांगलें वाङ्मय पोसण्याइतकी जनता सुशिक्षित झाली आहे असें नाहीं, व लेखकाचा योगक्षेम जनतेवर चालेल अशी स्थिति आली नाहीं. नाटकें पूर्णपणें लोकाश्रयावरच वाढत आहेत. चांगल्या नाटकांबद्दल ग्रंथकारांना तीन तीन हजार रुपये मिळतात असा कै. खरे शास्त्री आणि रा. खाडिलकर यांचा अनुभव आहे. तरीदेखील ही प्राप्ति इतकी अल्प आहे कीं ग्रंथकाराचा योगक्षेम नाटकें लिहिण्यावर अजून चालणार नाहीं. कादंबऱ्यांवर प्राप्ती फारशी होत नाहीं. आणि कोणाहि कादंबरीकारास कादंबरी लेखनापासून १००० रुपयांची प्राप्ति झाल्याचें उदाहरण नाहीं. आजचा लोकाश्रय आहे तो लेखकाचा ग्रंथ जगापुढें आणण्यास त्यास समर्थ करण्याइतपत आहे; व फार झालें तर थोडासा मदतीच्या स्वरूपाचा मोबदलादेखील ग्रंथकारास मिळेल. चांगली कादंबरी तयार झाल्यास ती निदान फुकट मागण्यास प्रकाशक धांवतील असा काल आला आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं तसाहि काल नव्हता. चांगल्या कादंबरीचें प्रकाशन होणें दुरापास्त झालें होतें. तथापि पंचवीस वर्षांपूर्वीं लेखकांस कांहींच मिळत नव्हतें असें नाहीं. रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या ‘सुधारणेचा मध्यकाल’ या कादंबरीस प्रकाशकाकडून अवघे १२५ रु.

मिळाले, आणि ‘ वाईकर भटजी ’ या कादंबरीच्या लेखकास फक्त ५० रुपये मिळाले. तितकेच रुपये ‘ सती राणक देवी ’ या कादंबरीस मिळाले. पण जर गडकरी यांस १२५ रुपये देऊन त्यांची ‘ सुधारणेचा मध्यकाल ’ ही कादंबरी प्रसिद्ध करण्यास कै. मित्र पुढें आले नसते, तर ती कादंबरी बाहेर पडली असती कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे.

लोकाश्रयामुळें वाङ्मय जगणार तर टीकाकारांनीं आपलें काम प्रामाणिकपणानें केलें पाहिजे; व त्यानें तसें केलें नाहीं तर टीकाकारांचे कान उघडण्याची प्रवृत्ति समाजांत पाहिजे. या गोष्टी ज्याप्रमाणें सांगितल्या त्याप्रमाणेंच ग्रंथकारानें टीकेकडे चांगलें लक्ष पुरविलें पाहिजे हेंहि सांगितलें पाहिजे.

प्रत्येक कवीस किंवा कादंबरीकारास आपल्या ग्रंथावरील टीका लक्षपूर्वक पाहिल्याच पाहिजेत. आणि ज्या टीका प्रामाणिकपणें केल्या असतात त्या लक्षांत घेतल्या पाहिजेत; लोकमताविषयीं उपेक्षा करून कोणाचेंहि चालावयाचें नाहीं. आणि या वाङ्मयाच्या लोकशाहींत लोकमताकडे तर विशेषच लक्ष दिलें पाहिजे. जेव्हां वाङ्मय राजा किंवा आश्रयदाता श्रीमान् जमीनदार याच्या आश्रयानें निर्माण होत असतें तेव्हां तें वाङ्मय आश्रयदात्याच्या अभिरुचीनें मर्यादित होत असतें. आणि वाङ्मयाला जेव्हां राजे किंवा मोठे जमीनदार यांचा आश्रय नाहींसा होतो तेव्हां जनतेच्याच आश्रयानें संवर्धित होतें, आणि त्या स्थितीचे परिणाम वाङ्मयावर झाल्याशिवाय रहात नाहींत. जें पुस्तक मुळींच खपणार नाहीं तें छापावयास कोणीहि प्रकाशक धजावणार नाहीं. जोंपर्यंत ग्रंथलेखक केवळ आपल्या तुष्टीसाठीं स्वतःचे पैसे खर्च करून पुस्तकें छापीत आहे, आणि एक पुस्तकहि खपलें नाहीं तरी हरकत नाहीं असें जोंपर्यंत त्यास वाटत आहे तोंपर्यंत तो लोकाभिरुचि दुर्लक्षूं शकेल. पण तीदेखील फारशी दुर्लक्षितां यावयाची नाहीं. आपण केलेली कृति लोकांना आवडावी ही लेखकाची इच्छा असतेच, आणि ती इच्छा त्याच्या लेखावर परिणाम घडविल्याशिवाय राहणार नाहीं. तथापि याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं पुष्कळ उच्च प्रतीच्या लेखकांस आपल्या लेखाची समकालीनांकडून चहा होणार नाहीं हें ठाऊक असतें तरी तो लिहीतच असतो. आणि याचें कारण आपण आजच्या जनतेची गरज भागवीत नसलों तरी

भविष्यकालीन जनतेची गरज भागवीत आहों हीं त्याला जाणीव असते. तथापि त्यास आपला क्रम चालू ठेवण्यास प्रचलित काळांत थोडा तरी अभिज्ञ वर्ग भेटावा लागतो. कै. राजवाडे व कै. खरे शास्त्री यांनीं आपला ग्रंथप्रसिद्धीचा क्रम लोकाभिरुची तयार झाली नसतांहि कायम ठेवला; व तसें करण्यांत त्यांनीं स्वार्थत्याग पुष्कळ केला ही गोष्टहि निर्विवाद आहे. पण त्यांच्या परिश्रमाची जाणीव असलेला व त्यांच्या कृतीची अभिरुचि असलेला वर्ग महाराष्ट्रांत थोडा तरी होताच. तसा वर्ग मुळींच नसता तर त्यांच्याकडून झाली तेवढीदेखील कृति झाली नसती.

० ० ०

## ३ : भारतीय काव्यपरंपरा व मराठी संतकवी

संतकवींमध्यें काव्याविषयक विचार काय होते आणि त्यांना कवितेची मर्मज्ञता कितपत होती या दृष्टीनें संतकवींच्या ग्रंथांत बुडी मारण्यापूर्वी आपणांस हा विचार केला पाहिजे कीं, हे कवी भारतीय काव्यपरंपरेंतील व्यक्ती होत्या काय ? ते जर त्या परंपरेंतील व्यक्ती असतील तर त्यांची काव्यविषयक मर्मज्ञता आणि संस्कृत साहित्यशास्त्र यांचा संबंध जुळवितां येईल. पण ते जर त्या परंपरेंतील व्यक्ती नसतील तर ते कोणत्या परंपरेंतील आहेत हें पाहिलें पाहिजे; आणि त्यांच्यामध्यें स्वकीय वाङ्मयविषयक कांहीं ध्येयें उत्पन्न झालीं होतीं काय याचा तपास केला पाहिजे.

या संतकवींस त्या वेळेस साधु, संत, भक्त इत्यादि निरनिराळीं विशेषणें प्राधान्येंकरून लावलीं जात होतीं, पण कवि हें विशेषणदेखील लावलें जात होतेंच. मात्र तें कोणत्या अर्थानें लावलें जात होतें याचा विचार केला पाहिजे.

पद्य आणि कविता ह्या गोष्टी भिन्न आहेत. तथापि सामान्य मनुष्य पद्य आणि कविता एकच समजतो, आणि पद्यकारास कवि समजतो. या दृष्टीनें जे पद्यात्मक ग्रंथ लिहिणारे ग्रंथकार होऊन गेले त्यांस लोक कवी असें म्हणूं लागले. शास्त्रज्ञ मंडळींना या लौकिक प्रवृत्तीविरुद्ध भांडण्याचें कारण नव्हतें. कारण सुशिक्षित वर्गाच्या दृष्टीनेंदेखील संतकवी हे एका अर्थानें कवीच होते.

कवि या शब्दाचे अनेक अर्थ संस्कृत ग्रंथांत दिसून येतात. कवि म्हणजे विद्वान् असा अर्थ होतो; आणि कवि हा शब्द दैत्यगुरूसहि लावीत असत. हा शब्द प्राचीन महाराष्ट्रांत विद्वान् या अर्थी लागत असावा, आणि तो शब्द त्याच अर्थानें रामदासांनीं वापरला आहे. रामदासांचें " आतां वंदूं कवीश्वर " इत्यादि जें व्याख्यान दासबोधांत आहे तें ' रसात्मक वाक्यें लिहिणाऱ्या कवी 'ला मुळींच लागू पडत नाहीं. तें व्याख्यान वाचून

रामदासांनीं कवींचें वर्णन जें लिहिलें आहे तें जगांतील अनेक सर्वमान्य कवींना लागू पडावयाचें नाहीं. कारण रामदास, कवि हा शब्द 'ज्ञानी' या अर्थानें वापरीत आहेत. रामदासांनीं कवींचें जें वर्णन केलें आहे तेंच खरें 'कवि' लक्षण आहे असें गृहीत धरून आणि अर्वाचीन कवींना तें लागू पडत नाहीं म्हणून अर्वाचीन कवींचा उपहास करण्याची प्रवृत्ति कांहीं जुन्या संतकवींच्या अभिमान्यांत दृष्टीस पडते. पण या तऱ्हेचा उपहास अयोग्य होय. अर्वाचीन कवींच्या उदयकालीं त्यांस नालायक ठरविण्यासाठीं या तऱ्हेचा वाद फारच होता, पण अर्वाचीन कवींचें स्थान पक्कें झालें आहे व तो वादहि आतां बंद पडला आहे. 'कवि' ही पदवी कोणास द्यावी हा प्रश्न विचारास घेतला तर जुन्या संतकवींस हा शब्द लावावा किंवा नाहीं असाच प्रश्न उत्पन्न होईल. संतकवी हे जुन्या कविपरंपरेंतील व्यक्ती मुळींच नाहींत. जुन्या कविपरंपरेशीं आपलें नातें जर कोणास सांगतां आलें तर तें अर्वाचीन कवींनाच सांगतां येईल.

जुने संतकवी यांस आपण ते कवी नाहींत असें म्हटलें म्हणजे त्यांच्या पदरीं आपण कमीपणा बांधतों असें नाहीं; कारण ते शिक्षक होते हें कोणीहि कबूल करील. आणि लावण्या करणाऱ्या मंडळींचा कवि शब्दावर हक्क ब्रह्मज्ञानावर ओंवीबद्ध लिहिणारांपेक्षां जास्त आहे; हेंच भारतीय वाङ्मयाचा इतिहास व त्या इतिहासांत 'कवि' शब्दाचा उपयोग कोणत्या प्रकारच्या व्यक्ती दाखविण्यासाठीं करीत असत हें जाणणाऱ्या मंडळींना कबूल करावें लागेल. जुने संतकवी कोणत्या परंपरेंतील आहेत, याचा विचार त्या संतकवींच्या वृत्तीचें एकंदर भारतीय वाङ्मयांतील कार्य पाहूनच केला पाहिजे. हा विचार करतांना मराठी कवींनीं जो विषय मांडला तो कविसंप्रदायांतील विषय होता कीं काय, आणि त्यांनीं जें वाङ्मय लिहिलें तें काव्य म्हणून लिहिलें काय हे प्रश्न पुढें उभे राहतील.

पुढें जो पुरावा देत आहें त्यावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं मराठी कवी ज्या वर्गांतून बाहेर आले तो वर्ग संस्कृत कवींच्या वर्गांतून निघालेला नव्हता. त्या वेळचे संस्कृत विद्येचे प्रतिनिधि-वर्ग अनेक होते. वेदाभ्यासी याज्ञिक वर्ग होता, तसाच भाषाशास्त्रज्ञांचा वर्ग होता, संगीतज्ञांचाहि

निराळाच वर्ग होता. तसेंच धर्मशास्त्रज्ञ व ज्योतिषाचे अभ्यासक समाजांत होते, वैद्यकशास्त्रज्ञ होते. या सर्वांच्या परंपरा संतकवींच्या कालांतदेखील चालूच होत्या; आणि या सर्व परंपरांचे प्रतिनिधि अजूनहि आढळतात. संस्कृत-वाङ्मयान्तर्गत ज्या वाङ्मयशाखेचा मराठी संतकवींचे ग्रंथ हा परिणाम होत ती वाङ्मय शाखा कविता-स्वरूपाची नसून अध्यात्मवाङ्मय-स्वरूपाची आहे. कवीचा धंदा निराळा आणि अध्यात्मिक शिक्षकाचा अगर वाङ्मयोत्पादकाचा धंदा निराळा. मराठी वाङ्मय संस्कृत आध्यात्मिक ग्रंथकारांच्या परंपरेंतील आहे, पण त्या वाङ्मयाचें स्वरूप संस्कृत आध्यात्मिक ग्रंथांपेक्षां निराळें आहे. पशुवैद्यक आणि गणित या विषयांवर लिहितांना ज्याप्रमाणें आद्य संतकविकालीन कानडी ग्रंथकारांनीं पद्यमय लेखनाचा अवलंब केला त्याचप्रमाणें संतकवींनींहि पद्यावलंब आध्यात्मिक क्षेत्रांत केला आहे. मराठी संतवाङ्मयासारखेंच संस्कृत अध्यात्मवाङ्मय नाहीं, मराठी संतवाङ्मय संस्कृतमध्यें भाषान्तरिलें तर ते ग्रंथ अगदीं निराळ्या प्रकारचे दिसूं लागतील हें खरें आहे, तथापि तेवढ्यावरून मराठी कवींचे ग्रंथ भारतीय कविपरंपरेंत घालतां येणार नाहींत. मराठी अध्यात्मग्रंथांत हें वैशिष्ट्य कां उत्पन्न झालें त्याचीं विशिष्ट सामाजिक कारणें काढलीं पाहिजेत, व संस्कृत आणि प्राकृत मिळून जें भारतीय वाङ्मय तयार होतें त्या वाङ्मयांत हा नवीन ओघ कोणत्या कारणांनीं आला हें पाहिलें पाहिजे.

ज्ञानेश्वरीच्या काळापर्यंत आलेला संस्कृत, ललित व वैज्ञानिक वाङ्मयाचा विकास पाहिला तर असें दिसून येईल कीं, कांहीं बाबतींत अत्यंत श्रेष्ठ ग्रंथकार त्याच वेळेस होत होते तर कांहीं बाबतींत जुन्या संस्कृतीचा ओघ आटावयास लागला होता. कवितेचा विकास एकंदर पाहिला तर त्या वेळेस पंचमहाकाव्यें झालीं होतीं व बिल्हणाच्या विक्रमांकदेवचरितासारखे ग्रंथहि तयार झाले होते, नाटकें झालीं होतीं. कालिदासादि कवि साहित्यशास्त्राचें अध्ययन केलेले होते, पण त्यांच्या चळवळीचा काल संपून गेला होता व त्यांची दृष्टि स्फुट श्लोक करण्याकडे वळली होती. महाराष्ट्रांत देशी भाषा काव्य-क्षेत्रांत डोकावून पहात होती, पण तिचा काव्यरचनेमध्यें उपयोग करण्याकडे विद्वानांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. पण तामिळ, कानडी व तेलगू प्रदेशांत सर्व प्रकारच्या वाङ्मयासाठीं देशी भाषेचा उपयोग केला जात होता.

महाराष्ट्रांत देशी भाषेंत पदें, लावण्या या गोष्टी पुष्कळ असाव्यात. पण त्यांचें संहितीकरण व अभ्यास हीं त्या वेळेसच झालीं नाहींत. तथापि त्या साहित्याकडे संगीतज्ञांचें लक्ष गेलें असावें. संगीतरत्नाकरादि ग्रंथांत जे राग दृष्टीस पडतात ते राग संस्कृतमधील गानसाहित्यावरून तयार झाले नसून ते देशी गानसाहित्यावरूनच तयार झाले आहेत हें त्या विषयावर विचार करणाऱ्या कोणासहि स्पष्ट होईल; येथें त्यावर लिहीत नाहीं. कारण यावर चांगलें लिहावयाचें म्हणजे एक मोठा ग्रंथच लिहावा लागेल. ज्या साहित्या-वरून रत्नाकरकारांचें संगीतशास्त्र तयार झालें तें साहित्य आज रक्षिलें गेलें नाहीं हें उघड आहे. मराठी संतकवींच्या कालीं असलेल्या ललित आणि गंभीर संस्कृतीचा आतां आपण आढावा घेऊं.

या गोष्टीचा विचार करण्यासाठीं अकरावें, बारावें आणि तेरावें या तीन शतकांतील संस्कृत व देशी या दोन्ही वाङ्मयांकडे लक्ष दिलें पाहिजे. मराठी ग्रंथरचना ज्या काळीं सुरू झाली त्या काळांत म्हणजे श्रीपतीच्या रत्नमालेच्या काळापासून ज्ञानेश्वराच्या काळापर्यंत म्हणजे १० व्या शतका-पासून १३ व्या शतकापर्यंत संस्कृत ग्रंथरचना थांबली होती असें मुळींच नाहीं. दक्षिणेकडे देशी वाङ्मय सपाटून वाढलें होतें. पण संस्कृत ग्रंथदेखील होत होते. संस्कृत ग्रंथरचनेचा ओघ अद्यापहि थांबला नाहीं. संस्कृतमध्यें अजूनहि काव्यें आणि नाटकें तयार होतात. विजयानगरचे तैलंगी ग्रंथकार मुडुंब नृसिंहाचार्य यांनीं तर गेल्या चाळीस वर्षांत पन्नास–साठांवर संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत, आणि त्यांत मोठमोठीं काव्यें आहेत. संस्कृत ग्रंथ-कारांची परंपरा थोडीबहुत अजून अव्याहत आहे; तर वर सांगितलेल्या तीन शतकांत वाङ्मयविषयक आणि वैज्ञानिक स्थिति काय होती हें पाहतांना संस्कृत व देशी या दोन्ही ग्रंथभांडारांकडे नजर फेंकली पाहिजे. ग्रंथकार आपलें म्हणणें मांडण्यासाठीं निरनिराळ्या भाषांचा आश्रय करतो. आजहि पुष्कळ ग्रंथकार इंग्रजींत आणि देशी भाषेंत लिहितात तर कांहीं देशी भाषेंत व संस्कृत भाषेंत लिहितात. आंध्र, द्रविड आणि कर्नाटक या तीनहि प्रदेशांत देशी भाषेंत त्याचप्रमाणें संस्कृतमध्यें लिहिणारे ग्रंथकार झाले. निरनिराळ्या ठिकाणचे संस्कृत ग्रंथ एकमेकांकडून वाचले जात होते, पण देशी भाषेंतील ग्रंथ मात्र वाचले जात नव्हते असें वाटतें. पण प्रत्येक

अनुक्रम ........
क्रमांक ........ नों. दि. ........


ठिकाणीं देशी वाङ्मयामुळें जी कांहीं मनोवृत्ति तयार होई ती त्या स्थलाच्या संस्कृत ग्रंथकारांवर परिणाम करीत असे.

या तीन शतकांतील संस्कृत वाङ्मयाचा आढावा घ्यावयाचा म्हणजे काव्य, नाटक, कथावाङ्मय, कोशरचना, व्याकरण इत्यादि निरनिराळ्या वाङ्मयक्षेत्रांत काय कार्य झालें हें पहावयाचें. काव्यग्रंथांकडे आपण प्रथम लक्ष देऊं. नववें आणि दहावें शतक यांच्या संधिकालांत राजशेखर हा प्रसिद्ध कवि होऊन गेला. हा महाराष्ट्रीय होता, आणि याची बायको चव्हाण कुलांतील होती. दहाव्या शतकाच्या अंतिम कालांत मुंजराजाचें नांव कवींमध्यें आढळतें, आणि अकराव्या शतकांत त्याचा पुतण्या भोज हा कवींचा आश्रयदाता म्हणून प्रसिद्ध झाला. अकराव्या शतकांतील चालुक्यांच्या आश्रयास असलेला प्रसिद्ध कवि म्हटला म्हणजे विक्रमांकदेवचरिताचा कर्ता काश्मीरचा बिल्हण होय. या सुमारासच क्षेमेंद्र काश्मीरांत कवि म्हणून प्रसिद्ध होता. अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कथासरित्सागराचा कर्ता सोमदेव हा चमकला. बाराव्या शतकांतील मोठालीं कामें म्हटलीं म्हणजे मंखाचें श्रीकंठचरित, आणि कल्हणाचा काव्यरूपी राजतरंगिणी नामक इतिहास होय. या वेळेचें संस्कृत काव्याचें मुख्य केंद्र म्हटलें म्हणजे काश्मीर होतें, पण त्याच्या खालोखाल बंगालचा राजा लक्ष्मणसेन याचा दरबार होय. त्याच्या आश्रयानें उमापतिधर, धोई गोवर्धन आणि गीतगोविंदकार जयदेव इत्यादि कवी पुढें आले. नैषधकाव्य लिहिणारा श्रीहर्ष कवि हा बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कनोजच्या जयचंद आणि विजयचंद यांच्या दरबारीं राहिला असावा. या प्रख्यात काव्यांशिवाय अनेक काव्यात्मक प्रशस्त्या याच काळांत लिहिल्या गेल्या. तेराव्या शतकांत काव्यग्रंथ तयार झालेले अजून आढळले नाहींत.

कथावाङ्मयासंबंधानें आपणांस असें दिसून येतें कीं, अकराव्या शतकांतील ग्रंथकारांमध्यें उल्लेखिलेले क्षेमेंद्र आणि सोमदेव हेच उल्लेखावे लागतात. वेताळपंचविशी ( वेताळ पंचविंशति ) ही बृहत्कथेंत आहेच पण तिचे अनेक पाठ आपणांस आढळून येतात. सिंहासनद्वात्रिंशिका ऊर्फ सिंहासनबत्तिशी हें पुस्तक अकराव्या किंवा बाराव्या शतकांतलेंच असावें. याच्या सामान्य आणि जैन अशा दोन आवृत्त्या आहेत. माधवानल-कामकंदला नांवाची जी कादंबरी आहे ती कदाचित् याच कालांतील असेल. हींत आनंद नांवाचा

एक ब्राह्मण व एक नर्तिका यांची प्रेमकथा आहे. विक्रमादित्यावर विक्रमोदय म्हणून एक कथासमूह आहे, आणि 'वीरचरित्र' नांवाचें एक काव्य शातवाहनांच्या एका शूद्रक नांवाच्या आश्रिताचीं धाडसी कृत्यें वर्णन करितें. शुकसप्तति हें याच कालांतील पुस्तक होय. 'भारतकद्वात्रिंशिका' यांत भिक्षा मागणाऱ्या जातींच्या किंवा भारतकांच्या ३२ कथा आहेत. शिवदासकृत कथार्णव यांत चोरांच्या गोष्टी आहेत तथापि या काळानंतर संस्कृत कथारचनेला ओहोटी लागली असावी. व या कथावाङ्मयापैकींदेखील बरेंच वाङ्मय अगोदर प्राकृतमध्यें आणि मागाहून संस्कृतमध्यें आलें असावें.

नाट्यवाङ्मयासंबंधानें विचार करतां निश्चयात्मक या काळांत झालेलें नाटक आढळत नाहीं. जयदेवाचें प्रसन्नराघव हें कदाचित् या काळांत झालें असेल, पण त्याचीदेखील खात्री देतां येत नाहीं. हा जयदेव गीतगोविंदकार नसून वऱ्हाडचा म्हणजे महाराष्ट्रीय आहे. हा ज्ञानेश्वराच्या पूर्वीं झाला एवढें मात्र खरें. जयदेव हा साहित्यशास्त्रज्ञ होता, आणि याचा 'चंद्रालोक' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. प्रसन्नराघवानंतरचें नाटक म्हटलें म्हणजे हनूमन्नाटक किंवा महानाटक होय. हें नाटक कोणीं केलें याचा विचार आपण बाजूस ठेवूं. भोजाच्या कालांत हें नाटक प्रसिद्धीस आलें हें उघड आहे; आणि यांत प्रसन्नराघवांतील कांहीं उतारे घेतले आहेत. यावरून हा ग्रंथ अकराव्या शतकांत झाला असावा असा तर्क होतो. याच सुमाराचें आणखी एक नाटक म्हटलें म्हणजे सुभटाचें दूतांगद हें होय. याच्या नंतरच्या कालांत म्हणजे मराठी कवींच्या कालांतदेखील अनेक नाटकें झालीं आहेत. त्यांची माहिती ज्ञानकोशांत नाट्यशास्त्र या लेखांत ( पृष्ठ नं. १२६–१३६ ) सांपडेल.

नाटक या नांवाखेरीज प्रकरण, नाटिका, प्रहसन इत्यादि जे प्रकार होते त्या प्रकारांचे अनेक ग्रंथ याच काळांत होऊन गेले आहेत. कर्णसुंदरी ही नाटिका बिल्हणाची होय. मदनकवीची पारिजातमंजरी तेराव्या शतकाच्या प्रारंभींच झाली. साहित्यदर्पणकारानें व त्याच्या बापानें लिहिलेल्या दोन नाटिका विश्रुत आहेत. लटकमेलक प्रहसन याच काळांत होऊन गेलें. या काळांत नाट्यवाङ्मय सपाटून झालेलें दिसतें, पण तीं नाटकें जुन्या नाट्यकारांइतकीं प्रसिद्धि पावलीं नाहींत.

साहित्यशास्त्राची वाढ या कालांत होतच होती.

साहित्यशास्त्राकडे पाहिलें तर तें नवव्या शतकापासून वाढतच होतें. दंडीच्या काळांत अलंकारास प्राधान्य दिलें जात होतें. आणि नवव्या शतकाच्या पुढें अलंकारांचा जरी अधिक विकास झाला तरी अलंकाराखेरीज इतर गोष्टींना काव्यांत प्राधान्य मिळूं लागलें. नवव्या शतकांतला उद्भट हा रसपरिपोषाचेंच काव्यांत प्राधान्य आहे असें तत्त्व मांडूं लागला व ' ध्वनी 'चें महत्त्व सांगूं लागला. ध्वनिकारिका, ध्वन्यालोक, ध्वन्यालोकलोचन, व्यक्तिविवेक हे ग्रंथ मागाहून दहाव्या शतकाच्या अंतापर्यंत झाले. अकराव्या शतकांतला प्रसिद्ध ग्रंथकार मम्मट हा होय. याचा काव्यप्रकाश ग्रंथ तर प्रसिद्धच आहे. पुढें क्षेमेंद्राचा औचित्यालंकार व कविकंठाभरण हे ग्रंथ येतात. धारच्या भोजराजाचा सरस्वतीकंठाभरण हा प्रसिद्ध ग्रंथ यापुढें येतो. बाराव्या शतकाच्या आरंभीं वाग्भट व हेमचंद्र या जैन ग्रंथकारांचे काव्यानुशासन हे ग्रंथ येतात. बाराव्या शतकाच्या आरंभीं राजांकरुय्यक यानें अलंकारसर्वस्व हा ग्रथ रचिला व बाराव्या शतकांतच रुद्रभट्टानें शृंगारतिलक हा शृंगारपूर्ण साहित्यावर ग्रंथ लिहिला. साहित्यशास्त्रांत महाराष्ट्रानें बाराव्या शतकांत घातलेली भर सांगावयाची म्हणजे जयदेव कवीच्या चंद्रालोक या ग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. आशाधराचा टीकाविषयक झालेला ग्रंथ हाच होय.

या कालामध्यें कोशरचना बरीच झाली आहे. हलायुध कोश अकराव्या शतकाच्या अगोदर लिहिला गेला असावा. हलायुधानंतरचा मोठा कोश म्हटला म्हणजे वैजयन्ती होय. हा रामानुजाचार्यांचा समकालीन ग्रंथकार यादवप्रकाश याचा होय. यादवप्रकाश दाक्षिणात्य होता. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धांत दिगंबरजैनपंथाच्या धनंजय नामक कवीनें नाममाला नांवाचा कोश लिहिला. ११११ मध्यें महेश्वर कवीनें विश्वप्रकाश नांवाचा कोश लिहिला. याच्यानंतरचा कोश मंख कवीचा होय. या कोशांत पुष्कळच नवीन शब्दांचा भरणा आहे. याच्यानंतर हेमचंद्राचा कोश येतो.

बाराव्या शतकाच्या अखेरीस आणि तेराव्या शतकाच्या आरंभीं केशवस्वामीनें नानार्थार्णव नांवाचा कोश लिहिला. चौदाव्या शतकांत मेदिनी नांवाचा कोश पुढें येतो.

येणेंप्रमाणें संस्कृत भाषेंत कोशाची रचना करणारे ग्रंथकार दिसून येतात.

व्याकरणग्रंथांकडे पाहिलें तर मात्र त्यांत बोपदेवाचें म्हणजे महाराष्ट्रीयाचें नांव प्रामुख्यानें पुढें येतें. हा ज्ञानदेवाचा समकालीन गृहस्थ. यानें मुग्धबोध, कविकल्पद्रुम व त्यावरील कामधेनु ही टीका हे महत्त्वाचे व्याकरणग्रंथ लिहिले आहेत. भागवत हें बोपदेवानें लिहिलें असाहि समज एका कालीं प्रसृत झाला होता, पण त्या कल्पनेस विद्वान् वर्गानें महत्त्व दिलें नाहीं. बोपदेवाचा एक वैद्यकावर व एक धर्मशास्त्रावर ग्रंथ आहे. शिवाय मुक्ताफळ आणि हरिलीलाविवरण हे त्याचे ग्रंथ आहेत.

याशिवाय बोपदेवाच्या नांवावर पुढील ग्रंथ सांपडतात. १ त्रिंशत्श्लोकी अशौचसंग्रह; २ धातुपाठ; ३ परशुरामप्रतापटीका; ४ श्राद्धखंड; ५ रामव्याकरण; ६ शार्ङ्गधरसंहिता; ७ गूढार्थदीपिका; ८ हृदयदीपनिघंटु; ९ बोपदेवशतक; १० काव्यकामधेनु; ११ धातुकोश; १२ परमहंसप्रिया; १३ भागवतपुराण द्वादशस्कंधानुक्रम; १४ महिम्नस्तवटीका; १५ शतश्लोकी व शतश्लोकी चंद्रकला; १६ सिद्धमंत्रप्रकाश (कधीं कधीं बोपदेवाच्या बापाच्या नांवावर हा ग्रंथ घालतात); १७ शीघ्रबोधव्याकरण.

ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें हा काल महत्त्वाचा ठरतो. भास्वतीकरण हा करणग्रंथ अकराव्या शतकांत जगन्नाथपुरी येथें झाला. याशिवाय करणोत्तम नांवाचा ग्रंथ त्याच सुमारास झाला. याच काळचा प्रसिद्ध महाराष्ट्रीय ज्योतिषी भास्कराचार्य होय. याचे सिद्धान्तशिरोमणि, करणकुतूहल, लीलावती इत्यादि अनेक ग्रंथ आहेत. भास्कराचार्यांच्या ग्रंथांचीं भाषान्तरें पुष्कळ झालीं, व त्यावर टीकाहि इतक्या आहेत कीं तितक्या टीका कोणत्याहि ज्योतिषग्रंथावर नाहींत. भास्कराचार्यांचा पुतण्या अनंतदेव यानेंहि दोन टीकाग्रंथ लिहिले. त्यांच्यानंतरचा ग्रंथकार विवाह वृंदावनकार केशव (शके ११६५) होय. श्रीपतीच्या रत्नमालेवर महादेवकृत टीकेचा काल शके ११८५ हा आहे. ज्ञानेश्वरीच्या काळचाच दुसरा एक ज्योतिषी म्हणजे महादेव परशुराम हा होय (शके १२३८). यानें महादेवीसारिणी नांवाचा ग्रंथ लिहिला. बोपदेवाचा मुलगाहि ज्योतिषग्रंथकार होता.

अकराव्या शतकांत वंगसेन आणि चक्रदत्त यांचे चिकित्सासारसंग्रह

प्रसिद्ध आहेत. शार्ङ्गधर हा ग्रंथकार बाराव्या शतकांतील असावा. तेराव्या शतकांत म्हणजे ज्ञानेश्वराच्या काळांतच वैद्यकावर महाराष्ट्रीयांनीं संस्कृतमध्यें ग्रंथ लिहिले आहेत; त्यांत हेमाद्रीच्या आयुर्वेदिक रसायन या टीकेचा उल्लेख करतां येईल. हेमाद्रीच्या आश्रित बोपदेव यानें शतश्लोक नांवाचा वैद्यकग्रंथ लिहिला तो वर उल्लेखिलाच आहे.

आतां या वेळचें कानडी वाङ्मय काय होतें तें पाहूं.

या तीन शतकांमध्यें कानडी वाङ्मय फारच पुढें आलें. आणि तें पुढें येण्यास जैन आणि लिंगायत ग्रंथकार कारण होत. जैन वाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा काल हाच होय. कानडी वाङ्मयाची परंपरा निदान नवव्या शतकापासून सुरू आहे. मान्यखेतचा राजा नृपतुंग याचा कविराजमार्ग नवव्या शतकांतच तयार झाला. त्यांत दहा बारा कानडी कवींचा उल्लेख आहे. त्यांत व इतर ग्रंथांत उल्लेखिलेल्या कानडी ग्रंथकारांचा हिशेब घेतला तर ही ग्रंथांची परंपरा पांचव्या शतकापर्यंत मागें जाईल. कविराजमार्गांत कवीश्वर, विमल, उदय, नागार्जुन, जयबंधु, दुर्विनीत व श्रीविजय ह्या ग्रंथकारांचीं नांवें प्रामुख्यानें आढळतात. कवि-राजमार्गानंतरचा ग्रंथकार पहिला गुणधर्म हा होय. यानें हरिवंश किंवा नेमिनाथपुराण हा ग्रंथ लिहिला. दहाव्या शतकांतील ‘ तीन रत्नें ’ या नांवानें जे कवी प्रसिद्ध आहेत ते पंप, पोन्न आणि रन्न हे होत. पंप पूर्वी ब्राह्मण होता पण नंतर जैन झाला. व रन्न हा कासार होता. अकरावें शतक जैन वाङ्मयाच्या दृष्टीनें कमी महत्त्वाचें होतें, पण त्या कालांत चंद्रराजानें ‘ मदनतिलक ’ नांवाचा ग्रंथ लिहिला. अकराव्या शतकाच्या प्रारंभकालींचा प्रसिद्ध ग्रंथकार नागचंद्र किंवा अभिनवपंप होय. याचाच पंपरामायण हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. नागचंद्राच्याच कालांत राजादित्य नांवाचा कवि व कान्ति नांवाची कवयित्री होऊन गेली.

बाराव्या शतकांतील कानडी ग्रंथकार म्हटले म्हणजे नयसेन, दुसरा नागवर्मा, ब्रह्मशिव, कीर्तिवर्मा, कर्णपार्थ व वृत्तविलास हे होत. याच कालांतला ब्राह्मण ग्रंथकार म्हटला म्हणजे दुर्गसिंह होय. यानें पंचतंत्र नांवाचा चंपु लिहिला आहे. बाराव्या शतकांतच लिंगायत वाङ्मयहि बरेंच

झालें आहे. या वेळचे प्रमुख लिंगायत ग्रंथकार म्हटले म्हणजे हरिहर, राघवांक, केरेय, पद्मरस, पालिकुरकेसोम व देवकवि हे होत.

या जैन, ब्राह्मण व लिंगायत कानडींत किती विविध प्रकारचें वाङ्मय निर्माण केलें याचा विचार केला असतां असें दिसून येऊं लागतें कीं, ज्ञानेश्वरीच्या काळाच्या पूर्वींच कानडी ही विषयांचें विवेचन करणारी भाषा झाली होती. नृपतुंगानें उल्लेख केलेल्या ग्रथाची माहिती मागें विद्या-सेवकांत ' नवव्या शतकांतील महाराष्ट्र ' या लेखांत ( वर्ष ४, अंक ४ ) विस्तृतपणें आलीच आहे. यानें रामायण व महाभारत या ग्रंथांचींच जैन रूपान्तरें केलीं आणि त्याच कथांस अगदीं निराळें स्वरूप दिलें. छंदोबुधि हा कानडी छंदःशास्त्रावर ग्रंथ निर्माण झाला. कानडीमध्यें बाणभट्टाची कादंबरी अवतरली गेली. मदनतिलक नांवाचा शृंगारिक ग्रंथ झाला. विशिष्ट जैन पुराणें तयार झालीं, अनेक नीतिग्रंथ तयार झाले. कानडी भाषेचे व्याकरण ग्रंथ झाले, जैन धर्मांतील दोष दाखविणारे ग्रंथ तयार झाले, गोवैद्यकावर आणि अंकगणित व क्षेत्रमापन इत्यादि विषयांवर पद्यात्मक ग्रंथ झाले.

पंचतंत्रासारखा ग्रंथ तयार झाला, शिवपार्वती-विवाहावर मोठें काव्य झालें, आणि लिंगायत पुराणें तयार झालीं, व कुसुमावली नांवाची एक स्वतंत्र कादंबरी तयार झाली.

द्राविडांची वाङ्मयप्रगति यापेक्षांहि जास्त होती. तिचें वर्णन वाचण्या-साठीं ज्ञानकोशांतील तामिळ नाट्यावरील लेख पहावा. तामिळमध्यें आणि तेलगूमध्यें सुंदर स्वतंत्र काव्यें प्रसिद्ध झालीं आहेत, आणि त्यांत संस्कृत ग्रंथापेक्षां निराळें तेज दिसत होतें हें निर्विवाद आहे. नवीन काव्यग्रंथ या दृष्टीनें मराठीला द्राविड, तेलगू व कानडी या तीन भाषांशीं तुलना करतां गौणत्व येतें, पण तें भासतें तितकें नाहीं.

महाराष्ट्र हा कवितेंत मागासलेला असणें शक्यच नाहीं. कारण भवभूति वऱ्हाडांतला, त्याचप्रमाणें राजशेखर हा महाराष्ट्रीयच होता. विदर्भपद्धति हीदेखील वऱ्हाडांतच निर्माण झाली. ही काव्यपद्धति गोड म्हणून प्रतिष्ठा पावली; आणि हिला विदर्भपद्धति म्हणण्याचें कारण हिचा परिपोष

विदर्भांत झाला. विदर्भाची सुंदर काव्याबद्दलची प्रसिद्धि दंडीच्या काव्यादर्शांतहि वर्णिली आहे. याशिवाय संगीतरत्नाकर हा संगीतशास्त्रांतील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ या महाराष्ट्रीयानेंच केला. इतर विद्येंत महाराष्ट्र मागासलेला होता असें कसें म्हणावें ? भास्कराचार्य हा प्रसिद्ध ज्योतिषी महाराष्ट्रीयच होता; व हेमाद्रि यानें धार्मिक विषयांची संहिताच केलेली आहे, आणि श्रौतधर्म, स्मार्तधर्म आणि पौराणिक धर्म या सर्वांची सांगड घातली आहे. हेमाद्रीनें या बाबतींत जें अनेकविध कर्ममार्गांचें एकीकरण केलें तें आजपर्यंत टिकलें आहे. बोपदेव यानें व्याकरणविषयक आणि वैद्यकविषयक जे ग्रंथ केले त्याचा उल्लेख आलाच आहे.

आपण ज्ञानेश्वरकाळाकडे लक्ष दिलें आणि भोंवतालचे संस्कृत ग्रंथ घेतले नाहींत म्हणजे ज्ञानेश्वराचा काल हा सर्वत्र अंधकाराचा काल असावा आणि त्या कालांत एक ज्ञानेश्वर काय तो हिरा असावा अशी कल्पना होऊं लागते. पण वस्तुस्थिति तशी नव्हती. नवीन मराठी कृति करणारा ज्ञानेश्वर आपल्या भोंवतालीं संस्कृत विद्येचें आणि ग्रंथकारांचें साम्राज्य पहात होता, आणि त्या वर्गाकडून आपला ग्रंथ मराठी असला तरी त्याची चहा होईल अशी अपेक्षा करीत होता. त्यावरून आपल्या भोंवतालचा वर्ग दुराग्रही नसून सहृदय आहे अशी त्याची समजूत होती. महाराष्ट्रांतील हिंदु राज्याचा हा अंतकाल होता हें खरें, पण त्या वेळेस विद्या मागसलेली नसून भरभराटींत होती असें दिसतें. संगीतरत्नाकराचा कर्ता शार्ङ्गदेव, बोपदेव, हेमाद्रि, भास्कराचार्य यांसारखे एकंदर ग्रंथकार घेतले म्हणजे ज्ञानेश्वराच्या एकसूर्यतेची कल्पना कमी होऊं लागेल.

कानडी, तेलुगु वाङ्मयाकडे व त्याचप्रमाणें तामिळ वाङ्मयाकडे अवलोकन केलें म्हणजे असें दिसूं लागतें कीं मराठी वाङ्मय सुरू होण्यापूर्वींच कानडी, तामिळ आणि तेलुगु वाङ्मयें अत्यंत विविध प्रकारचीं झालीं होतीं, आणि मराठी वाङ्मय मात्र बाल्यावस्थेंत होतें; पण यावरून महाराष्ट्राची संस्कृति तीन द्राविड संस्कृतींपेक्षां हीन दर्जाची होती असें म्हटलें तर मात्र तें चुकीचें होईल. मराठी वाङ्मय आणि महाराष्ट्राची संस्कृति या गोष्टी एकत्र समजतां कामा नयेत. महाराष्ट्राची संस्कृति उच्च दर्जाचीच होती हें तत्कालीन

विविध प्रकारचे ग्रंथ पाहतां म्हणावेंच लागेल. उलट पक्षीं असें मांडतां येईल कीं, महाराष्ट्र हें गीर्वाण संस्कृतीचाच आपण अंश आहोंत असें समजत असल्यामुळें त्या गीर्वाण संस्कृतीचेंच विस्तारण करण्याचा प्रयत्न करीत होतें, आणि कानडी ग्रंथकार संस्कृतग्रंथसदृश ग्रंथ किंवा रूपान्तरें करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळें त्यांची बुद्धि रूपान्तरें करण्यांत खर्च झाली होती तर महाराष्ट्रीयांची बुद्धि अस्तित्वांत असलेल्या संस्कृतीचें संवर्धन आणि विस्तरण करण्याकडे लागली होती.

ज्ञानेश्वराच्या कृतीचा तत्कालीन व पूर्वकालीन वाङ्मयाकडे पाहून विचार केला तर ती कोणत्याहि वर्गांत बसत नाहीं. जयदेव हा त्या वेळचा संस्कृत-कवि होता, व त्या वेळीं सामान्य गायक कवीदेखील पुष्कळ होऊन गेले असावेत. त्यांचें काव्य केवळ लावण्यांच्या स्वरूपाचें नसून भक्तिकाव्यदेखील त्यांत असावें. असे कवि होऊन गेले हें त्यांचें अस्तित्व, अनेक चालींच्या सहाय्यानें संगीतरत्नाकर तयार झाला असला पाहिजे यावरून स्पष्ट होतें. त्यांत भक्तिकाव्यदेखील असेल अशी कल्पना आहे, याचें कारण भक्तिमय पद्यांचा उदय दक्षिणेंत त्याच्या अगोदरच झाला आहे आणि त्यांच्याकडे संगीतज्ञांची दृष्टि वळली असें दिसतें. अर्थात् ज्ञानेश्वर हा पूर्वकालीन कवींच्या परंपरेंतील नाहीं तर त्याचे बौद्धिक पूर्वगामी कोण याचा स्वतंत्र विचार केला पाहिजे.

० ० ०

श्रीपतीची रत्नमाला हा मराठी ग्रंथ आहे; पण श्रीपति हा ज्योतिषी होता; संत कवि नव्हता. श्रीपति आणि ज्ञानेश्वर या दोघांनीं मराठींत ग्रंथरचना केली एवढेंच दोहोंमध्यें साम्य आहे. श्रीपतीनें रत्नमाला हा संस्कृतमध्यें ग्रंथ केला आणि त्याची प्रतिकृति स्वतःच केली. संस्कृत ग्रंथ पूर्वींच लोकविश्रुत होता, पण मराठी ग्रंथ भारतेतिहाससंशोधक मंडळाच्या द्वितीयसंमेलनवृत्तप्रसंगीं कै. राजवाड्यांनीं पुढें मांडला. तोंपर्यंत कोणासहि ठाऊक नव्हता. श्रीपतीच्या ज्योतिर्विषयक ग्रंथाला काव्य म्हणून ज्योतिर्ज्ञान ज्यांत नाहीं तो कवि कसचा असें बोलायला कोणी ज्योतिषाचा अभिमानी आज पुढें येत नाहीं हें कवितेचें भाग्यच होय असें म्हटलें पाहिजे. असो.

ज्या अर्थीं संतकवी हे भारतीय गीर्वाण कविपरंपरेंतील नाहींत तर त्यांची परंपरा कोणाशीं भिडवावी हा एक ऐतिहासिक प्रश्न उत्पन्न होतो.

ज्ञानकोशामध्यें प्रो. दांडेकर यांनीं जो सुंदर लेख लिहिला आहे त्यांत वारकरी पंथाच्या प्राचीन इतिहासाविषयीं मांडणी केली आहे ती येणेंप्रमाणें :

पांडुरंग हें दैवत आद्य शंकराचार्यांच्या वेळेस चांगलेंच लोकप्रिय होतें. पांडुरंगाची मूर्ति जैन नाहीं व कानडीहि नाहीं. पंढरपूरच्या देवळांतच कृष्णस्वामीची जी समाधि आहे ती ज्ञानेश्वराच्या जन्मापेक्षां साठ वर्षांनीं जुनी आहे. नामदेवाचे वडीलदेखील पंढरीची वारी करीत होते, त्या अर्थीं ज्ञानेश्वरापूर्वीं वारकरी पंथ होता व ज्ञानेश्वराचें कार्य त्या पंथाची घटना करण्याऱ्या स्वरूपाचें होतें, ( ज्ञानकोश वि. २० पृ. व १६१ ) हें वरील विवेचन करतांना "कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु" यावर प्रो. दांडेकर यांनीं ही मूर्ति कर्नाटकी नाहीं असें दाखविण्यासाठीं जें भाष्य केलें आहे तें वाचूनदेखील विठ्ठलाचा संबंध कानडी लोकांशीं नसावा असें वाटत नाहीं. 'कानडी' याचा अर्थ 'अगम्य' असा होतो हें प्रो. दांडेकर यांनीं

दाखविलें आहे तें बरोबर आहे असें आम्हासहि वाटतें, तथापि विठ्ठल कानडा कर्नाटक आहे या वाक्यांत कानडा या शब्दाचें स्पष्टीकरण होतें, दुसऱ्या कर्नाटक शब्दाचें होत नाहीं. त्या ओळीचा "कर्नाटकीय विठ्ठल अगम्य आहे" असाच अर्थ उत्पन्न होतो. तसाच अर्थ "कानडिया विठोबा कानडिया, बहु आवडसी जीवा पासोनिया" याहि अभंगांत होतो.

प्रो. दांडेकर यांनीं आणखी एक महत्त्वाची गोष्ट दाखविली आहे आणि ती म्हटली म्हणजे, वारकरी संप्रदाय हा पूर्वीच्या एका विशिष्ट संप्रदायाची उत्तरपीठिका नसून अनेक संप्रदाय मिळून झाला आहे. मात्र हें लिहितांना त्यांनीं जें विवेचन केलें आहे ( ज्ञानकोश व १७०-१ ) तें अपूर्ण आहे. प्रो. दांडेकर यांनीं वारकरी संप्रदायांत चैतन्य, स्वरूप, आनंद, व प्रकाश हे चार संप्रदाय होते हें दाखविलें आहे, पण खरोखर पाहतां यापेक्षां अनेक संप्रदायांचीं माणसें यांत आलीं होतीं; आणि प्रो. दांडेकर यांनीं जे चार संप्रदाय सांगितले ते वारकरी पंथांत उत्तरकालीं प्रविष्ट झाले आहेत. अगदीं प्रारंभींचे जे संप्रदाय मुकुंद-ज्ञानेश्वर कालीं होते ते म्हटले म्हणजे नाथसंप्रदाय आणि रामानंदसंप्रदाय हे होत. मुकुंदराज आपली गुरुपरंपरा आदिनाथ, हरिनाथ आणि रघुनाथ अशी देतो, ( विवेकसिंधु उत्तरार्ध प्रकरण ), तर ज्ञानेश्वर आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गाहिनीनाथ व निवृत्तिनाथ अशी देतो. यावरून मुकुंदराज व ज्ञानेश्वर हे दोघेहि एकाच पंथाचे पण भिन्न शाखांचे होते असें स्पष्ट होतें. या नाथसंप्रदायाची चळवळ उत्तर हिंदुस्थानापासून महाराष्ट्रापर्यंत झाली आणि कच्छापासून बंगालपर्यंत झाली हें दिसतें ( ज्ञानकोशांतील 'कानफाटे' लेख पहा ). दक्षिणेकडे शांकर, रामानुजी वगैरे जे संप्रदाय झाले त्यांनीं आपल्या विचारांचें महत्त्व रामानंदामार्फत स्थापन केलें आहे, आणि ज्ञानेश्वराचा बाप विठ्ठलचैतन्य हा रामानंदाचा गुरु होताच. तर उत्तरेकडील नाथसंप्रदाय आणि दक्षिणेकडील रामानंदसंप्रदाय या दोन्ही बाजूंनीं महाराष्ट्रांतील आध्यात्मिक जीवनास प्रेरणा मिळाली आहे.

महाराष्ट्राची वृत्ति विशिष्ट मताच्या आग्रही अनुकरणाची नसून सर्वसंग्राहक होती असें वारकरी पंथाच्या प्रारंभापासून दिसतें. आणि ही वृत्ति

अधिक प्रामुख्यानें लोकांपुढें मांडली जाण्यास एकनाथानें चोवीस गुरु केले इत्यादि कथा निर्माण झाल्या. एकनाथानें जर खरोखरच चोवीस गुरु केले असतील तर असें दिसतें कीं आपली संग्राहकता एकनाथास प्रामुख्यानें पुढें मांडावयाची होती. महानुभाव हा अगदीं निराळ्या प्रकारचा संप्रदाय आला तरी त्या संप्रदायाच्या मंडळींचा समाजांत एक नवीन जातीसारखा निराळा तुकडा पडला नाहीं. ही गोष्टदेखील धार्मिक प्रश्नांकडे केवळ धार्मिक दृष्टीनें पाहण्याची महाराष्ट्रांतील संवय स्पष्ट करते.; दक्षिणेंत शांकर आणि रामानुजी या दोन निराळ्या जातींच झाल्या आहेत.

रामानंद हे भावप्रधान आचार्य होते, तर नाथपंथी मंडळी हठयोगादि क्रियांची अभिमानी होती. गुरूपदेश घेतांना आपला जो मुख्य गुण आहे त्या गुणाचाच प्रवक्ता गुरु करावयाचा अशीच लोकांची पद्धति नव्हती. नामदेव हा भक्तिप्रधान होता पण निराकार ईश्वराची कल्पना करणारा विसोबा खेचर हा नामदेवाचा गुरु होता. यावरून गुरूचें आणि शिष्याचें वैशिष्ट्य एकच असलें पाहिजे असें नाहीं. आणि कवीचें वैशिष्ट्य शोधून काढतांना त्यानें कोणत्या मताचा गुरु केला होता हें शोधणें उपयोगी पडेलच असें नाहीं. ज्ञानेश्वराचें वैशिष्ट्य नाथपंथी मतांत्रें नव्हतें. त्याला पूर्वसंस्कार त्याच्याच घरीं त्याच्या बापाकडूनच झाले असणार, व त्यामुळें त्याच्या मनावर रामानंदी मताचे परिणाम जास्त झाले असण्याचा संभव आहे. ज्ञानेश्वराची स्वतःची आध्यात्मिक भूक नाथपंथप्रवेशानें शान्त झाली असेल एवढेंच.

ज्ञानेश्वर आणि नामदेव हे जरी एका काळचे असले तरी त्या दोघांच्या एकंदर प्रवृत्तींत भेद आहे. नामदेव व तुकाराम हे दक्षिणेकडील आळवारांशीं सदृश आहेत तर ज्ञानदेव हा केवळ उच्च विषय अत्यंत सोप्या भाषेंत प्राकृत लोकांसाठीं सांगणारा शिक्षक दिसतो. ज्ञानदेव आणि मुकुंदराज हे जरी दक्षिणेकडील आळवारांच्या नंतरचे असले तरी त्या दोहोंमध्यें बौद्धिक संबंध होता किंवा नव्हता हें पूर्णपणें सांगतां येण्याजोगें नाहीं. अध्यात्मशिक्षणाचें काम अंगीकारण्याइतपत ज्ञानेश्वर हा पूर्वकालीन तत्त्ववेत्त्यांचा आणि नाथ-संप्रदायी मंडळीचा अनुयायी असला तरी ग्रंथरचना सोप्या आणि गोड,

कवित्वयुक्त भाषेंत करण्याच्या बाबतींमध्यें तो अगदीं स्वतंत्र दिसतो. त्याचे अभंग मात्र तामिळ वाचकांस आळवारांची आठवण करून देतील.

ज्ञानेश्वराच्या काळापूर्वीं महानुभावांचें वाङ्मय पुष्कळच झालें होतें. नवीन उत्पन्न झालेले व सामान्य परंपरेविरुद्ध तत्त्वें प्रतिपादिणारे ग्रंथकार लोकांस आपल्याकडे ओढीत आहेत अशा प्रसंगीं परंपरेचे जे अभिमानी ग्रंथकार होते त्यांना मराठींत लिहिणें अवश्य झालें होतें. महानुभावांचे मुख्य प्रतिपाद्य ग्रंथ म्हटले म्हणजे गीता आणि भागवत. या ग्रंथांचा अर्थ ते निवाडा करून सांगणार; त्या अर्थीं याच ग्रंथांवर श्रुतिस्मृतिपुराणोक्तांचीं भाष्यें असणें अवश्य होतें आणि त्यामुळेंच या दोन ग्रंथांच्या टीकांस अगोदर चालन मिळालें. या दृष्टीनें ज्ञानेश्वराचे पूर्वगामी परंपरागत संप्रदायाविरुद्ध असलेले धार्मिक प्रतिस्पर्धीच ठरतात.

० ० ०

## ५ : मराठी वाङ्मयाचा पहिला काल व कवींचें आपल्या अस्तित्वाचें समर्थन

मराठी वाङ्मयाच्या प्रथम कालामध्यें मराठी भाषेंत ग्रंथ लिहिण्याच्या कल्पनेविषयींच सुशिक्षितांमध्यें तिरस्कारबुद्धि होती, असें म्हणण्यापेक्षां त्या कल्पनेच्या युक्ततेविषयीं साशंकता होती आणि या प्रकारच्या वृत्तीची जाणीव संतकवींना होती. या वृत्तीचें अस्तित्व त्या वृत्तीस उत्तर देण्याचा प्रयत्न संतकवी करीत असत यावरून दिसून येतें. शिष्टांनीं मराठींत लिहावयाचें नाहीं, अशिष्टांनींच लिहावें असा रिवाज महाराष्ट्रांत असावा. पण लेखन मात्र चालूच असावें. ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ एकाएकीं मराठींत झाले नाहींत. भाषा विचारव्यक्तीसाठीं हळूहळूच तयार होत असते. मुकुंदराज व ज्ञानेश्वर हे मराठींतील आद्य ग्रंथकार खास नाहींत. जैन व बौद्ध ग्रंथकारांनींदेखील मराठीचा उपयोग केला असला पाहिजे, आणि महानुभावांची परंपरा ज्ञानेश्वरपूर्व आहेच. तथापि हे सर्व शिष्टवाङ्मयाचेच उत्पादक आहेत. यांच्या अगोदर मराठीमध्यें काव्यें करणारांचा एक जुना वर्ग होताच आणि तो म्हटला म्हणजे लावण्या, पोवाडे करणारांचा होय. लावण्यांची परंपरा शातवाहनांपासून सुरू झाली ती एकसारखी चालूच असली पाहिजे. पण त्यांचें काव्य तयार होऊन लोकांच्या मुखीं व्हावयाचें आणि नंतर दुसऱ्याचें काव्य लोकमुखीं झालें म्हणजे पूर्वींचें काव्य विस्मृतिपंथास जावयाचें असा प्रकार चालू होता. हालाची सप्तशती आहे हा एक संग्रह आहे. निरनिराळ्या कवींच्या लावण्या त्यांत एकत्र केलेल्या आहेत. आणि त्या वेळेसच ती लावणी म्हणणाऱ्यांची परंपरा स्थापित झाली होती असें दिसतें. नटांचें अस्तित्व जुन्या कालापासून आहे. नाटकांतील पडदे, नटांचा अभिनय ( १६. ३७४ ), राजाराणीचीं सोंगें घेणारे लोक, आणि नायकिणी यांचा उल्लेख ज्ञानेश्वरानें केलाच आहे. त्यावरून ज्ञानेश्वरपूर्वकालीन वाङ्मयाची

कल्पना होते. तेव्हां लोकांची वृत्ति झाली होती ती अशी— महत्त्वाच्या विषयावर संस्कृतमध्यें लिहावें आणि केवळ सामान्य लोकरंजनार्थ जें लिहिणें असेल तेवढेंच मराठींत पहावें. ही वृत्ति अजून पालटली नाहीं. वैज्ञानिक वाङ्मयाची परंपरा मराठींत पूर्णपणें स्थापन करावी ही बुद्धि अजून स्थापित झाली नाहीं. आणि मराठीस देशशासन दृष्ट्या महत्त्व आल्याशिवाय ती परंपरा चांगली स्थापित होणार नाहीं. सामाजिक आयुष्यक्रमांत काव्यनाटकादि लोकरंजनार्थ होणाऱ्या वाङ्मयापेक्षां प्राकृत भाषेस कांहीं अधिक स्थान द्यावें असें लोकांस वाटत नव्हतें. ज्ञानेश्वरादि संतकवींनीं लोकरंजनार्थ होणाऱ्या वाङ्मयांत भर टाकली नसून पारमार्थिक वाङ्मयाची भर टाकली. तथापि मराठीनें पूर्वपरंपरागत ग्रंथांचें केवळ दास्य न पत्करतां आपली स्वतंत्र राष्ट्रीय संस्कृति तयार करावी या वृत्तीचादेखील उदय होत होता असें दिसतें. पण ती वृत्ति फोंफावली नाहीं. मराठीनें आपलें स्वतंत्र वाङ्मय करावें, संस्कृतमध्यें ग्राह्य असेल तेवढें घ्यावें, असें केल्यानें संस्कृतमधील पूर्वकालीन सर्व प्रकारच्या कल्पनांचें दास्य उत्पन्न होत नाहीं इत्यादि विचारपरंपरा जरी दासोपंतानें पुढें मांडली तरी ती कल्पना महाराष्ट्रांत रुजलीच नाहीं. महाराष्ट्र दासोपंताचें ध्येय घेण्याइतका स्वतंत्र बुद्धीचा बनला नव्हता. त्याला जर कांहीं अनुयायी मिळते तर दासोपंताचें वाङ्मयध्येय उत्कर्ष पावलें असतें. मराठी राज्यांत त्यास चांगलीं फळें आलीं असतीं, असो. मुकुंदराय, ज्ञानेश्वर यांनीं जें कार्य केलें तें प्रतिष्ठित ग्रंथरचनेस मराठींत सुरुवात केली हें होय. मुकुंदराय व ज्ञानेश्वर हे सामाजिक दृष्टीनें लावण्या रचणाऱ्या वर्गांतील नसून सुशिक्षित मंडळींत मोडत होते. यासाठीं आपण ज्या वर्गांत मोडतों त्या वर्गानें आपल्या कृतीकडे सप्रेम पहावें ही इच्छा त्यांच्या मनांत होती. आणि यासाठीं ते जेव्हां कोणाला उत्तर देतांना दृष्टीस पडतात तेव्हां तें याच वर्गाला उद्देशून असतें.

सुशिक्षित ब्राह्मणवर्ग हा आपलें वाङ्मय आणि आपला अभ्यास समाजांतील उच्च वर्गांच्या लोकांच्या आश्रयानें करीत होता. त्या वर्गाकडून मराठींतील वाङ्मय दुर्लक्षिलें जाई. या नवीन होणाऱ्या मराठी वाङ्मयाला कोणताहि निश्चित आधार मिळाला नसता तर झालेलें वाङ्मय टिकलेंच नसतें आणि नवीन उत्पन्न झालें नसतें. ज्ञानेश्वर मुकुंदराज हीं माणसें जन्मतः आणि

शिक्षणानें संस्कृत पंडितांच्या कोटींतील होतीं. पण तीं देश्य वाङ्मयाच्या बाजूला वळून निराळाच वाङ्मयसंप्रदाय उत्पन्न करतीं झालीं. आणि त्यांनीं जी परंपरा पाडली तिला तर मराठी काव्यवाङ्मय चिकटलें असें म्हणतां येईल.

या वेळेच्या संस्कृत वाङ्मयामध्यें मराठींत चांगले ग्रंथ लिहिणें हा मूर्खपणा आहे अशा तऱ्हेचे विचार दिसत नाहींत. चतुर्वर्गचिंतामणी हा त्या वेळचा मोठा संस्कृत ग्रंथ होय. पण त्यांत मराठी ग्रंथरचनेविषयीं तिरस्कार कोठेंच नाहीं. यावरून मराठीचा तिरस्कार त्या वेळची हेमाद्रि, बोपदेव यांच्यासारखी अगदीं वरच्या दर्जाची मंडळी करीत नसावी. तथापि त्या वेळचा शास्त्रीवर्ग एकंदरींत प्राकृत ग्रंथांकडे तुच्छतेनें पहात असल्यास नवल नाहीं. त्यांची टीका आज शिल्लक मात्र राहिली नाहीं. त्यांचें अस्तित्व ग्रंथकारांच्या टीकेस दिलेल्या उत्तरांवरूनच कळून येत आहे.

टीकाकार नेहमीं मोठ्या योग्यतेचे असतात असें नाहीं. त्यामुळें त्यांचे शब्द टिकून रहात नाहींत. कार्यकर्ता क्वचितच निघतो पण टीकाकार मात्र हवे तितके निघतात. त्यांचा परिणाम जरी होत असला तरी निंदकांची निंदा फारच थोडा काल टिकते, पण त्या निंदेचा परिणाम जर निंदित कवीच्या इतर काव्यांवर झाला असेल तर तो मात्र शिल्लक राहतो; आणि कवींनीं कोणत्या परिस्थितींत ग्रंथ लिहिले हें कवी आपल्या कृतीसंबंधानें आपल्या तर्फेची कैफियत मांडतात तीवरूनच उत्तरकालीनांस समजते. मराठी वाङ्मयाच्या प्रथमकालांत कवींच्या कृतींचें परीक्षण व्हावयाच्या ऐवजीं त्यांच्या परिश्रमाच्या उपयुक्ततेसंबंधानेंच प्रश्न उपस्थित होत असला पाहिजे हें मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ व दासोपंत इत्यादिकांच्या लेखांवरून दिसून येतें. तो काल त्यांच्या कृतींचें अंतरंग परीक्षून मत देण्याचा नव्हता, तर त्यांच्या प्रयत्नांच्या उपयुक्ततेविषयींच संशय घेणारा होता, व त्यांच्या त्या प्रकारच्या आक्षेपांस कवींनीं उत्तरें दिलीं आहेत. कांहीं उत्तरें येथें मासल्यासाठीं देतों.

“ म्हणौनि मज काहिं । समर्थनीं आतां विषो नाहीं
गीता जाण हे वाङ्मइं । श्रीमूर्तिप्रभूची ।
आतां आइती गीता जगीं । मी सांधें मऱ्हाटिया भंगीं ।
एथ कैचा विस्मया लागि । ठा ॐ असे ॥ ”

ज्ञानेश्वरांनीं त्यांच्यावर समकालीनांकडून शक्य होणाऱ्या टीकेची आठवण खालील वाक्यांत रक्षिली आहे.

" तुम्हि पुरोहित गुणें । मी बोलिला पुरें उणें ।
तें तुम्ही माउली पणें । उपसाहिजो जी ।। १ ।।
शब्दु कैसा घडिजे । प्रमेय कैसेयां पढिजे ।
अलंकारु म्हणिजे । काइ तें नेणें ।। २ ।।
साएखेडाचे बाउलें । चालवी तेच्या सूत्राचेनि चालें ।
तैसा मातें दाविती बोलें । स्वामी तो माझा ।। "

आतां एकनाथाला मराठी भाषेचा कैवार घेऊन ज्या अस्तन्या साराव्या लागल्या त्याची पुढील ओंव्यांनीं आठवण देतों. या ओव्यांचा मराठीच्या अभिमान्यांनीं इतका वारंवार उच्चार केला आहे कीं, त्या बऱ्याच लोकांस पाठ झाल्या असतील.

" संस्कृतग्रंथकर्ते महाकवी ।
प्राकृतीं काय उणीवी ।
नवीं जुनीं म्हणावीं ।
कैसेन केवीं सुवर्णसुमनें ।। ए. भा. १.१२१
कपिलेचें म्हणावें क्षीर ।
मग इतरांचें काय नीर ।
वर्णस्वादें एकचि मधुर ।
दिसें साचार सारखें ।। २२ ।।
जें पाविजे संस्कृत अर्थें ।
तेंचि लाभे प्राकृतें ।
तरी न मानावया येथें ।
विषमाचि तें कायीं ।। २३ ।।
कां निरंजनीं बसला रावो ।
तरी तोचि सेवकां पावन ठावो ।
तेथें सेवेसि न वचता पाहो ।
दंडी रावो निजभृत्यां ।। २४ ।।

अनुक्रम ........ २७
क्रमांक ........ नोंद दि ........


कां दुर्बळी आणि समर्थ ।
दोहींस रायें घातले हात ।
तरी दोघांसि ही तेथ ।
सहजचि होत समागम्य ।। २५ ।।
देशभाषा वैभवें ।
प्रपंचपदार्थी पालटलीं नांवें ।।
परी रामकृष्णादि नाम नव्हे ।
भाषा वैभवें पालटूं ।। २६ ।।
संस्कृतवाणी देवें केली ।
प्राकृत तरी चोरापासोनि झाली ।।
असोतु या अभिमानभुली ।
वृथा बोली काय काज ।। २७ ।।

आतां संस्कृत किंवा प्राकृता ।
भाषा झाली जे हरिकथा ।।
ते पावनचि तत्त्वता ।
सत्य सर्वथा मानली ।। २८ ।।

एकनाथानें मराठी भाषेंत ग्रंथ लिहिण्याबद्दल आपलें समर्थन करतांना संस्कृत देवानें निर्मिली व प्राकृत चोरापासून आली काय असा द्वंद्वयुद्धाचा आवेश आणिला आहे. तो आवेश त्याच्यापेक्षां जरा अधिक तरुण पण त्याशींच समकालीन असलेल्या दासोपंतांत अधिक दिसतो. तो हल्ला प्रतिपक्षाच्या गोटांत नेतो, आणि मराठी भाषेचाच आश्रय करण्याचें श्रेष्ठत्व स्थापन करूं पाहतो. त्याचें म्हणणें असें आहे कीं, मराठींत शब्दभांडार संस्कृतपेक्षां जास्त आहे आणि प्रत्यक्ष व्यवहारांत संस्कृतचें महत्त्व नाहीं, आणि सूक्ष्म अर्थभेद दाखवील इतकी व्यापक शब्दरचना मराठींत आहे तशी संस्कृतमध्यें नाहीं. तो असें दाखवितो कीं संस्कृत शब्द 'घट' घेऊन तुम्ही बाजारांत जा आणि तुम्हांस हवा तो माल मिळतो का पहा. संस्कृतमध्यें निरनिराळ्या आकारांच्या वस्तूंना 'घट' हा एकच शब्द आहे. बाजारांत म्हणजे प्राकृत भाषेंत प्रकारागणित शब्द आहेत तसे संस्कृतमध्यें कोठें आहेत ?

" येथें संस्कृतचि केवळ । न सरे नाणें सकळ
कोण्ही एक स्थळ । ऐसें आहे ॥
संस्कृतें घट्ट म्हणती । आतां तयाचे भेद किती
कवणा घटाची प्राप्ती । पावावी तेणें
हारा, डेरा, रांजणू । मुढा, पडगा, आनु
सुगड, तौली, सुजाणु । कैसी बोलैल ॥
घडी, घागरी, घडौली । अलंदें, बाचिकें, वौळी
चिटकी, मोरवा, पातली । सांजवणें तें ॥
ऐसे प्रतिभाषे वेगळाले । घट असती नामाधिले
एके संस्कृतें सर्व कळे । ऐसे कैसेन ॥ "

" संस्कृतें घटु म्हणती " हे शब्द लिहितांना आज ज्याप्रमाणें ' भटें ' शब्द वापरतात तशाच अर्थानें आणि वृत्तीनें दासोपंतांनीं ' संस्कृतें ' हा शब्द वापरला असावा असा भास होतो.

तर दासोपंत प्राकृतभाषादूषकांस म्हणतो—

" प्राकृत म्हणोनि दूषिती । तेचि ययाज्ञाना वंचती
भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख कीं ना ॥
हातीं देतां नवरत्नें । मऱ्हाटेन बोलें, न घेणें
आतां हानि तयाकारणें । ते दूरि नसे.
संस्कृतें बोललें सेवणें । तेंचि सांडावें प्राकृत वचनें
ऐसिया मूर्खां मुंडणें । किती आतां ॥ "

संस्कृत भाषेच्या अभिमान्यांचें मुंडन करूं इच्छिणाऱ्या दासोपंतास संस्कृत भाषेंतील संस्कृतीची अभिज्ञता नव्हती असें नाहीं. त्याची संस्कृत भाषेविषयीं वृत्ति होती ती केवळ मराठी भाषेच्या अभिमान्याची नसून ज्ञानविकासेच्छूची होती हें पाहून विशेषच कौतुक वाटतें.

" संस्कृत असती ग्रंथ । तयांचें जाणावें मत
ऐसे जैं आर्त । उपजे जिवा ॥

तरीचि ते अभ्यासावे । अभ्यासूनि तत्त्व जाणावें
मग शब्द अवघे सांडावे । न व्हावें आसक्त ॥
कणु घेऊनि भूस । देईजे जैसें पश्वादिकांस
तत्त्व जाणोनि शब्दास । तैसें सांडावें ॥ ”

ग्रंथांतील अर्थ पाहिजे, भाषा केवळ भूस आहे असें तो सांगत असे. ज्ञानाकडे लक्ष न देतां पांडित्याचेंच दंभ मात्र ज्यास करावयाचें असेल त्यानेंच परक्या भाषेंत पांडित्य करावें; प्रामाणिक मनुष्यानें स्वभाषेंतच स्वजनांना खरा अर्थ सांगावा. पण ज्याला लोकांस ठकवाठकवीचाच धंदा करावयाचा असेल त्यानें संस्कृत शास्त्रें शिकावीं व वटवट करावी असें त्याचें म्हणणें होतें. दासोपंताचें मत एकंदरींत असें दिसत होतें कीं, संस्कृत ‘ शास्त्रें ’ म्हणून जें वाङ्मय आहे तें आहे तसेंच शिकून त्याचा पुनरुच्चार करीत जाणें ही निव्वळ ठकबाजी आहे. दासोपंत म्हणतो—

“ अथवा उदरापूर्तिकारणें । योग्यतेचेनि गुणें
मूर्खां लोकां ठकणें । ऐसे जें ॥
तैं शास्त्रें समग्र शिकावीं । अपार वटवट करावी
नाना उपायीं आणावी । आपणां योग्यता ॥
नाना विद्या जाणोनी । नाना मतें शिकोनी
नानाविध जिंकोनी । वादी लोक ॥
आंगीं योग्यता आणावी । मग ते अभिमानें पोषावी
संसारिकाप्रति दावावी । साधावा रुका ॥
अर्थप्रयोजनु जया असे । तया क्रियेची चाड नसे
स्वहित स्वप्नींहि न दिसे । तेणें शास्त्रें ॥ ”

तथापि हें सर्व संस्कृत पांडित्य लोकांकडून पैसा काढण्यापुरतेंच असतें. व्यवहार आला म्हणजे ते मराठीकडेच धांव घेतात असें दासोपंत सांगतात.

“ आतां आला रुका पुरे । मग सांडी संस्कृतें उत्तरें ।
प्राकृता वाणी विचरे । संसारमार्गीं ॥ ”

मराठी भाषेंत ग्रंथरचना करण्याच्या कृतीचें समर्थन दासोपंताइतकें तीव्रतेनें दुसऱ्या कोणीं केलेलें दिसत नाहीं. पण यास कारण देशी भाषेचें आयुष्याच्या व्यवहारांत स्थान काय असावें याविषयीं दासोपंताइतका दुसऱ्या कोणीं विचारच केलेला नव्हता. दासोपंताइतपत वृत्ति अलीकडील मराठीच्या अभिमान्यांनीं दाखविली नाहीं. मराठींत ग्रंथरचना करण्याची प्रवृत्ति पक्की झाली होती तथापि तिच्याविषयीं तुच्छता लोकांच्या मनांतून गेली नव्हती. मुक्तेश्वर म्हणतो—

"सुरस सुंदरी पवित्र सृष्टि। पक्वान्नें निपजवुनीं पाठीं। संस्कृत शब्द सुवर्ण ताटीं। श्रेष्ठां श्रेष्ठां ओगरली॥ तें रसायण दुर्बलपणीं। महाराष्ट्रभाषा रंभापर्णीं। वाढिलें तरी भुकाळु जनीं। न सेविजे किमर्थ॥"

ही मुक्तेश्वराची भाषा किती तरी भीत भीत लिहिलेली दिसते. मुक्तेश्वर जरी मराठी भाषेचा संवर्धक होता तरी संस्कृत भाषेंतील शब्दांचें महत्त्व त्यास पटलें होतें. आणि आपण एक तेवढे चांगले विद्वान् मराठी भाषेच्या अभिवृद्धीस लागलों आहोंत पण इतर मराठी ग्रंथकार गचाळ आहेत आणि भाषाहि गचाळच आहे असा त्याचा समज झाला होता. तो संस्कृतचा जाडा पंडित होता अशांतला भाग नाहीं; त्यानें ज्या प्रकारचीं संस्कृत पद्यें केलीं तशीं आज जर कोणीं केलीं तर त्याचे कान उपटण्यास अनेक टीकाकार धांवतील.

मुक्तेश्वराच्या काळांत अगोदर झालेल्या वाङ्मयाकडे अधिक परीक्षक दृष्टीनें पाहण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली असावी. या प्रवृत्तीचें स्वरूप मुक्तेश्वराच्या महाभारतांत दृष्टीस पडतें. द्रौपदीस्वयंवर-वर्णनप्रसंगीं आपल्यापूर्वीं भारतकथेवर मराठींत ग्रंथ लिहिणाऱ्या कवींवर मुक्तेश्वरानें पुढील ताशेरा झाडला आहे—

**"प्राकृत कवींचा वाग्जल्प। तैल कढईंत पाहूनिया रूप। फिरतां मत्स्य सकंप। वामनेत्रीं विंधिला। परी तें मूळ भारतांत नाहीं। म्हणोनि असो न बोलों कांहीं। नलिका छिद्रांतून पाहीं। यंत्र भेदोनि पाडलें.**

येक म्हणती 'मऱ्हाठे काय। हें तों भल्यांसी ऐकों नये'। तीं मुखें नेणती सोय। अर्थान्वयाची॥ १॥ लोहाची मांदूस केली। नाना रत्नें सांठविलीं।

अभाग्यानें त्यागिली । लोखंड म्हणो ॥ २ ॥ तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत । नेणोनि त्यागी भ्रांत । मंद बुद्धिस्तव ॥ ३ ॥ आहाच सांपडता धन । त्याग करणें मूर्खपण । द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंच नये ॥ ४ ॥ तैसे प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत । अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ५ ॥ भाषा पालटें कांहीं । अर्थ वाया जात नाहीं । कार्यसिद्धी ते सर्वही । अर्थाचपाशी ॥ ६ ॥ तथापि प्राकृत-करितां । संस्कृताची सार्थकथा । येऱ्हवी त्या गुप्तार्था । कोण जाणें ॥ ७ ॥ अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट । नाना अहंतेनें वाट । बोधिली मोक्षाची ॥ ८ ॥ ” (दशक ७, समास १)

मुक्तेश्वराचें अनुकरण करणाऱ्या नरहरि मोरेश्वरानेंदेखील आपल्या-पूर्वींच्या प्राकृत कवींवर संस्कृत महाभारतांतील कथेंत फरक केल्याचा आरोप केला आहे.

**“ प्राकृत कवींची वाग्वल्ली । सौभद्र पडिल्या भूमीवरी । लत्ताप्रहार मस्तकावरी । केला सैंधवें संतोषें ॥ सौभद्रें प्राण धरितां कंठीं । होतां धनंजयाची भेटी । गुज सांगतां क्रोधें किरीटी । प्रतिज्ञा करी प्रतापें ॥ ”**

प्राकृत भाषेंत लिहिण्याबद्दल माफी मागण्याची चाल बरेच दिवस चालू होती असें दिसतें. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतला मुरारि कवि जुन्या कवींचेंच गाणें गातो.

जेव्हां कवि आपण प्रत्येक वाक्य ईश्वराज्ञेनें लिहीत आहों, आपण केवळ ईश्वराच्या हातांतील बाहुलें आहों अशी मांडणी करतो तेव्हां त्याच मनुष्यानें मराठींत लिहिण्याबद्दल माफी मागत रहावें हें अनुचित होईल. तथापि असा प्रसंग फारसा येत नाहीं. मराठींत लिहिण्याबद्दल माफी मागणारे बहुतेक लेखक ब्राह्मण आहेत. आणि त्यांतले बहुतेक पंडित आहेत. आपण ईश्वरी प्रेरणेनें किंबहुना त्याच्याच आदेशानें प्रत्येक वाक्य उच्चारीत आहों असें म्हणणारे बहुतेक कवी कुणबी वगैरे अशिक्षित जातींतले आहेत. तथापि या दोहोंच्या मधला मार्ग कित्येक कवी स्वीकारतात. अशा कवींमध्येंच मुरारीचा उल्लेख केला पाहिजे. त्यानें आपल्या कवितेचें श्रेय परमेश्वरी आज्ञेस दिलें नसून गुरुकृपेस दिलें आहे. “ तो मुरारि नामें ब्राह्मण पाहीं । इच्छा उदेली

त्याच्या देहीं । जे महाराष्ट्र कविता करावी कांहीं॥ कृपाबळें गुरूच्या ॥ धर्मराजें श्वान तारिला । स्वर्गभुवनीं मान्य केला । तैसें माझ्या महाराष्ट्र बोला । पावन सर्वां करावें ॥ धवल अथवा कपिला गाय । भिन्नवर्णें दिसती पाहे । परी दुग्धवर्ण भिन्नता नोहे । स्वादीं ऐक्य सारखें ॥ तैसा संस्कृतीं जो कां अर्थ । तोचि प्राकृती जालिया प्राप्त । मग कां तेथ धरावें द्वैत । श्रवणीं सादर असावें ॥ देवें संस्कृत भाषा केली । म्हणोनि विश्वा वंद्या झाली । तरी देवाविरहित काय आली । प्राकृत भाषा आज हे ॥ ”

मुरारीचें वरील लिहिणें बहुतेक अनुकरणात्मक होतें असें आजगांवकरांनीं आपल्या महाराष्ट्र कविचरित्रांत दाखवून दिलें आहे.

श्रीधराच्या मराठी भाषेंतील ग्रंथांचा स्त्रियांस कसा उपयोग होतो त्याविषयींच्या ओंव्या प्रसिद्धच आहेत—

“ अबलांसि न कळे संस्कृत वाणी । जैसें आडांतलें गोड पाणी । परी तें–दोर पात्रा–वांचोनी । अशक्त जना केंवि निघे ॥ तोचि तडागासि येता त्वरें । तात्कालचि तृषा हरे । तेवि अबलाजन तारावया ईश्वरें । प्राकृत ग्रंथ निर्मिले ॥ ”

भाषेचा अभिमान कोणत्या तऱ्हेनें धरावा याविषयींचें दासोपंताचें तत्त्व न्या. रानड्यांसारख्या उत्तरकालीनांस समजलें नव्हतें असें दिसतें. संस्कृत ग्रंथ अभ्यासावेत पण जें लिहावयाचें तें मराठींतच लिहावें अशी दासोपंताची वृत्ति होती. तर अलीकडच्या मराठीच्या दुर्दैवी अभिमान्यांची वृत्ति त्याच्या उलट आहे. संस्कृत वाङ्मयाऐवजीं मराठी वाङ्मयच वाचावें अशी त्यांची वृत्ति आहे. म्हणजे मूळ श्रेष्ठ वाङ्मय न वाचतां त्याचीं अर्ध्या–कच्च्या पढिकांनीं केलेलीं रूपान्तरेंच वाचीत बसावें असें म्हणण्यासारखें आहे. हा मराठीचा खोटा अभिमान आहे.

० ० ०

## ६ : अभिज्ञतेचे तीन प्रकार : आदरव्यक्ति, भाषान्तर व अनुकरण

जुन्या कवींच्या काव्यविषयक वृत्तींचें सांगण्याजोगें दुसरें एक अंग म्हटलें म्हणजे, एकमेकांची केलेली स्तुति होय. तथापि ही स्तुति काव्यविषयक गुणांबद्दल असे असें नाहीं. ही स्तुति संत म्हणून करण्यांत येई. एकमेकांविषयीं त्याच दृष्टीनें आदर दाखविण्यांत येई. मराठींत ग्रंथ करण्याचें समर्थन केल्यानें मराठी ग्रंथास स्थैर्य आलें नसतें. त्या ग्रंथाची चहा लोकांत झाली पाहिजे, आणि ही गोष्ट मराठी कवींच्या लक्षांत आली होती. यामुळें प्रत्येक मराठी कवीची वृत्ति आपल्या पूर्वगामीविषयीं आदर दाखविण्याची होती. काव्य ईश्वरी प्रेरणेमुळें झालें असा विश्वास ज्यानें व्यक्त केला त्याविषयीं आदरबुद्धि इतर संतांनीं दाखविली नसती तर संतमंडळींचें लोकांवर मुळींच वजन पडलें नसतें. एकमेकांविषयीं आदर हा संतकवींच्या संप्रदायाचा प्राण होता असें म्हटलें पाहिजे. जेव्हां संतमंडळींनीं आपला संप्रदाय स्थापन केला तेव्हां त्यांनीं एकमेकांविषयीं अत्यादर दाखविला आहे, याविषयीं आपणांस ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयांत हवी तेवढी साक्ष आहेच. ग्रंथकारांविषयीं आदर सर्व जनतेंत पसरण्यासाठीं ज्या आख्यायिका-वाङ्मयाची आवश्यकता आहे तें आख्यायिका-वाङ्मय नामदेवाच्या गाथेंत इतकें सपाटून भरलें आहे कीं, तें नामदेवाचेंच असेल काय अशी शंका स्वाभाविकपणें उपस्थित होते. संतकवी इतरांविषयीं आपला आदर केवळ स्तवनानेंच दाखवितात असें नाहीं तर आख्यायिकांचें रक्षण करून दाखवितात. जुन्या कवींनीं आपले अभिप्राय आपल्या पूर्वींच्या कवींवर व्यक्त केले आहेत, पण त्यांत त्या कवींच्या काव्यगुणावर विवेचन नाहींच असें म्हटलें तरी चालेल. त्यांना त्यांच्या काव्यगुणापेक्षां त्यांची संत व भगवद्भक्त या नात्यानें थोरवी गावयाची होती आणि ती त्यांनीं अनेक तऱ्हांनीं गाइली आहे. ज्ञानेश्वराच्या मनोहर

उपसांपेक्षां ज्ञानेश्वरानें भिंत चालविली, रेड्याकडून वेद बोलविले इत्यादि गोष्टींचीच तारीफ झाली आहे. पण महिपतीनें संतमंडळींचे चमत्कार वर्णिले आहेत. पण महीपति हा केवळ पूर्वकालीन लेखकांचा किस्ता गिरवीत आहे. संतांचीं चरित्रें लिहिणारा महिपती हा एकच कवि नाहीं. निरनिराळ्या संतांचीं निरनिराळ्या कवींनीं लिहिलेलीं चरित्रें प्रसिद्ध आहेत आणि त्यांच्यावर आरत्याहि लिहिल्या गेल्या आहेत. ज्या मानानें व्यक्तीचें संतमंडळांत महत्त्व असे त्या मानानें त्या व्यक्तीवर उत्तरकालीन कवींकडून काव्यपुष्पें अधिक उधळलीं जात. उदाहरणार्थ, दासोपंत व्या. याच्याइतकें वाङ्मय दुसऱ्या फारच थोड्या कवींनीं लिहिलें आहे. व दासोपंताच्या ग्रंथांचें परीक्षण केलें असतां त्याच्यामध्यें विद्वत्ता अनेक कवींपेक्षां जास्त दिसून येते. असें असतां दासोपंताची प्राचीन कवींमध्यें मोठी चहा होती असें नाहीं.

एकनाथानें निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई यांच्या स्तुतीपर अभंग लिहिलेच आहेत. त्याप्रमाणेंच त्यानें नामदेव, गोरा कुंभार, सांवता-माळी व चोखामेळा यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. त्यांमध्यें एकनाथानें त्यांच्या काव्याविषयीं मत व्यक्त केलें नाहीं, तर काव्याची प्रेरणा त्याच्या मतें ज्या भक्तीमुळें होई त्या भक्तीची व त्यांच्या आत्मज्ञानाची अभिज्ञता दाखविली आहे. त्याची ज्ञानेश्वराच्या काव्याविषयीं प्रशंसा जर असेल तर ती ज्ञानेश्वरीच्या शेवटीं त्यानें एका ओवींत घातली आहे तेवढीच आहे. ती ओवी म्हटली म्हणजे "ज्ञानेश्वरीच्या पाठीं, जो ओंवी घालील मऱ्हाटी। तेथें अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली॥" त्याच्या नामदेवचरित्रामध्यें नामदेव पूर्वजन्मीं उद्धव, त्याच्यापूर्वीं अंगद, व त्याच्याहिपूर्वीं प्रल्हाद होता अशी पूर्वावतारपरंपरा उल्लेखिली आहे. गोरा कुंभाराचें चरित्र नामदेवाच्या चरित्रामध्येंच अंतर्भूत केलें आहे. तसेंच सांवता माळ्याचें चरित्रदेखील नामदेवाच्या चरित्रांत घुसडल्यासारखें दिसतें, व चोखामेळ्याचें चरित्रहि नामदेवाच्या चरित्राच्या अनुषंगानें सांगितलें आहे ( आवटे गाथा ).

कविता करणाऱ्या जुन्या संतांमध्यें कान्होपात्रा, गोरा कुंभार, सेना न्हावी, सांवता माळी, चोखामेळा, नरहरी सोनार यांचे अभंग पाहतां त्यांत त्यांनीं

आपल्या प्रेरणेविषयीं फारसें लिहिलेलें नाहीं. निवृत्तिनाथादि चतुष्टयाची कान्होपात्रेनें स्तुति केली आहे. कान्होपात्रा आपल्या अभंगांत " धन्य कान्होपात्रा । आजी झाली भाग्याची । भेटी झाली ज्ञानदेवाची । म्हणोनिया " असें ज्या अभंगसमुच्चयांत म्हणते, त्या अभंगसमुच्चयांतच रेड्याच्या मुखें वेद वदविले, चौदाशें वर्षे तप करणाऱ्या चांगदेवाचा गर्व हारविला व भिंत चालविली असा उल्लेख करिते. यावरून ज्ञानदेवाच्या चमत्कारांची प्रसिद्धि त्याच्याच काळांत झाली होती कीं काय असा प्रश्न उत्पन्न होतो. गोरा कुंभाराचे तीनच अभंगपरिच्छेद ( आवटे एकनाथ गाथा १४९ ) उपलब्ध आहेत, पण त्यांत तो आपल्या प्रेरणेचा उल्लेख करीत नाहीं. तसाच सांवता माळी ( अभंगपरिच्छेद १–१० ) व चोखामेळाहि ( अभंगपरिच्छेद १–१४ ) करीत नाहीं. नरहरी सोनारदेखील आपल्या काव्यस्फूर्तीविषयीं कांहींच सांगत नाहीं. सेना न्हावी याचे अभंगपरिच्छेद १६९ आहेत. त्यांत तो निवृत्तिनाथ, ज्ञानदेव यांच्याविषयीं तसेंच आपला गुरु गैबीनाथ याच्याविषयीं आदर दाखवितो, परंतु काव्याचा इतिहास या दृष्टीनें तो कांहींच सांगत नाहीं. ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या ग्रंथांवर अभिप्राय व्यक्त करणारे कांहीं उतारे येथें देतों.

नामदेवाचा ज्ञानेश्वरीबद्दल अभिप्राय येणेंप्रमाणें—

" ज्ञानराज माझी योग्याची माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली ॥ १ ॥ गीता आलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंद लहरी प्रगट केली ॥ २ ॥ अध्यात्मविद्येचें दाविलेसें रूप । चैतन्याचा दीप उजळिला ॥ ३ ॥ छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारिली ॥ ४ ॥ श्रवणाचे मिषें बैसावें येऊनी । सामराज्य भुवनीं सुखी नांदे ॥ ५ ॥ नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओंवी अनुभवावी ॥ ६ ॥ "

जनाबाईचा ज्ञानेश्वरीवरील अभिप्राय येणेंप्रमाणें आहे—

" गीतेवरी आन टीका । त्यांनीं ( ज्ञानेश्वर ) वाढियेली लोकां ॥ १ ॥ रान ताटामाजीं । त्यांनीं वोगरिलें कांजी ॥ २ ॥ या ज्ञानेशावांचोनी । म्हणे नामयाची जनी ॥ ३ ॥ "

परसा भागवताचा नामदेवाच्या कवित्वावर अभिप्राय येणेंप्रमाणें—
" कविरस वाटोनी क्षीरीस हिंगाची फोडणी । भक्तिवीण आळवणी तैसी कैंवी रुचे ॥ १ ॥ तैसें रसाळ अमृत नामयाचें गीत । अनुभवी जाणत तेथींची गोडी ॥ २ ॥ दुधातुपाची वाटी लावोनिया होटीं । कांजी तया पोटीं कैंवि रुचे ॥ ३ ॥ धायवरी जेवी जे तुपेसी क्षीरी । त्यावरी भाकरी नाचण्याची ॥ ४ ॥ तैसें केशवाचें प्रेम नामदेव जाणें । तेथील अनुभव परसा म्हणे ॥ ५ ॥ "
असेंच अनेक कवींचें दाखवितां येईल. कवींविषयीं प्रशस्त्या उत्तर-कालीनांनीं लिहावयाची पद्धति केवळ संतांत होती इतरांत नव्हती असें नाहीं.

संत या वर्गांत जे येत नसत अशा कवींची स्तुति एकमेक करीतच आहेत; उदाहरणार्थ, रामचंद्र बडवेकृत मोरोपंतांची स्तुति प्रसिद्ध आहे:—

" मोरेश्वरपंताची ऐकुनि कविता मनीं सुकवि लाजे ।
पावे विवर्णता ते मीं किति वर्णूं जनीं सुकविला जे ॥
मोरेश्वरपंताची कविता रसनिपुणसत्सभागेया ।
अभिमानें सेर्ष्य कवन करितां सम गुराभिवत्स भागे या ॥
आर्या केका करिताचि शिरला वाटे मयूर यमक वनीं ।
सुजनासि फार पीडिल म्हणुनि भुलविला किरातयम कवनीं ॥
कवितेंत भाषणांतहि भासे मृदुतेकरोनि शुकपिकसा ।
विश्वफळ श्रीरामा घाली कव तेंवि हा शिशु कपि कसा ।
सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥
कठिण ग्रंथ म्हणुनिया आर्यांतें निंदिती न सुकवी ते ।
मोठ्या, मोठ्या कविंचे मान्या यद्धाणिति ओष्ठ सुकवीते ॥
सुस्वर कंठें रसिकें आर्या गातां मयूरबाबाची ।
वेधी सुजनमनातें न तशी धुन ऐकतां रबाबाची ॥
हे मिळतां अन्य न मनि घृत मिळतां जेंवि सद्रसिक तेला ।
वणिज न गंगेच्याही आणुनि पावेल भद्र सिकतेला ॥
या जन्मताचि गेल्या काशीरामेश्वरा नमायाला ।
प्रौढपणीं आर्यांतें जगतीतलही पुरे न मायाला ॥ "

महाराष्ट्र कवींच्या कृतीवर अभिप्राय व्यक्त करण्याची आणखी एक पद्धत म्हटली म्हणजे मराठी ग्रंथाचीं संस्कृतमध्यें रूपान्तरें करणें. ही क्रिया हिंदुस्थानांत वारंवार दृष्टीस पडते. प्रथम एखादा ग्रंथ प्राकृतमध्यें होतो आणि त्या ग्रंथास नंतर सार्वजनिकत्व येण्यासाठीं त्याचें संस्कृतमध्यें भाषान्तर होतें. ही क्रिया मराठी कवींचा उदय होण्यापूर्वींदेखील पुष्कळदां झालेली आपणांस आढळते. पाली व अर्धमागधी भाषांत बौद्ध आणि जैन यांनीं जे विचार आणले तेच विचार पुढें सार्वजनिक क्षेत्रांत येण्यासाठीं संस्कृत रूपान्तर पावले. वेताळपंचविशीदेखील प्राकृतमध्यें असावा; ही आपणांस बृहत्कथेंत दृष्टीस पडते. तसेंच पंचतंत्रादि ग्रंथांतील कथा पूर्वीं प्राकृतमध्येंच असून संस्कृतामध्यें त्याचीं रूपान्तरें झालीं आहेत त्या कथा प्रथम आपणांस जातकांत दिसून येतात. स्वाभाविकत: मनुष्य स्वभाषेमार्फतच इतरांस कथा सांगतो, त्या कथा इतरांमध्यें पसरतात, आणि त्या जेव्हां संस्कृतमध्यें लिहिण्याचा हव्यास असलेल्या मनुष्याच्या हातीं लागतात तेव्हां त्या संस्कृत ग्रंथांत जाऊन बसतात. संस्कृत वाङ्मय येणेंप्रमाणें प्रत्येक देशी भाषेंतील वाङ्मयाचें संग्राहक वाङ्मय होत होतें. व त्या प्रवृत्तीमुळेंच आपणांस मराठींतील वाङ्मयाच्या संस्कृत प्रतिकृती झालेल्या आढळतात. येणेंप्रमाणें विवेकसिंधूची प्रतिकृति अनंतमुनीनें केली आहे, आणि अमृतानुभवाची प्रतिकृति प्रल्हाद बडवे यांनीं केली आहे. व अलीकडे ज्ञानेश्वराचीदेखील संस्कृत प्रतिकृति जतच्या न्यायाधिशांनीं केली आहे. अनंतमुनि व प्रल्हाद बडवे हे अगदीं अलीकडचे ग्रंथकार होत, आणि यामुळें मराठी ग्रंथांस संस्कृतीकरणाचा मान जरा उशीराच मिळाला. असो.

जुन्या कवींच्या काव्याभिज्ञतेचें आणखी एक अंग म्हटलें म्हणजे अनुकरण होय. जेव्हां एक दुसऱ्याचें अनुकरण करतो, तेव्हां तो दुसऱ्याविषयीं आपली अभिज्ञताच दाखवितो. याप्रमाणें अनुकरण जुन्या कवींत पुष्कळ दिसून येतें. रामदासाचे मनाचे श्लोक हे अत्यंत लोकपरिचित आहेत हें खरें; दुसऱ्या कोणाचा मनास बोध तितका लोकपरिचित नाहीं. तथापि हा विषय रामदासानें जो आपला विषय केला, त्याच्या पाठीमागें परंपरा आहे. नामदेवाचा मनास उपदेश हा जर प्रारंभींचा म्हटला तर वावगें होणार नाहीं. त्याच्यानंतर आपणांस एकनाथाचा मनास उपदेश दृष्टीस पडतो, व सरतेशेवटीं

रामदासाचा दृष्टीस पडतो. या तिहींमध्यें श्री रामाचा उल्लेख अनेकदां येतो. याप्रमाणेंच मनाचा उपदेश हें नांव जरी दिलें नसलें तरी मनास उपदेश करण्याची प्रवृत्ति अनेक कवींत दिसून येते व याचें कारणहि स्पष्टच आहे. चमत्कृतिजनक काव्य करावें हा त्या काव्यप्रवृत्तीचा हेतूच नसावा, तर आपल्या मानसिक उन्नतीकरितां आपण जो प्रयत्न करावयाचा त्या प्रयत्नाचा भाग या प्रकारचीं काव्यें होत. आपल्या मनाच्या पापी वृत्तीची जाणीव सर्वच संतांस झालेली दिसते; व यामुळें या प्रकारचीं जीं काव्यें आहेत तीं फारच अंतःकरणपूर्वक झालेलीं आहेत व त्यामुळें त्यांत कवित्व विशेष आहे. नामदेवाच्या मनास उपदेशांतील कांहीं उतारे येथें देतों.

" तत्त्वमसी वाक्य उपदेशिलें तुज । तें तूं जीवीं कां अझुन धरिसी दूर ।। धृ० ।। त्रिभुवना परता धांवतोसी दुरी । आधीं तूं आपली शुद्धि करी । उदयु अस्तु झाला कवणीये घरीं । पिंडामाझारीं पाहेपां ॥१॥ जागृतीमध्यें कवण जागतें । दोहीं माजीं स्वप्न कोण देखतें । सुषुप्तीमध्यें कोण नांदतें । मग अनुवादतें तें कवण ॥ २ ॥ निद्रा मरण हें एक स्थान । दोहींचा देखणा जाणें आपण । लहान सुईच्या इंधनाहून । आढळलें मन पांचासी ॥ ४ ॥ इंद्रियें चपळ चेइलीं । जागत होतीं तीं कां परतलीं । जाऊनियां कवणा घरीं लपलीं । मना मिळालीं कवणें गुणें ॥५॥ सांगतां तेथें अनुवाद कैंचा । नाहीं तूं पण खुंटली वाचा । विष्णुदास नामा बोलिला साचा । परमपदीं बैसलासे ॥ ६ ॥ "

" अरे मना तूं मर्कटा । पापीया चांडाळा लंपटा । परद्वार हिंडसी सुनटा । अरे पापी चांडाळा ॥ १ ॥ अरे तुज पापावरी बहु गोडी । देवाधर्मीं नाहीं आवडी । तेणें न पावसी पैलथडी । कर्म बांधवडी पडिसील ॥२॥ अरे तूं अभिलाषिसी परनारी । तेणें सिद्धपंथ राहेल दुरी । जवळी येईल यमपुरी । आपदा पावसील ॥३॥ आतां तुज वाटतसे गोड । अंतकाळीं जाईल जड । महा दोष येती सुखाआड । करितील कईबाड यमदूत ॥४॥ माधें शिकविलें नाइकसी । आतां सांगेन बळिया केशवासी । धरूनि नेईल वैकुंठासी । चरणीं जडसी म्हणे नामा ॥ "

" क्षण एक मना बैसोनि एकांतीं । विचारीं विश्रांति कोठें आहे ॥ १ ॥

अनुक्रम ३७९१८ वि: निबंध
क्रमांक ९५६९ नों दि. २७/२/६५

लक्ष चौऱ्याशींच्या करितां येरझोरा। शिणलासी गव्हारा वेळोंवेळां ।। २ ।। अझूनि तुज लाज न वाटे पैं कैसी। नरकाचे द्वारासी जावें किती ।। ३ ।। दुर्लभ आयुष्य मनुष्य देहीचें । जातसें मोलाचें वांयांविण ।। ४ ।। खापराचे साठीं सांडिला परीस । गहिंवरें फुटतसे हृदय माझें ।। ५ ।। पुत्र-कलत्र आहेत सुखाचीं सोयरीं । यांची समता थोरीं धरिली तुवा ।। ६ ।। अनुदिनीं पाळितां अनुभवेंचि पाहे । कोण सुख आहे तया जवळीं ।। ७ ।। जगाचा जिवलग मायबाप आपुला । तो तुवां दुरविला केशिराज ।। ८ ।। स्वप्नींचिया धना लुब्धलासी काय। आलें काळभय हाकीत तुज ।। ९ ।। संतापाचें सदन शोकाचे पुतळे । ते त्वां मानियले हितकारी ।। १० ।। कैंची सुखनिद्रा इंगळाचे शेजे । प्रत्यया आणूनि तुझें तूंचि पाहीं ।। ११ ।। तुज राखेल कोण येवढिये संकटीं । रिघसी ज्याचे पोटीं मरणाभेणें ।। १२ ।। आदिमध्यअवसानीं सोडविल निर्वाणीं । तया चक्रपाणी सेवी वेगीं ।। १३ ।। जो जो क्षण लाविसी हरिभजनाकडे । तो तो गांठीं पडे सार्थकीं रे ।। १४ ।। नामा म्हणे तुजची येतो काकुलती । सोडी रे संगति वासनेची ।। १५ ।। ”

“ अरे मना शोक करिसी किती । हे तंव वाया धनसंपत्ति । आयुष्य भविष्य नाहीं तुझीयें हातीं । हें अवघें अंतीं जायजणें ।।१।। एक अर्बुद साठी कोठी देखा । तीस लक्ष दहा सहस्र लेखा । सात शतें नवमास मापा । तया हिरण्यकश्यपा काम झालें ।। २ ।। चौदा चौकड्या लंकानाथा । नव्याणव सहस्र राया दशरथा । ते ही गेले स्वर्गपंथा । मागें सर्वथा नुरलेची ।। ३ ।। चौदा कल्प मार्कंडेया पडे । तैं लोमहर्षणाचा एक लोम घडे । बकदाल-भ्याचें निमिषे मोडे । गेले एवढें अरे मना ।। ४ ।। बकदालभ्याचें पुरें निमिष । तैं वटहंसाचें उपडें पिच्छ । तयासी होतां मृत्यु प्रवेश । तो एक श्वास भृशुंडीचा ।। ५ ।। मरणांत पुरे भृशुंडीचा । तैं एक दिवस कूर्माचा । नामा विनवी केशवाचा । वेगीं विठोबाचा पंथ धरा ।। ६ ।। ”

“ लाजों नको मना हरीच्या कीर्तना । संसारा पाहुणा दो दिवसांचा ।। १ ।। बाळकाचे बोल माउली प्रीति करी । तैसी कीर्ति हरी परिसे चित्तें ।। २ ।। भलतीया परी बोले बा श्रीहरी । तो भवसागरीं तारील जाणा ।। ३ ।। येणें तारुण्यपणें भ्रमलासी जणीं । भोगिसी पतनीं जन्मांतरीं ।। ५ ।। तूं होय मागतां हरी होय दाता । शरण जाई अनंता म्हणे नामा ।। ६ ।। ”

...४

एकनाथ—मनास उपदेश—अभंगसमुच्चय २६२४—२६७२ यांत रामदासाच्या मनास बोधाचीच पूर्वावृत्ति होय असें वाटूं लागतें. याच्यामध्यें ज्या गोष्टी एकनाथानें मनास बोधिल्या आहेत त्याच रामदासानें आपल्याहि मनास बोधिल्या आहेत. तथापि रामदासामध्यें नावीन्य नाहीं असें नाहीं. कारण रामदासाच्या स्वभावांत एकनाथापेक्षां जी आत्मसामर्थ्याची जाणीव होती ती दिसून येत आहे. " सदां चक्रवाकासि मार्तंड जैसा। उडी घालतो संकटीं स्वामि तैसा ॥ " तसेंच " समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥ " या तऱ्हेचे जे उद्गार रामदासानें काढले आहेत ते एकनाथाच्या मनास उपदेशांत दिसत नाहींत. एकनाथाच्या मनास उपदेशांत विठ्ठलाकडे दृष्टि आहे तर रामदासामध्यें फक्त रामाकडे दृष्टि आहे. तथापि रामविषयक अनेक उल्लेख एकनाथाच्या मनास उपदेशांत आहेत. " सर्वां भूतीं राम दृष्टीचें देखणें " तसेंच " मन रामीं रंगलें। अवघें मनचि राम झालें " अशा तऱ्हेचे रामविषयकहि उल्लेख आहेत.

'मनास बोध' या विषयाची आवड धरणारा रामदास हा शेवटचा कवि खास नव्हे. त्याशीं समकालीन जे कवी होते त्यांत एका मोठ्याच कवीनें तोच विषय घेतला आहे आणि त्यांत अनुकरण अगदीं स्पष्ट आहे. हा कवि म्हटला म्हणजे वामन होय. रामदासाचे श्लोक भुजंगप्रयात वृत्तांत आहेत तसेच वामनाचेहि आहेत. आणि आपला श्लोक रामदासाचा समजला जाऊन आपलें श्रेय जाऊं नये म्हणून त्यानें प्रत्येक श्लोकांत आपलें नांव घालून श्लोकावर पक्कें शिक्कामोर्तब केलें आहे.

" मना वैभवा भूलला व्यर्थ प्राणी।
सखे सोयरे दीसतां सौख्य मानी ॥
जिवाचा सखा तूं विचारूनि पाहे।
म्हणे वामना मुक्ति सन्नीध आहे ॥ "

० ० ०

## ७ : स्वकाव्यसमर्थन व त्याचें महत्त्व

जुन्या मराठी कवींच्या लेखांचें अवलोकन केलें तर त्यांत ग्रंथचर्चामूलक काव्यपरीक्षणतत्त्वाची विशेष वाढ झालेली दिसत नाहीं. तथापि विशिष्ट-काव्यपरीक्षणाकडे दृष्टि जाण्यापूर्वीं वाङ्मयांत जे कांहीं खेळ दिसून येतात त्यांत आपलें समर्थन, दुसऱ्या संतकवींची स्तुति, ग्रंथांचीं रूपान्तरें, अनुकरण इत्यादि गोष्टींचा निर्देश करतां येईल. या विविध प्रकारांचें प्रतिबिंब त्यांच्या ग्रंथांत आपणांस कसें पहावयास सांपडतें हें मागच्या लेखांत दाखविलेंच आहे.

आतां जुन्या कवींच्या आणखी एका वैशिष्ट्याकडे व त्यांच्या कवितेवर आपलेंच मत सांगण्याच्या पद्धतीकडे वळूं. मराठी ग्रंथरचनेच्या प्रारंभकालीं मराठी कवितेच्या किंवा मराठी ग्रंथाच्या अस्तित्वाचेंच समर्थन करण्याची जरूरी सर्वांसच भासत होती. आणि हें समर्थन मुकुंदराजाच्या काळापासून रामदासाच्या काळापर्यंत चाललेंच होतें, एवढेंच नव्हे तर राजकीय दृष्ट्या ज्या काळांत मराठी भाषेला महत्त्व आलें तो काळ म्हणजे बाळाजी बाजीराव पेशव्यांचा काळ, या काळांतदेखील त्या समर्थनाच्या छटा मुरारीसारख्या ग्रंथकारांच्या लेखांत दिसून येतात. हें मागें दाखविलेंच आहे. हें समर्थन मराठी भाषेची तरफदारी करूनच होत होतें असें नाहीं तर आपण ईश्वरी आज्ञेमुळें लिहीत आहोंत असें सांगून करण्यांत येई.

जेव्हां मराठी कवी कविता करीत तेव्हां केवळ विद्वान् व संस्कृतज्ञ कवीच कविता करीत असें नव्हतें. बरेचसे कवी साधारणच शिकलेले होते व पुष्कळांस संस्कृत येत नसावें. खुद्द तुकारामास संस्कृत येत असेल असें वाटत नाहीं, तथापि त्यास संस्कृत ग्रंथांतील विचारांची बऱ्या प्रकारें ओळख झाली असावी असें वाटतें. काव्यस्फूर्ति पावलेला मनुष्य जर लोकांत मान्य व्हावा असें असेल, तर तशी लोकांमध्यें केवळ काव्याकडे लक्ष देण्याइतपत अभिरुचि

वाढली असली पाहिजे; परंतु तशी अभिरुचि आजहि वाढलेली आहे असें वाटत नाहीं. ती डोकावूं लागली आहे यांत शंका नाहीं व आजच्या तरुण पिढींत काव्याभिज्ञता गेल्या पिढीपेक्षां खास अधिक आहे. तथापि निव्वळ प्राकृत काव्य लिहिणारा कवि जर सुशिक्षितांत मोडण्यासारखा नसला, तर तो आपल्या काव्यगुणांमुळें सभ्य लोकांत मोडेल अशी आजहि परिस्थिति नाहीं. ज्या अर्थीं कवींस विद्येची जोड नव्हती आणि ज्या अर्थीं कविता धार्मिक आयुष्यक्रम आणि वेदान्त एवढ्याच कक्षेंत परिभ्रमण करीत होती त्या अर्थीं, ज्या कवींस या क्षेत्रामध्यें काव्य करावयास पाहिजे होतें पण संस्कृत पांडित्य नव्हतें त्यांच्या काव्यलेखनाचें समर्थन व्हावयास कांहीं तरी निराळी उच्चता पाहिजे होती. धार्मिक विषयावर चर्चा करण्यास किंवा व्याख्यान देण्यास ज्यांना पांडित्य नसेल, त्यांना अधिकार उत्पन्न होण्यास ' ईश्वरी प्रेरणा ' किंवा ' गुरुकृपा ' यांची आवश्यकता असते. यामुळें अनेक मराठी कवींनीं आपण " ईश्वरी प्रेरणे 'नें बोलत आहों असें सांगितलें आहे. तुकारामानें याविषयीं पुष्कळदांच ईश्वरी प्रेरणा झाल्याची जाणीव दाखविली आहे. आपण जें बोलतों तें ईश्वर आपणांस बोलावीत आहे असे तुकारानामें इतक्या वारंवार दाखविलें कीं, तें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं.

कवि आपल्या काव्याचें आपणांस प्रेरणा झाल्याचें सांगून समर्थन करीत. कवि आपलें समर्थन कसें करतो हें साहित्यशास्त्राच्या शोधकास अत्यंत महत्त्वाचें आहे. कवींची अत्मसमर्थनाची पद्धति कवींचें स्वतःच्या काव्या-विषयीं काय मत होतें तें दाखविते.

कवींचें आपल्या स्वतःच्या कवितेवर काय मत होतें ही गोष्ट प्राचीनांच्या इतिहासांत वगळतां यावयाची नाहीं. पुष्कळ कवींनीं आपल्या कवितेवर मतें व्यक्त केलीं आहेत, आणि तीं व्यक्त करतांना त्यांनीं आपल्या दृष्टीनें जें सत्य वाटत होतें तें सांगून टाकलें आहे. पुष्कळ कवींना असें वाटत होतें कीं आपण ईश्वरी प्रेरणेनेंच लिहीत आहों. आपणांस ईश्वरी प्रेरणा झाली आहे असें ते जेव्हां सांगत असत तेव्हां ते खोटें बोलत होते असें नाहीं. ते आपला त्या प्रकारचा स्वतःचा विश्वास व्यक्त करीत होते यांत शंका नाहीं. त्यांना ईश्वरी प्रेरणा झाली होती अशांतला भाग नाहीं. त्यांची ईश्वरी प्रेरणा म्हणजे आपण ज्यास स्फूर्ति म्हणतों तीहून निराळी होती असें नाहीं. पण

तिला ते ईश्वरी प्रेरणाच समजत असत. त्यांस असें वाटे कीं, " आपण तर विद्वान् नाहीं, तर मग आपण कविता करतों तरी कशी ? आपणास ज्या अर्थीं विद्वत्ता नाहीं त्या अर्थीं आपणांस जें काव्यसामर्थ्य आलें तें ईश्वरी कृपेचा भाग असला पाहिजे." या प्रकारची वृत्ति अनेक कवींत दिसून येत आहे. पांडित्य म्हणजे काय याची त्यांस अंधुक कल्पना असे, आणि तें आपल्यापाशीं नाहीं हें त्यांस समजे. एक तर आपली कवित्वशक्ति ईश्वरी कृपेनें आली आहे असें ते समजत किंवा ती गुरुकृपेनें आली अशी कल्पना करीत. आपल्या कवितेमध्यें गंभीर विचार आहेत असें त्यांचें त्यांनाच वाटे, आणि ते विचार ईश्वरी प्रेरणेनें आले आहेत आणि ते व्यक्त करण्याइतकी आपली बुद्धि तर नाहीं, असें त्यांस वाटे. आपल्या अपेक्षेपेक्षां पुष्कळच चांगलें लेखन आपल्या लेखणींतून उतरलें असा अनुभव पुष्कळ लेखकांस येतो तसाच त्यांस आला असावा. नामदेवाच्या कवितेंत प्रेरणासमर्थन आहे. त्याचे उतारे पुष्कळच देतां येतील. पण नामदेवाच्या एकंदर काव्याविषयीं इतका संशय आहे कीं, ते उतारे न दिल्यास तें काव्य नामदेवाचेंच आहे काय याविषयीं वाद उपस्थित होईल. तुकारामाचा आपल्यास प्रेरणा झाल्याचें सांगणारा लोकपरिचित अभंग म्हटला म्हणजे—

" आपुलीया बळें नाहीं मी बोलत
सखा कृपावंत वाचा त्याची
साळुंखी ते कैची बोले मंजुळ वाणी
बोलवीता धणी वेगळाची
काय म्या पामरें बोलावीं उत्तरें
परि त्या विश्वंभरें बोलविलें "

हा होय. या तऱ्हेचीं वाक्यें तुकाराम बोलला तेव्हां त्याच्या मनांत वर सांगितलेल्या भावनाच दिसून येतात.

तुकारामाचा शिष्य निळोबा हा आपल्या प्रेरणेविषयीं तर एक कवित्व नांवाचें काव्य लिहितो. त्या काव्याचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे. हें काव्य सुंदर असल्यामुळें जवळ जवळ सर्वच दिलें आहे:—

" गा पांडुरंगा, माझी वाचा उगाच कां वदवितां ? ती ऐकतां कोणासहि

रुचत नाहीं; हांसों लागतात. हें पाखांड रचलें आणि तोंड सैरावैरा वाजविलें असें म्हणतात. जो द्योकार दिला तो आतां ठेवा ( मला नको ).

एकच अक्षर वाचेस आलें तर तें (देवा तुम्ही ) विस्तार करून वाढवितां हे चक्रपाणी माझी वाणी कां चेतविली हें मला समजत नाहीं. वाणीमध्यें आयता रस तुम्ही जोडून देतां व त्याला निवडून सारांश लावितां, तुम्ही सुजाण कृपाब्धी आहांत. तर आतां तरी माझी स्थिति जाणा.

मला कांहींच समजत नाहीं हें माझ्या जिवांत मला ठाऊक आहे. पण मला देव बोलवितो, तेथें उपाय कोणाचा आहे. ( मीं ) बहुश्रुत वक्ता, पंडित किंवा वाचाल नव्हे. श्री विठ्ठल बोलवी ते बोल बोलतों.

श्री हरीनें जें आज्ञापिलें तें ही वैखरी वदली. येथें माझें वीर्य नाहीं. हें कार्य ज्याचें आहे तो जाणतच आहे. मी म्हणतों याची प्रतीति जर तुम्हांस येईल तर चित्तांत हितबुद्धीच धरा. येरी टाकून द्या, आणि नास्तिक वादी दूर परतो.

तुमच्या गुणानें माझी वाणी सत्याक्षरें प्रवर्तली. जे अर्थ तुम्हीं दाविले ते ओळींतून यथार्थ मांडले. ही माझी वाणी कांहीं मतान्तरांत शिरली नाहीं. ही वाक्यपूजा गरुडध्वजाच्या इच्छेसाठींच आहे.

पंढरिनाथा, जो कोणी मला निंदील तो निंदो, किंवा माझी खोटी स्तुति खुशाल करो. पंढरिनाथा, मी तुमचेच गुण गाईन, तूं आवडीनें ऐक किंवा ऐकूं नको. मला बळ देऊन कृपाळु विश्वजनिताच बोलवितो. देवा, जना नावडे तें मज हातीं कां हो वदवितां ? झिरपणाऱ्या अमृताप्रमाणें सुस्वाद असलेली आयत्या प्रसादासारखी संतवाणी तर आहेच. ती संतवाणी जे जे सत्य स्वानुभव बोलले ते प्रगट होतांच सहज सिद्धान्त झाले. निळा तुमच्या वरदानानें तिच्याच अनुवादानें बोलत आहे.

तुमच्या पायीं मन जडलें, तर शब्दांचें प्रयोजनच काय उरलें; असें असतां माझी मति कां चेतविली, आणि गुणीं कां प्रवर्तिली ? ( ती चेतविल्यानें काय झालें आहे बरें ? ) रात्र आणि दिवस हे लिहितां पुरत नाहींत. अक्षरांच्या चळथा उठतात. गोविंदा, तुम्ही मला धंदा लावून दिला आहे. तुमची लीला कळत नाहीं.

तुम्ही जे जे बोल बोलवितां त्यांमाजी अर्थ खोल आहे. देवा, आपल्या

आवडीप्रमाणें मजकडून वदवा आणि आपलें रंजन करून घ्या. हे भोजा-सारख्या देवा, माझी लौकिक लाज दूर करून कौतुकानें नाचवा. हे कृपासूर्या, हें सर्व ( माझी ) वाणी प्रकाश करून करा.

तुम्हीं चुबकळून काढलेलीं ( माझीं ) अक्षरें ब्रह्मरसानें घोळलेलीं असावींत अशी तुमची इच्छा झाली. तुम्ही माझ्या भावासारखे आहांत. मी अर्थचातुर्य जाणत नाहीं. तुमचें करणें तुम्ही जाणा.

माझा भाव काय तो एवढासा, तेवढाच तो तुमच्या पायीं वाहिला. पण यावर तुम्हीं जें कांहीं दिलें तें अगाध आहे. माझी मति किती तरी अल्प, पण तेवढीच तुम्ही वाढवून सरती केली.

धरण फुटलें, लोंढा आला तो माझ्या तोंडाला आवरत नाहीं. ( हा काव्याचा लोंढा येण्याचें कारण ) तुमच्या कृपेच्या मेघानें वृष्टि केली त्यामुळें उत्तम प्रकारच्या बोधानें वाचा गर्जना करिती झाली. प्रतीतीच्या विद्युल्लता झळकतात आणि ब्रह्मरसाचे थेंब खालीं येतात. त्यामुळें जें पीक पिकलें आहे तें सर्व भागांस आलें आहे.

माझी आर्षवाणी ( ईश्वरानें ) वादविली आहे, ती वैदिक आहे आणि पुराणांनीं मिश्र आहे. आणि संतसज्जन बैसून श्रवण करितात. आणि तात्पर्याचे अर्थ घेतात. आणि मस्तक डोलवितात. दयाघन विठ्ठलानें मला असें केलें आहे.

देवानें मला वाचेनें बोलविलें; ( नाहीं तर ) मला हें ( सर्व कवित्व ) काय ठावें होतें. ( मला स्फूर्ति कशी झाली म्हणाल तर सांगतों. ) सहज नामें आळवीत असतां हा अवचित ओघ आला. ( इतर प्रकारच्या कवित्वा-पासून माझ्या कवित्वांतील ) अंतर संत जाणतात. आणि हा रखुमाईचा वर आहे असें ओळखतात. हें सर्व विचारलें म्हणून सागतों हें पुन्हां माझ्या ओंठाशीं येणार नाहीं." हे निळोबाचे अभंग वेदवक्त्या ऋषींच्या अत्यंत सुंदर सूक्तांच्या तोडीचे आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

निळोबानें बालक्रीडेचे अभंग वर्णनपर केले खरे पण तेदेखील लिहिण्याचें काम आपण ईश्वरकृपेनेंच केलें आहे अशी भावना निळोबा दाखवितो. त्या अभंगांच्या शेवटीं तो म्हणतो—

" मी तर व्यासवाणी समजत नाहीं, जे साधे किंवा गुह्य अर्थ पुराणांत आहेत ते जाणत नाहीं. इतर कवी जे प्रसाद वाणी बोलते झाले तेहि अर्थ

मी नेणें. मी आपल्या आवडीच्या भरीनें आपली वाणी गौरविली आहे. चतुरांनीं श्रवण करावी अशी ही नव्हे. ही मुग्धवाणी आहे. पण माझ्या मनांत एक थोर विश्वास वागत आहे तो म्हटला म्हणजे स्वामी तुकया हा सद्गुरु आहे. तो माझी भक्ति जाणून माझा अव्हेर कधीं करणार नाहीं. त्यानेंच माझ्या अंतरींचीं आर्तावस्था जाणून वर देऊन ही वाग्वाणी कृष्ण-चरित्रीं वदविली आहे. आणि माझी " आयणी " पुरविली आहे."

जेव्हां कविता उद्गारात्मक असेल तेव्हां मीं जें लिहिलें तें सर्व प्रेरणेनें लिहिलें आहे किंवा ईश्वराच्या आज्ञेनें लिहिलें आहे असें कवीनें म्हणणें गैर वाटणार नाहीं. तथापि जेव्हां लांब लांब आख्यानें कवि लिहूं लागतो, चरित्रें वर्णितो तेव्हां आपण प्रत्येक शब्द अक्षर ईश्वराच्या आज्ञेनेंच लिहिलें आहे असें म्हणणें म्हणजे ग्रंथकाराच्या म्हणण्यावर विश्वास ठेवण्याची जी वाचकाची बुद्धि असेल तिला फार ताण देणें आहे असें वाटतें. महिपती जरी चरित्रकार होता व साहित्य जमवून चरित्रें लिहीत होता तरी तोदेखील आपण प्रत्येक अक्षर ईश्वराज्ञेनेंच लिहिलें आहे असें बोलत आहे.

" जैशी आज्ञा केली रुक्मिणीवरें
तितुकींच लिहिलीं ग्रंथीं अक्षरें
जैसा वाजविणार फुंकितो वारें
तैशीं वाजंत्रें वाजती ।।
क्षेत्रांत बीज पेरलें जाण
अंकुर येणें जीवनाधीन
कीं बाहुल्याचें नाचणें जाण
कळे सूत्राधीन असे. ।। "

यासाठीं जेव्हां कवि आपलें लिहिणें प्रेरणेनें झालें असें सांगतो तेव्हां तें सर्वदा विश्वसनीय नाहीं. मेहनतीनें लिहिलेलें अनेक प्रकारचें वाङ्मय प्रेरणेनेंच आहे असें सांगण्याची प्रवृत्ति मराठी कवींत दिसून येते. ही प्रवृत्ति एक गोष्ट मात्र सिद्ध करते आणि ती म्हटली म्हणजे, प्रेरणाकाव्याचें महत्त्व कवींनीं पूर्णपणें ओळखलें होतें हें होय. प्रेरणाकाव्याचें साहित्यशास्त्रीय दृष्ट्या त्यांस किती महत्त्व भासतें व तें महत्त्व पुढें तत्त्वदृष्टीनें कसें मांडलें गेलें याचें विवेचन पुढें येईलच.

० ० ०

## ८ : संतकवींची आपल्या वैशिष्ट्याविषयीं जाणीव

आतां जुन्या संतकवींच्या कवित्वविषयक विचारांकडे वळूं. त्यांचे इतर संतकवींविषयींचे जे अभिप्राय आहेत ते तें संत या नात्यानें त्यांच्याविषयीं आदर दाखविण्याच्या स्वरूपाचे आहेत. कवींनीं आपल्या पूर्वगामींच्या ग्रंथांची काव्यदृष्टीनें चिकित्सा केली नाहीं; व काव्यविषयक आपल्या कल्पना जर त्यांनीं मांडल्या असतील तर त्या आपल्या लेखनाचें समर्थन करतांनाच मांडल्या आहेत, इत्यादि गोष्टी मागें दाखविल्याच आहेत.

संतकवींना काव्य ही गोष्ट महत्त्वाची वाटत नव्हती. संतत्व ही गोष्ट महत्त्वाची होती. जो चांगला भक्त असेल पण ज्यानें एकहि अभंग लिहिला नसेल अशांचीहि मान्यता त्यांच्यांत होत असावी. उदाहरणार्थ, गोरा कुंभाराचे अभंग थोडेच आहेत. संतत्वाला जरी महत्त्व होतें तरी संतकवींना आपल्या काव्यरचनेबद्दल अभिमान वाटत होता. मला कवित्व समजत नाहीं, मला कवित्व समजत नाहीं असें जेव्हां ते उच्च स्वरानें सांगत होते, तेव्हां ती शालीनता आत्मकृतिमंडनार्थ होती दुसरें कांहीं नाहीं. आपण केवळ भक्त नसून कवी आहोंत याची जाणीव संतकवींस होती एवढेंच केवळ नव्हे तर आपणांस कवि म्हणवून घ्यावयास कांहीं अडचण उत्पन्न होईल हेंहि त्यांस समजत होतें, व यासाठीं आम्हीं कवित्व करीत नाहीं, पांडुरंगाविषयीं जें प्रेम वाटतें तें व्यक्त करतों किंवा पांडुरंग जें सांगेल तें बोलत आहोंत असें ते वारंवार मांडीत. म्हणजे एकीकडे तर कवित्वावर हक्क सांगावयाचा आणि पुन्हां जर कोणी "तुम्ही कवि कसे!" असा प्रश्न विचारला तर भांडण चुकविण्यासाठीं आपण कवि नसून भक्त आहोंत असें म्हणावयाचें; आणि पुन्हां कवित्वाची व्याख्यादेखील आपणांस लागू पडेल अशीच करावयाची, या सर्व क्रिया एका विशिष्ट प्रकारच्या विचारप्रवृत्तीच्या दर्शक आहेत. या प्रवृत्तीचा थोडक्यांत अर्थ सांगावयाचा म्हटला म्हणजे आपण

कवि आहोंत असें संतकवींस वाटत होतें, पण आपण कवि आहोंत हें साहित्यशास्त्रज्ञांशीं भांडून सांगण्याइतकी हिंमत त्यांना नव्हती. म्हणून ते कवित्वाचें श्रेय नाकारीत होते.

मी कवि नाहीं, मला कवित्व समजत नाहीं असें जेव्हां जेव्हां एखादा संतकवि म्हणतांना दिसतो तेव्हां त्याचे ते शब्द वाचून कौपरच्या 'मला कशाबद्दल गर्व वाटत नाहीं' हें सांगणाऱ्या ओळींची आठवण वाचकांस होते. कौपरनें म्हटलें आहे कीं, "मला राजवंशीयत्वाबद्दल गर्व वाटत नाहीं पण ज्या आईबापांना स्वर्गांत स्थान मिळालें अशांपासून आपण झालों याचा मला गर्व वाटतो.

My Boast is not I deduced my birth
From loins enthroned and rulers of the Earth
But higher far my proud pretention lies
Son of parents that passed into the skies."

हें वाचून कवीविषयीं जराशी बेताचीच सहृदयता वाटत असलेला वाचक म्हणेल कीं, अरे कौपर, उगाच खोटें कां बोलतोस ? तुला आपल्या राजवंशसंभवाबद्दलच बढाई गावयाची आहे, दुसरें आम्हांस कांहीं दिसत नाहीं. तुला जर आपल्या राजवंशसंभवाबद्दल अभिमान नाहीं तर तूं राजवंशीय आहेस हें सांगायला कशाला आलास ? तुला विचारलें होतें कोणीं ? तूं सांगितलें नसतेंस तर तुझा राजवंशसंभव शोधायला कोणीहि आलें नसतें. राजवंशसंभवाबद्दल तुला अभिमान नाहीं हें दाखविण्यासाठीं जें कारण तूं सांगतोस तें काय ? तर तुला गर्व बाळगायला त्याहून मोठी जागा आहे, अशा प्रकारचें; आणि तें हें कीं जे स्वर्गास गेले त्यांच्या पोटचा तूं आहेस ! म्हणजे जें कधींच सिद्ध होणार नाहीं ! म्हणजे केवळ काल्पनिकच कारण देतोस.

ज्याबद्दल मनांत बढाई वाटते ती गोष्ट तर सांगावयाची आणि तीबद्दल आपणास अभिमान वाटत नाहीं म्हणून सांगावयाचें. या तऱ्हेची प्रवृत्ति मनुष्याच्या मनांत कां बरें उत्पन्न होते ? ही प्रवृत्ति उत्पन्न होते हें खचित. जेव्हां एखादा मनुष्य मी असुक नाहीं असें एखाद्या उंच गोपुरावर उभें राहून सांगूं लागतो तेव्हां तो खरोखर जें श्रेय वरवर नाकारीत असतो

त्या श्रेयाचा तो हक्कच सांगत असतो; एवढेंच केवळ नव्हे तर तो तें श्रेय केवळ शालीनतेमुळें नाकारीत नसतो, तर त्यास कोणाच्या तरी टीकेची भीति वाटत असते हें होय. आपणांस इकडे काव्यशास्त्र समजत नाहीं म्हणून सांगावयाचें, तरीदेखील आपणांस तें समजतें अशी आपल्या चहात्यांची समजूत होईल इतपत पुरावा देऊन ठेवावयाचा या प्रकारची क्रियादेखील होत होती. आपण ईश्वराच्या शक्तीमुळें रचना करतों, आपण खरोखर कांहीं एक जाणत नाहीं अशी भाषा बोलणाऱ्या निळोबानें आपणाला रसांचीं नांवें ठाऊक आहेत असें दाखविण्याचा एक प्रयत्न केला आहे तो येथें देतों.

" सांगो नवरस लक्षण । तरी शृंगार हास्य करुण ।
धीर वीर भयानक जाण । बीभत्स अद्‌भुत शांतरस ।। १
शृंगारिक तें माधुर्य जाणें । हास्य तें विनोद करणें ।
कारुण्य तें कींव भाकणें । धैर्य उपजवणें तें धीर ।। २
वीर ते युद्धाच्या गांठीं । शब्दामागें शब्द उठी ।
भयानक रस भय घाली पोटीं । बीभत्स त्याहुनी कुष्टी उच्छृंखल ।। ३
अद्‌भुत रस ते नवलवाणें । जे का अचाटाचे बोलणें ।
श्रोतयातें विस्मय देणें । ऐकतां शहाणे निर्बुजती ।। ४
शांतरस तो शुद्ध सात्त्विक । विकारविवर्जित माजि विवेक ।
निळा म्हणे हे नवरस देख । जाणती गायक चतुरते ।। ५ "

(आवटे, निळोबा गाथा १४२७).

यावरून काय दिसून येतें बरें ? यावरून एवढेंच दिसून येतें कीं आपण केवळ कवीच नाहीं तर काव्याचें शास्त्र जाणणारे आहोंत असें दाखविण्याची आपल्या निळोबांना हौस होती.

आपण कवि आहोंत हें जरी एखाद्या कवीला समर्थन करतां आलें नाहीं व आपल्या कवित्वाचें कोणी काव्यदृष्टीनें परीक्षण करूं लागेल ही कल्पना जरी कवीस भयभीत करीत असली व तीमुळें आपल्या कृतींचें परीक्षण तो टाळूं लागला तरी तेवढ्यानें त्याचा कवित्वावरचा हक्क नाशाबित होतो असें नाहीं. आपणांस आज त्याचें हक्क सांगणें आणि परीक्षणाबद्दल भीति बाळगणें या दोन्ही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.

या सर्व देखाव्याकडे पाहणाऱ्या साहित्यशास्त्राच्या ऐतिहासिक अभ्यासकास कांहीं निराळेंच सत्य समजून येतें. या संतमंडळीमध्यें कांहीं काव्यविषयक तत्त्वें नवीन होतीं. तीं नवीन तत्त्वें ते रचनेंत दाखवीत त्याप्रमाणें काव्यचर्चेंतदेखील दाखवीत; तथापि तीं त्यांस साहित्यशास्त्राच्या भाषेंत सांगतां आलीं नाहींत. तीं जर त्यांस सांगतां आलीं असतीं किंवा तत्कालीन साहित्यशास्त्रज्ञांस संतकवींचें अंतःकरण समजून घेऊन तीं आपल्या पद्धतीनें मांडतां आलीं असतीं तर साहित्यशास्त्रांत एक नवीन संप्रदाय उत्पन्न होऊन कुंठित झालेल्या साहित्यशास्त्रास चालना मिळाली असती. ती क्रिया अगदींच व्हावयाची राहिली नाहीं. ती क्रिया रामदासांनीं कांहीं अंशीं केलीच. पण रामदासांनीं जो साहित्यशास्त्रीय विचार मांडला तो संस्कृत ग्रंथांत गेला नाहीं आणि त्यामुळें तो अतिमहाराष्ट्रीय किंवा अखिल भारतीय झाला नाहीं.

ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां मराठी संतकवींच्या वाङ्मयावरून उत्पन्न होणारें साहित्यशास्त्र संस्कृत साहित्यशास्त्राची अपूर्णता पूर्ण करणारें होतें. साहित्यशास्त्रांत प्रथम अलंकारांसच प्राधान्य होतें; व पुढें ध्वन्यालोक वगैरे ग्रंथांनीं ध्वनीस प्राधान्य दिलें, व विश्वनाथादि कांहीं ग्रंथकारांनीं पुढें रसास प्राधान्य दिलें. पण साहित्यशास्त्र या संतमालिकेच्या ग्रंथाभ्यासानें आणखी पुढें सरकावयास हवें होतें. आपल्या नवीन कवितेबरोबर त्या प्रकारच्या कवितेचें समर्थन करणारें नवीन साहित्यशास्त्रहि उदय पावावयास पाहिजे होतें पण तसें तें झालें नाहीं. यांत आश्चर्यहि नाहीं. साहित्यशास्त्राचा मुख्य उपयोग लोकाभिरुचि सुशिक्षित करणें हा आहे. आणि लोकाभिरुचि सुशिक्षित करण्याचा मुख्य उपयोग नवीन कृतीची चहा व्हावी हा होय. संतकवींच्या कृतीची चहा वारकरी मंडळींत होतच होती. व ती मंडळी जुन्या साहित्यशास्त्रीय कल्पनांनीं बांधलीच गेली नव्हती, तर जुन्या साहित्यशास्त्रीय कल्पनांचें उच्चाटण करण्याची तरी आवश्यकता काय ? संस्कृत वाङ्मयांत अवगाहन करून आनंद पावणारा जो वर्ग होता तो कमी होत होता म्हणून त्या वर्गाशीं दोन हात करण्याची फिकीर संतकवींनीं केलीच नाहीं.

समाजांत ज्याप्रमाणें एका प्रकारच्या मालाचे उत्पादक त्या प्रकारच्या मालास गिऱ्हाइकी असली म्हणजे त्या मालास जे गिऱ्हाईक नाहींत

त्यांच्या टीकेविषयीं उदासीनच असतात, त्याप्रमाणेंच संतकवींची स्थिति होती. ज्याप्रमाणें लोकप्रिय नाटकें करणारे 'वाङ्मया'च्या दृष्टीनें नाटकांचें परीक्षण करूं पाहणाऱ्या टीकाकारांना असें म्हणतात कीं "बाबांनो, तुम्हीं आमच्या नाटकांच्याकडे तुमच्या वाङ्मयविषयक उच्चतेच्या दृष्टीनें पहात राहूं नका. मी नाटक लिहितों तें बाजार कसा आहे तें पाहून लिहितों. मी उच्च नाटककार नाहीं. मला पाहिजे तर तमाशा लिहिणारा म्हणा." या तऱ्हेनें अनेक नाटकें लिहिणारांनीं आपल्या कृतीचें समर्थन केलें आहे. आणि जुन्या साहित्यविषयक कल्पनांनीं आच्छादित झालेल्या लोकांशीं भांडण चुकविलें आहे. तीच क्रिया संतकवी करीत होते. ज्याप्रमाणें नाट्यशास्त्रांत बदलत्या लोकाभिरुचीप्रमाणें नावीन्य आणूं पाहणारा नाटककार निरर्थक भांडण चुकविण्यासाठीं आपल्याकडे लघुत्व घेऊन आपला कार्यक्रम मात्र चालू ठेवतो तीच क्रिया हे संतकवी करीत होते. आणि त्यांना त्यांचा चहातावर्ग असल्यामुळें ते संस्कृत पंडितांच्या मताविषयीं उदासीन होते.

जेव्हां नवीन प्रकारचें वाङ्मय उत्पन्न होतें तेव्हां त्याबरोबर जुन्या साहित्यशास्त्रीय ग्रंथांत कांहीं तरी सुधारणा करावी लागते. नवीन वाङ्मय लोकाभिरुचि बदलून काव्यपरीक्षणाचें एखादें नवें तत्त्व पुढें आणतें. तर आतां मराठी कवींनीं जुन्या साहित्यशास्त्राची अपूर्णता कशी नजरेस आणली तें पाहूं.

साहित्यशास्त्रांत रस हा काव्याचा आत्मा समजतात, तर उत्तम काव्य हें ध्वनिकाव्य कसें म्हणतां येईल, ध्वनि म्हणजे काय, तर व्यंग्यार्थाला प्राधान्य असलेलें काव्य. व्यंग्यार्थाला जर प्राधान्य द्यावयाचें असेल तर तें काव्य खरोखर रसास पोषक नसून रसास अपकर्षकच आहे. तें काव्य चांगलें चाखावयाचें म्हणजे त्यांतील व्यंग्यार्थ काय हें अगोदर काढावयाचें आणि तोच मुख्य अर्थ समजावयाचा. असलें काव्य खरोखरच परिणामकारी नसून केवळ खेळ आहे. जें सहज समजेल असें काव्य उत्तम असूं शकणार नाहीं काय? उलट असें म्हणतां येईल कीं, तसलेंच काव्य उत्तम जें समजावयास सोपें व जें ताबडतोब परिणामकारी असेल. असें काव्य जेव्हां लोकांना करतां येत नाहीं तेव्हां मनांतील अर्थ द्राविडी प्राणायामाच्या

पद्धतीनें सांगून चमत्कृति उत्पन्न करावयाची क्रिया होते. म्हणजे भावाचीच उत्कटता साधत नसेल तरच ध्वनीस महत्त्व येईल. पण कवीनें खरोखर भावाची उत्कटताच साधली पाहिजे. पण ती साधावयाची कशी ? तर त्याला उत्तर हेंच आहे कीं, जेव्हां कवीच्याच मनांत उत्कटता असेल तेव्हां ती उत्कटता काव्यांत येईल, एरव्ही यावयाची नाहीं. यासाठींच जेव्हां कवि आपल्या स्वतःच्या भावना व्यक्त करीत असतो तेव्हां तें उत्तम काव्य होईल. 'लिरिक्' नांवाच्या काव्याची म्हणजे ज्या काव्यांत कवी आपल्या स्वतःच्या भावना व्यक्त करतात अशा काव्याची महति यामुळेंच आहे. पण कवीनें आपल्याच भावना व्यक्त करावयाच्या म्हटल्या म्हणजे कवीला स्वतःच काव्याचें नायक व्हावें लागतें. कवीनें स्वतःच कवनविषय होण्याची पद्धति पडली नव्हती. या प्रकारची कविता त्यांस परिचित नव्हती. संस्कृत काव्यांत कवि आपल्याच भावांचें वर्णन करतो असें महत्त्वाचें मध्यकालीन काव्य म्हटलें म्हणजे बिल्हणाचें चौरपंचाशिका होय. आणि नंतरचें म्हणजे भामिनीविलास होय आणि त्यांतल्या त्यांत करुण-विलास होय. कवि जेथें नायक होईल आणि आपला भाव स्वेच्छेनें वर्णन करूं शकेल असें दुसरें काव्य म्हटलें म्हणजे भक्तिकाव्य होय. त्यांत कवि आपली ईश्वरविषयक भावना मोकळ्या मनानें मांडूं शकतो. जेव्हां भक्ति-काव्यांत अतिशयोक्ति केली जाते आणि कोट्या लढविल्या जातात तेव्हां त्या भक्तीचा आवेश दुर्बल असतो हें सांगावयास नकोच. संस्कृतमध्यें भक्ति-काव्यें फारच थोडीं आहेत. स्तोत्ररत्नाकरांतील काव्यें कृत्रिमच भासतात. जेव्हां जगन्नाथराय गंगालहरींत—

"प्रभाते स्नातीनां नृपतिरमणीनां कुचतटी-
गतो यावन्मातर्मिलति तवतोयैर्मृगमदः ।
मृगास्तावद्वैमानिकशतसहस्रैः परिवृताः
विशंति स्वच्छंदं विमलवपुषो नंदनवनम् ॥ "

[ सकाळीं स्नान करणाऱ्या राजस्त्रियांच्या स्तनांस असलेली कस्तुरी जेव्हां तुझ्या पाण्यांत मिसळते तेव्हां ( ती कस्तुरी ज्यांच्या अंगांतून निघाली ते ) मृग उद्धरतात असा याचा अर्थ आहे. ] असें म्हणतो तेव्हां जगन्नाथरायाच्या

कविकल्पनेबद्दल आपणांस कौतुक वाटतें, पण त्याच्या भक्तीबद्दल आपली खात्री होत नाहीं. तसेंच जेव्हां मोरोपंत—

“ तुम्हांसमचि हें गुणें अणु उणें नसे नाम हा ।
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना पहा ।
सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका ।
छळी न न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ।। ”

[ ईश्वराचें नांव ईश्वराप्रमाणेंच बलवान् आहे, लोकांना तारण्याच्या बाबतींत ईश्वरापेक्षां बिलकुल कमी नाहीं, कदाचित् तें ईश्वरापेक्षांदेखील अधिक चांगलें आहे, निदान तें लोकांचें बरेंच करील. पण ईश्वर मात्र कधीं बरें तर कधीं वाईट असें करील. तूं देवा, ज्याप्रमाणें गायकास ( शुक्राचार्यास ) फसविलेंस तसें तें नाम गायकास फसविणार नाहीं. तूं ज्याप्रमाणें ( बळीस ) अधोगति ( पाताळचें राज्य ) दिलीस त्याप्रमाणें हें तुझें नांव कोणासहि अधोगति देणार नाहीं, व तें वाटेल त्यास सुलभ आहे, असा अर्थ. ]

असें म्हणतो तेव्हांदेखील आपणांस मोरोपंताच्या कल्पनेबद्दल कौतुक वाटतें पण त्याच्या भावोत्कटत्वाबद्दल साशंकताच उत्पन्न होते. मागें केकावलींतील भक्ति हा वादाचा विषयहि झाला होता तेव्हां मोरोपंताचे भक्त असलेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं मोरोपंताच्या केकावलींतील भक्तीविषयीं शंका घेणाऱ्या रानड्यांच्यावर जो ताशेरा झाडला तो निबंधमालेंत मोरोपंताची कविता या निबंधांत पहावयास मिळेल. त्या टीकेची पांगारकरांनीं फार स्तुति केली आहे; पण पांगारकरांसदेखील रानड्यांचा मुद्दा आणि विष्णुशास्त्र्यांच्या टीकेचें अप्रयोजकत्व मयूरप्रेमामुळें लक्षांत आलें नाहीं.

त्या निबंधांत रानड्यांच्या केकावलीच्या अभिप्रायावर टीका करतांना मालाकार आपली काव्यजिज्ञासा विसरले होते आणि तो धार्मिक चळवळीचा प्रश्न समजून प्रार्थनासमाजिस्टांची भक्ति श्रेष्ठ कीं जुन्या लोकांची भक्ति श्रेष्ठ या प्रश्नांत शिरले होते, आणि “ देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं माझा भावो । ” म्हणून सोप्या शब्दांनीं भावोत्कटता प्रगट करणारी मंडळी आणि कोट्या करणारा मोरोपंत हे मालाकारांनीं एका वर्गांतले धरले होते

व रानडे विरुद्ध पक्षांतले धरले होते, व संतकवींची भक्ति प्रार्थनासमाजिस्टांच्या भक्तीपेक्षां थोर आहे असें सांगून संतकवींत नसलेल्या मोरोपंतांच्या कृत्रिम काव्यांत भक्तीचें दौर्बल्य मुळींच नाहीं अशी मांडणी त्यांनीं केली होती. असो.

प्रस्तुत प्रश्न सुधारक–उद्धारकवादाचा नाहीं किंवा प्रार्थनोंची भक्ति उच्च किंवा वारकरी मंडळीची भक्ति उच्च हाहि नाहीं. तथापि रानड्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नास मयूरभक्तीमुळें शास्त्रीबोवांनीं व हरिभक्तिपरायणांनीं वादाचें स्वरूप त्या तऱ्हेचें कल्पिलें आहे. आपण आज वादाचा प्रश्न शास्त्रीय दृष्टीनें सोडविण्यासाठीं रानडे, विष्णुशास्त्री आणि पांगारकर या तिन्ही व्यक्तींना गाळूं, एवढेंच नव्हे तर मोरोपंतांसहि गाळूं; आणि अलंकारप्राचुर्य रसहानि करतें कीं काय एवढाच प्रश्न विचारास घेऊं. भावना जेव्हां उत्कट असेल तेव्हां मनुष्य पांडित्याच्या गोष्टी बोलेल काय ? व उपमा उत्पन्न करील काय असा प्रश्न विचारला तर त्यास नाहीं असेंच उत्तर मिळेल. भावना उत्कट असते तेव्हां अलंकार सुचतात काय हा केवळ मनुष्यस्वभावनिरीक्षणाचा प्रश्न आहे. भावबद्ध मनुष्यास अलंकार सुचत नाहींत. एवढेंच नव्हे तर मोठमोठे पंडित दुःखावेगांत लहान मुलासारखे रडूं लागतात असेंच दिसून येतें. वस्तुस्थिति असेल ती दाखवावयाची आणि भावांच्या गाढत्वानें कवीस वाचकावर परिणाम घडवावा लागतो. त्यामुळें रसपोषक कवित्व करणारा कवि भावनाप्रधान काव्यांत कोट्या, श्लेष किंवा गूढ अर्थाचीं वाक्यें घालणार नाहीं. मोरोपंतादिकांची ईश्वरविषयक भावना जरी तीव्र असली तरी त्यांच्या अलंकारांमुळें दुर्बल दिसूं लागते. हा दोष मराठी कवींतच आहे असें नाहीं तर अलंकारांचें आणि पांडित्याचें ओझें घेऊन बसणाऱ्या मोठ्या कवींतसुद्धां ती दिसून येते. याला आपण कविकुलगुरु कालिदासाचेंच उदाहरण घेऊं. कालिदासानें या प्रकारची रसनिष्पत्तीविरुद्ध गुन्हेगारी जवळजवळ प्रत्येक करुणरसप्रधानप्रसंगीं केली आहे. उदाहरणार्थ—

“ हृदये वससीति मत्प्रियं यदवोचस्तदवैमि कैतवं
उपचारपदं न चेदिदं त्वमनंगः कथमक्षता रतिः ”

[ रतीला आपला नवरा मदन हा शिवानें भस्म केला हें कळल्यानंतर

बेशुद्ध झालेली रति पुन्हां उठून कोटि करते कीं हे मदना, मी तुझ्या हृदयांत वास करितों असें जें तूं मला म्हणालास तें खोटें आहे हें मी जाणतें. तें जर औपचारिक भाषण नसेल तर तूं अगदीं शरीरविहीन झालास तेव्हां मीहि जळून कशी गेलें नाहीं ? मी अगदीं अक्षत कशी राहिल्यें ? ] हा श्लोक सुंदर असूनहि रसहानिकारक आहे.

तसेंच जेव्हां रामानें सीतेचा त्याग केला तेव्हां सीता लक्ष्मणापाशीं जें रामासंबंधीं बोलली त्यांत बिचाऱ्या सीतेसदेखील कोटि करावयास कालिदासानें लावलें आहे.

" उपस्थितां पूर्वमपास्य लक्ष्मीम् वने मयासार्धमसि प्रपन्नः
त्वयाधुना प्राप्यतया तिरोषात् सोढास्मि न त्वद्भवने वसंति "

[ जेव्हां ( यौवराज्याभिषेकसमयीं ) लक्ष्मी तुझ्याजवळ आली तेव्हां तिला टाकून देऊन तूं माझ्याबरोबर वनांत आलास; आतां तिला तूं सांपडला आहेस तर तिनें ही संधि साधून ( पूर्वींच्या गोष्टीची आठवण धरून ) अत्यंत रागानें मला तुझ्या घरीं राहूं दिलें नाहीं. ]

हीं दोन्ही उदाहरणें रसहानि करणारीं आहेत. अशींच उदाहरणें अजविलापांत सांपडतात.

वरील दोन्ही उदाहरणांत रसहानि झाली आहे आणि ती कालिदासाच्या आपलें कौशल्य दाखविण्याच्या बुद्धीमुळें झाली आहे. निवेदनात्मक काव्यांत ज्या व्यक्ती असतील त्या व्यक्तींशीं तादात्म्य उत्पन्न करणें, हें रसोत्पत्ति करूं इच्छिणाऱ्या कवीचें काम आहे. तें काम असल्या कोट्यांनीं बाजूला राहतें. वाचकास आपण वर्णित व्यक्तीच्या अंतःकरणांत शिरत आहों अशी भावना होत नाहीं, तर त्याचें लक्ष वर्णित पात्रांवरून व त्यांच्या अंतःकरणस्थितीवरून उडतें व तो कवीचीच तारीफ करूं लागतो. असें झालें म्हणजे रसहानि आलीच. भक्तिपर काव्यामध्यें कवीच्या मनांतील भक्ति वाचकाच्या मनांत उतरली पाहिजे; पण ती न उतरतां वाचक मध्येंच कवीची त्याच्या कोट्यांबद्दल तारीफ करूं लागला म्हणजे तेथें 'भक्तिहि हीनवाणी' समजली पाहिजे.

नामदेव, तुकाराम, निळोबा यांसारखे कवी कोट्या करण्याचें टाळीत

असत. रामदासांनीं सरलकवित्वाचाच आग्रह धरला आहे तो यासाठींच होय. कोट्या पुष्कळ असलेलें काव्य हें रसानें कधींच ओथंबत नाहीं. मिल्टनसारखे कवीदेखील असली घाण करतातच. मिल्टनला शोकादि भाव दाखवितांना कोट्यांच्याऐवजीं ग्रीक, लॅटिन वाङ्मयांतील उल्लेख पात्रांच्या तोंडीं घालून आपलें पांडित्य दाखविण्याचा मोह पडे. याबद्दल डॉ. जॉन्सननें मिल्टनला जो दोष दिला आहे तो अगदीं रास्त आहे.

संतकवींस अर्थात् भावनेच्या उत्कटत्वाचें काव्य पाहिजे होतें, आणि ज्या अर्थी ते ईश्वराविषयीं असलेली भक्ति ही श्रेष्ठ भावना समजत होते त्या अर्थीं त्यांस तेंच काव्य श्रेष्ठ वाटत होतें.

नामदेवाची काव्यविषयक वृत्ति काय असावी हें त्यानें स्पष्ट दिलें नाहीं, परंतु गायन, ग्रंथपारायण व वेदपुराणें यांचें अध्ययन यांविषयीं त्यानें जी वृत्ति दाखविली आहे तीवरून त्याची काव्यविषयक दृष्टि सहज समजून येते, आणि ती म्हटली म्हणजे भक्ति असेल तर ती हवी, मग ती भक्ति बोबड्या पद्यांत कां व्यक्त होईना. भक्तीचें कवन करावें मग त्यांत अलंकारादि काव्यगुण असो किंवा नसो. भक्तीची उत्कटता त्यांत व्यक्त झाली पाहिजे. सुंदर शब्दांचें, सुंदर उपमा घातलेलें व अतिशय अलकारांनीं भरलेलें असें काव्य त्यास नको होतें. भावोत्कटता नसेल तर तूं वैदिक, पुराणिक वगैरे होशील पण वैष्णव होणार नाहींस असें नामदेव म्हणे.

“ वेदाध्ययन करिसी तरी वैदिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ।। १ ।। पुराण सांगसी तरी पुराणिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ।। २ ।। गायन करिसी तरी गुणी जन होसी ।। परी० ।। ।। ३ ।। कर्म आचारसी तरी कर्मठची होसी ।। परी० ।। ४ ।। यज्ञ करिसी तरी याज्ञिकची होसी ।। परी० ।। ५ ।। तीर्थ करिसी तरी कापडीच होसी ।। परी० ।। ६ ।। नामा म्हणे नाम केशवाचे घेसी । तरीच वैष्णव होसी अरे जना ।। ७ ।। ”

“ शास्त्रज्ञ पंडित तो एक मी मानी । आपणातें देखोनी तन्मय झाला ।। १ ।। येरा माझें नमन सर्वसाधारण । ग्रंथांचें रक्षण म्हणोनियां ।। २ ।। वेद पारायण मानी तो ब्राह्मण । चित्त समाधान संतुष्ट सदा ।। ३ ।। पुराणिक

तो होऊनि कृतार्थ । विषयीं विरक्त विधि पाळी ।। ४ ।। मानी तो हरिदास ज्या नामीं विश्वास । सर्वस्वें उदास देह भावा ।। ५ ।। नामा म्हणे ऐसे भेटवी विठ्ठला । त्यालागीं फुटला कंठ माझा ।। ६ ।। "

" शिकला गाणें राग आळवण । लोकां रंजवण करावया ।। १ ।। भक्ताचें तें गाणें बोबडीया बोलीं । तें तें विठ्ठलीं अर्पियलीं ।। २ ।। बोबडीया बोलीं जे कोणी हांसती । ते पचिजेती रौरवीं ।। ३ ।। नामा म्हणे बहुत बोलों आतां काई । विठोबाचे पाय अंतरती ।। ४ ।।

संतकाव्याचें स्वरूप त्यांच्या भावनेनेंच निश्चित केलें होतें. ती भावना मोरोपंतादि कवींच्यामध्यें नव्हती काय ? असा प्रश्न उत्पन्न होतो. व कित्येक मोरोपंताचे चहाते त्याच्या भक्तीला कमीपणा दिल्याबद्दल भांडावयास येतील. ते म्हणतील कीं मोरोपंतास किंवा कालिदासास कोट्या करण्याची ताकद होती म्हणून त्यांनीं केल्या; संतमंडळी भाळीभोळी होती म्हणून त्यांनीं कोट्या केल्या नाहींत, व यासाठीं संतकवींचें भक्तिकाव्य उच्च व मोरोपंताचें हलकें असें म्हणतां येणार नाहीं. जे साहित्यशास्त्र शिकले असतील व कल्पक असतील त्यांनीं आपलें कौशल्य फुकट घालवावें काय ? मोरोपंतादि मंडळीस साहित्यशास्त्रीय आणि संस्कृत कवींच्या ग्रंथांचा संस्कार झालेली अभिरुचि होती म्हणून त्यांच्या ग्रंथांत कोट्या आल्या. त्यांची भक्ति कनिष्ठ होती असें मुळींच नाहीं. या आक्षेपास असें उत्तर देतां येईल कीं, कोणाची भक्ति कमी किंवा जास्त हें हृदयांत एखादें यंत्र खुपसून मोजतां तर येत नाहीं. तथापि त्या प्रकारच्या प्रश्नाची आपणांस आवश्यकताच नाहीं. आपला प्रश्न व्यक्तीच्या श्रद्धेविषयींचा नसून काव्याच्या रसोत्पत्तीचा आहे. कवीमध्यें जर पांडित्य असलें तर भक्ति कमी होते काय, हाहि प्रश्न आपल्यापुढें नाहीं. काव्य कसें असावें एवढाच आहे. आणि याला उत्तर असें कीं, रसाच्या परिपोषणाकडे लक्ष देणें हें जेव्हां कवीचें कर्तव्य असतें तेव्हां त्यांनीं पांडित्य दाखविण्याचा आणि लोकांस चकित करण्याचा मोह सोडला पाहिजे. संतकवींपैकीं पुष्कळांपाशीं पांडित्याचें ओझें नव्हतें ही गोष्ट जरी खरी असली तरी त्यांची काव्यविषयक वृत्ति कशी होती हें लपत नाहीं. भक्तिकाव्याची पांडित्यप्रदर्शनानें किंवा कोट्यांनीं सरलता बिघडते असेंच त्यांस वाटत होतें.

● ● ●

## ९ : स्वतः अभिप्राय व्यक्त करण्याची पद्धति

संतकवींच्या काव्याची आवड असलेले आणि त्यांच्या अंगीं साधुत्व असल्यामुळें हे संतकवि केवळ क्षमेचे सागर होते आणि अनेक मानवी भावना त्यांच्यांत नष्ट झालेल्या होत्या असें म्हणण्याची कित्येक लेखकांस संवयच लागली आहे. वस्तुस्थिति तशी नव्हती. ईश्वरविषयक भक्ति असली म्हणजे दुसऱ्या सर्व भावना मावळतात असें नाहीं. संतकवींच्या भावना इतक्या सरळपणें मांडल्या गेल्या आहेत कीं, त्यांच्यामध्यें रामदासांनीं वर्णिलेला व रामदासांच्या दृष्टीनें दुय्यम प्रकारच्या कवितेस कारण होणारा रजोगुण-देखील आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. आणि जेव्हां तो दिसून येतो तेव्हां ती कविता ब्रह्मज्ञानाच्या गोष्टीपेक्षां अधिक आकर्षक होते.

प्रेरणाविषयक विचार करतांना, कवी आपल्याच ग्रंथांविषयीं विचार कसे व्यक्त करीत असत हें मागें सविस्तर दाखविलेंच आहे. आपल्या कवित्वाची तारीफ व दुसऱ्यांच्या कवित्वाची निंदा करण्याच्या प्रवृत्तींतून बड्या बड्या व्यक्तीदेखील सुटल्या नाहींत, हें आपणांस त्या त्या निरनिराळ्या कवींचे ग्रंथ पाहिले म्हणजे सांपडेल.

नामदेवाच्या गाथेकडे पाहिलें असतां त्यानें आत्मचरित्र अत्यंत मोकळ्या मनानें सांगितलें आहे. त्या दृष्टीनें प्राचीन काळच्या संतमंडळींच्या एकमेकांशीं असलेल्या संबंधाचें वाङ्मय यानें उत्तम तऱ्हेनें रक्षिलें आहे. पण तें विश्वसनीय आहे किंवा नाहीं याची शंका आहे. नामदेवाच्या अभंगांची भाषा अर्वाचीन दिसते तर उलटपक्षीं त्या अभंगांत तो ज्ञानेश्वरसमकालीन कवींशीं संबंध दाखवितो.

आपल्या कवितेवर आपणच मत व्यक्त करण्याची चाल जवळजवळ प्रत्येक कवींत दिसून येते. त्या व्यक्त केलेल्या मतानें त्यांची काव्यपरीक्षण-पद्धति स्पष्ट होते असें म्हणतां येत नाहीं. पुष्कळदां हे कवी मूळ ग्रंथाची

स्तुति करीत व ओघानें आपल्या कवितेवर अभिप्राय देत. याचीं उदाहरणें इतकीं आहेत कीं, तीं विस्तारानें देण्यांत मौज नाहीं. मुक्तेश्वर व वामन यांच्या काव्यांतील उतारे येथें देतों.

प्रथम मुक्तेश्वराकडे लक्ष देऊं. महाभारताच्या फक्त वनपर्वांत तो आपल्या कवितेविषयीं चारदां मत व्यक्त करतो.

" ( १ ) ... जें बोलिलें व्यासदेवें । तेंचि महाराष्ट्र वैभवें । अर्थ मिरवे सारखा ।। ( म. भा. वनपर्व १. १६१ ). ( २ ) मुक्तेश्वराची ( मराठी ) वाग्वाणी । भरी स्वानंद गोंधळा ।। ( कित्ता. ६. १५६ ). ( ३ ) इति श्रीभारत-वनपर्वणी । कथा नर्मदा-रसवाहिनी ।। ओंवियारूपें पवित्र पुलिनीं । बाणलिंगें विचित्रें ।। तटीं श्रवणसुखाचे आर्ती । तपश्चर्या करितां श्रोतीं । भोगा मुक्ति आयती । स्वधर्मपत्नी सारिखी ।। ( कित्ता. १२.२१७-२१८ ) ( ४ ) मुक्तेश्वराचा वाग्विलास । देशभाषा परि संतोष । मानूनियां साक्षीलागीं व्यास । उभा असे जवळिके । ( कित्ता. १५.२०५ ) "

वामनपंडितानेंदेखील आपल्या ग्रंथाविषयीं आपला अभिप्राय वारंवार व्यक्त केला आहे.

" म्हणोनि जे भागवतीं शुकानें ।
लीला तुझी वर्णिलि कौतुकानें ।।
टीका तिची मी क्षितिलोकवाणी ।
करीन जेथें न सुखास वाणी ।। "

( संकलित रामायण श्लो. ५ )

आपल्या योगवासिष्ठावरील वामन पंडित येणेंप्रमाणें मत देतात—

" असा प्रश्न ऐकोनिया राघवाचा ।
वदे उत्तर श्री वसिष्ठ स्ववाचा ।
वदों भाव त्याचा महाराष्ट्र वाणी ।
जरी शब्द थोडे न अर्थास वाणी । "

( योगवासिष्ठ, श्लोक ४ )

मराठी समश्लोकी टीकेबद्दल वामनाचा स्वतःचा अभिप्राय—

" समश्लोकी टीका प्रकटलि जगीं ज्ञानसरिता ।
सदा स्नानें पानें करुनि करि आनंदभरिता ।
अनंता जन्मांच्या हरुनि सकळा साच दुरिता ।
स्वयें दे मोक्षातें श्रवणपठणीं हेचि त्वरिता । " (भगवद्गीता श्लो. २२)

वरील उताऱ्यांमध्यें आत्मश्लाघा नाहीं असें कोण म्हणेल ? यांनीं व्यक्त केली तितकी आत्मश्लाघा जर आज कोणीं केली, तर भोंवतालचे टीकाकार त्या कवीस फोडून काढतील यांत शंका नाहीं. तथापि तितपत आत्मश्लाघा करण्यांत वामनास संकोच वाटत नसावा हें उघड आहे व यास कारणहि आहे. हे कवी आपले ग्रंथ आपल्या चहात्यांसच दाखवीत असावेत व मुद्रणाच्या अभावामुळें हे ग्रंथ भलत्याच्या हातीं पडतील अशी त्यांस भीति वाटत नसावी.

आपल्या कवितेची तारीफ करण्याची क्रिया मूळ ग्रंथाच्या स्तुतीबरोबरच होत होती असें नाहीं. कधीं कधीं ही क्रिया परनिंदेबरोबरहि होत असे. या दृष्टीनें सर्वांत मोठा गुन्हेगार म्हटला म्हणजे तुकाराम होय. सहृदयतेनें पाहिलें तर, आत्मप्रशंसेंतदेखील दोष नाहीं व परनिंदेंत त्याहून नाहीं. तें केवळ मत व्यक्त करणें होय. मात्र हीं दोन्ही पाहून कवीचें कौतुक करावयास वाचक फारच सहृदय असावा लागतो. तुकारामाचे आत्मप्रशंसेचे व इतरांच्या निंदेचे तुरळक अभंग पुष्कळ ठिकाणीं आढळतात, परंतु त्याचा एके ठिकाणीं असलेला संच येणेंप्रमाणें देतां येईल.

' माझें कवित्व स्वाभाविक झऱ्याप्रमाणें आहे, मानासाठीं तयार केलेलें कृत्रिम नाहीं ' असें तुकाराम पुढील अभंगांत सांगतो—

" विश्वास तो देव । म्हणुनि धरियेला भाव ॥ १ ॥
माझी वदवितो वाणी । ज्याणें धरिली धरणी ॥ २ ॥
जोडिलीं अक्षरें । नव्हतीं बुद्धीचीं उत्तरें ॥ ३ ॥
नाहीं केली आटी । कांहीं मानदंभासाठीं ॥ ४ ॥
कोणी भाग्यवंत । तया कळेल उचित ॥ ५ ॥
तुका म्हणे झरा । आहे मुळींचाचि खरा ॥ ६ ॥ "

त्यांच्या हृदयांत भाव नसतांना ते कवित्व करतात व ते लोक द्रव्यदारा-लोभी आहेत असे तुकोबाचे आक्षेप आहेतच, व त्या कवींना यमदंड भोगावा लागेल असें तुकाराम म्हणतो.

"कलियुगीं कवित्व करिती पाषांड। कुशल हे भांड बहु झाले ॥ १ ॥ द्रव्यदाराचित्तीं प्रजांची आवडी। मुखें बडबडी कोरडाची ॥ २ ॥ दंभ करी सोंग मानावया जग। मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥ ३ ॥ वेदाज्ञे करोनि न करीति स्वहित। नव्हती अलिप्त देवाहुनि ॥ ४ ॥ तुका म्हणे दंड साहील यमाचे। न करी जो वाचे बोले तैसें ॥ ५ ॥"

बरोबरीच्या इतर कवींविषयीं इतक्या मोकळेपणानें काढलेले उद्गार आजच्या साहित्याच्या लोकशाहींत खपतील काय?

तुकारामाच्या वेळेस कवित्व पुष्कळच होतें व दुसऱ्याच्या काव्यांतील तुकडे घेऊन आपली कविता सजविण्याचा प्रयत्न होत असे. तुकाराम त्याविषयीं संतापून बोलत आहे—

"घरोघरीं जाले कवी। नेणें प्रसादाची चवी ॥ १ ॥ लंडा भूषणाची चाड। पुढें न विचारी नाड ॥ २ ॥ काढावें आइतें। तेंचि जोडावें स्वहितें ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे। आहाच झांकतील डोळे ॥ ४ ॥

प्रश्न असा होईल कीं, जर मान्यतेसाठीं तुकाराम कवित्व करीत नव्हता व केवळ भगवद् भक्तीसाठीं तो काव्य करीत होता, तर दुसऱ्या मनुष्यानें चोहोंकडचे चार शब्द गोळा करून काव्य केलें तर तुकारामाच्या पोटांत कां दुखावें? पण दुखत होतें हें खरें. शिवाय तें इतकें दुखत होतें कीं त्याबद्दल आजच्या ग्रंथकारास हंसूं आल्याशिवाय राहणार नाहीं. एखाद्यानें भक्ति चांगली केली व दुसऱ्यानें जरा वेडीवांकडी म्हणजे दुसऱ्याचे शब्द घेऊन केली म्हणून खेदाचें कारण नाहीं. तर मग काव्य करतांना इकडचे तिकडचे शब्द घेतले म्हणून काय बिघडलें? याचें उत्तर हेंच कीं, काव्य हें केवळ ईश्वरभक्तीचें साधन वाटत नव्हतें, तुम्हांआम्हांप्रमाणें तुकारामहि गौरवाचा भुकेला होता आणि त्यास संत म्हणून ख्याती हवी होती, एवढेंच नव्हे तर कवि म्हणून ख्याती हवी होती व दुसऱ्याची तशी ख्याती नको होती. तुकारामास आपल्या काव्याची उच्चता भासत होती व आपल्या काव्यक्षेत्रांत

कमी योग्यतेच्या मनुष्यानें उडी घातली तर न जाणो पुढें मागें त्यास आणि आपल्यास एकाच मालिकेंत लोक ओंवतील असा तुकारामास घाबरटपणा उत्पन्न झाला होता. आपल्याला जो सन्मान मिळावयास पाहिजे तो दुसऱ्यास मिळतो असें त्यास वाटे.

" एकाचिया सोई कवित्वाचे बांधे । बांधलिया साधे काय तेथें ।। १ ।। काय हातीं लागे भुसाचे कांडणीं । सत्याची दाटणी करूनि ठेवी ।। २ ।। कवित्वाचे रूढी पायां पाडी जग । सुखावोनी मग नरका जाय ।। ३ ।। तुका म्हणे देव केल्याविण साहे । फजिती ते आहे लटिक्या अंगीं ।। ४ ।। "

तुकारामास घाबरटपणा आणि त्वेष आला त्याचें कारण जग त्या कवीच्या पायां पडे हेंच होतें; आणि त्यामुळें तुकारामास इतका संताप येई कीं तो उष्ट्या पत्रावळी गोळा करणारांस चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत नरकांत पाठवितो ! !

" उष्ट्या पत्रावळी करूनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची । १ ।। ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ।। २ ।। तुका म्हणे एका नारायणा ध्याई । वरकडा वाही शोक वसे ।। ३ ।। "

तुकाराम ज्या इतक्या त्वेषानें एका विशिष्ट व्यक्तीस शाप देत होता, केवळ सामान्य विधान करीत नव्हता, त्या व्यक्तीस लोक ' कवीश्वर ' म्हणत असावेत असें दिसतें. तुकारामास त्या कवीश्वराचा इतका राग येई कीं त्याचा आम्हांला विटाळ होतो असें तुकाराम सांगतो. त्याच्या दांभिक कवितेची आवड धरणारे लोक बहिरट आणि आंधळे आहेत पण शेवटीं तोंड ( कोणाचें ? कवीश्वराचें किंवा त्याच्या चहात्यांचें ) काळें होईल असें तुकाराम भविष्य करतो.

" कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद वोंगळ चिवडिती ।। १ ।। दंभाचे आवडी बहिराट आंधळे । शेवटास काळें होईल तोंड ।। २ ।। सोन्या-शेजारीं तों लाखेची जतन । सतत ते गुण जैसे तैसे ।। ३ ।। सेव्यसेवकता न घडतां ठावी । तुका म्हणे गोवी पावती हीं ।। ४ ।। "

तुकारामाच्या आत्मप्रौढीच्या अभंगांबद्दल राग मात्र वाचकांस येत नाहीं आणि याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे, प्रत्येक मनुष्याला आत्मप्रशंसेची

अनुक्रम
क्रमांक ........ नों. दि.



थोडीबहुत तरी आवड असतेच हें होय; व त्यास तुकारामबावांसारखे नम्र गृहस्थदेखील आत्मस्तुति करतात हें पाहून तुकारामबावांसारख्याविषयीं आपलेपणा वाटूं लागतो. जें स्वाभाविक आहे तें दृष्टीस पडलें म्हणजे जें प्रेम वाटतें, तें आपणाशीं अगदीं विसदृश अशा व्यक्तीबद्दल वाटत नाहीं; आणि यामुळें थोरांमोठ्यांचे जे दोष दिसूं लागतात, तेच त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत आपलेपणा उत्पन्न करतात. शिवाय लोकांना एकसारखा भक्तींत तल्लीन झालेला तुकारामच पहावयास हवा आहे असें नाहीं, तर शेजाऱ्याचा गौरव पाहून मत्सर झालेला व शिव्या देणारा तुकारामदेखील पहावयास हवा आहे. एका प्रौढीच्या अभंगाची निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं वर उलट स्तुतीच केली आहे. तो अभंग येणेंप्रमाणें—

> " संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥ १ ॥
> ज्ञानदेवें रचिला पाया । रचियेलें देवालया ॥ २ ॥
> नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥ ३ ॥
> जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥ ४ ॥
> भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥ ५ ॥ "
>
> ( आवटे–तुकाराम गाथा, अभंग ४१४५ ).

प्रो. दांडेकर यांचें मत असें आहे कीं, हा अभंग तुकारामाचा नसून बहिणाबाईचा आहे. तथापि तसें मत व्यक्त करण्यास चांगलासा आधार दिलेला नाहीं. असो.

तुकारामाचे हे वरचे उद्गार काव्यपरीक्षणवाचक कितपत आहेत तें सांगतां येत नाहीं. त्यानें हे उद्गार कोणत्या ‘ कवीश्वरा ’संबंधानें काढले हें समजण्यास आज मार्ग नाहीं. या उद्गारामध्यें जे आरोप केले आहेत ते म्हटले म्हणजे टीकाविषय झालेला ‘ कवीश्वर ’ दुसऱ्यांच्या कल्पना किंवा शब्द चोरतो, त्याची वागणूक वाईट आहे– आणि ती कोणत्या बाबतींत म्हणून विचारल्यास तुकाराम एवढेंच सांगतो कीं, त्याच्या मनांतून द्रव्याशा आणि स्त्रीप्रेम गळालेलीं नाहींत, त्याला मुलें व्हावींत अशी आवड आहे वगैरे. तुकाराम त्या ‘ कवीश्वरा ’च्या पदरीं परदाराभिलाष बांधीत नाहीं

हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. दुसरे आरोप कोणते तर तो दंभ करतो, आणि लोकांना तो आपल्या पायां पडायला लावतो, अंगांत गुण नसतांना तो लोकमान्य होऊं पाहतो वगैरे. त्याला भजणारे लोक आंधळे आणि बहिरट आहेत, वगैरे. हे तुकारामाचे शब्द वाचले म्हणजे टीकाविषय झालेला मनुष्य खरोखर मोठा वाईट इसम दिसत नाहीं. इतकें असतां तो मनुष्य यावच्चंद्रदिवाकरौ नरकांत पडणार आहे असें तुकारामांनीं कां म्हणावें बरें ? त्यावरून एकच निर्णय निघतो कीं भयंकर मत्सरपिशाच्चिकेनें तुकाराम-बोवांस पछाडलें होतें.

तुकारामाच्या या शिवराळ भाषेवरून लोकमान्य टिळकांच्या दुर्बल टीकाकारांची आठवण होते. ते तरी काय म्हणत ? ते एवढेंच म्हणत कीं, लोकमान्यांना खरी देशभक्ति नाहीं. लोक वेडे म्हणून ते त्यांची पूजा करतात, वगैरे. तुकारामाला ज्या कवीचा इतका संताप येत होता आणि ज्याविषयीं इतका मत्सर वाटत होता तो कवि फारच उच्च असला पाहिजे यांत शंका नाहीं. या कवीचें नांव तुकारामानें कां बरें प्रसिद्ध केलें नाहीं ? कदाचित् सालोमालोवर जो दुसरा एक ताशेरा झाडला आहे त्यावरून तोच कवि असेल काय अशी शंका उत्पन्न होते. तुकारामाचा टीकाविषय झालेला कवि देहूच्या आसपासच होऊन गेला असणें शक्य आहे.

कधीं कधीं असेंहि होतें कीं, एखादा मोठा मनुष्य आपल्या समकालीन फालतु व्यक्तीबद्दल मनांत राग धरतो आणि त्यावर कोरडे ओढतो. त्यामुळें ती फालतु व्यक्ति मात्र विस्मरणीय होते. तुकारामानें एका समकालीन 'हरीच्या दासा 'ला चिरंजीव केलें आहे. नाहीं तर 'सालोमालो 'चें नांव कोणास ठाऊक असतें ? तुकाराम त्याविषयीं खालीलप्रमाणें लिहितो—

" सालोमालो हरिचा दास । म्हणुन केला अवघा नास ।। १ ।। अवघें वच मंगळ केलें । म्हणती एकाचें आपुलें ।। २ ।। मोडुनि संतांचीं वचनें । करिती अपणां भूषणें ।। ३ ।। तुका म्हणे कवी । जगामधीं रूढ दावी ।। ४ ।।

(आवटे, तुका. गाथा, पृ. ६०१–६०२)

तुकारामानें आपल्याविषयीं मत आणखी एका ठिकाणीं व्यक्त केलें आहे. ते अभंग येणेंप्रमाणें— कवित्वाचा निषेध व त्याचा परिहार (पृ. ५७०)

" करूं कवित्व काय नाहीं आतां लाज । मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥ आतां आला एका निवाड्याचा दीस । सत्याविण रस विसरला ॥ २ ॥ अनुभवाविण कोण करी पाप । रितोचि संकल्प लाजवावे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥ ४ ॥ "

वरील अभंगांवरून तुकारामास आरंभींच्या कालांत कविता करण्याविषयीं लाज वाटत होती, पण त्यास जो आध्यात्मिक अनुभव आला त्यामुळेंच त्यास कवन करण्यास धैर्य आलें असें दिसतें.

" पावावें संतोष । तुम्हीं यासाठीं सायास ॥ १ ॥
करीं आवडी वचनें । पालटुनि क्षणक्षणें ॥ २ ॥
द्यावें अभयदान । भूमी न पडावें वचन ॥ ३ ॥
तुका म्हणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥ ४ ॥ "

" केल्या पुरती आळी । कांहीं होते टाळाटाळी ॥ १ ॥ सत्य संकल्पाचें फळ । होतां न दिसेची बळ ॥ २ ॥ दळणाच्या ओंव्या । रित्या खऱ्या मापें व्याव्या ॥ ३ ॥ जातीं उखळें चाटूं । तुका म्हणें राज्य घाटूं ॥ ४ ॥ "

कवींच्या मनांतील आपल्या काव्यांविषयींच्या आणि दुसऱ्याच्या काव्यांविषयींच्या भावना काय होत्या हें आणखी कवी घेऊन देत नाहीं. अनेक कवींची कथा तुकाराम व वामन ह्यांच्यासारखीच आहे.

० ० ०

आपलें काव्य निराळ्या प्रकारचें आहे ही जाणीव संतकवींना जी झाली होती ती त्यांनीं आपली प्रेरणांकितता दाखवून आणि कवित्वाची व्याख्या निराळी करून व या प्रकारच्या अनेक रीतींनीं व्यक्त केली होती. ही जाणीव तत्त्वरूपानें कोठें तरी मांडली जाणें अवश्य होतें. आपला परमार्थविषयक संप्रदाय इतर लोकांपेक्षां जरा निराळा आहे ही गोष्ट ते समजून चुकले होते. आपलें काव्यवैशिष्ट्य उमजण्यास आपल्या काव्यापेक्षां निराळ्या प्रकारचें काव्य ते आसपास पहात असले पाहिजेत, व प्रचलित कल्पनांशीं भांडत असले पाहिजेत. अभिमानानें भांडण्याजोगें त्यांचें वैशिष्ट्य होतें हें शिवकालीन वाङ्मयाचा आढावा घेऊन पुढें दाखविलें आहे. आपलें वैशिष्ट्य ईश्वरभक्तींत आहे तसेंच कवितेंतहि आहे असें रामदासांस अगदीं स्पष्टपणें वाटत होतें. संस्कृत ग्रंथांतील भक्ति ज्या प्रकारची होती त्यापेक्षां आपली भक्ति अधिक तीव्र आहे या प्रकारची भावना इतर संतकवींतहि होती. तशी भावना असल्याशिवाय, “ ज्ञानदेवानें पाया रचिला आणि तुकारामानें त्याला कळस चढविला ” असें वाक्य तुकाराम बोलला नसता, किंवा प्रो. दांडेकर यांच्या मताप्रमाणें तें वाक्य तुकारामाचें नसून त्याची शिष्यीण बहिणाबाई ( ज्ञानकोश, पृ. व १५९ ) हिचें असलें तर बहिणाबाईदेखील तें बोलली नसती.

संस्कृत काव्याच्या इतिहासांत शिवकाल हा स्तोत्ररचनेचा काल आहे. या काळचें संस्कृत वाङ्मय जर पाहिलें तर त्यांत नाट्यवाङ्मय बरेंच दिसतें पण खंडकाव्यें बेताचींच आहेत. त्यांत मुख्य भरणा स्तोत्रांचा आहे, पण ही स्तोत्ररचना देशी वाङ्मयांत स्तोत्रवाङ्मय वाढलें त्याचा परिणाम म्हणून झाली असावी असें वाटतें.

महाकाव्यें हीं ज्ञानेश्वरकालापूर्वींच लिहून झालीं होतीं, आणि त्याच्या-

नतरचीं काव्यें म्हणजे राजप्रशस्त्यांचीं काव्यें होत. हीं प्रशस्त्यांचीं काव्यें म्हटलीं म्हणजे त्यांत कवित्वशक्ति बेताचीच असलेली आणि राजांच्या वंशावळ्या वगैरे देणारीं अशीं होतीं. हीं लहानच असत, व हीं ताम्रपटांमधून-देखील दृग्गोचर होतात. प्रशस्त्या ज्या वर्गाविषयीं लिहावयाच्या तो राजन्य-वर्ग दुर्बल झाला म्हणजे त्याबरोबर त्याच्या प्रशास्तिलेखक कवींच्या कवित्वास-सुद्धां ओहोटी लागणें स्वाभाविक होतें.

शिवाजीवर जीं पर्णालाख्यान वगैरे काव्यें झालीं तीं दोन स्वरूपाचीं आहेत. एक तर तीं प्रशस्तिवाङ्मयाचा विकास होत, व पुराणवाङ्मयाशीं तीं संबद्ध होऊं पाहणारीं होत.

अशा वेळेस कवित्वशक्तीचा ओघ स्तोत्ररचनेच्या कामीं लागला होता. यास कवित्वाच्या इतिहासाच्या दृष्टीनें, तसेंच धार्मिक इतिहासाच्या दृष्टीनें कारण आहे. ज्ञानेश्वरकालांतच बुद्धधर्म व जैनधर्म यांचें प्राबल्य नाहींसें होऊन पौराणिक धर्म चांगलाच स्थापन झाला होता हें हेमाद्रीच्या चतुर्वर्ग-चिंतामणीवरून अगदीं स्पष्ट दिसून येतें. या ग्रंथांत पौराणिक मतांचेंच स्पष्टी-करण वैशिष्ट्यानें केलें आहे. पौराणिक धर्मस्थापनेबरोबरच सर्व प्रकारच्या वाङ्मयास पौराणिक स्वरुप द्यावयाचें आणि त्याचा कोणत्या तरी पुराणांत अंतर्भाव करून द्यावयाचा इत्यादि प्रयत्न झालेले आहेत. राजप्रशंसा पुराणसंबद्ध करण्याचा प्रयत्न जसा शिवभारतांत दिसून येतो तसाच इतर प्रशस्तिलेखांतदेखील दिसून येतो.

स्तोत्रवाङ्मय जें तयार होई त्याला तें संस्कृतांत असल्यासुळें महत्त्व येई, पण काव्य या दृष्टीनें त्याचें महत्त्व कमीच होतें. रामरक्षेसारखीं जीं स्तोत्रें तयार झालीं तींदेखील अत्यंत कृत्रिम आहेत, आणि तसलीं स्तोत्रें पाहून संतकवींना त्यांच्यापेक्षां आपलेच ग्रंथ सरस आहेत ही भावना उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक आहे. त्यांना असेंहि वाटे कीं, या पंडितवर्गाची भक्ति खोटी. मी कुणबी झालों हेंच बरें झालें. नाहीं तर दंभानेंच मेलों असतों असें तुकाराम म्हणे.

पूर्वकालीन लेखकांनीं आपल्यामध्यें वैशिष्ट्य आहे याची जाणीव दाखविली तर आपल्या धार्मिक भावनांमध्यें कांहीं विशिष्ट शास्त्रीय पद्धति

आहे असें रामदासांनीं दाखविलें. दासबोधामध्यें जो व्यावहारिक विचार आहे किंबहुना संस्कृत ग्रंथकारांनीं सांगितलेल्यापेक्षां जें जास्त कर्मयोगशास्त्र त्यांत आहे त्याची परस्परसंगति कै. राजवाडे यांनीं चांगली जुळवून ती ग्रंथमालेंत पूर्वीं मांडली आहे. ज्याप्रमाणें आपल्या अत्यंत निराळ्या पारमार्थिक प्रवृत्तीचें शास्त्रीय विवेचन दासबोधांत रामदासांनीं केलें आहे, त्याचप्रमाणें आपल्या संप्रदायाच्या आश्रयानें जें काव्य उदित झालें त्याचेंहि विवेचन या दासबोधरूपी ज्ञानकोशांत रामदासांनीं केलें आहे. ग्रंथ कसा लिहावा हें, अक्षर कसें असावें येथपासून सांगितलें आहे. त्या वेळेस मराठींत प्रत्येक विषयावर स्वतंत्र ग्रंथ व्हावा असा काळ आला नव्हता. त्यामुळें रामदासासारखी अनेक विषयांवर विचार करणारी जी व्यक्ति होती तिला आपले सर्व प्रकारचे विचार एकाच ग्रंथांत घालावे लागले. हा ग्रंथ वाचतांना असें वाटूं लागतें कीं, हा ग्रंथ अजून लोकांस चांगला समजला नाहीं. अनेक शास्त्रांवर ज्या नवीन गोष्टी यांत सांगितल्या आहेत, त्या गोष्टींचें महत्त्व, त्या त्या शास्त्राचें पूर्वरूप ठाऊक असल्याशिवाय समजणार नाहीं. संस्कृत ग्रंथभांडार पाहिल्यानंतरच यांत नवीन काय आहे हें दिसूं लागतें. यांत पूर्वींच्या ग्रंथकारांस अपरिचित असें मानसशास्त्र आहे, तसेंच पूर्वीं कोठें न सांगितलेलें असें समाजशास्त्र आहे, तसेंच मानवी आयुष्याचें अत्यंत सूक्ष्म व नवीन असें पृथक्करण आहे. विचाराच्या नावीन्याची व विविधत्वाची जाणीव रा. देव यांस झाली, हें त्यांच्या दासबोधाच्या प्रस्तावनेवरून दिसतें. पण विचारनावीन्याची व्यापकता रा. देव यांनीं मांडली तीपेक्षां पुष्कळच अधिक आहे. दासबोध हें काव्य नसून एक मोठें विचारभांडार आहे हें कोणासहि एका वाचनानेंच समजण्यासारखें आहे.

रामदासांनीं कर्मयोगपर विचार ज्याप्रमाणें कांहीं तरी नवें सांगून उत्कर्षास नेला त्याप्रमाणेंच त्यांनीं साहित्यशास्त्रीय विचार अगदीं स्वतंत्र केला आणि तो संस्कृत ग्रंथकारांच्या पुढें नेला आहे. रामदासांचें काव्यावर लिहिणें साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें कितपत शास्त्रीय विवेचन आहे, त्यांच्या विचारांत कांहीं नावीन्य आहे काय, किंवा तें निदान विचार करण्याजोगें आहे काय हें आपण पाहूं. दासबोधांतून या विषयावर कांहीं उतारे घेतां येतील.

जेव्हां संतकवी कवितेवर विवेचन करीत तेव्हां कवित्वाविषयीं स्वसंप्रदाय-निरपेक्ष विचार प्रकट करीत नसून आपल्या संप्रदायांतील काव्य करूं इच्छिणारांना सूचना देत आहेत हें लक्षांत घ्यावें, आणि त्यांच्या स्वसंप्रदाय-विषयक सूचना त्यांच्या विवेचनांतून वजा केल्या म्हणजे त्यांचे कवित्व-विषयक सामान्य विचार आपण निवडून काढले असें समजावें.

" कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ । कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ॥ ३६ ॥ मृदुमंजुळ कोमळ । भव्य अद्‌भुत विशाळ । गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ॥ ४० ॥ जेणें अनुताप उपजे । जेणें लौकिक लाजे । जेणें ज्ञान उमजे । या नांव कवित्व ॥ ४८ ॥ जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे । जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ॥ ५० ॥ जेणें सद्‌बुद्धि लागे । जेणें पाखंड भंगे । जेणें विवेक जागें । या नांव कवित्व ॥ १७॥ जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे । जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ॥ ५२ ॥ जेणें होये समाधान । जेणें तुटे संसारबंधन । जया मानिती सज्जन । या नांव कवित्व ॥ ५३ ॥ " ( दशक १४, समास ३ ).

वर घेतलेल्या उताऱ्यांत स्वसंप्रदायसापेक्ष विचार आणि कवित्वविषयक विचार यांचें पृथक्करण करतां येणेंप्रमाणें मांडणी करतां येईल—

वरील उताऱ्यांत केवळ कविताविषयक विवेचन फार थोडें आहे. कवित्व निर्मळ असावें, सरळ असावें, प्रांजल अन्वयाचें असावें– म्हणजे कवीचें म्हणणें समजावयास कांहीं एक आयास पडूं नयेत. तें मृदु, मंजुळ आणि कोमल असावें, किंवा भव्य अद्‌भुत विशाल असावें, तसेंच तें गौल्यामुळें, माधुर्यामुळें रसाळ असावें एवढेंच सांगितलें आहे. इतक्या अनेक शब्दांत जर मुख्य कांहीं कल्पना असेल तर ती हीच कीं अलंकार घालण्याच्या किंवा व्यंग्यार्थाला प्राधान्य देण्याच्या इच्छेनें, किंवा दुसऱ्या अनेक क्लृप्त्या लढवून कवीनें आपला सरळपणा घालवूं नये. संस्कृत कवितेच्या उत्तर-कालीं कवितेला जी कृत्रिमता कवींनीं आणली तिचा निषेध स्पष्ट शब्दांत रामदासांनीं केला आहे.

केवळ सौलभ्याच्या उपदेशानें कवित्वाचें स्पष्टीकरण होत नाहीं. रामदासांचीं काव्यविषयक मतें अधिक तपासलीं पाहिजेत.

काव्यास काव्यत्व कशानें येईल याचें तात्त्विक निरपेक्ष विवरण रामदासांनीं केलेलें नाहीं तर आपल्या संप्रदायाचें काव्य कसें असावें हें त्याच समासांत सांगितलें आहे. त्यांत साहित्यशास्त्रीय तत्त्व गोंवून दिलें आहे कीं कवित्वाचे परिणाम अजमावले पाहिजेत. कवित्व जर परिणामकारी होईल तरच त्यास महत्त्व आहे. परिणाम कसे व्हावयास पाहिजेत हें रामदास पुढें सांगतात व ते परिणाम त्यांस इष्ट असलेल्या भक्तिरसमय रसाळ कवितेपासूनच अपेक्षितात. जर कवित्व अन्य रसाचें असलें तर अन्य परिणाम अपेक्षिले पाहिजेत. भक्तिरसमय काव्याचे मनावर अपेक्षिलेले परिणाम असे - त्या काव्यामुळें अनुताप उपजला पाहिजे, लौकिकाविषयीं इच्छा लाजली पाहिजे, आणि 'ज्ञान' झालें पाहिजे. खऱ्या कवित्वानें देहबुद्धि तुटावी, भवसिंधु आटावा, भगवंत प्रगट व्हावा, सद्‌बुद्धि लागावी, पाखंड भंगावें, विवेक जाग्रत व्हावा; त्याच्या योगानें सत्य समजावें, आभास निरसला जावा, आणि आपपर भाव नाहींसा व्हावा, समाधान व्हावें, संसारबंध तुटावा, इत्यादि इत्यादि.

अर्थात् भक्तिरूपी काव्यापासून जितके परिणाम अपेक्षिले आहेत ते काव्यकर्त्यांच्या मनांत भक्तिभावाची उत्कटता व ज्ञानीपणा उतरल्याशिवाय काव्यांत उत्पन्न होऊं शकणार नाहींत; म्हणजे रामदासांच्या दृष्टीनें काव्य सरस पाहिजे; तें वाचकावर अत्यंत परिणाम घडविणारें पाहिजे; आणि त्यासाठीं कर्त्यांच्या मनांत प्रेरणा जोराची झाली पाहिजे; असा एकंदर अर्थ निघतो.

काव्याचे परिणाम किती झाले पाहिजेत हें सांगतांना जी भाषा रामदासांनीं वापरली आहे ती भाषा वाचतांना देहबुद्धि तुटली पाहिजे, भवसिंधु आटला पाहिजे इत्यादि काव्यापासून अपेक्षिलेले परिणाम वाचून अतिशयोक्तीची भावना वाटल्यावांचून रहात नाहीं. तथापि ती अतिशयोक्तीची भाषा सकारण आहे. काव्याचा आत्मा रस आहे, व चांगलें काव्य म्हणजे ज्यांत रस हाच उत्कटतेस गेलेला असेल तेंच होय. पण उत्कटतेस गेलेला रस म्हणजे काय? रसांची डिग्री मोजण्यासारखें साहित्यान्तर्गत गणितशास्त्र अजून सांपडलें नाहीं. काव्यांत रस पुष्कळ आहे किंवा कमी आहे हें सांगावयाचें कसें? रसोत्पत्ति ही तिच्या वाचकांच्या मनावर परिणाम दाखवूनच

मोजावयाची असते. तिचे परिणाम जितके जास्त होतील तितका रस जास्त चांगला उतरला असें समजावयाचें. भक्तिरस व अध्यात्मभावना हीं चांगलीं उतरलीं असें केव्हां समजावयाचें ? तर तो ग्रंथ वाचून वाचकासच वैराग्य-परता भासेल तेव्हां. अर्थात् रसाचें दृढत्व कवीकडून मागण्यासाठीं त्या त्या काव्याचे परिणाम आपण किती मोठाले अपेक्षितों हें सांगावयाचें, या दृष्टीनें काव्याचा परिणाम काय झाला पाहिजे याविषयीं अतिशयोक्तीची भाषा रामदासांच्या लेखांत आली आहे.

आतां रामदासांनीं केलेल्या कवींच्या वर्गीकरणाकडे लक्ष देऊं. हें वर्गीकरण करतांना उत्तम काव्य, कनिष्ठ काव्य इत्यादि तारतम्याची कल्पना देत आहें.

रामदासांचे कवित्वविषयक विचार मुख्यत्वेंकरून दासबोधांत दशक १४, समास ३ यांत व त्याचप्रमाणें दशक १, समास ७ यांमध्येंहि सांपडतात. तथापि त्यांची काव्यविषयक वृत्ति दासबोधांत अनेक ठिकाणीं आढळून येते. ही काव्यविषयक वृत्ति त्यांनीं प्रत्यक्ष सांगितली नाहीं तर त्यांनीं मानस-शास्त्रीय विवेचन केलें आहे त्यावरून ती आपणांस दिसून येते.

ही कवित्वाचें स्वरूप ठरविणारी जी मनाची बरी वाईट प्रवृत्ति किंबहुना प्रवृत्तीच्याहि मागें असणारी जी प्रकृति तीवर काव्यपरता अवलंबून असते. ती मनुष्यप्रकृति दाखविणारे उतारे घेतल्याशिवाय रामदासांच्या साहित्य-शास्त्राचें स्पष्टीकरण होणार नाहीं. कवित्वकलेवरील १४ व्या दशकांतील विवेचनाकडे प्रथम वळूं. रामदासांच्या कवित्वविवेचनाची पहिलीच ओंवी मोहक आहे ती अशी—

" कवित्वशब्द सुमन माळा । अर्थ परिमळ आगळा ।
तेणें संत षट्पदकुळा । आनंद होये ॥ १ ॥ "

कवितेंत जर केवळ दुसऱ्यांच्या शब्दांचा पुनरुच्चार नको असेल तर ज्या भावना लोकांत उत्पन्न करावयाच्या त्या कवींतच उत्पन्न झाल्या पाहिजेत हें धार्मिक काव्याच्या बाबतींत सांगण्यासाठीं रामदास सांगतात—

" क्रियेवीण शब्द ज्ञान । तया न मानिती सज्जन ।
म्हणौनि देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥

देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ ६ ॥ ”

रामदास कवित्वाचे प्रकार व्याख्येसह पुढें सांगतात—

“ धीट पाठ प्रासादिक । ऐसे बोलती अनेक ।
तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥ ”
“ धीट म्हणजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनासि आलें ।
बळेंच कवित्व रचिलें । या नांव धीट बोलिजे ॥ ८ ॥ ”
“ पाठ म्हणजे पाठांतर । बहुत पाहिले ग्रंथांतर ।
तयासारिखा उतार । आपणहि केला ॥ ९ ॥ ”

या दोन प्रकारच्या काव्याशिवाय, पण प्रासादिक नसलेल्या, काव्याची उत्पत्ति वर सांगितलेल्या दोन्ही गुणांच्या संयोगानें उत्पन्न होते. त्यास रामदास धीटपाठ म्हणतात. त्याचें लक्षण ते पुढील ओंव्यांत देतात—

“ शीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें ।
भक्तिवांचून जें केलें । त्या नांव धीट पाठ ॥ १० ॥ ”
“ कामिक रसिक शृंगारिक । वीर हास्य प्रस्ताविक ।
कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥ ११ ॥
मन झालें कामाकार । तैसेचि निघती उद्गार ।
धीटपाठें परपार । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥
व्हावया उदरशांति । करणें लागे नरस्तुति ।
तेथें केली ते वित्पत्ति । त्या नांव धीटपाठ ॥ १३ ॥ ”

वर ‘ धीट पाठ कवित्वा ’च्या व्याख्येंत रामदासांनीं प्रत्येक शब्द मोजून घालण्याइतकी तर्कशास्त्रीय शुद्धि राखली नाहीं. तथापि आपली दृष्टि मात्र मांडली आहे; किंबहुना, भावनेच्या खोलपणामुळें तें धीट म्हणतां येणार नाहीं. असें काव्य या नवीन सदरांत घातलें आहे. जेव्हां मन कामाकार होतें तेव्हां भावना वरवरची नसते, तरी त्या काव्यास केवळ भावनोत्कटतेमुळें प्रासादिक काव्यांत घालावयास रामदासस्वामींना नको होतें.

धीट, पाठ, व धीट पाठ हें हलक्या तऱ्हेचें कवित्व रामदास समजतात आणि म्हणतात—

" कवित्व नसावें धीट पाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषांड मत ॥ १४ ॥
कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग ।
कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ॥ १५ ॥
कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ ।
कवित्व नसावें कुटिल । लक्षुनियां ॥ १६ ॥
हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें ।
छेदभंग न करावें । मुद्राहीन ॥ १७ ॥
वित्पत्तीहीन तर्कहीन । कलाहीन शब्दहीन ।
भक्तिज्ञानवैराग्यहीन । कवित्व नसावें ॥ १८ ॥ "

हें सर्व विवेचन दोष कोणते टाळावेत याविषयींचें आहे. आणि ज्यास विद्या, तर्क, कला, शब्द किंवा भक्तिज्ञानादि भावना नाहींत त्यानें काव्याच्या भानगडींत पडण्यांत अर्थ नाहीं असें सांगणारें आहे. कोणास तरी लक्षून लिहिलेली कुटिल कविता स्वामींनीं पाहिली असावी. ती टिकली नाहीं हें मात्र खरें.

कविता भावप्रधान पाहिजे हें पुढच्या ओंव्यांत दाखवितात—

" भक्तीहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत ।
आवडीहीन जें वक्तृत्व । कंटाळवाणें ॥ १९ ॥
भक्तीविण जो अनुवाद । तोचि जाणावा विनोद ।
प्रीतिविण संवाद । घडे केंवि ॥ २० ॥ "

आवडीशिवाय ज्याप्रमाणें वक्तृत्व कंटाळवाणें होतें त्याचप्रमाणें भक्तिकाव्य भक्तीशिवाय कंटाळवाणें होतें. त्यास ' ठोंबें ' काव्य म्हणावें. जो अनुवाद भक्तीशिवाय होतो ती ' थट्टा ' आहे, संवाद नव्हे. म्हणजे प्रेमाशिवाय प्रेमव्यंजक जें लटकें भाषण होतें तें केवळ अनुकरणात्मक आहे. तें फ्लर्टिंगच्या स्वरूपाचें आहे. प्रीतीशिवाय ' संवाद ' ( रिस्पॉन्स ) कसा उत्पन्न होईल ? वगैरे विचार वर व्यक्त केले आहेत.

यानंतर प्रासादिक कवी कसे असतात तें रामदास सांगतात—

" वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन । अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ।। २२ ।। ज्यास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी । चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ।। २३ ।। जो भगवद्भजनेंविण । जाऊं नेदी येक क्षण । सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ।। २४ ।। अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागे भक्तिछंद । भक्तिविण अनुवाद । आणीक नाहीं ।।२६।। आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी । भावें करुणा कीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ।।२७।। भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवें देहभान । शंका लज्जा पळोन । दुरी ठेली ।।२८।। तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला । तेणें अहंभाव घातला । पायातळीं ।। २९ ।। गात नाचत निःशंक । तयास कैंचे दिसती लोक । दृष्टीं त्रैलोक्य नायेक । वसोनि ठेला ।। "

कवीच्या मनाला जें वाटतें किंवा त्याला जें दिसतें तें सांगण्यानें प्रासादिक कविता होत नाहीं. तर प्रासादिक कवितेचें मुख्य लक्षण हें कीं, जो भाव व्यक्त करावयाचा तो कवीच्या मनांत मुरला पाहिजे. कवि स्वतः भावरूप झाला पाहिजे आणि तो जें बोलतो तें भावानें भरलेल्या मानसिक स्थितीचा स्वाभाविक परिणाम असला पाहिजे.

येणेंप्रमाणें धीट, पाठ आणि प्रासादिक या त्रिविध कवित्वामध्यें प्रासादिक ही कविता उत्तम प्रकारची होय, धीट ही दुय्यम प्रकारची होय व पाठ ही कनिष्ठ प्रकारची होय. धीट गुण आणि पाठ गुण हे एकत्र झाले असतां कविता सरस आणि आलंकारिक होते पण तीदेखील प्रासादिक कवितेच्या खालच्या पायरीवरील आहे. येणेंप्रमाणें केवळ भावरसांच्या जोराप्रमाणें कवितेचें उच्चनीचत्व रामदासांनीं दाखविलें आहे.

तथापि त्याबरोबर हेंहि दाखविलें पाहिजे कीं, रामदासांनीं भावोत्कटतेच्या जोराप्रमाणें कवितेचें उच्चनीचत्व ठरवावें ही एकच कल्पना मांडली नाहीं. जो प्रतिपाद्य विषय असेल, कवितेचा जो हेतु असेल त्यावर कवितेची उच्चनीचता ठरवावी हीहि दृष्टि रामदासांत होती. आणि यामुळेंच " व्हावया उदरशांति । करणें लागे नरस्तुति । तेथें केली ते वित्पत्ती । त्या नांव धीट पाठ ।। " असें रामदास बोलले आहेत. मम्मट हा काव्याचें

हेतू सांगतांना ' यशसे ' बरोबर ' अर्थकृते ' असा हेतु सांगतो. पण त्या हेतूनें जें काव्य तयार होईल तें रामदासांच्या मतानें हलकें आहे.

रामदास आपली काव्यविषयक वृत्ति सात्त्विक, राजस आणि तामस या तीन मनुष्यप्रकृतींशीं जुळविण्याचा प्रयत्न करीत होते. ज्यास आपण काव्य-सृष्टि म्हणूं ती सर्वच काव्यसृष्टि राजसगुणाचें विततस्वरूप आहे असें दाखविण्याची त्यांची प्रवृत्ति होती. रामदासांना भावोत्कटतेवर कवितेचें गौरव ठरवावें हें कबूल होतें पण त्याबरोबर त्यांना असेंहि वाटे कीं, भावोत्कटता जर परमेश्वराखेरीज अन्य बाबतींत–उदाहरणार्थ स्त्रीविषयक–दिसली तर तें कांहीं श्लाघ्य नाहीं. स्त्रीविषयक भावोत्कटतेचा रामदासांनीं दासबोधांत वारंवार निषेध केला आहे. सात्त्विक पुरुष, राजस पुरुष आणि तामसी पुरुष या तिघांत जर सात्त्विक पुरुष श्रेष्ठ आहे तर पुरुषाच्या गुणावर अवलंबून असलेली जी कविता तिचें वर्गीकरण सात्त्विक, राजस आणि तामस या तीन प्रकारचें कां करूं नये ? प्रेमविषयक किंवा ऐतिहासिक काव्य करणारास जी मनोवृत्ति लागते ती राजस मनोवृत्ति होय. त्याप्रमाणेंच प्रेम किंवा भक्ति ही ज्या व्यक्तींविषयीं उत्पन्न होतात त्या व्यक्तीच जर हीन स्वरूपाच्या असल्या तर तदाश्रयी कवितादेखील हीन स्वरूपाची नाहीं काय ? अशी त्यांची विचारसरणी होती. रामदासांनीं काव्यामध्यें प्रासादिक काव्यास श्रेष्ठ ठरविलें आहे. त्याबरोबरच अनेक ठिकाणीं ईश्वरभक्तीचें जें कवित्व तेंच कवित्व या पदवीस लायक आहे असें वारंवार म्हटलें आहे. तर एकंदर ग्रंथकर्तृत्वासच रामदासांनीं तीच कसोटी लावली आहे.

जो पारमार्थिक नव्हे तो ग्रंथच नव्हे असें रामदास म्हणतात. हें मत जरासें आग्रही दिसतें. पण आपल्या शिष्यवर्गानें आपल्या कवित्वाचा श्रेष्ठ उपयोग कसा करावा यासंबंधानें ते विचार व्यक्त करीत होते, यासाठीं प्रस्तुत आग्रही मत व्यक्त करतांना रामदासांच्या मनांत काय विचार होते ( दशक ७ समास ९ ) हेंदेखील समजून घेतलें पाहिजे.

" बहुत प्रकारें पाहतां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता । परमार्थास तत्त्वतां । तारूंच कीं ।।२८।। इतर जे प्रापंचिक । हास्यविनोद नवरसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ।।२९।। जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे ।

भाक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ।।३०।। जो ऐकतां गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे । नातरी येकसरें वोळे । मन भगवंतीं ।। ३१ ।। जेणें होय उपरति । अवगुण पालटती । जेणें चुके अधोगति । त्या नांव ग्रंथ ।।३२।। जेणें धारिष्ट वाढे । जेणें परोपकार घडे । जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ।। ३३ ।। जेणें परत्र साधन । जेणें ग्रंथे होये ज्ञान । जेणें होइजे पावन । या नांव ग्रंथ ।।३४।। ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुति । जेथें नुपजे विरक्तिभक्ति । तो ग्रंथचि नव्हे ।। ३५ ।। "

रामदास येथें सार्वत्रिक स्वरूपाचें विधान करीत नसून आपल्या संप्रदायाच्याच दृष्टीनें करीत आहेत. लौकिक ग्रंथास तो ग्रंथच नव्हे असें जें ते बोलतात तीं केवळ आलंकारिक भाषा आहे.

देशाभिमान, ग्रामाभिमान, अपत्यप्रेम, पत्नीप्रेम इत्यादि भौतिक सुखांची अभिज्ञता, या गोष्टींनीं युक्त असलेलें काव्य आपणांस सुंदर वाटतें, तथापि या सर्व गोष्टींस प्राधान्य देणारें काव्य, ते गुण कवीच्या अंगीं बाणल्याशिवाय काव्यांत कसे उत्पन्न होणार ? पण या प्रकारच्या गुणांनीं युक्त पुरुष तोच रामदासांनीं खालच्या दर्जाचा ठरविला आहे.

" जो गुण येतां शरीरीं । वर्तणूक कैसा करी ।
सावध होऊनि चतुरीं । परिसावें ।। ७ ।।
मातापिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता ।
इतुकीयांची वाहे चिंता । तो रजो गुण ।। ९ ।।
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
दुसऱ्याचें अभिलाषावें । तो रजो गुण ।। १० ।।
मी तरणा मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर ।
मी सकळांमध्यें थोर । म्हणे तो रजो गुण ।। १४ ।।
माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव ।
ऐसी मनीं धरी हांव । तो रजो गुण ।। १५ ।।
बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता ।
लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ।। १८ ।।

अनुक्रम ............ दि:
क्रमांक ............ नों दि: ............



जिवलगांची खंती । जेणें काळें वाटे चित्तीं ।
तेणें काळें सीघ्रगती । रजोगुण झाला ॥ १९ ॥
संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल शेवट ।
मनास आठवे संकट । तो रजोगुण ॥ २० ॥
वैभव देखोनि दृष्टी । आवडी उपजली पोटीं ।
आशागुणें हिंपुटी । करी तो रजोगुण ॥ २१ ॥
जें जें दृष्टी पडिलें । तें तें मनें मागितलें ।
लभ्य नसतां दुःख झालें । तो रजोगुण ॥ २२ ॥ ”

या प्रकारें जें मन वर्णिलें आहे त्या प्रकारचें मनच काव्याभिरुचीचें आणि रसिक वर्गाचें आहे असें रामदास दाखवितात. या प्रकारच्या मनास तें मध्यम प्रकारचें मन समजतात. ते पुढें म्हणतात—

“ विनोदार्थीं भरे मन । शृंघारिक करी गायेन ।
रागरंग तान मान । तो रजोगुण ॥ २३ ॥
टवाळी ढवाळी निंदा । सांगणें घडे वेवादा ।
हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ॥ २५ ॥ ”
( दासबोध दशक २, समास ५ ).

भाविक अंतःकरण भाविक कविता वाचील; त्यास खाद्य पुरविणारा कवि भाविकच असला पाहिजे, त्याप्रमाणें ज्या प्रकारच्या तृष्णा काव्य पुरवितें तें काव्य करणारा कवि तदनुरूप मनोवृत्तींचा असला पाहिजे. शृंगारिक काव्य करणारा कवि ज्या प्रकारच्या व्यक्तींचे कोड पुरवितो त्या व्यक्ती—

“ आळस उठे प्रबळ । करमणुकीचे नाना खेळ ।
कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ॥ २६ ॥
कळावंत बहुरूपी । नटावलोकी साक्षपी ।
नाना खेळीं दान अर्पी । तो रजोगुण ॥ २७ ॥
देवकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळु ।
प्रपंचीं जो स्नेहाळु । तो रजोगुण ॥ २९ ॥

गोडग्रासीं आळकेपण । अत्यादरें पिंडपोषण ।
रजोगुणें उपोषण । केलें न वचे ॥ ३१ ॥
शृंगारिक तें आवडे । भक्ति वैराग्य नावडे ।
कळा लाघवीं पवाडे । तो रजोगुण ॥ ३२ ॥
नेणोनिया परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा ।
बलात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ॥ ३३ ॥ ”

या प्रकारच्याच असणार, तर त्या कवितेस तरी श्रेष्ठत्व कसें द्यावयाचें ? अशी विचारसरणी रामदासांची दिसते.

ज्या अर्थीं ज्या कवितेस आपण कविता म्हणतों तीस रामदास रजोगुणी कविता म्हणत व त्यांच्या दृष्टीनें जी सत्त्वगुणात्मक कविता तीच श्रेष्ठ होती, त्या अर्थीं त्या प्रकारच्या कवितेच्या कर्त्यासच रामदास कवीश्वर म्हणणार. रामदासांनीं लौकिक काव्यास लघुत्व दिलें आहे, तर त्यांच्या दृष्टीनें सात्त्विक काव्य कांहीं तरी उच्च प्रकारचें असलें पाहिजे. तेव्हां त्यांच्या दृष्टीचें, काव्य-शास्त्राच्या दृष्टीनें समर्थन कितपत होईल हें आपणांस पाहिलें पाहिजे व यासाठीं रामदासांची उच्च प्रकारच्या काव्याची कल्पना चांगली समजून घेतली पाहिजे. सात्त्विक कवीश्वराचें वर्णन ( दशक १, समास ६ ) रामदास कसें करतात तें पाहूं—

“ आतां वंदूं कवीश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर । नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥ १ ॥ कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हें नानाकळांचें जीवन । नाना शब्दांचें भुवन । यथार्थ होय ॥ २ ॥ कीं हें पुरुषार्थाचें वैभव । कीं हें जगदीश्वराचें महत्त्व । नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माणकवी ॥ ३ ॥ कीं हे शब्दरत्नांचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्तसरोवर । नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण झाले ॥ ४ ॥ अध्यात्म ग्रंथाची खाणी । कीं हे बोलके चिंतामणी । नाना कामधेनूची दुभणी । बोलली श्रोतियांसि ॥ ५ ॥ ”

काव्य आणि परमार्थ या गोष्टींचें एकीकरण होणार तर पारमार्थिक पुरुषास जें महत्त्व असतें तें कवीस येणार, आणि पारमार्थिक बाबतींत उच्च अशा व्यक्तींचें महत्त्व कवीला रामदासांनीं दिलें आहे. कवीच्या काव्यामुळें

ज्या क्रिया घडतात म्हणून रामदासांनीं सांगितलें आहे त्यांत ' रस तुंबळतो ' म्हणून रामदासांनीं सांगितलें आहे पण पुढें रामदास असेंहि सांगतात कीं, कवीच्या ग्रंथाचा अर्थ सांगावयास कवीच पाहिजे.

" आधींच कवीचा वाग्विलास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस । कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होय ।। १५ ।। "

कवींच्या योगानें देवांचें स्वरूप निश्चित होतें. प्राचीन ऋषींना मान्यता कवींनींच उत्पन्न केली आहे, एवढेंच नव्हे तर शास्त्र हें काव्यापासून भिन्न जरी असलें तरी त्यास शास्त्रत्व म्हणजे शास्त्रास लोकांनीं मानलें पाहिजे ही भावना कवींनींच दिली आहे. हें मत रामदासांनीं पुढील ओव्यांत सांगितलें आहे.

" कवी देवांचे रूपकर्ते । कवी ऋषींचे महत्त्व वर्णिते । नाना शास्त्रांचे सामर्थ्यते । कवी वाखाणिती ।। २० ।। "

म्हणजे कवींचा धंदा जाहिरात करण्याचा आहे हें रामदास कबूल करतात. पण रजोगुणी कवी हे राजे आणि स्त्रीसौंदर्य यांचीच जाहिरात करतात. रामदासांच्या मताप्रमाणें कवीस जाहिरात करण्याचा विषय त्याहून भिन्न व गंभीर आहे. निर्गुण देवास सगुणरूप देणें, राजांचें महत्त्व न वर्णितां ऋषींचें महत्त्व वर्णन करणें, एवढेंच नव्हे तर धर्मशास्त्राविषयीं लोकांत आदर उत्पन्न करून त्यांस चिरस्थायी करणें हीं मोठालीं कार्यें सात्त्विक कवींपुढें आहेत. हीं करावयास सात्त्विक भावनाप्रधान कवि पाहिजे, पैशाचा लोभी कवि असून उपयोगी नाहीं. कारण निर्गुण—निराकाराला सगुण—साकार केल्यानें तो पैसे थोडेच देणार ? भोंवतालचे राजे त्यांचें महत्त्व वर्णन केल्यानें पैसे देतील, पण ऋषी व तेदेखील मृत असलेले ! त्यांच्या महत्त्ववर्णनापासून द्रव्यदृष्टीनें कांहीं एक फायदा नाहीं. त्याचप्रमाणें शास्त्रांचें महत्त्व लोकांस पटविणारें काव्य केल्यानेंदेखील कवीचा आर्थिक दृष्ट्या कांहीं एक फायदा नाहीं. त्या अर्थीं या तिन्ही गंभीर गोष्टींविषयीं काव्यरचना करण्याला आणि त्यांचें महत्त्व समाजास पटवून द्यावयास द्रव्येच्छा नसलेला म्हणजे उच्च दर्जाचा कवि पाहिजे. रामदासांनीं शिवाजीची प्रशंसा केली नाहीं असें नाहीं; पण ती प्रशस्तिलेखक भाटाप्रमाणें केली नसून उत्तेजन देणाऱ्या वडील मनुष्याप्रमाणें केली आहे.

सगुण ईश्वराचें काव्य, त्याप्रमाणेंच प्राचीन ऋषींविषयीं अत्यादर, आणि धर्मशास्त्राप्रमाणें समाजशासनाचें महत्त्व या सर्व गोष्टी तर कवींनीं उत्पन्न केल्या. कवींमुळें समाजास स्थैर्य आहे; म्हणून रामदास पुढच्याच ओवींत म्हणतात—

" नसता कवींचा व्यापार। तरी कैंचा असता जगदुद्धार। म्हणौनि कवि हे आधार। सकळ सृष्टीशी ॥ २१ ॥

आतांपर्यंत झालेल्या रामदासांच्या काव्यविषयक सिद्धान्ताचें पुनरवलोकन करूं.

( १ ) काव्य सरळ असावें ( अलंकार किंवा व्यंग्यार्थास प्राधान्य इत्यादिकांनीं तें दुर्बोध करूं नये ).

( २ ) कवित्वाचे वाचकावर परिणाम जितके दृढ, दीर्घ, किंवा मोठ्या आवेगाचे होतील तितकें तें काव्य चांगलें.

( ३ ) काव्यामुळें वाचकाच्या मनावर परिणाम होण्यासाठीं तें उत्पन्न करणाऱ्या कवीच्याच मनावर परिणाम झालेला असला पाहिजे.

( ४ ) धीट, पाठ आणि प्रासादिक हे कवित्वाचे तीन प्रकार आहेत. कवीच्या मनावर गहनरस संस्कार न होतां कवीच आपल्या मनांत येईल तें बोलत असतो तेव्हां होणारें काव्य धीट वर्गांत मोडेल. पाठ म्हणजे कवीवर संस्कार कांहींच न होतां तो केवळ पूर्वींच्या कवींचे शब्द व भावदर्शक वर्णनें घेऊन कवित्व करतो तें कवित्व पाठ होय. व कवि जेव्हां अगदीं भावबद्ध होऊन जातो तेव्हां तें काव्य प्रासादिक होय. वर्गीकरण इंग्रजींत सांगावयाचें झाल्यास " इंप्रेशनिस्ट ", " इमिटेटिव्ह " आणि " इन्स्पायर्ड " असें रूपान्तर करावें लागेल.

( ५ ) भाव हाच ज्या अर्थीं काव्याचा प्रधान गुण आहे त्या अर्थीं जो भाव जितका उच्च प्रकारचा तितकी त्या भावाशीं संबद्ध कविता चांगली. भाव ईश्वराविषयींच चांगला, त्या अर्थीं भक्तिप्रधान व ईश्वरी प्रेरणा झालेली म्हणजे प्रासादिक कविता श्रेष्ठ होय.

( ६ ) जर कवीच्या कवित्वाचें महत्त्व भावनांच्या उत्पादनावर अवलंबून आहे, आणि ज्या अर्थी भावनांचें उत्पादन मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक प्रकृतीवर अवलंबून आहे त्या अर्थी सत्त्व, रज, तम हे जे तीन मनुष्य-प्रकृतीचे भेद आहेत त्यांस अनुसरून कवितादि व्यापारांचें उच्च नीचत्व ठरविणें योग्य आहे. ज्यास आपण संगीतादि गोष्टींची रसिकता म्हणतों ती आवड रजोगुणी आहे. सात्त्विक आवड निराळ्याच प्रकारची आहे. यासाठीं सात्त्विक आवडीची कविता श्रेष्ठ होय.

( ७ ) राजसगुणाची कविता राजेरजवाड्यांच्या आश्रयाची अपेक्षा करून उत्पन्न होते. व तीमुळें राजाश्रयनिरपेक्ष कवितेचे विषय जितके गंभीर असूं शकतात तितके राजाश्रयाची अपेक्षा करणारे विषय गंभीर असूं शकत नाहींत. वर्ण्य वस्तूचें गांभीर्य ही गोष्टदेखील कवितेचें महत्त्व ठरविते. व या दृष्टीनें ईश्वरास सरूपत्व देणारी आणि शास्त्राच्या अधिकारास जगांत मान्यता उत्पन्न करून देणारी कविता श्रेष्ठ प्रकारची होय.

येणेंप्रमाणें रामदासांच्या मताचें स्पष्टीकरण सरळपणें आणि विचारांतील अन्योन्याश्रय स्पष्ट करून मांडलें आहे. रामदासांच्या या सर्व मतांची चर्चा याच स्थळीं करीत नाहीं. हीं सर्व मतें अगदीं बरोबर आहेत असेंहि म्हणत नाहीं; तथापि या विचाराच्या मांडणींत साहित्यशास्त्रीय विचार पुढें सरकला आहे खास. रामदासांच्या मताविषयीं चर्चा पुढें उपसंहारांत केली आहे आणि ती रामदासांच्या तत्त्वांना कांहीं मर्यादा आहेत हें दाखविण्यासाठीं केली आहे.

रामदासांनीं हें जें साहित्यशास्त्र मांडलें आहे तें मांडण्यासाठीं त्यांनीं विचार केला तो कोणत्या वाङ्मयाचें अवलोकन करून केला हें विचार करण्यासारखें आहे. आपण आज जी अनेक कवींची कविता पाहतों ती प्रासादिक वर्गांत जाऊं पाहणाऱ्या संतकवींची आहे. रामदासांनीं ज्या कवींस हलक्या प्रतीचे कवी ठरविले ते कोणते ? त्या वेळचे धीट कवी कोठें आहेत आणि पाठ कवि कोठें आहेत ? तुकारामासारख्या अत्यंत प्रासादिक कवींच्या-पेक्षां खालच्या दर्जाचे जे कवी आहेत, उदाहरणार्थ, मोठ्या कवींच्या शिष्यवर्गांतले कवी झाले त्यांच्याविषयीं 'धीट', 'पाठ' हे शब्द

रामदासांनीं उच्चारिले काय ? उच्चारले असतील असें वाटत नाहीं. कारण जी पायां पडायला सामान्य मंडळी येत आणि 'गुरु प्रसादा'नें भीत भीत कविता करीत, त्यांना कमी ठरविण्याचा प्रयत्न कशास पाहिजे ? धीट, पाठ, हें जें वर्गीकरण रामदासांनीं केलें तें समकालीन स्वत:स मोठे समजणारे जे दुसरे कवी असतील त्यांसच उद्देशून रामदासांनीं केलें आहे. धीट–पाठ–प्रासादिकांचें वर्गीकरण समजण्यासाठीं भोंवतालची एकंदर काव्य-सृष्टि समजून घेतली पाहिजे. तुकारामदेखील भोंवतालच्या प्रासादिक नसलेल्या कवींसंबंधानें ओरडतच होता. 'घरोघरीं झाले कवी। नेणें प्रसादाची चवी।' म्हणून ज्या कवींबद्दल तो ओरडत होता ते कवी तुकारामाच्या दृष्टीनें 'धीटपाठ'च असले पाहिजेत. परिस्थिति नीट समजून घेण्यासाठीं संतकवींच्या साहित्यशास्त्राची 'थिअरी' ज्या काळांत मांडली गेली त्या काळाचें एकंदर वाङ्मयविषयक वातावरण समजून घेतलें पाहिजे.

० ० ०

## ११ : शिवकालीन वाङ्मय आणि तत्संबद्ध वातावरण

महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेचा काल हा वाङ्मयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा काल होता पण याचें कारण राजसत्ता होती असें म्हणतां येत नाहीं. तुकाराम हा संतकवींतील श्रेष्ठ कवि खरा, पण त्याचें काव्य राज्य असतें अगर नसतें तरी तसेंच चाललें असतें. रामदासाची गोष्ट तशीच आहे. वामनपंडित-देखील राजाश्रयाचा कवि नाहीं. शिवाजीनें ज्या प्रकारच्या काव्यास आश्रय दिला तें काव्य संस्कृत किंवा व्रज भाषेंतील होय. मराठी कवींपैकीं शाहीर-वर्गास कांहीं प्राप्ति या वाढत्या राजसत्तेमुळें झाली असली पाहिजे. एवंच राजे लोक जरी वाङ्मयास उत्तेजन देणारे असले तरी ते काव्य म्हणजे आत्मप्रशंसेचें एक अंग या दृष्टीनेंच काव्याकडे पहात. रजोगुणी काव्याकडे संतमंडळी तुच्छतेनें पहात होती आणि आपलें उच्चत्व त्यांस भासत होतें यांत शंका नाहीं. त्यांना मराठी राज्य स्थापन होत आहे याबद्दल आनंद होत नव्हता असें नाहीं, आनंद होत होताच. व हा आनंद तुकारामानें आणि रामदासानें व्यक्त केला आहे. पण या संतकवींस राजाचे आश्रित अगर भाट बनावयाचें नव्हतें. राजाला आवडणारें काव्य करणारा वर्ग निर्माण झाला पण मराठी वाङ्मयावर संतकवींनीं जी छाप पाडली होती तीमुळें राजप्रशस्त्या लिहिण्याकडे मराठी भाषेचा उपयोग केला गेला नाहीं. ज्याप्रमाणें आज प्रणयाचीं वाक्यें बोलणें मराठींत अजून शोभेनासें झालें नाहीं त्याप्रमाणें मराठी ही राजप्रशस्तीची भाषा होऊं शकली नाहीं.

जरी सूतवाङ्मय मराठींत उत्पन्न व्हावयास अडचण भासत होती तरी ती उणींव संस्कृत आणि हिंदी कवींनीं भरून काढली. या कवींनीं रामदास वगैरे व्यक्तींशीं आपला सारखेपणा दाखविण्याचा प्रयत्नच केला नाहीं. राजाचे जे गुरु ते आपले गुरु; आपणांत आणि संतकवींत अंतर पुष्कळ आहे अशीच त्यांची भावना होती.

ग्रंथाची उत्पत्ति आणि भोंवतालच्या जनतेची बौद्धिक स्थिति यांत अन्योन्याश्रयाचा निकट संबंध आहे. भोंवतालीं अभिज्ञ जनता असल्याशिवाय ग्रंथोत्पत्तीच व्हावयाची नाहीं. शिवाजी महाराजांच्या कालामध्यें जितकी उच्च प्रकारची ग्रंथोत्पत्ति झाली तितकी केव्हांच झाली नाहीं. सुंदर, गोड व सोप्या ओंव्या लिहिणाऱ्या मुक्तेश्वराच्या महाभारतापासून थोडीशी तरी डोकेफोड करावयास लागणारे यथार्थदीपिकेसारखे ग्रंथ याच काळांत झाले. त्याचप्रमाणें याच काळांत बखरीवाङ्मय तयार होऊं लागलें, ऐतिहासिक पोवाडे तयार झाले, आणि श्रृंगारिक संस्कृत काव्याचीं भाषान्तरें आणि स्वतंत्र श्रृंगारिक कविता यांच्याकडे लोकप्रवृत्ति झाली. श्रृंगारिक काव्यांत तीन प्रकार दिसून येतात; पहिला प्रकार जो भाषान्तर त्यांत चौरपंचाशिकेचें भाषान्तर येतें. या स्वतंत्र श्रृंगारिक काव्यामध्येंदेखील दोन प्रकार दिसून येतात; कृष्णाची लीला वर्णन करण्याचें निमित्त करून श्रृंगारिक काव्यें करणें, व मोठ्याशा व्यक्तीशीं संबंध न आणतां स्वतःचेच भाव व्यक्त करणें. दुसऱ्या प्रकारच्या कवींमध्यें लोलिंबराजाचा उल्लेख करतां येईल. याशिवाय अनेक विषयांचें विवेचन करणारे दासबोधासारखे ग्रंथ तयार झाले. या कालाइतका वाङ्मयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रस्तुत कालाखेरीज अन्य काल नाहीं. ज्या कालांत मोरोपंत आणि महिपती झाले ते कालदेखील शिवकालाच्या मानानें कमी महत्त्वाचे दिसतात. तर या कालाच्या एकंदर वाङ्मयाच्या उत्पादनाचें व लोकाभिरुचीचें साकल्यानें निरीक्षण करण्याचा प्रयत्न करूं. हें निरीक्षण करावयाचें म्हणजे त्यांत जनतेच्या अनेक अंगांचें निरीक्षण करावें लागेल. साधुसंतांचा वर्ग व त्याचे चहाते, वामन-विठ्ठलासारखे प्रतिष्ठित कवी आणि त्यांचे चहाते; राजदरबार, शेतकरीवर्ग यांची वाङ्मयासंबंधानें मागणी व पुरवठा या सर्व गोष्टींचा स्थूल अवलोक घेतला पाहिजे.

प्रथमतः तत्कालीन संतकवींच्या एकंदर वाङ्मयाचें विहंगमावलोकन करूं.

मुक्तेश्वरः— ( शके १५२१-१५७१ ). याचे ग्रंथ महाभारताचीं पांच पर्वें, रामायण, कांहीं त्रुटित आख्यानें व किरकोळ ओंवीबद्ध स्तोत्रें व अभंग. यानें महाभारताचीं आणखी कांहीं पर्वें लिहिलीं असण्याचा संभव आहे. पण तीं सांपडलीं नाहींत. निवासस्थान पैठण, सोलापूर जिल्ह्यांत सोनारी गांवीं जोसपण व शेवटीं तेरवाड येथें मृत्यु.

रमावल्लभदासः—( शके १५३२–मृत्यु ? )—ग्रंथ ( १ ) दशकनिर्धार यांत भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारानें कृष्णजन्मकथा सांगितली आहे. ( २ ) वाक्यवृत्ति ही श्रीशंकराचार्यांच्या बृहद्वाक्यवृत्ति या ग्रंथावर विस्तृत टीका आहे. ( ३ ) चमत्कारी नांवाची गीतेवर टीका. निवासस्थान कधीं वाई, कधीं दाभोळ मठ व कारवार जिल्ह्यांत चंदावर येथें. शिष्यपरंपरा गोमंतकांत आहे.

शिवकल्याण:—भागवत दशमस्कंधावर विस्तृत टीका, जवळ जवळ एक लक्ष. अमृतानुभवावर नित्यानंददीपिका. निवासस्थान जोगाईचें आंबें ऊर्फ मोमिनाबाद. मुक्ताबाईच्या शिष्यपरंपरेंतील. टीका पंढरपूर येथें लिहिली.

लोलिंबराजः—जुन्नर येथील राहणारा. साधू म्हणून उत्तरकालीन उद्धवचिद्घन, शिवराम इत्यादिकांनीं त्यास नमन केलें आहे. ग्रंथ ( १ ) भागवताच्या दशमस्कंधावर टीका, ( २ ) वैद्यजीवन नांवाचा संस्कृत व मराठी ग्रंथ, ( ३ ) लोलिंबराज चरित्र, शृंगारिक, मराठींत आत्मचरित्रात्मक लौकिक असें पहिलेंच काव्य. हें फार अश्लील आहे म्हणून भावे बोभाटा करतात. लोलिंबानें एका यवनीबरोबर लग्न केलें होतें. तिला रत्नकला असें नांव दिलें होतें. ( ४ ) वरील ग्रंथांशिवाय याचीं पदें वगैरे पुष्कळच आहेत.

शामाराध्य:—( १ ) ग्रंथ ज्ञानेश्वरींतील कठिण शब्दांचा अर्थ सांगणारी ‘ पद्यमाला ’, ( २ ) भारत, ( ३ ) भागवत, ( ४ ) रामायण, यांतील अनेक आख्यानें, ( ५ ) भागवताच्या दुसऱ्या व दहाव्या स्कंधावरील टीका, ( ६ ) आश्वलायन प्रश्नमाला, ( ७ ) नित्यानित्यविचार, ( ८ ) ज्ञानोदयसिंधु. यांपैकीं ६, ७, ८ हे ग्रंथ वेदान्तावर आहेत. ( ९ ) गीतेवर टीका, ( १० ) कांहीं उपनिषदांवर भाष्य, ( ११ ) शिवाय पदें, स्तोत्रें, अभंगरचना वगैरे.

तुकारामः—देहू येथील राहणारा. याचे अभंग सुप्रसिद्ध आहेत.

बोधलेबुवा:—धामणगांवचे राहणारे.

निंबराजः—हे दैठणचे राहणारे. शके १६०० मध्यें दैठण येथें समाधिस्थ झाले. ग्रंथ –( १ ) ज्ञानबोध; यांत निंबराज व त्यांचे गुरु

( एकनाथशिष्य नरहरि ) यांचा संवाद आहे. ( २ ) जपमाळ, यांत संतचरित्रें आहेत.

मोरया गोसावीः—राहणारे चिंचवडचे. ग्रंथ– गणेशपुराण नांवाचा मोठा ग्रंथ लिहिला आहे. शिवाय अनेक स्फुटपद्यें आहेत.

गणेशनाथः—राहणार सारशें येथील. अनेक पदें व अभंग रचिले.

त्र्यंबकः—कांहीं पदें व अभंग आहेत.

त्र्यंबकसुतः—किरकोळ.

विठ्ठलदासः—स्फुट पदें व अभंग.

धोंगडाः—काव्य उपलब्ध नाहीं.

शिवदास कुंडेश व पणाभीविश्वनाथः—कांहीं कविता संताजीच्या वहींत व इतर बाडांत आहे.

सेना न्हावीः—काल अनिश्चित. थोडे अभंग उपलब्ध आहेत.

शेख महंमदः— श्रीगोंदें येथील. स्फुट अभंग पुष्कळच आहेत.

रामदासः—( १५३०–१६०३ ) यांचे दासबोध, मनास बोध इत्यादि ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. राहणें चाफळ मठांत. जन्म जांब येथें.

गंगाधरः—रामदासांचे वडील बंधु. ग्रंथ–( १ ) भक्तिरहस्य, ( २ ) सुगमोपाय, शिवाय स्फुट प्रकरणें, अभंग. मृत्युकाळ शके १५९९.

जयरामस्वामीः—वडगांव मठाचे अधिकारी. ग्रंथ ( १ ) दशमस्कंध, ( २ ) रुक्मिणीस्वयंवर.

रंगनाथस्वामीः—निगडी येथील मठाधिपति. ग्रंथ– ( १ ) गजेंद्रमोक्ष, ( २ ) गुरुगीता, ( ३ ) सुदामचरित्र, ( ४ ) शुकरंभासंवाद, ( ५ ) पंचीकरण, ( ६ ) भानुदासचरित्र, ( ७ ) योगवासिष्ठसार.

आनंदमूर्ति ब्रह्मनाळकरः—कांहीं पदें.

केशवस्वामी भागानगरकरः—एकादशीचरित्र व कांहीं पदें.

केशवस्वामी ( मारकीनाथशिष्य ): — गर्भगीता.

वेणाबाईः—रामदासांची शिष्या. शके १५७७ पासून मिरजेस मठ. ग्रंथ– सीतास्वयंवर व इतर किरकोळ.

बयाबाई रामदासी:—किरकोळ श्लोक, आर्या वगैरे.

अंबाबाई:—रामदासशिष्या. कांहीं पदें.

बहिणाबाई:—तुकारामशिष्या. आत्मचरित्र, किरकोळ पद्यें.

प्रेमाबाई:—तुकारामशिष्या. कित्येक पद्यें.

वामन पंडित:—मूळ विजापूरचा. प्रथम फारशी भाषेंत प्रवीण झाला. मागाहून पंडित बनला. काशीस अध्ययन. प्रथम द्वैताभिमानी; मागाहून अद्वैती. मलय पर्वताकडे त्यास गुरूपदेश झाला. तो निगमसार ग्रंथांत ( शके १५९५ ) त्यानेंच वर्णिला आहे. ग्रंथ, यथार्थदीपिका, निगमसार, कर्मतत्त्व समश्लोकी, सिद्धान्तविजय व अनुभूतिलेश, राधाविलास, राधाभुजंग वगैरे. वामन पंडिताच्या दोन समाधी आहेत; एक वारणातीरीं शेगांव कोरेगांव येथें व दुसरी वाईजवळ कृष्णातीरीं भोगांव येथें. एकाच वामनाच्या दोन समाधी असणें शक्य आहे असें भावे समजतात ( महाराष्ट्र सारस्वत, पृ. २६५ ).

नागेश:—हा अहमदनगराजवळील भिंगार येथें राहणारा. ग्रंथ—चंद्रावलीवर्णन.

विठ्ठल बीडकर:—बीडजवळील गौरीपूर येथें राहणारा. काव्यग्रंथ पुष्कळ. चित्रबंध अनेक ( काव्यसंग्रहांत छापलेले आहेत ). रुक्मिणी स्वयंवर ( शके १५९६ ); पांचालीस्तवन ( १५९६ ), सीतास्वयंवर ( १५९९ ), रसमंजरी ( १६०१ ), द्रौपदीवस्त्रहरण ( १६०२ ), विद्वज्जीवन व बिल्हण चरित्र.

कल्याण:—हा रामदासशिष्य. बाभुळगांवच्या कृष्णाजीपंत नांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा. मूळ नांव अंबाजी. काळ १५४० ते १६३६. कांहीं अभंग व पदें.

उद्धव:—हा टांकळीजवळील राहणारा. काळ १५४६ ते १६३५. किरकोळ अभंग व पदें.

देवदास ( रामदासशिष्य ):—दादेगांव येथील मठाचा अधिकारी. श्लोक, अभंग, अष्टकें वगैरे.

निरंजन ( समर्थशिष्य ):—गणेशगीता, मननमाला.

निरंजन ( शिवरामशिष्य ):—ग्रंथ पुष्कळ आहेत म्हणतात.

बाळकराम ( समर्थशिष्य ):—ग्रंथ–दामाजीची रसद, गजगौरी वोवसा.

सीताराम ( समर्थशिष्य ):—अन्वयव्यतिरेक ?

रामकविः—प्रदोषमाहात्म्य ( शके १५६७ ).

राघवः—संदेशहरण ( शके १६११ ).

शिवरामस्वामी ( पूर्णानंदशिष्य )—अत्यंत प्रचंड ग्रंथकार. याचे पन्नासाच्या वर ग्रंथ आहेत. माहाराष्ट्र सारस्वताच्या सूचींत याच्या ग्रंथांची यादी आहे. याच्या चरित्रावर एक लेख १८९९ च्या मे महिन्यांत वऱ्हाडसमाचारांत मीं प्रसिद्ध केला तोच शिवरामस्वामीवरील पहिला लेख असावा. जन्म शके १५५४, मृत्यु शके १६११.

मुचकुंदः—भार्गवचरित्र.

कोकीळः—?

भीमकविः—रामदासांचा तंजावरकडील प्रेषित. ग्रंथ– रामदासचरित्र व इतर कांहीं पदें.

अनंतस्वामीः—रामदासांचे तंजावरकडील शिष्य.

राघवस्वामीः—रामदासांचे तंजावरकडील शिष्य.

तुकाब्रह्मानंद :— शिवाजीचा पोतदार. पुढें संन्यासी. ब्रह्मानंदशिष्य. ग्रंथ– भर्तृहरीच्या शतकत्रयावर समश्लोकी टीका. शांकरभाष्य, प्रणवाष्टक, नाटक रामायण, गीतगोविंद समश्लोकी.

गोपाळनाथ मळगांवकर :— बोधलेबोवांचा शिष्य. दक्षिणात्य गौड ब्राह्मण. सावंतवाडीचा राहणारा. ग्रंथ– स्कंदपुराणान्तर्गत पांडुरंगमाहात्म्य ( ओंवी-संख्या सुमारें ६०० ). प्रकाशबोध ( ओंवी-संख्या २०२ ). बालक्रीडा ( ओंवी-संख्या २५० ). शिवाय पदें, अभंग व भूपाळ्या.

अवचितसुत काशी :— हा कवि भारस गांवचा देशमुख, शिवाजीच्या उत्तरकालांतील व संभाजीच्या कालांतील. हा मानभावपंथी होता. आडनांव सोळंकी. ग्रंथ– द्रौपदीस्वयंवर.

चंद्रात्मज रुद्र :— ग्रंथ– उद्योगपर्व व भीष्मपर्व. हा ज्ञानेश्वरबंधुभगिनी-चतुष्टय आणि मुक्तेश्वर यांचा उल्लेख करतो. कानडी भाषेंतील कुमारव्यास

कवीचें महाभारत आहे त्यावरून आपण ग्रंथ लिहिल्याचें सांगतो (१६०४). स्थल ठाऊक नाहीं. आपली कुलदेवता कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावर असलेला महादेव आहे असें सांगतो.

निळोबा :— तुकारामाचा टाळकरी. अभंग पुष्कळच आहेत.

नाथदास ऊर्फ हरिदास :— मनश्चंद्रबोध आणि विक्रमचारित्र. वास्तव्य-स्थान माहीत नाहीं. भाषा शिवकालीन स्पष्ट आहे. मनश्चंद्रबोध यांत मनास कायानगरीचा राजा कल्पून त्यावर एक रूपकातिशयोक्ति ( allegory ) लिहिली आहे. ओंवी-संख्या ९२४. " रामचंद्र नाहीं घरीं काय मी करूं " हें याचेंच पद आहे. " नलगे करणेंचि घडामोडी अर्थीं अक्षरें उघडीं " ( निळोबा, तुकाराम स्तुतींत ).

दिनकरगोसावी रामदासी:—स्वानुभवदिनकर ( ओंवी-संख्या६७५० ), स्फुट श्लोक ६२५०, व अभंग, पदें मिळून ७५०. भागवत सांपडलें नाहीं. कांहीं हिंदी कविताहि प्रसिद्ध झाली आहे. भिंगार येथील कोनेरपाठकांच्या वंशांतील. रामदासांचे अनुयायी; मठ तासगांव येथें. यांत दासबोधांतील अनेक विचारांची पुनरावृत्ति आहे असें रा. शंकरराव देव, रामदास व रामदासी मासिकांत रामदासाचाच दासबोध आहे असें सिद्ध करतांना दाखवितात.

तुकासुंदरदास :—याचा नासिकेतोपाख्यान नांवाचा ग्रंथ आहे. रचना-काल शके १५९९.

## महानुभाव वाङ्मय

शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकाच्या शेवटीं महानुभाव पंथांत अनेक मोठाले ग्रंथ झाले आहेत. त्यांत ' लीलानिधि ' हा ग्रंथ फार महत्त्वाचा समजला जातो. यांत ग्रंथसमाप्तीचा काल शके १५९५ दिला आहे.

## पवाडे करणारे शाहीर

अग्निनदास :—अफजलखान वधाचा पवाडा करणारा शाहीर.

तुळशीदास :—तानाजीनें सिंहगड घेतल्याचें वर्णन लिहिणारा शाहीर.

यमाजी :—बाजी फसलकराच्या पदरचा शाहीर.

आकवर्थ व शाळिग्राम यांच्या संग्रहांत हे पोवाडे सांपडतील.

## नाटककार

शिवकालीं नाटक कितपत होतें हें समजत नाहीं. लक्ष्मीनारायण कल्याण हें तंजावरकडे मराठी नाटक शिवाजीच्या मृत्यूनंतर झालेलें आहे. याची माहिती मागें ग्रंथमालेंत आलीच आहे. या वेळेस संस्कृत नाटकें मात्र सपाटून झालीं आहेत.

## ख्रिस्ती वाङ्मय

शिवकालापूर्वींच फादर स्टीफन्सचा ख्रिस्तपुराण हा ग्रंथ तयार झाला (इ. स. १६१४). 'फ्रान्सिवास द गमारिस' याचा शुभवर्तमानांतील कथाभाग घेऊन लिहिलेला ग्रंथ. ग्रंथकार शिवकालीन असावा. याच्या अगोदर 'मिनवेल डी आलेमडा' यानें 'सेंट लोरन्स' या ख्रिस्ती साधूचें गद्य चरित्र लिहिलें आहे. तें शिवाजीच्या काळांतच (इ. स. १६५८) गोंव्यांत छापलें गेलें.

शिवकालीन महाराष्ट्रीय बौद्धिक आणि काव्याभिरुचीचें वातावरण काय होतें हें अजमावण्यासाठीं वाङ्मय तपासतांना महाराष्ट्राशीं संबद्ध अशा हिंदी व संस्कृत वाङ्मयाचा हिशेब घेतला पाहिजे. त्याच्या योगानें महाराष्ट्रांतील बौद्धिक चलनवलनाचे कांहीं तरी धागे कळून येतील.

शिवाजीच्या प्रेरणेनें अनेक संस्कृत ग्रंथ झाले. त्यांत खालील ग्रंथ उल्लेखिले पाहिजेत.

## संस्कृत कवी

जयराम :—पर्णालाख्यान, राधामाधवविलासचंपू.

परमानंद :—शिवभारत.

रघुनाथ हणमंते :—राजव्यवहार कोश.

याशिवाय जो एक ज्योतिषावरील ग्रंथ शिवप्रेरणेनें झाला त्याचा उल्लेख पुढें येईल.

शिवकाल हा एकंदर विद्येच्या विकासाच्या दृष्टीनें किती महत्त्वाचा होता याची कल्पना तत्कालीन संस्कृत भाषेंतील काव्य आणि काव्येतर वाङ्मय लक्षांत घेतल्याखेरीज होणार नाहीं. जे मराठी ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांत संस्कृत ग्रंथरचना करणारे आहेतच. यांत लोलिंबराजाचा

उल्लेख करतां येईल. त्याचें वैद्यजीवन दोन्ही भाषांत आहे. त्याचा हरिविलास ग्रंथ हा एक आणखी संस्कृत ग्रंथ होय. समर्थांच्या संप्रदायांत खुद्द समर्थमेरु कवि, गिरधर रामदासी, जयरामस्वामी हे मराठी ग्रंथांचे त्याचप्रमाणें संस्कृत ग्रंथांचे कर्ते होते. संस्कृतमध्यें उच्च धार्मिक भावनांचे ग्रंथ झाले नाहींत, ते प्राकृतमध्यें झाले, पण ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रावरील ग्रंथ हे संस्कृतमध्यें झाले आहेत. ज्योतिष ग्रंथास खुद्द शिवाजी महाराजांनीं उत्तेजन दिलें आहे. या कालांत संस्कृत नाट्य वाङ्मय वाढलेंच पण त्यावरदेखील प्राकृत ग्रंथकारांनीं जें वातावरण उत्पन्न केलें त्याचा परिणाम दिसून येत आहे. शंकरभक्ति, रामभक्ति व कृष्णभक्ति यांचीं साधनें म्हणून हे ग्रंथ झाले असावेत हें उघड दिसत आहे. व या वेळेस जीं देशी भाषांतून जागोजाग नाटकें अगर ललितें होत त्यांचा परिणाम संस्कृत नाट्य वाङ्मयावर झाला यांत शंका नाहीं. एवंच काव्य आणि नाटक यांच्या बाबतींत संस्कृत वाङ्मय देशी वाङ्मयाचें निर्णायक न होतां देशी धार्मिक वाङ्मय आणि जानपद कला यांचा परिणाम संस्कृत वाङ्मयावर म्हणजे नागरिक वाङ्मयावर होऊं लागला होता, देशी वाङ्मयाचें प्राबल्य त्या वेळच्या संस्कृत ग्रंथकारांस भासूं लागलें होतें हें स्पष्ट दिसतें. मराठी कवींचा—त्यांस माकडें म्हणून—जो जयरामानें उपहास केला आहे तो उपहास देशी वाङ्मयाचें वाढतें बल दाखवितो. या वेळच्या संस्कृत ग्रंथकारांचीं नांवें व त्यांच्या ग्रंथांविषयीं माहिती येणेंप्रमाणें देतां येईल—

**चंपूकार**

नीलकंठ दीक्षितः—'नीलकंठविजयचंपू' (इ. स. १६३६), नलचरित्र.

**नाटककार**

महादेव :— 'अद्भुतदर्पण नाटक' यांत रामकथा आहे (इ. स. १६९३ पूर्वीं).

अतिरात्र याजिन :—हा नीलकंठ दीक्षित (वरील) याचा धाकटा भाऊ. 'कुशकुमुद्वतीय' नाटक, रामाचा पुत्र कुश व त्याची बायको कुमुद्वती यांच्या संबंधींचें.

व्यंकट कृष्ण दीक्षित :—'कुशलवविजय' नाटक (इ. स. १६९३ पूर्वीं).

शेषचिंतामणी :—‘ रुक्मिणीहरण ’ नाटक ( इ. स. १६७५ पूर्वी ).

सामराज दीक्षित :— ‘ श्रीरामचरित ’ नाटक ( इ. स. १६८१ ); सुदामचरित्र; बुंदेल राजपुत्र आनंदराय याच्या सांगण्यावरून. यानेंच धूर्त नर्तक प्रहसन लिहिलें आहे.

जगज्जोतिर्मल्ल :—नेपाळचा राजा; ‘ हरगौरीविवाह ’ ( इ. स. १६२९ ); कुवलयाश्व नाटक.

सिद्धिनरसिंह :— नेपाळचा राजा ‘ हरिश्चंद्रनृत्य नाटक ’ ( इ. स. १६२०–१६५७ ).

शुक्लेश्वरनाथ :— प्रबोधोदय नाटक. शुक्लेश्वर हा सगर राजघराण्यांतील भगवंतरायाचा आश्रित असून १७ व्या शतकांत झाला.

आनंदराय मखिन् :— तंजावरच्या शहाजी ( १६८७ ते १७११ ) चा आश्रित. याचें विद्यापरिणयन नाटक आहे ( कांहींच्या मतें हें वेद नांवाच्या दुसऱ्या एका कवीचें आहे ). जीवनंदन हेंहि एक नाटक यानें केलें आहे.

तार्किक सिंह :— संकल्पसूर्योदय नाटक हा आनंदराय मखिन्च्या पूर्वींचा. या नाटकांत रामानुजाचीं तत्त्वें प्रतिपादन केलीं आहेत. दुसरें नाटक रुक्मिणीपरिणय.

रामभद्र दीक्षित :— ( इ. स. १६९३ ) यानें व्याकरण, कोश, काव्यें, नाटकें वगैरे पुष्कळ लिहिलीं. जानकीपरिणय हें नाटक याचें प्रसिद्ध आहे. शृंगारतिलक भाण.

राजचूडामणि दीक्षित :— आनंदराघव आणि रुक्मिणीकल्याण नाटक.

सरस्वतीनिवास :— रुक्मिणी नाटक ( १७ वें शतक ).

वरदकवि :— रुक्मिणीपरिणय नाटक ( १७ वें शतक ).

शहाजी राजा :—तंजावरकर ( इ. स. १६८७–१७११ ) चंद्रशेखरविलास नाटक.

रामचंद्र सूसुनुवंशमणि :— गीतदिगंबर नाटक. ( इ. स. १६५५ ) हें नेपालेश्वर राजा प्रतापमल्ल याच्या तुलादानाच्या वेळीं लिहिलें.

अपय्या दीक्षित :— ( १६ व्या शतकाचा शेवट ) वसुमतिचित्रसेनविलास नाटक.

मैथिलकृष्णदत्त :— ( १७ वें शतक ) पुरंजनचरित, सान्द्रकुतूहल, कुवलयाश्वीय नाटकें.

रामभट्ट :— ( १७ वें शतक ) मदालसा नाटक.

रामभद्र :— ( इ. स. १६६५ ) ललितकुवलयाश्व नाटक.

जीवविबुद्ध :— ( इ. स. १६६५ ) नलानंद नाटक.

पेरिअप्पा :— ( इ. स. १६९३ ) शृंगारमंजरी शाहराजूज नाटक.

विश्वनाथभट्ट :— महादेवपुत्र चित्तपावन राणदाशृंगारवाटिका अथवा वापिका नाटिका ( १७ व्या शतकांतील ).

कृष्णदत्त मैथिल :— सान्द्रकुतूहल पुरंजन नाटक ( १७ वें शतक ).

अम्मालाचार्य :— वसंततिलकभाण, चोलभाण ( इ. स. १६९० चा सुमार ).

लक्ष्मीनारायण कल्याण :— ( इ. स. १७०० ) या सुमाराचें तंजावरकर शहाजी राजाच्या वेळचें. हें मराठी आहे.

वरील संस्कृत नाट्यकारांत महाराष्ट्रीय नाटककार किती होते हें नक्की सांगतां येत नाहीं. हें संस्कृत नाटक वाङ्मय राजाश्रयानेंच झालेलें असावें.

**वैद्यक**

लोलिंबराज :— हरिविलास, वैद्यजीवन ( इ. स. १६३३ ).

**उपासनाविषयक**

मेरुकवि :— ( समर्थांचा शिष्य ) श्रीरामपंचरत्न.

गिरिधर रामदासी :— समर्थस्तोत्रें व इतर पदें वगैरे.

**वेदान्त**

सहजानंद :— सहजानंदी.

जयरामस्वामी :— प्रबोधसुधाकर.

**धर्मशास्त्रीय**

गागाभट्ट :— कायस्थधर्मप्रदीप, शिवराजप्रशस्ति.

**शिवकालीन संस्कृत कवी व काव्यें**

वामनपंडित :— अनुभूतिलेश, सिद्धान्तविवेक.

रामदास :— पंचाध्यायी दासगीता.

शिवकल्याण :— अपरोक्षानुभूतीविवरण ( इ. स. १६३५ सुमार ).

शिवरामस्वामी कल्याणीकर :— मनीषापंचक व कांहीं स्तोत्रें.

आनंदतनय :— पदें.

जयराम पिंड्ये :— राधामाधवविलासचंपू, पर्णाल पर्वतग्रहणाख्यान.

परमानंद नेवासेकर :— शिवभारत.

## ज्योतिष

अनंतकेशव :— लघुजातकटीका.

रामभट अनंत :— करणग्रंथ.

गणेश केशव — ग्रंथशिरोमणिप्रकाश.

मल्लारि दिवाकर :— ग्रहलाघवटीका.

गोविंद नीलकंठ :— पीयूषधारा.

रंगनाथ बल्लाळ — गूढार्थप्रकाशिका.

विष्णु दिवाकर :— करणग्रंथ.

नृसिंह कृष्ण :— सौरभाष्य.

विश्वनाथ दिवाकर :— सूर्यसिद्धान्त टीका, सोमसिद्धान्त टीका.

दिवाकर नरसिंह :— प्रौढमनोरमा.

माधव गोविंद :— नीलकंठी टीका.

मुनीश्वर रंगनाथ :— लीलावती निवृत्ति.

नीत्यानंद देवदत्त :— सिद्धान्तराज.

रंगनाथ नरसिंह :— सिद्धान्तचूडामणि ( १७ वें शतक ).

महादेवात्मज कृष्ण :— राइणार प्रान्त मावळ ( शक १५७५ ). शिवाजीच्या सांगण्यावरून– ग्रहकौतुक, ग्रहलाघव व स्वतःचे वेध यांच्या आधारें करणकौस्तुभ ग्रंथ केला.

कमलाकर नरसिंह :— सिद्धान्त तत्त्वविवेक ( १७ वें शतक ).

रत्नकंठ शंकर :— पंचांगकौतुक ( १७ वें शतक ).

मल्लयपुत्र विल्हण :— वार्षिक तंत्र ( १७ वें शतक .

### संगीत

दामोदर मिश्र :— संगीतदर्पण ( इ. स. १९२५ ).

जगन्नाथकवि :— ( १९२५ ).

अहोबल :— संगीत पारिजात. ( १७ वें शतक ).

### व्याकरण

भट्टोजी दीक्षित :— ( इ. स. १६०० ). सिद्धान्तकौमुदी.

कोंडभट्ट :— ( भट्टोजीचा पुतण्या ) वाक्यरचना.

### कोश

रघुनाथ पंडित :— राजव्यवहार कोश.

शिवकाळीं इतकें वाङ्मय निर्माण होत होतें आणि अगोदरचें दरबारी मराठी फारसीमय होतें तर या दोहोंमध्यें जो झगडा चालला होता त्याचें दृश्य स्वरूप कोशांत आलें. या वेळेस उच्च व्यवहारासाठीं संस्कृत व सामान्य व्यवहारासाठीं प्राकृत हें हिंदुस्थानांत चोहोंकडेच असल्यामुळें ज्या मुसलमानी अमलाखालीं नव्या गोष्टी आल्या त्यांवर वाङ्मय उत्पन्न व्हावयाचें तें संस्कृत भाषेशींच संबद्ध करावें लागलें. दिल्ली दरबारांत संस्कृत फारसी कोश झाले त्याप्रमाणें मराठी दरबारांतदेखील झाले, पण त्यांचे हेतू भिन्न होते. फारसी प्रकाश या नांवाचे दोन कोश उत्तरेकडे अकबर व शहाजहान यांच्या कारकीर्दींत झाले. व शहाजहानकालीन क्षेमेंद्राचा लोकप्रकाश हा एक कोश झाला. त्यांचा हेतु फारशीचा परिचय करून देण्याचा होता तर दाक्षिणात्य कोशाचा हेतु संस्कृत व मराठी भाषांचें महत्त्व स्थापनेचा होता. मराठींत जी कोशरचना झाली तीवरून त्या काळची स्थिति व कोशाचे हेतू हीं दोन्ही व्यक्त होतात.

( १ ) जुनी मराठी समजेनाशी झाली होती म्हणून ज्ञानेश्वरींतील शब्द देणारा शामाराध्याचा पद्यमाला हा मागें उल्लेखिलेला कोश झाला.

( २ ) राजव्यवहार मराठींत व्हावे. पण राजव्यवहाराचे शब्द फारसी होते म्हणून फारसी शब्दांस प्रतिशब्द देणारा हणमंत्यांचा राजव्यवहार कोश झाला.

( ३ ) संस्कृत भाषा संस्कृतमधून शिकविणें हें कठीण जाऊं लागलें म्हणून अमरकोशाचें मराठी भाषान्तर झालें.

एवंच चालू मराठी भाषेमार्फत अभ्यास व्हावा म्हणून या तीन बाजूंनीं प्रयत्न झाला.

शिवकालांत मराठी भाषेला महत्त्व आणण्यासाठीं झालेल्या प्रयत्नां-संबंधानें एक महत्त्वाची गोष्ट निर्देशिली पाहिजे ती ही कीं, मराठी ग्रंथ-कार जेव्हां मराठीचा अभिमान धरून लिहीत तेव्हां ते संस्कृत भाषेविरुद्ध लिहीत. राजदरबारांत मराठी असलें पाहिजे व तें शुद्ध स्वरूपांत असलें पाहिजे याबद्दल त्यांची धडपड दिसत नाहीं. पण तेवढ्यावरून ती धडपड नव्हती असें मात्र वाटत नाहीं. संतकवी धार्मिक विषयांवर लिहीत तेव्हां त्यांच्या क्षेत्रांत संस्कृत हीच प्रतिस्पर्धी होती. धार्मिक विचार व्यक्त करण्यासाठीं भाषा कोणती असावी एवढ्या प्रश्नावर काय तें संतकवींनीं लिहिलें आहे. संस्कृत ग्रंथ न शिकतां मराठी ग्रंथावर तहान भागवावी असा मूर्खपणा करण्याचा दोष ज्याप्रमाणें त्यांच्यावर लादतां येणार नाहीं त्याप्रमाणें फारसी भाषेशीं झगडा करण्याचें श्रेय त्यांचें नव्हे. मराठीची फारसी भाषेशीं लढाई फारशी झाली नाहीं. राज्य पालटलें तेव्हां राजन्य वर्गाची दरबारी भाषा मराठी झाली. राज्यव्यवस्थेचें एक अंग म्हणून वाङ्मय होऊं लागलें. त्या वाङ्मयास व्यापारी भाषेंत बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, नव्या राज्याची जाहिरात हिंदी व संस्कृतमधून सर्व हिंदुस्थानभर फडकवली आणि राज्यरूपी कारखान्यांतली कामगार-मंडळी मराठीच असल्यामुळें कारखान्यांत भाषा मराठीच करण्याचा प्रयत्न झाला. व हा सर्व प्रयत्न ज्यांचा कारखाना त्यांच्याकडून झाला.

आतां मराठी राज्याबरोबर राजाश्रयानेंच वाढलेल्या आणि राजे लोकांची जाहिरात करणाऱ्या वाङ्मयाकडे लक्ष देऊं. हें वाङ्मय सामान्य लोकांतील अभिरुचीचें द्योतक नसून दरबारी मंडळींच्या अभिरुचीचें दर्शक आहे.

प्रथम शिवाजीचा कवि म्हणून प्रख्यात असलेल्या भूषणाकडे लक्ष देऊं. शिवाजीच्या पदरीं भूषण कवि होता. हा कनोजा ब्राह्मण होता. यानें जें

शिवराजभूषणकाव्य लिहिलें तो अलंकारावरील हिंदी भाषेंतला एक ग्रंथ आहे. भूषणाचे शिवाजीवर अनेक ग्रंथ आहेत. शिवराज भूषणकाव्य ( निर्णयसागर ) प्रसिद्ध झालें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत जी माहिती दिली आहे तीवरून त्या ग्रंथाची माहिती होते, त्यांत भूषणाचें चरित्र आलें आहे त्यावरून जी मुख्य गोष्ट बाहेर पडते ती ही कीं महाराष्ट्र आणि इतर भाग यांचा बौद्धिक संबंध स्थापित होण्यास उत्तर हिंदुस्थानी कवीस आश्रय देणें हें फार उपयोगी पडलें असावें. पंजाबी, फारसी व हिंदुस्थानी कवींना आश्रय देण्याची परंपरा शहाजीनेंच पाडली असें जयरामाच्या ग्रंथावरून दिसतें. कवि आणि भाट यांचा राजांना मुख्य उपयोग त्यांची जाहिरात करणें हा होय. ही गोष्ट बिल्हणानें विक्रमांकदेवचरित्राच्या प्रस्तावनेंत स्पष्ट शब्दांत सांगितली आहे.

**लंकापते: संकुचितं यशो यद्**
**यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्र:**
**स सर्व एवादिकवे: प्रभावो**
**न कोपनीया: कवय: क्षितींद्रै:**

हें तत्त्व शिवाजीनें ओळखलें होतें एवढेंच नव्हे तर कर्मधर्मसंयोग असा जुळून आला कीं, शिवाजीसंबंधानें काव्य करणारा मनुष्य औरंगजेब आणि छत्रसाल यांच्या दरबारीं असलेल्या कवींचाच भाऊ होता.

भूषणाचा धाकटा भाऊ मतिराम हा ललितललाम, छंदसार व रसराज या तीन ग्रंथांचा कर्ता होता व तो कुमायूंचा राजा उदोतचंद व छत्रसाल इत्यादिकांच्या दरबारीं प्रतिष्ठा पावला. सर्वांत धाकटा मुलगा नीलकंठ हाहि प्रसिद्ध कवि होता. थोरला भाऊ चिंतामणि हा तर औरंगझेबाच्या दरबारीं कवि होता. तर या प्रकारचे संबंध असलेला कवि शिवाजीच्या दरबारीं आला हा एक चांगला दैवयोग होता यांत शंका नाहीं. असा कवि दरबारीं असल्यामुळें निरनिराळ्या राजांच्या दरबारांत शिवाजीची कीर्ति आपोआप फैलावत असली पाहिजे. भूषणकवीसंबंधानें जी माहिती आपल्याकडे मराठी ग्रंथांत सांपडते ती शिवाजी बखरींतील होय. ही प्रथम विस्तारांत प्रसिद्ध झाली. तींत थोडाबहुत बाष्कळपणाच आहे. भूषणकवीचा शिवबावनी

नांवाचा एक ग्रंथहि प्रसिद्ध आहे (प्रकाशक गोवर्धनदास लक्ष्मीदास). राजप्रशस्ति वाङ्मयाच्या संस्कृत शाखेकडे आतां वळूं आणि जयराम व परमानंद यांचा परामर्ष घेऊं. यांचीं काव्यें नुकतीं प्रसिद्ध झालीं आहेत. जयरामाचें 'राधामाधवविलासचंपू' हें काव्य कै. वि. का. राजवाडे यांनीं संपादन करून येथील चित्रशाळेनें प्रसिद्ध केलें आहे (शके १८४४) तसेंच त्याचें 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' हें पुस्तक रा. स. मा. दिवेकर यांनीं संपादून प्रसिद्ध केलें आहे (शके १८४५). रा. दिवेकर यांनींच परमानंदाचा 'शिवभारत' हा ग्रंथ नुकताच (शके १८४९) प्रसिद्ध केला आहे.

महाराष्ट्राच्या राजघराण्यांत व सरदारघराण्यांत वाङ्मयविषयक अभिरुचि होती तिची परंपरा पहावयाची म्हटली म्हणजे शहाजीच्या कालापासून सुरुवात करावयास पाहिजे. सुदैवानें मालोजीच्या वेळचे तीर्थोपाध्यायांस दानें केल्याचे लेख सांपडले आहेत पण काव्योत्तेजनाचें कांहीं सांपडलें नाहीं. शहाजीसंबंधानें मात्र आपणांस पुरावा चांगलाच आहे. जयराम कवीनें राधामाधवविलासचंपू, पर्णालाख्यान वगैरे जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांत भोंसले घराण्यानें कविवर्गास कसा आश्रय दिला होता हें सांगितलें आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं कवींस सौख्यांत ठेवावें हें भोंसले घराण्यांत चांगलेंच समजत होतें. आणि त्या राजाश्रयास प्रारंभ शिवाजीच्या अगोदर म्हणजे शहाजीच्याच काळांत झाला आहे. शहाजीचें वैभव मोठेंच दिसतें, व तो विद्येचें चीज करण्यामध्यें मुळींच कुचर नव्हता. चंपूकडेच अवलोकन केलें तर खालील गोष्टी दिसून येतात.

शहाजीनें हा चंपू स्वतः श्रवण केला, शहाजीच्या पदरीं अनेक भाट असत व ते त्याचें गुणवर्णन करीत, तो त्यांना अशीं काव्यें करण्यास सांगे. शहाजीकालीन समाजांत कवित्व कशास म्हणत हें जाणण्यास चंपू एक साधन आहे. जयराम म्हणतो, अलंकारशास्त्र ग्रंथ पाहून किंवा पढून कवित्वशक्ति येत नाहीं, ती मूळची व ईश्वरानुग्रहप्राप्त अशी प्रतिभा असावी लागते. यावरून तुकाराम रामदासांच्या पूर्वींच झालेले प्रेरणाकाव्याचे विचार कवीनें स्वीकारून आपण त्या वर्गांत मोडतों असा हक्क सांगितलाच आहे. चंपूंत संभोग, विप्रलंभ, स्त्रियांचें नखशिखान्त वर्णन इत्यादि प्रकारचें कवित्व

असून मग शहाजीप्रशंसा आहे. शहाजी स्वतः संस्कृत जाणणारा व कवित्व करणारा होता. तो कवींना संस्कृत समस्या घाली. शहाजीचा वडील मुलगा संभाजी हाहि संस्कृतज्ञ व समस्या घालणारा होता; शहाजीच्या दरबारांत मोठमोठे पंडित कवी लष्करी सरदार असत. यांची संख्या ७० आढळते. शहाजी खूष झाला म्हणजे कवींना घोडे, पोषाक, इनामें देई. शहाजीनें मल्याळ देशांतील बंड मोडलें व दक्षिण कर्नाटकांतील एक पुरंदर नांवाचा किल्ला घेतला. विजयनगर, कनकगिरीहि काबीज केली. शहाजी आपल्यासमोर द्वंद्वयुद्ध व कुस्त्या करवी वगैरे गोष्टी जयरामानें उल्लेखिल्या आहेत. शहाजीला गोवर्धनाचार्यांच्या आर्या फार आवडत. कोठलाहि कवि आश्रयास आल्यास शहाजी त्याला ठेवून घेई. जयरामानें अशा ३५ कवींचीं नांवें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें—

शहाजीच्या राजसभेंतील कवी–( १ ) रघुनाथ व्यास; ( २ ) रघुनंदन; ( ३ ) ठाकूर चतुरद; ( ४ ) लछीराम; ( ५ ) श्यामगुसाई; ( ६ ) ठाकूर शिवदास; ( ७ ) केसरिदास; ( ८ ) नारायणभट्ट गुरु; ( ९ ) गयंदकवि; (१०) द्वारकादास; (११) देव काशीकर; (१२) शेष व्यास काशीकर; (१३) बलभद्र कवि; (१४) सुखलाल; (१५) अल्लीखान; (१६) बालकवि; (१७) रघुनंदन रामानुज; (१८) जदुराय; (१९) दुर्ग ठाकूर; (२०) सबुद्धिराव; (२१) ढुढरी कवि; (२२) अकब्बरपूरचा कवि; (२३) एक पंजाबी कवि; (२४) एक हिंदुस्थानी कवि; (२५) एक फारशी कवि; (२६) एक गुजराथी कवि; (२७) मोरिना भाट; (२८) बर्गी कवि; (२९) मोदलराय; (३०) कोट्टा पोबराय; (३१) लालमणि; (३२) घनशाम; (३३) विश्वंभर भाट; (३४) बलदेव नरायन; (३५) अनंत नरायन.

शहाजीच्या सैन्यांत व राज्यांत अनेक प्रान्तीय लोक रहात त्यामुळें त्याच्या दरबारांतहि अनेक प्रान्तीय विद्वान् आश्रयार्थ होते, म्हणून अनेक प्रान्तीय भाषा त्याला व दरबाराला समजत. शहाजीच्या पदरीं खुषमस्करे असत. शके १५५० च्या सुमारास शहाजी इतका प्रबळ झाला कीं "उत्तरेस शहाजहान व दक्षिणेस शहाजी हे रक्षक आहेत" अशी म्हण हिंदुस्थानांत पडली होती. शहाजीनें गुत्तीच्या स्वारींत मीरजुम्ला याचा पराभव केला

होता. शहाजीनें सर्व कर्नाटक जिंकलें. महंमद आदिलशहा म्हणे कीं, माझी बाहशाही शहाजीनें राखिली आहे. शहाजी हा फाल्गुनांत वसंत दरबार भरवीत असे; शहाजी शाहिरांचे मराठी पवाडे श्रवण करी, पक्ष्यांचे आलाप श्रवण करी. नाच-गायन ऐके, यज्ञयाग करी, साधुसंतांचें दर्शन घेई, लढाया खेळे; शहाजीचा रोजचा वर्तनक्रम प्राचीन क्षत्रिय राजांप्रमाणें असे.

हें शहाजीचें वर्णन ज्यानें लिहून ठेवलें आहे, त्या जयरामाचीच कथा त्या वेळच्या कवींस असलेल्या राजाश्रयाची बोधक आहे. जयरामाचें आडनांव पिंड्ये. नाशिक जिल्ह्यांतील मार्कंड्याच्या डोंगराजवळील एका गांवीं हा रहात होता. बापाचें नांव गंभीरराव. याच्याकडे मार्कंडापासून अहिवंता-पर्यंतच्या ७ किल्ल्यांची किल्लेदारी होती. शहाजी निजामशाहीचें पुनरुज्जीवन करीत असतां त्याची गंभीररावाशीं ओळख झाली. त्यामुळें पुढें जयराम हा बंगळूरास शहाजीच्या दरबारीं गेला. जयरामास तत्कालीन मुख्य मुख्य १२ भाषा येत होत्या. त्यानें हें चंपूकाव्य शहाजीच्या सांगण्यावरून रचिलें. यांत शहाजीचें गुणवर्णन आहे. जयरामानें शहाजीच्या प्रथम भेटीच्या वेळीं १२ नारळ शहाजीपुढें ठेवून आपल्याला १२ भाषा येतात म्हणून सांगितलें. मग शहाजीनें जयरामास आश्रय दिला व अनेक बक्षिसें दिलीं; जयरामानें गोवर्धनाचार्यांच्या आर्यासारख्या आर्या रचिल्या. जयरामानें केलेला स्तुतिपर श्लोक संभाजी राजाच्या कारभाऱ्यानें आपल्या मुद्रेंत कोरविला. व्यंकोजी राजानें जयरामास, राधामाधवविलासचंपू ऐकल्यावर दर वर्षास १ हजार वराह होन देण्याची नेमणूक केली. व्यंकोजीबरोबर जयराम हा शैलमल्लिका-र्जुनाच्या यात्रेस गेला होता.

शहाजीच्या राखेचा पुत्र कोयाजी हा संस्कृत, प्राकृत, नृत्य, गायन जाणणारा होता व अनेक शास्त्रांत निष्णात होता; व त्याची मुलगी नायकीण नांवाची असून ती नृत्य गायन कलेंत निष्णात होती. तिच्या वस्तादजीची व जयरामाची मैत्री होती. जयराम हा संस्कृत भाषेवर फार प्रेम करी. प्राकृतांत कवित्व करणारांना तो 'मर्कटें' म्हणे व संस्कृत कवींना सिंह म्हणे. जयरामानें शहाजीच्या दरबारांतील प्राकृत कवींना वादांत अनेकदां जिंकिलें असें जयराम स्वतः सांगतो. जयराम शहाजीच्या दरबारीं शके १५७५ पासून १५८० पर्यंत होता. चंपू काव्य शक १५८० च्या सुमारास झालें.

जयरामकविविरचित पर्णालपर्वतग्रहणाख्यानांत जयराम हा व्यंकोजीच्या दरबाराचें वर्णन करतो, " गवई, बजवय्ये, स्तुतिपाठक भाट, उत्तम नट आणि नर्तक हे सभेच्या पुढील अर्ध्या भागांत आपल्या स्थानीं आसनावर बसून त्याची स्तुति गात होते ( ८, ९, १० व ११ )." " महाराज, ह्या मनुष्याकडे कृपादृष्टीनें पाहावें." असें भालदारांनीं प्रत्येकाचा नामोच्चार करून सांगितल्यावर त्या लोकसमुदायानें त्याला नमस्कार यथाक्रम केला. इतक्यांत द्वारपालानें येऊन सांगितलें कीं, हत्तीवर बसून जयरामकवि येत आहेत. तेव्हां राजाचे नेत्र हर्षानें प्रफुल्लित होऊन त्यानें आदरपूर्वक ( लगबगीनें ) पंडितांसह सचिवाला त्वरेनें सामोरें पाठविलें. नंतर जयराम कवीनें त्यांच्यासह सभेमध्यें प्रवेश केला ( १२, १३, १४ व १५ ) तेव्हां एकोजी राजानें त्याच्या सन्मानार्थ उठून उभें राहून त्याला नमस्कार केला. आणि ज्याप्रमाणें विनयशील भरतानें श्रीरामचंद्रासंबंधीं कुशल प्रश्न विचारले त्याप्रमाणें त्यानें आपले वडील बंधु जे श्रीशिवाजीमहाराज यांच्यासंबंधीं कुशल प्रश्न विचारले. कवीनें आधीं सर्व कुशल वृत्त सांगितलें ( १६ व १७ ) आणि तो म्हणाला, " महाराज, देवश्रेष्ठ, जगत्प्रभु विष्णूच्या चरित्रासारखे असे आपले बंधु श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र ऐका (१८). निष्कलंक कलंकी तरुणांचा ( यवनांचा ) नाश करील असें जें शास्त्रामध्यें ( पुराणांत ) सांगितलेलें आहे तेंच आतां वर्णितों (१९). कारण त्या युद्धाचें कवींनीं पूर्वीं यथाभूत ( जसें झालें तसें ) वर्णन केलें आहे. मींसुद्धां त्यांच्या कृपेनें कांहीं ऐकून वर्णन केलें (२०). तें श्रवण करून महाराजाधिराज ( शहाजी ) सुद्धां पूर्वीं संतुष्ट झाले. बेंगरूळ नगरीं गौरीविलास नांवाच्या सभेंत ( दिवाणखान्यांत ) आपणसुद्धां पूर्वार्ध आरंभापासून ऐकला. म्हणूनच आपण ( पुढील चरित्र ) ऐकण्याच्या उत्सुकतेनें मला बोलाविलें ( २१ व २२ ). पुढें पद्यें रचीत रचीत कांहीं वर्षांनीं मीं काव्यग्रंथ तयार केला व त्यांत सर्वांचा संग्रह केला (२३). तो हा सर्व आपण व राजवंशांतील इतर श्रेष्ठ पुरुषांनीं मोठ्या तल्लीनतेनें सविस्तर ऐकला (२४)." यानंतर व्यंकोजी उत्तर करतो—

" पूर्वींचें चरित्र आम्हीं ऐकलें आहे. अलीकडचें आरंभापासून सांगावें. आपणांस महाराजांचें दर्शन कसें घडलें ? हल्लीं महाराज कोणत्या गडावर

रहात आहेत ? येथून तीन वर्षेंपर्यंत आपण जें काय केलें तें सर्व ऐकण्याची आमची इच्छा आहे. आपण मोठे कवि आहां ( २५, २६ व २६।। )."

जयराम म्हणतो, "मी बारा भाषांत काव्य रचितों ( २७ पूर्ण ). तेव्हां प्रथम मराठी भाषेंत ( त्यांचें चरित्र ) वर्णिलें. येथून राजगडास जाऊन मीं महाराजांचें दर्शन घेतलें (२८). त्यानंतर शिवाजी महाराजांनीं सुरत पुनः लुटली. त्याचें वर्णन मीं हिंदी व मराठी या दोन भाषांत केलें ( २९ ). नंतर त्याच मोहिमेंत श्री. त्रिंबक नांवाचा प्रख्यात पवित्र किल्ला आनंदानें हस्तगत केला ( ३० ). त्याच्यामागून जसें पूर्वीं श्रीकृष्णानें भागदत्त नगर ( भागलपूर ) लुटलें तसें शिवाजी महाराज कारंजा शहर लुटून आले ( ३१ ). त्याचेंहि वर्णन मी मराठी व हिंदी या दोन भाषांत केलें. नंतर सह्याद्रीचें मस्तक जो बागलांच्या ताब्यांतील पूर्वीं पृथ्वीवर अतिविख्यात पन्हाळा किल्ला तोसुद्धां अत्यंत विपुल आणि उग्र अशा ताम्रांनीं ( मोगलांनीं ) घेऊन आपल्या ताब्यांत सुरक्षित ठेविला होता ( ३२ व ३३ ), तो त्यांच्यापासून महा बलवान् शिवाजी महाराजांनीं हां हां म्हणतां घेतला. त्यानंतर मधून मधून अलंग कुरंग, निंगलवाडी येथें कडाक्याचें युद्ध झालें. अहिवंतगड, मार्कंडगड, रवळा जवळा नांवाचे सुंदर व अजिंक्य किल्ले-देखील आपले वडील बंधु जे शिवाजी महाराज त्यांनीं काबीज केले ( ३४, ३५, ३६ ). त्याचप्रमाणें चामुंडगड, हरिश्चंद्रगड, महिषगड आणि अडसर-गड हेसुद्धां निकरानें लढून घेतले ( ३७ ). नंतर जीवधन नांवाचा यवनांचा मोठा किल्ला त्यांचा प्राणभूत असा होता तो किल्लासुद्धां महाराजांनीं त्यांजपासून घेतला ( ३८ ).

जव्हार नांवाचें कोळ्यांचें जें प्राचीन राज्य तें विक्रमशहापासून महाराजांनीं पराक्रमानें घेतलें ( ३९ ). त्याचप्रमाणें सोमशहाचें रामनगर नांवाचें प्रख्यात राज्य शिवाचा अवतार जे शिवाजी महाराज त्यांनीं सहज लीलेनें घेतलें ( ४० ). महाराजांनीं प्रत्येक गडास नवीन नांव दिलें. ती कथा प्रसंगानें पुढें सांगेन. याप्रमाणें मीं अल्पसें वर्णन केलें तें आपण ( महाराजांनीं ) ऐकावें ( ४१ व ४१।। )."

"पन्हाळा नांवाचा आमच्या बादशहाचा अत्यंत विस्तीर्ण किल्ला बादशहाशीं सख्य ( तह ) असतांहि ( महाराजांनीं ) कसा घेतला व कां

घेतला ? ज्याच्यावर धान्यें, वृक्ष, फळें, फुलें, गाईचीं खिल्लारें, मीठ, तेल, गवत, नवें नवें नाना प्रकारचें सर्पण आहे; ज्याच्यावर सर्वत्र विहिरींच्या गोड पाण्याचें वैपुल्य आहे; जेथें मौल्यवान् टोलेजंग वाडे, घोड्यांच्या पागा, हत्तीखाने, लोकांचीं घरें यांच्या सुंदर रांगा झळकत आहेत; जेथील बाजारपेठदेखील इतकी विस्तीर्ण आहे कीं, ती एक दुसरा समुद्रच भासते; ज्याच्यावर चतुरंग सेनेसहित शेंकडों सेनापतीहि ( सरदार ) आहेत; जेथें सर्व लेखक ( चिटणीस ) नागोजी पंडित ( नागजित् ) सर्वांचें वेतन लिहीत भालदारांसह सभोंवतीं हिंडत असतो ( ४२ पूर्ण ४३,४४,४५,४६ व ४७ ); ज्याच्यावरील पहारेकरी लोक मध्यरात्रीं जागरूक असतात आणि मोठी घोषणा करतात, शिंगें व घंटा ( तास ) यांचा मधून मधून निनाद करून आणि तटांच्या आंत व बाहेर हातांत शेंकडों लोक दिवट्या व मशाली घेऊन चांगलें उजाडेपर्यंत जागत असतात, अशा प्रकारचा अत्यंत बलाढ्य असा हा गड, ज्याप्रमाणें गरुड अति दुरून झडप घालून सापास झटकन् पकडतो त्याप्रमाणें क्षणार्धांत हस्तगत केला ( ४८,४९ व ५० ). तेव्हां एवढ्या ह्या कृत्याला दुष्कर असें कां म्हणूं नये ? आणि हें अचाट कृत्य दाजीस्वामींनीं ( शिवाजी महाराजांनीं ) केलें ( ५१ ). ती सर्व हकीकत मला प्रथम ऐकावयाची आहे. मागाहून दुसरें वृत्त सांगावें." याप्रमाणें राजानें म्हटल्यावर त्या कवीनें त्यास पन्हाळगडचा ( स्वारीचा ) सर्व वृत्तान्त आरंभापासून सविस्तर सांगितला. तो येणेंप्रमाणें ( ५२ ).

" इंद्राच्या भीतीनें दीर्घकाल समुद्रांत बुडून राहिलेल्या मैनाकाप्रमाणें त्या पन्हाळगडास अत्यंत दयाळू शिवाजी महाराजांनीं धीर देऊन यवनरूपी समुद्रांतून अशा प्रकारें वर काढलें." श्रीजय रामकविविरचित शिवचरित्रांतील पन्हाळगड ग्रहणाख्यानाचा पहिला अध्याय समाप्त.

यापुढील हकीगत आपल्या दृष्टीनें अप्रकृत आहे. आतां दुसऱ्या एका कवीकडे वळूं.

परमानंद काशीस गेला असतां ब्राह्मणांनीं विचारल्यावरून परमानंदानें हें शिवभारत सांगितलें. या वेळीं शिवाजी हयातच होता. शिवाजीचे सर्व उल्लेख वर्तमानकालीन आहेत. परमानंद नेवासेचा रहिवासी व पुराणिक होता.

बापाचें नांव गोविंद. त्यानें काशीस जाण्यापूर्वींच हें शिवभारत तयार केलें होतें. शिवाजीनें परमानंदास आपलें चरित्र वर्णन करण्यास आज्ञा केली होती. शिवकालीं शिवाजीची कीर्ति काशीपर्यंत जाऊन तेथील हिंदुलोकांत त्याचें चरित्र जाणण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती. तसेंच शिवाजीच्या चरित्रावर शिवभारतासारखें प्रचंड व शिवराज प्रशस्तीसारखीं छोटीं काव्यें करण्याइतपत शिवाजीची कामगिरी त्याच्या हयातींतच वाढीस लागली होती. तुळजाभवानी व शंभुमहादेव यांस परमानंद विशेष प्रकारें नमन करतो. मालोजीची जहागीर पुणें प्रान्तीं होती. तो दौलताबादच्या निजामशाहाचा मांडलिक होता. परमानंद ज्या उपमा देतो त्या उपमा चांगल्या व समर्पक असतात ( उ. अ. १, श्लो ५७–५८ ). परमानंद आपल्यास ' कवीन्द्र ' म्हणवितो व शिवभारतास ' अनुपुराण ' म्हणून ' शतसहस्रसंहिता 'हि म्हणतो. त्याच्या मनांत महाभारताप्रमाणें हा ग्रंथ १ लक्ष करावयाचा होता. परंतु हल्लीं सांपडलेला ग्रंथ फारच अल्प आहे. यांत १५८३ शकापर्यंत म्हणजे राजापूरची खंडणी घेतली व शृंगारपूर काबीज केलें इतकेंच शिवचरित्र आलें आहे.

भातवडीच्या लढाईतील जयामुळें निजामशहा, मलिकअंबर व शहाजीचे चुलत भाऊ त्याचा मत्सर करूं लागले म्हणून शहाजीनें निजामाची नौकरी सोडली असें परमानंद पुढील शहाजीचें स्थित्यंतर वर्णितो. ही माहिती तरी नवीन आहे.

इब्राहिम आदिलशहानें शहाजीस आपल्या दरबारीं बोलावून नेलें, शहाजीनें आदिलशहास बरेच प्रान्त मिळवून दिले जिजाबाईला एकंदर ६ पुत्र झाले त्यांत संभाजी व शिवाजी एवढेच जगले ही एक निराळीच गोष्ट तो सांगतो परमानंद हा शिवाजीला अवतारी पुरुष म्हणतो. तो शिवाजीस विष्णूचा अवतार म्हणतो तर पुढच्या लेखकांनीं त्याला शंकरावतार म्हटलें आहे. तो म्लेंच्छांस दैत्य म्हणतो. त्यांच्यामुळें प्रायः क्षत्रिय नष्ट झाले. म्लेंच्छांच्या जुलुमानें पृथ्वी ब्रह्मदेवास शरण गेली. ती म्हणते, यज्ञ बंद पडले, ब्राह्मणसत्कार, वेदाध्ययन बंद झालें. धर्मनिर्बंध मोडले, म्लेंच्छ धर्म वृद्धि पावत आहे, सज्जनांचा छळ होत आहे, गोहत्या होते, साधूंचा व क्षत्रियांचा

नाश होतो आहे, ब्रह्मदेवानें विष्णूची स्तुति केली, विष्णूनें शहाजी-जिजाईच्या पोटीं अवतार घेण्याचें कबूल केलें.

जन्म घेण्यापूर्वीं विष्णूनें जिजाबाईस आपलें साक्षात् दर्शन दिलें. शिवाजीचा जन्म झाल्यावर देवांनीं नगारे वाजविले व सर्वांनीं येऊन त्याचें स्वस्तिवाचन केलें ( श्रीकृष्ण किंवा श्रीराम जन्माचें पौराणिक वर्णन येथें हुबेहूब परमानंदानें वठविलें आहे ). क्षत्रियाच्या षष्ठिपूजनास नांगर, तरवार, धनुष्य, कार्तिक स्वामी, गणपति यांची पूजा करीत असें याच्या वर्णनावरून दिसतें. सातव्या अध्यायांतील सर्व वर्णन रामायण व भागवतांतील रामकृष्ण यांच्या बाललीला वर्णनाची नक्कल आहे, पण ती चांगली साधली आहे

दौलताबाद ( निजामशाही ) मोंगलानें व आदिलशहानें घेण्याचा भिन्न भिन्न प्रयत्न एकाच वेळीं केला; पण मोंगलाचा डाव साधला ही नवीन माहिती. मुसलमानांना परमानंद असुरवंशी म्हणतो. शहाजीची निजामशाही सोडून आदिलशाहींत जाण्याची व ती सोडून पुन्हां निजामशाहींत जाण्याची दोन खेपांची माहिती नवीन आहे. शहाजीच्या मनांत स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचें होतें व त्यानें तशी खटपट केली पण मोंगल व विजापूर यांच्या दोघाच्या रेट्यामुळें तें निष्फळ झालें म्हणून यापुढें शिवाजीच्याकडून ती खटपट त्यानें केली ही माहिती नवीन आहे. शहाजी बंगळूरास असतां शिकार, साधुसेवा, काव्यचर्चा, नृत्य, लष्करपहाणी, योगशास्त्र यांत आपला काळ घालवी. शहाजी काव्यपारंगत होता. शिवाजीला ७ व्या वर्षीं मूळाक्षरें शिकविलीं. तो लेखनकर्मांत पारंगत झाला. शिवाजीवर १२ व्या वर्षीं पुणें प्रान्ताच्या जहागिरींचा अधिक शहाजीनें सोपविला. शिवाजी अनेकविद्यानिपुण होता. राजनीति, पुराणें, श्रुति, स्मृति, भारतरामायण, शास्त्रें, काव्य, वस्तु, निरनिराळ्या भाषा, पद्य, लष्करी विद्या वगैरे त्याला येत होतें परमानंद म्हणतो, प्रतिभेशिवाय काव्य उत्पन्न होत नाहीं. यानें अशुभ चिन्हांचा उतारा बहुधा महाभारतांतून घेतला आहे. लढाईचें वर्णन परमानंद चांगलें करतो.

खळद बेलसरची लढाई, शिरवळची लढाई, पुरंदरची लढाई शिवाजी व आदिलशहा यांच्यांत झालेली सविस्तर दिली आहे, हें वर्णन नवीन आहे. यांचा उल्लेख व थोडीशी माहिती फक्त दुसरीकडे आली आहे. परमानंदाला

तत्कालीन आदिलशाही, मोगलाई, शिवाजीचें राज्य यांतील प्रसिद्ध व्यक्तींची ओळख चांगली असावी. निदान हें भारत रचतांना त्याला सरकारी कागदपत्रें तरी पहावयास मिळालीं असावींत, कारण तो अनेक सरदारांचीं प्रत्यक्ष नांवेंच देतो. हीं खरीं कां खोटीं हें ठरविण्यास प्रत्यंतर पुरावा पाहिजे; परमानंद महाभारतांतील व्यासवचनें ( म्हणी ) देतो ( अ. १३ श्लो. १८ ). तसेंच शुक्र, वरुण वगैरे राजनीति उद्धृत करतो ( अ. १६ ); आपल्या म्हणण्यास चांगलीं उदाहरणें देण्याचें परमानंदास साधलें आहे. तसेंच राजनीति व लोकव्यवहार कसा असावा हेंहि तो मधून मधून देतो ( अ. १३ आणि अ. १६ ). त्याला उत्कृष्ट उपमा साधतात. ( अ. १३ श्लो. ८४–८७ व अ. १४ श्लो. ४–८ ; शहाजीची कैदेंतून सुटका शिवाजीनें व संभाजीनें महाराष्ट्र व कर्नाटक या दोहोंकडे आदिलशहाविरुद्ध एकदम चढाई केल्यामुळें लवकर झाली ही माहिती नवीन आहे; अल्ली आदिलशहानेंच शिवाजीला जिवंत पकडून आणण्याची आज्ञा अफझलास केली व त्याप्रमाणें मनांत कपट ठेवून खान शिवाजीवर चालून आला होता हें परमानंद स्पष्ट सांगतो. खानानें तुळजापूरच्या देवीचा अपमान केला, खानानेंच प्रथम वार केला व दगा दिला असें परमानंद सांगतो. मध्यान्हीं हा खानाचा वध झाला. त्यानंतरचें सृष्टीचें वर्णन परमानंदानें रावणाच्या किंवा कंसाच्या वधानंतरच्या पौराणिक वर्णनाबरहुकूम केलें आहे. कोल्हापूर-नजीकच्या रस्तुम–जमान व शिवाजी यांच्यांतील युद्धाची इतकी साग्र हकीकत दुसरीकडे आढळत नाहीं. शास्ताखानाचे सरदार ( रायबागीण यांत आहे ) व त्याची मोहीम आणि उंबरखिंडीची लढाई ही माहिती भरपूर दिली आहे. उंबरखिंडीच्या लढाईचा काल व स्थल यांची माहिती तर अश्रुतपूर्व आहे. बखरकारांनीं या लढाईचा अत्यंत घोटाळा केला होता. तोफांच्या लढायांत व आरमारांत फिरंग्यादि परकीय लोक निष्णात होते असें परमानंद सांगतो. शिवाजीनें ( अध्याय ३० श्लोक १–४ ) राजापुरास खणत्या लावून गांवांतील खंडणी वसूल केली होती. पन्हाळावेढा, शिद्दी जोहारानें घातलेला, यांतील लष्करी दृष्टीनें दिलेली माहिती बखरींत आढळत नाहीं. सहाशें लोकांचें पायदळ घेऊन शिवाजी एके रात्रीं पहिल्या प्रहरीं पालखींत बसून पन्हाळ्याहून निसटून विशाळगडास गेला. त्या रात्रीं

पाऊस पडत असल्यानें व भवानीच्या मायेनें शिद्दीचें सैन्य गाफील झालें होतें. विशाळगडास पूर्वींच जोहाराच्या एका तुकडीनें वेढा दिला होता पण तो फोडून शिवाजी गडांत गेला. नंतर जोहारानें पाठलागासाठीं पाठविलेला मसूद यानें विशाळगडास येऊन व तेथील आपलें पूर्वींचें सैन्य गोळा करून कडेकोट वेढा घातला. पण शिवाजीनें सतत हल्ले करून मसुदास पिटाळून लावलें व तो गेल्यानंतर पुणें प्रान्तांत शास्ताखानानें धुमाकूळ घातल्याचें समजल्यावरून तो विशाळगड सोडून पुण्याकडे गेला. या सबंध प्रसंगांत बाजी प्रभूचें नांव कोठेंहि आलेलें नाहीं हें आश्चर्य आहे. या प्रसंगांत आलेली पुष्कळशी माहिती आपल्याला आजपर्यंत माहीत नव्हती. शृंगारपूर व पाली येथील संस्थानें शिवाजीनें ताब्यांत घेतलीं येथपर्यंतच शिवभारतांत मजकूर आहे. पुढील अध्याय अर्धवटच बंद होऊन शिवभारत संपलें.

पवाडे लिहिण्याची चाल जुनीच होती. शिवाजीच्या काळांत तिला उत्तेजन मिळालें असावें एवढेंच नव्हे तर पवाडे रचण्यासाठीं कवींस माहिती दरबारनें पुरविली असावी असें दिसतें. त्याशिवाय प्रतापगडच्या ऊर्फ अफजुलखानवधाच्या पोवाड्यांत बऱ्याच व्यक्तींचा उल्लेख आला नसता. रा. भावे यांनीं या पवाड्याची कोणती प्रत पाहिली हें मला समजलें नाहीं. बहुतकरून त्यांनीं शाळिग्रामी आवृत्ति ग्राह्य धरिलीसें दिसत आहे. कैलास-वासी भावे यांस आधारग्रंथ देण्याचें इतिहास-लेखकाचें कर्तव्य याची जाणीव अजीबात नव्हती आणि त्यामुळें त्यांचीं विधानें तपासणें हें पुष्कळ जड जातें; आणि त्यांत अभ्यासकाचा वेळ विनाकारण जातो. अफजलखानाच्या वधाची जी प्रत कै. भावे यांच्यासमोर होती त्या प्रतींत या पवाड्याला पुष्कळच अर्वाचीन संस्कार झाला आहे असें दिसतें. हा पवाडा विविधज्ञानविस्तारांत दोनदां छापला गेला. विस्तारांतील पवाडा अधिक जुनाट दिसतो. व ज्या पुराव्यावरून हा पोवाडा अफझलखान वधानंतर लिहिला गेला असें दिसत आहे तो पुरावा भावे यांनीं घेतलेल्या आवृत्तींत पुसटून टाकला गेला आहे.

प्रतापगडच्या युद्धाचा पोवाडा ( वि. विस्तार ) यांत पोवाडे गाणाऱ्या कवीला मुद्दाम बोलावून आणून पोवाडा रचावयास सांगितल्याचा उल्लेख आहे.

" बाइनें ( जिजाबाईनें ) शाहीर बोलाविला ।। आग्रीनदास कवीश्वर त्यानें कडाका गाईला ।। दिला एक इनाम गांव बक्षीस त्याला ।। चढविले हाताला, लंगर सोन्याचे दोन ।। भाग मी राजाचें गाईन ।। ११ ।। "

या पोवाड्यावरून केवळ पोवाडा रचण्याबद्दल गांव इनाम मिळत होते असें समजण्याचें कारण नाहीं. शाहीर व गाण्डी यांच्यामध्यें आपणांस श्रोत्यानें किंवा यजमानानें कोणतेंहि पारितोषिक देण्याच्या अगोदरच मोठें बक्षीस दिल्याचें बोलून तें लागू करूं पाहण्याचा संवय सुप्रसिद्धच आहे.

शिवकालीन राजाश्रयी वाङ्मयाचें स्वरूप वर दिलेंच आहे, आतां एकंदर वाङ्मयाचें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं थोडेंसें लिहितों.

संस्कृत ग्रंथांचीं भाषान्तरें करण्याचा काल शिवकालापूर्वींच सुरू झाला होता. मुक्तेश्वरानें महाभारताचें भाषान्तर सुरू केलें. त्यांत पूर्वींच्या भाषान्तर-कारांवर टीका आलेली आहे. ज्ञानेश्वरी व भागवताच्या दशम स्कंधावरील टीका यांस भाषान्तरें म्हणतां येणार नाहीं तर स्वतंत्र ग्रंथच म्हटलें पाहिजे. तथापि, या टीका ग्रंथांत व भाषान्तरांत एक साम्य आहे तें म्हटलें म्हणजे आधारासाठीं एखादा ग्रंथ धरून लिहिणें हें होय. तथापि या कालांत जी स्वतंत्र ग्रंथ-रचना झाली तींत तुकारामाचे आख्यानेतर अभंग रामदासाच्या ग्रंथांतील आख्यान भाग सोडून इतर भाग यांस प्राधान्य दिलें पाहिजे. संतकवींनीं आपल्या ईश्वरविषयक भावना प्रगट करणें व भोंवतालची परिस्थिति लक्षांत आणून जे विचार येतील ते प्रकट करणें ( धीट काव्य ) यांस स्वतंत्र काव्यात्मक ग्रंथरचना म्हणतां येईल. या प्रकाराची रचना संत-कवींकडून बरीच झाली आहे. तसेंच लोलिंबराजानें रत्नकलेवर लिहिलेल्या शृंगारिक काव्यास स्वतंत्र काव्य म्हणतां येईल. तसेंच ' अलिगोरी 'सारखी कवितारचना झालीच आहे.

हा काल संतकवींच्या स्वतंत्र ग्रंथरचनेच्या काळाचा तसाच भाषान्तरोत्पत्तीच्या काळाचा मध्यबिंदु आहे भाषान्तरें या कालानंतर वाढलेलीं दिसत आहेत व कवीची स्वहृदयप्रकाशक काव्यरचना कमी होत गेलेली आहे. एका प्रकारच्या काव्याचा या कालानंतर उत्कर्ष झाला तर दुसऱ्या प्रकारच्या काव्यास उतार झाला, पण दोन्ही प्रकारच्या ग्रंथांचा

माध्याह्नकाल शिवकालच होय. हा अत्यंत उत्पादक काल होता. या वेळचा वाङ्मय-संभार किती प्रचंड आहे याचा बोध केवळ मागें दिलेल्या कवि-नामांवरून कांहीं अंशीं होईल, पण पुरा होणार नाहीं. कित्येक संतकवींनीं जे ग्रंथ अगर काव्यें केलीं त्यांची यादीच फार मोठी होईल. अशांमध्यें शिवरामस्वामी, तुकाराम, वामन व रामदास ही मंडळी येतील. पुष्कळदां ग्रंथ एकच असतो पण तो मोठा असतो. अशांमध्यें शिवकल्याणाच्या भागवताच्या दशमस्कंधावरील टीकेचें नांव घेतलें पाहिजे. या टीकेंत जवळ-जवळ एक लक्ष ओंव्या आहेत म्हणजे हा ग्रंथच महाभारताहून मोठा होतो. या कालांतलें सर्व वाङ्मय उपलब्ध झालें नाहीं एवढेंच नव्हे तर उपलब्ध झालेल्या वाङ्मयाचा शतांशदेखील प्रसिद्ध झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

शिवाजीच्या काळांत झालेल्या वाङ्मयाचें व ज्या वातावरणांत हें वाङ्मय तयार झालें त्या वातावरणाचें प्रस्तुत प्रसंगीं दिल्याप्रमाणें अगदीं स्थूल अवलोकन केलें असतां हा वाङ्मयाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा काल होऊन गेला असें वाटल्याखेरीज राहवत नाहीं.

वाङ्मयाच्या बाबतींत हा जो महत्त्वाचा काल आहे तो एकंदरींत महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा काल होय. या कालांत महाराष्ट्रीय कर्ते पुरुष दक्षिणेच्या अगदीं टोंकांपर्यंत गेले होते आणि वाङ्मयाचे पुरस्कर्ते म्हणून ठाऊक झाले होते. शहाजी व व्यंकोजी हे संस्कृत कवींचे आश्रयदाते म्हणून प्रसिद्ध झाले होते. आणि शिवाजीनें उत्तरेकडील हिंदी भाषेंत कविता करणाऱ्या कवींसहि आश्रय दिला होता; आणि त्यामुळें भोंसले घराण्याची वाङ्मयास आश्रय देणारे म्हणून कीर्ति दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत पसरली होती यांत शंका नाहीं. तथापि मराठी वाङ्मयाकडे पाहिलें तर मात्र हें वाङ्मय राजाश्रयाशिवायच वाढत होतें व याचें कारण शिवाजीचें औदासीन्य हें खास नव्हतें. संस्कृत कवी व हिंदी कवी यांच्यापाशीं शिवाजी जर आश्रय-दात्याप्रमाणें वागत होता तर मराठी संतकवींपाशीं तो शिष्याप्रमाणें वागत होता आणि त्यांच्याकडून प्रशस्तीचे शब्द मिळविण्याऐवजीं शाबासकीचे शब्द मिळवीत होता, त्यामुळें संतकवींच्याकडे शिवाजी अगदीं निराळ्या दृष्टीनें पहात होता यांत शंका नाहीं. आणि शिवाजीची आपल्या देशांतील व

भाषेंतील ग्रंथकारांविषयीं जी लीन वृत्ति उत्पन्न झाली होती तिचें कारण राजाश्रयाविषयीं निःस्पृहता हेंच प्राधान्यानें होतें असें म्हणतां येईल. संतकवींस राजाश्रय नको होता या सर्व मंडळीस पोट होतेंच पण तें भिक्षेवर म्हणजे सार्वजनिक आश्रयानें भरत होतें, व जनता त्यांस सत्पुरुष म्हणून भिक्षा घालावयास तयार होती. ज्यांस आपण संतकवी म्हणत नाहीं तर केवळ कवी असें म्हणूं, अशांपैकीं वामनाकडे पाहिलें तरी तोच देखावा दृष्टीस पडतो. शिवाजीनें रामदासांस राज्य लिहून दिलें होतें व तें त्यांनीं परत केलें म्हणून कथा आहे, व रामदासांनीं जवळ जवळ शिवाजीच्या अंतकालांपर्यंत आपल्या मठासहि कांहीं घेतलें नव्हतें. चाफळच्या उत्सवाला शिवाजी कांहीं वर्गणी देई तेवढीच, हें "चाफळ संस्थानचें उत्पन्न" या राजवाड्यांच्या लेखांत दाखविलेंच आहे ( रामदास व रामदासी, वर्ष ३ ). म्हणजे मराठी कवींनीं तरी आपल्यापुरता राजाश्रयनिरपेक्ष संप्रदाय स्थापन केला होता; व वामन पंडित त्याच परंपरेंतच समाविष्ट झाला. राजे लोकांची प्रशंसा करण्याकडे वामनपंडिताची बुद्धि वळण्याऐवजीं ती 'यथार्थदीपिका' लिहिण्याकडे वळली. त्याला राजदरबारीं प्रशंसा मिळविण्याची आकांक्षा नसून संतमंडळी व इतर ग्रंथकार आणि वाचकवर्ग यांच्याकडूनच प्रशंसा मिळविण्याची आकांक्षा होती. प्रतिस्पर्धी म्हणून भोंवतालच्या मंडळीकडे तो पहात नव्हता तर त्याच्या मनांत ज्ञानेश्वराशीं स्पर्धा उत्पन्न होत होती. मोठे कवी पूर्वींच होऊन गेले; आतां स्पर्धा तरी कोणाशीं करावयाची अशा भावनेनें भट्टनारायण किंवा जगन्नाथराय हे ज्याप्रमाणें

"काव्यालापसुभाषितव्यसनिनस्ते राजहंसा गताः ।
ता गोष्ठ्यः भयमागता गुणलवश्लाघ्या न वाचः सताम् ॥
सालंकाररसप्रसन्नमधुराकाराः कवीनां गिरः ।
प्राप्ता नाशमयं तु भूमि वलये जीयात् प्रबंधो महान् ॥

किंवा

"दिगंते श्रूयन्ते मदमलिनगंडाः करटिनः
करिण्यः कारुण्यास्पदमसमशीलाः खलु मृगाः"

अशा तऱ्हेचे उद्गार काढीत होते त्याप्रमाणेंच वामनानें काढले आहेत.

"प्राकृतग्रंथकर्तारो ये तु वर्षशतात्पुरा त्यक्तदेहास्तैर्यथोक्तं न तथा ज्ञानिनोऽधुना" हे उद्गार यथार्थ होते असें मात्र नाहीं. कारण एक ज्ञानेश्वर वगळला तर गीतेवर चांगले भाष्यकार याच वेळेस होऊन गेले, व या कालचें वाङ्मय जितकें विस्तृत आहे तितकें कोणत्याच काळचें नाहीं. तथापि वामन पंडितास बऱ्याच समकालीन लोकांची माहिती नसावी व बरीच मंडळी वामन पंडितानंतर विख्यात झाली असावी असें दिसतें. तथापि वामनाच्या उद्गारांवरून एक गोष्ट मात्र दिसते आणि ती म्हटली म्हणजे 'ज्ञानी' वर्गांत तो प्राकृत ग्रंथकारांना घालतो ही होय. म्हणजे प्राकृत ग्रंथकारांस आपण कोठें तरी पुढें जात आहों ही भावना उत्पन्न होऊं लागली होती, व ती त्यांची भावना एका दृष्टीनें यथार्थ होती.

जें मराठी वाङ्मय संतकवींचें होतें त्यांत वारकरी संतकवि आणि रामदासी असे दोन मोठे भेद पडतात. वारकरी संप्रदायामध्येंच शिवराम स्वामींची गणना करतां येईल. हा ग्रंथकार जरी फार जाडा होऊन गेला तरी त्याच्यामध्यें रामदासासारखा निराळेपणा नाहीं इतर संतकवी ज्ञानेश्वरापासून आलेलें वळण गिरवीत होते तर रामदासांनीं निराळ्या प्रकारचा उपक्रम केला होता. थोडक्या वेळांत त्यांनीं इतके मठ उत्पन्न केले होते कीं, आजच्या अत्यंत कर्तृत्ववान् अशा माणसांसदेखील आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. शिवाजीनें आपल्या राज्याची स्थापना केली त्याच्या पूर्वीं त्याला अगोदरच लहानसें राज्य बापाकडून मिळालें होतें, आणि कर्तीं माणसें मिळालीं होतीं. पण रामदासास सर्व नवीन सृष्टि तयार करावयाची होती. रामदासांच्या अनुयायांत पूर्वींच मठाधिपति असलेली मंडळी आली होती हें जयरामस्वामी, रंगनाथस्वामी निगडीकर यांच्या उदाहरणांवरून सांगतां येईल.

या वेळचे ग्रंथकार प्रवास पुष्कळ करीत होते असें दिसतें. जयराम कवीनें तंजावरपासून पन्हाळ्यापर्यंत प्रवास केल्याचें सांगितलेंच आहे. वामन पंडितानें मोगलाईत बाल्य घालविलें आणि पुढें काशीपासून मलयगिरीपर्यंत प्रवास केला, त्याची साक्ष त्यानेंच दिली आहे. रामदासांनीं बंगाल-पंजाबखेरीज सर्व हिंदुस्थानभर प्रवास केल्याचा पुरावा भरपूर आहेच ( रामदास व रामदासी, वर्ष ३, अंक २ ). जयरामाचा बराच प्रवास मराठी फौजांच्याबरोबर झाला; तरी तशी गोष्ट रामदास व वामन यांची नाहीं. त्यांनीं

भिक्षेवर किंवा स्वखर्चानेंच प्रवास केला असावा. तुकोबांनीं फारसा प्रवास केला नाहीं. देहूपासून पंढरपूरपर्यंत ज्या वाऱ्या केल्या असतील तेवढ्याच. तीर्थाटनें करण्याबद्दल रामदासांचा उपदेश आहे. यावरून या काळांत बौद्धिक चळवळींत पडलेला वर्ग अल्पानुभवी मुळींच दिसत नाहीं. रामदासांच्या दासबोधाकडे पाहिलें असतां त्यांत खोल मानसशास्त्र दिसून येतें, आणि तें ग्रंथावरून घेतलेलें दिसत नसून अनुभवानें तयार झालेलें दिसतें.

या काळांत ख्रिस्ती चळवळ होती व ती मराठी वाङ्मयोत्पादनाकडे वळली होती; महानुभावांचें वाङ्मय पूर्वींचें जरी बरेंच होतें तरी या काळांतहि बरेंच झालें. महानुभावांचे उपदेश घेणारांत ब्राह्मण होतेच; व लिंगाइतांचे उपदेश घेणारांमध्येंहि होते. असे ब्राह्मण रामदासांचेहि शिष्य होते असें दिसून येतें. अशांमध्यें जयरामस्वामी वडगांवकर यांचें नांव प्रामुख्यत्वें देतां येईल.

कानडींतून मराठी भाषान्तर करण्याची क्रिया होत होती याला पुरावा चंद्रात्मज रुद्र याचा आहे. एवंच या काळचें मराठी वाङ्मय अनेक ओघ मिळून वाढत होतें.

शिवकालीन एकंदर वाङ्मयाचें वर्गीकरण करूं लागल्यास त्यांत खालील प्रकार दिसून येतात—

( १ ) बखरींची रचना त्या वेळेस होत होती.

( २ ) ऐतिहासिक संस्कृत काव्यास सुरुवात झाली होती. म्हणजे कल्हणाच्या राजतरंगिणीनंतर ऐतिहासिक संस्कृत काव्य प्रथम महाराष्ट्रांतच उत्पन्न झालें होतें. हें राजाश्रयानें उत्पन्न झालें होतें.

( ३ ) राजव्यवहारकोश तयार होऊन भाषेचें मुसुलमानी स्वरूप काढून टाकून तिला संस्कृत भाषेचें पाठबळ देण्यासाठीं निश्चित प्रयत्न झाला.

( ४ ) मराठी भाषेंतील ग्रंथांमध्यें संस्कृत शब्द जसेच्या तसे घेऊन भाषेला अगदीं अर्वाचीन स्वरूप देण्यांत आलें.

( ५ ) मराठी काव्यामध्यें ज्याला परमार्थाचा गंध नाहीं असें लोलिंबराजाचें आपल्या रत्नकला नांव दिलेल्या मुसलमान बायकोबरोबर केलेलें विलासवर्णन करणारें अगदीं स्वतंत्र शृंगारिक काव्य निर्माण झालें होतें.

( ६ ) महाभारत, रामायण, भागवत, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांचीं भाषान्तरें झालीं.

( ७ ) मराठी शब्दकोशास सुरुवात झाली, ती जुन्या मराठींतील शब्दांचें स्पष्टीकरण करण्यासाठीं झाली.

( ८ ) स्त्री कवयित्री झाल्या एवढेंच नव्हे तर मठाधिपती झाल्या.

( ९ ) अलिगोरिकल म्हणजे क्रियापरंपरा रूपकानें दाखविणारी कविता तयार होऊं लागली. उदाहरणार्थ– हरिदासाचें मनःश्चंद्रबोध हें काव्य सांगतां येईल.

( १० ) महाराष्ट्राचें वैभव सर्व हिंदुस्थानला कळावें म्हणून हिंदी व फारशी कवींनादेखील आश्रय देण्यांत आला.

( ११ ) नाटकें चालूच होतीं. नटांचा उल्लेख दासबोधांतदेखील आला आहे. तुकाब्रह्मानंदाचें नाटकरामायण हा एक प्रत्यक्ष ग्रंथ आहे.

( १२ ) पोवाडे करणाऱ्या कवींना राजाश्रय मिळूं लागला. अफझुलखानवधाचा पोवाडा करण्यासाठीं तर कवीस मुद्दाम पाचारण केलें गेलें.

( १३ ) भक्तिवाङ्मय तर जोरांत होतें. या प्रकारचें अत्यंत श्रेष्ठ वाङ्मय उत्पन्न करण्याचें श्रेय तुकारामास आहे.

( १४ ) धर्मप्रचारास संघटित स्वरूप देण्याचा प्रयत्न अनेक मठ स्थापून रामदासांनीं केला.

( १५ ) निदान पंचवीस ठिकाणीं तरी मराठी वाङ्मय तयार होऊन तें स्थानिक लोकांच्या बोधासाठीं वापरलें जात होतें. ज्या ठिकाणीं वाङ्मय उत्पन्न होत होतें तीं ठिकाणें पुढें दिलीं आहेत—

( १६ ) लिंगायत पंथीयांनादेखील आपल्यामध्यें समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न झाला.

हीं सर्व लेखकांचीं नांवें आणि त्यांचीं राहण्याचीं स्थलें पाहतां, मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत हा अत्यंत महत्त्वाचा काळ होऊन गेला असेंच म्हणावें लागेल. इतके अनेक ग्रंथकार असलेला हल्लींच्या कालाखेरीज दुसरा काल नाहींच. ग्रंथोत्पत्तीचीं ठिकाणें अनेक आहेत. पुणें जिल्हा तर मुख्य महत्त्वाचें ठिकाण होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. निळोबा याच जिल्ह्यांतले.

सर्व महाराष्ट्रभर एक तऱ्हेचें वातावरण उत्पन्न होण्यास निरनिराळ्या ठिकाणच्या कवींमध्यें एक दृष्टि पाहिजे ती उत्पन्न झाली होती; पण सहकार्य उत्पन्न झालें नव्हतें. अन्योन्य परिचय होता किंवा नव्हता याविषयीं फारशी शंका नाहीं. अनेक कवींचा रामदास–तुकारामांशीं प्रत्यक्ष संबंध आला आहे. पंढरीस वाऱ्या व्हावयाच्या निमित्तानें या संतकवींच्या एकमेकांशीं ओळखी होतच होत्या; व रामदासांच्या शिष्यमंडळांनीं जी कविता निर्माण केली तींत तर एकाच ठिकाणाहून स्फूर्ति उत्पन्न झालेली होती. संतकवींच्या प्रयत्नांत सदृश वातावरण उत्पन्न झालें, पण सहकार्य उत्पन्न झालें नाहीं हें, अनेक कवी एकच पुस्तक भाषान्तराला घेत यावरून सिद्ध होतें. त्यांच्यांत सांघिक कार्याची भावना असती तर वाङ्मयास यापेक्षांदेखील निराळें स्वरूप आलें असतें. पुष्कळशा शक्तीचा अपव्यय झाला; वारकरी संप्रदाय हा वैयक्तिक प्रयत्न करणाऱ्या मंडळींचा संघ होता तर रामदासी संप्रदाय एकाच संघाच्या अनेक ठिकाणीं एका तंत्रानें चालणाऱ्या शाखा पसरवूं पहात होता. वामनाचा व रामदासांचा परिचय असावा असें त्या दोघांविषयींच्या आख्यायिकांवरून वाटतें. रामदास वामन पंडितांस ' यमक्या वामन ' म्हणत, आणि पंडितांस आपलें समाधान करून घ्यावयासाठीं दक्षिणेकडे जाण्यास रामदासांनींच सूचना केली. तुकारामबोवांवर वामन पंडितानें प्रशस्तीच लिहिली आहे यावरून ही सर्व मंडळी एकमेकांस भेटत असावी आणि यामुळें सर्वसामान्य असें वातावरण उत्पन्न झालें होतें यांत शंका नाहीं. रामदासी मठांचा व्यापकता रा. भावे ( महाराष्ट्र सारस्वत, पृ. २०८, ) येणेंप्रमाणें वर्णन करितात.—

" या सर्व मठांचें आदिपीठ चाफळ येथें श्री समर्थ रामदासस्वामी स्वतः हुजूर राहात. रामदासाचा पट्टशिष्य कल्याण याला सीना नदीच्या कांठीं डोमगांव येथें मठ स्थापून दिला होता. क्रमानें दुसरा शिष्य उद्धव. नाहीं; हें चुकलें ! वास्तविक पाहतां, समर्थांचा पहिला शिष्य उद्धव. यास दोन मठ स्थापून दिले होते. एक गोदेच्या पूर्वेला टांकळी येथें व दुसरा गोदेच्या पश्चिमेस इंदूर येथें. हें इंदूर म्हणजे पेशव्यांनीं आपल्या एका सरदाराची जेथें स्थापना केली तें उत्तर हिंदुस्थानांतलें इंदूर नव्हे. हें इंदूर म्हणजे मोगलाईतलें निजाम हैद्राबादेजवळचें इंदूर. कांहीं दिवस उद्धवानें या मठांत

रहावें व कांहीं दिवस टांकळीच्या मठांत असावें अशी गुरुजींची त्यास अनुज्ञा असे. अहमदनगरजवळ दादेगांवास देवदास यास, वऱ्हाडांत कारंजें येथें बाळकराम यास, औरंगाबादेजवळ भालगांवास त्र्यंबक गोसावी यास असे मठ स्थापून दिले होते. तसेंच काशीस रामचंद्र, रामेश्वरास हनुमान, गोमंतकांत गोविंद, सावंताच्या वाडीकडे संभुस्वामी या शिष्यांचे मठ होते. समुद्रकाठालाहि स्वामींचे मठ होते. दंडाराजपुरीवर त्रिंबक गगनीची नेमणूक केली होती. सुरतेकडे जनार्दन व द्वारकेकडे हरिस्वामी हे होते. नदीकांठ, कडेपठारें आणि डोंगरी ठिकाणें हींहि यांच्या मठस्थापनेंतून सुटलीं नव्हतीं. श्रीशैल्य शिखरावर कोदंडरामाचा मठ, बद्रीकेदारीं दयाळाचा मठ, औंध्या पर्वतावर बल्लाळाचा, सह्याद्रीच्या डोंगरांत अनंतबुवाचा असे अनेक मठ जिकडे तिकडे होते; याशिवाय नारायणबुवा चक्रपाणी, रायचूर प्रान्तांतले सदाशिव, श्रीरंगपट्टणाकडे शंकर गोसावी, तेलंगणांत शिवराम यांसारखे शिष्य सर्वत्र संचार करून आपल्या समर्थ स्वामींची सेवा योग्यपणें बजावीत ते निराळेच...... कर्नाटक, तंजावर वगैरे प्रान्तांत तर ही परंपरा फारच फैलावली होती. आपल्या भाषेंतले रघुनाथ, आनंदतनय, गोसावीनंदन, माधव वगैरे अनक चांगले कवी या तंजावराकडील रामदासी परंपरेंतलेच आहेत.

शिवाजीच्या अगोदरच बखरी तयार होण्यास सुरुवात झाली होती. तालिकोटच्या म्हणजे राक्षसतागडीच्या लढाईची बखर अशांचपैकीं आहे; ही शिवकालापूर्वींची स्पष्ट दिसत आहे. कांहीं बखरी शिवाजीच्या वेळीं तयार झाल्या असल्या पाहिजेत. आपणांस त्या उपलब्ध नाहींत एवढेंच. सभासदीबखर शिवाजीच्या काळानंतरची आहे. "हल्लीं ज्या बखरी प्रसिद्ध आहेत त्या सर्वांत ९० किंवा ९५ कलमी बखर ही फार जुनी आहे. ही प्रथम अरुणोदय वर्तमानपत्रांत व नंतर 'भारत वर्षा'त छापिली गेली आहे. ही फार महत्त्वाची असून हिच्यानंतरच्या अनेक शिवचरित्रकारांनीं हिचाच उपयोग केला आहे. हिची भाषा जुनी असून हिच्या शेवटीं पुढील शेरा आहे : सदरहू आख्यान नव्वद प्रकरणें पुण्यश्लोक राजा त्याची कथा दत्ताजीपंत वांकेनवीस ह्यांपासीं तपशीलवार लिहिली होती. त्यांपासून संकलित तालीक लेहून घेतली. अनाजी रंगनाथ मलकरे यांनीं हस्ताक्षरें तालिक लिहिली असे. (भावे)" या उताऱ्यावरून याच्या पूर्वींची बखर

होती हें उघड आहे, आणि बखर कदाचित् शिवकालींदेखील लिहिली जाऊन शिवाजीच्या मृत्यूनंतर पुरी करण्यांत आली असावी. शिवाजीच्या काळच्या कांहीं बखरी स्काट वेरिंगला सांपडल्या होत्या त्या त्याच्या इतिहासांतील टीपांच्या भागांत त्यानें उल्लेखिलेल्या आहेत, पण त्यांचा आज पत्ता नाहीं. त्या बखरींवरून कांहीं तरी निराळी माहिती सांपडेल असा अजमास आहे. चार बखरी शिवाजीस सोयराबाईनें विषप्रयोग केला असें लिहितात म्हणून स्काट वेरिंग सांगतो. तें खरें असल्यास संभाजीच्या सावत्र आईस क्रूरपणानें मारण्याचें काम जितकें गर्ह्य दिसतें तितकें दिसणार नाहीं. उलट त्यानें न्यायच केला असें वाटेल संभाजीनें भावास ठार मारलें नाहीं, त्याच्या आईस ठार मारलें हें लक्षांत घेण्याजोगें आहे. जर ती माहिती आजीबात खोटीच असेल तर मात्र ह्या बखरी संभाजीचें केवळ समर्थन करण्यासाठीं संभाजीनें लिहविल्या असतील अशी कल्पना करतां येण्याजोगी आहे. येथें या वादाच्या प्रश्नांत शिरतां येत नाहीं. शिवकालीं कांहीं बखरी तयार होऊन त्यांचा आपणांस अजून पत्ता लागला नाहीं हें शक्य आहे हें दाखविण्यासाठीं केलेलें विवेचन पुरे आहे.

० ० ०

महाराष्ट्रीयांनीं मराठींत कृति करतांना किंवा संस्कृतमधील विद्या ग्रहण करतांना आपली गरज व अभिरुचि या दोन दृष्टींनीं ते जुन्या विद्येतील ग्राह्य भागाची निवड करीत होते. संस्कृतमधील विद्या त्यांनीं जशीच्या तशीच घेतली नाहीं. भाषान्तरें केवळ भाषान्तर जसेंच्या तसेंच करावयाचें म्हणून केलीं नाहींत. आपणांस काय हवें यासंबंधाची त्यांची अभिरुचि स्वतंत्र होती व तीमुळें त्यांनीं भाषान्तरासाठीं घेतलेल्या ग्रंथांचें भाषान्तर करतांना हवे ते फेरफार केले. तसेंच छंदःशास्त्र उपयोगितांना त्यांनीं हवें तेवढेंच निवडलें. त्यांनीं तें प्रथम घेतलेंच नाहीं. बरेंचसें वाङ्मय ओंव्या व अभंग इत्यादि छंदांत केलें. मुक्तेश्वराच्या रामायणापासून अक्षरगणवृत्तें घेण्याचा सपाटा सुरू झाला. आणि तो घेण्याबरोबर संस्कृत छंदःशास्त्रावर मराठींत ग्रंथ करणें भाग पडलें. ज्ञानेश्वरापासून केवळ अभंग व ओंव्या यांचीच रचना चालू होती असें नाहीं तर पदेंसुद्धां चालू होतीं. तीं पदें अनेक प्रकारचीं दिसतात; व ज्या अर्थीं त्या काळीं संगीत-रत्नाकर हा ग्रंथ झाला त्या अर्थीं पदांचे पुष्कळच प्रकार उपलब्ध असले पाहिजेत. व हींच पदें अनेक भिन्न चालींवर म्हटलीं जात असतील. पदांचें छंदःशास्त्र करण्याचा प्रयत्न सध्यां जो रा. पटवर्धन यांनीं केला त्याच्यापूर्वीं तो झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. निरंजन माधवानें संस्कृत वृत्ताकडेसच लक्ष दिलें आहे.

छंदःशास्त्रावर मराठींत ग्रंथ झाले. निरंजन माधवाचा ग्रंथ भावे यांनीं महाराष्ट्र कवींत प्रसिद्ध केला आहे ( ग्रंथांक १४ ). या ग्रंथांत २६ वृत्तांचेंच विवेचन आहे. मराठी वृत्तें अगदींच उपेक्षिलीं आहेत व संस्कृतमधील-देखील मात्रागणवृत्तें उपेक्षिलीं आहेत.

मराठी कविता पदांमध्यें ज्ञानेश्वरकालापासून आजपर्यंत एकसारखी

चालूच आहे. आणि जें वाङ्मय गाण्याकडे उपयोगिलें जावें असें ज्ञानेश्वरादिकांस वाटलें तें त्यांनीं पदांत रचलें आहे.

येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, संस्कृत अक्षरगणवृत्तांचा स्वीकार न करण्यांत त्यांची कांहीं काव्यपरीक्षणवृत्ति दिसत आहे काय? मला वाटतें कीं दिसत आहे. कवितेच्या उत्कर्षासाठीं कवितेचें वृत्त सोपें असलें पाहिजे. नाहीं तर वृत्तासाठीं रसापकर्ष होतो ही भावना पुष्कळच कवींना होती; व मराठी कवितेंत सौकर्याकडे लक्ष ठेवावें असा रामदासापूर्वींपासून उपदेश होता. आणि छंदःशास्त्रावर लोकांना बांधून टाकणारे ग्रंथ झाले नाहींत ही आनंदाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. जर ग्रंथरचना सुरू झाली असती तर कालान्तरानें पदांचें स्वरूप जाऊन त्यांचीं अक्षरगणवृत्तेंदेखील बनलीं असतीं.

संस्कृत छंदःशास्त्र आपल्या भाषेस लागू करतांना कांहीं मर्यादा ठेवल्या पाहिजेत याची जाणीवदेखील मराठी कवींस झालेली आहे.

मराठी भाषेंत जी बोलण्याची पद्धति आहे तिला संस्कृत भाषेचे सर्व नियम लागू पडत नाहींत; म्हणून मराठी कवींनीं संस्कृत छंदःशास्त्रापासून आपलें संरक्षण करण्यासाठीं आपली लेखणी फिरविली आहे.

परशुराम कवीनें गुरुचरित्राचें जें आर्याबद्ध रूपान्तर केलें त्यांत त्यानें मराठी छंदःशास्त्राच्या स्वातंत्र्यार्थ एक गोष्ट पुढें मांडली ती ही कीं, 'पुढें अनुस्वार विसर्ग येतो। संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो।' हा वृत्तदर्पणी नियम नेहमींच लागू पडेलसें नाहीं. पुष्कळदां पुढील अक्षर जोडाक्षर असूनहि पूर्वींच्या अक्षरास गुरुत्व देत नाहीं. परशुराम ग्रंथारंभीं म्हणतो—

"गणमात्रा भेद असे आर्याछंदासि जाणती ज्ञाते।
आतां भाषायोगें त्याग गुरुत्वास होत संज्ञा ते॥
जोडाक्षर क्याख्यादि व्या–ह्या पर्यंत अक्षराप्राग्जें
अक्षर गुरु होतें परि तें लघु भाषापरत्वि हो साजे॥
आणि क हि त्ये, म्ह न्हा, व्हा, व्हे, म्हा, म्ही, आदिचें लघुच राही।
फोड करीन तयांची सादरता देउनी मनिं धरा ही॥
इतक्या सख्या उग्या हो! न व्याच चिमट्या मिट्या कुड्याचि नव्हा।
सुगुल्या उण्या पित्याच्या कुरथ्यापरि असुन द्या सुध्या चिप व्हा॥

न सुन्या वृत्ति तप्यांच्या सकप्यांच्या हृद्‌छिव्या उभ्या धि नव्या ।
सदम्या पुप्या भल्यांनीं दद्यासि भक्षू न ये हृदय खत व्या ।।
कृष्णेंत न्हा नव्हेचि तुम्हांसि यमभय तुम्ही सुखें स्वर्गी ।
नांदालचि म्हणत्यें अघ तस्कर शिर उडवुनी सुस्कृत स्वर्गी ”

परशुराम कवीच्या प्रस्तुत आर्यांकडे माझें लक्ष ओढण्याचें श्रेय, मुंबईचे मराठी ग्रंथसंग्रहालयाचे एक उत्पादक रा. नारायण महादेव बाक्रे यांच्याकडे आहे.

० ० ०

## १३ : भाषान्तरकार आणि त्यांचें मूळ परीक्षण

भाषान्तरकार हा आपलें काम करीत असतां कांहीं तरी चिकित्सातत्त्वें वापरीत असतो. तो जेव्हां भाषान्तरासाठीं विवक्षित ग्रंथ घेतो तेव्हां तो आपला निवड करण्याची शक्ति उपयोगांत आणतो व नंतर भाषान्तरास घेतलेल्या काव्यांपैकीं कांहीं भाग भाषान्तर करतो आणि कांहीं भाग सोडून देतो तेव्हां तो आपलें परीक्षण व्यक्त करीत असतो केवळ पुस्तक वाचून बरें-वाईट मत व्यक्त करणें निराळें आणि मूळ कवींचे ग्रंथ घेऊन त्यांतील कोणता भाग लोकांच्या पुढें मांडणें अवश्य आहे हें ठरविणें निराळें. पहिल्या कृतींत परीक्षण होतें तें लेखकाच्या तात्कालिक भावनांप्रमाणें व्यक्त होतें. दुसऱ्या प्रसंगीं परीक्षण होतें त्यांत अधिक सहृदयता बाळगून त्याच्या काव्यांतील ग्राह्य भागाची निवडानिवड केलेली असते आणि या दृष्टीनें भाषान्तरकाराचें भाषान्तर अभ्यासयोग्य आहे. जुने कवी घेऊन त्यांच्या मूळ ग्रंथांची भाषान्तराशीं तुलना करून काय फरक दिसतात ते नोंदून ठेवणें आणि ते फरक कां झाले यासंबंधाचा विचार करणें या तऱ्हेनें भाषान्तर-कारांच्या कृतींचा अभ्यास फारसा झाला नाहीं. काव्यसंग्रहकारांनीं मोरो-पंताच्या कांहीं भागाचा जो अभ्यास केला त्याचें स्वरूप पुढें दाखविलेंच आहे. त्या अभ्यासदिशेकडे लक्ष ओढण्यासाठीं मीं मागें एकदां जें लिहिलें आहे त्याचें अवतरण येथें करतों.

मराठी ग्रंथसमूह प्रचंड आहे, आणि त्याचा ऐतिहासिक अभ्यास झाला पाहिजे. या ऐतिहासिक अभ्यासाचीं अनेक स्वरूपें आहेत.

जो काळ फार जुना आहे त्या काळच्या सामाजिक स्थितीची माहिती मिळविण्यास कांहीं कवी उपयोगी पडतील. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीवरून महाराष्ट्राची सामाजिक स्थिति काढतां येई. व तसा प्रयत्न झालेलाहि आहे. पण जे कवी केवळ भाषान्तरवजा काव्यें लिहितात त्यांच्या या काव्य-

ग्रंथांचा अभ्यास कशासाठीं करावयाचा हा एक प्रश्न आहे. सकृत् दर्शनी असें वाटेल कीं, या अभ्यासाचें महत्त्वच नाहीं. कारण आपण ग्रंथ मूळांतूनच पहावे म्हणजे झालें. शिवाय श्लोकबद्ध भाषान्तराची आज किंमत काय? मोरोपंताचें भाषान्तर वाचावयाचें आणि दुर्बोध आर्यांचा अर्थ लावीत बसावयाचें ही तालीम कशासाठीं? मूळ महाभारत जर आज गद्यांत भाषान्तरलें गेलें आहे तर तेंच आपण कां वाचूं नये? अर्थात् हें म्हणणें अगदीं सयुक्तिक आहे. महाभारताची कथा परिचित करून घेण्याच्या दृष्टीनें मुक्तेश्वर, मोरोपंत यांची किंमत फार अल्प आहे. या काव्यवाङ्मयाचा उपयोग सामान्य जनतेस खरोखरच फार कमी होत जाणार. ज्याप्रमाणें एखादी नवी आवृत्ति निघाली म्हणजे जुनी आवृत्ति मागें पडते त्याप्रमाणेंच या भाषान्तरांची कथा आहे. संशोधकांखेरीज इतरांस या वाङ्मयाचा उपयोग फार अल्प आहे.

तथापि संशोधकांनीं मात्र यावर परिश्रम करण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, शिवलीलामृत घेतलें हें पुस्तक ब्रह्मोत्तरखंडाचें रूपान्तर आहे असें श्रीधर प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं बजावतो. पण आपण शिवलीलामृत आणि ब्रह्मोत्तरखंड हीं दोन पुस्तकें ताडून पाहिलीं तर आपणांस दोहोंमध्यें बराच फरक आढळून येतो. बऱ्याचशा कथा त्यांत सदृश आहेत, अनुक्रम भिन्न आहेत, यांसारख्या स्थूल गोष्टी जर सोडून दिल्या तरीदेखील लक्ष ओढणारे दुसरे अनेक फरक आढळून येतात. उदाहरणार्थ, शिवलीलामृतांत हरिहरांचा अभेद आहे असें मत मांडण्यांत आलें आहे, असला आग्रह ब्रह्मोत्तरखंडांत नाहीं. त्याप्रमाणें मंत्र गुरूपासून घ्यावा, मंत्र प्रत्यक्ष देवानें जरी दिला तरी गुरु हा केलाच पाहिजे इत्यादि मतें शिवलीलामृतांत मांडलीं आहेत त्याचा मूळ ग्रंथांत पत्ता नाहीं. हे दोन्हीहि फरक समानस्थितिदर्शक आहेत. याप्रमाणें दुसरे फरक काढतां येतील. ते फरक करण्यांत कवीचा उद्देश काय होता या तऱ्हेची चौकशी सुरू झाली म्हणजे त्या काळच्या बौद्धिक परिस्थितीवर प्रकाश पडेल; आणि असें अनेक कवींचें अध्ययन झालें म्हणजे ज्ञानेश्वराच्या कालापासून आतांपर्यंतचा वैचारिक इतिहास चांगल्या तऱ्हेनें लिहितां येईल. ही अभ्यासाची दिशा उपेक्षणीय नाहीं, आणि मराठी

वाङ्मयाचा अभ्यास सुरू करूं इच्छिणाऱ्यांनीं या दिशेनें अभ्यास करण्यास सुरुवात करावी असें आम्ही सुचवितों.

भाषान्तरांच्या तौलनिक अभ्यासानें कविकालीन सामाजिक स्थितीवर जास्त प्रकाश पडणार आहे तसाच कवीच्या मूलग्रंथविषयक कल्पनेवरहि प्रकाश पडणार आहे.

मराठी कवींनीं भाषान्तरासाठीं कोणते संस्कृत ग्रंथ घेतले हें पाहतां असें दिसेल कीं, त्यांनीं रामायण, महाभारत, भागवत या तीन ग्रंथांवर विशेष भर दिला आहे. कालिदासाच्या रघुवंश, कुमारसंभव आणि मेघदूत या काव्यांकडे त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. आणि यास कारणेंहि आहेत. एक तर माहितीच्या दृष्टीनें हे दुय्यम प्रकारचे ग्रंथ आहेत. रघुवंशांत जें रामचरित्र आहे त्या चरित्राची रामविषयक सत्यासंबंधानें काय किंमत आहे अशी शंका त्यांस वाटणें स्वाभाविक आहे. याशिवाय भाषान्तरकारांची काव्यदृष्टि संतकवींमध्यें वागत असलेलीच होती. तीमुळें कोटिक्रम आणि खल करणारें वाङ्मय त्यांना रुचलें नाहीं. त्या दृष्टीचें साहित्यशास्त्रसमर्थन जरी रामदासांनीं केलें आहे तरी त्या दृष्टीची परंपरा मुक्तेश्वरपूर्वकालापासून श्रीधरापर्यंत अव्याहत होती यांत शंका नाहीं. मुक्तेश्वर हा एकनाथाचा नातु व त्याला जरी वारकरी मंडळींत निश्चयानें घालतां येणार नाहीं तरी त्याची एकंदर काव्यविषयक दृष्टि एकनाथीय भावनांनीं तयार झाली यांत शंका नाहीं.

भाषान्तर करणाऱ्या सर्व मराठी कवींची काव्यविषयक वृत्ति याचें प्रस्तुत ठिकाणीं विवेचन शक्य नाहीं. कारण तो मोठा अभ्यास होईल. तथापि याविषयीं जी चर्चा अर्वाचीन लेखकांनीं केली आहे तिच्याकडे थोडेंसें लक्ष ओढतों.

महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण हा प्रकृत विषय आहे, महाराष्ट्रीय काव्याचें परीक्षण हा नाहीं; आणि यासाठीं महाराष्ट्रीयांनीं जेथें जेथें स्वभाषेंतील किंवा अन्य भाषेंतील काव्याचें परीक्षण केलें असेल तेथें तेथें व्यक्त केलेले विचार आपणांस येथें संग्राह्य आहेत. तथापि अनेक प्रसंगीं मनुष्य प्रत्येक विचार शब्दांनीं व्यक्त करीत नाहीं तर आपल्या कृतीनें आपले विचार व्यक्त करीत असतो. मागें जें प्रकरण लिहिलें आहे त्यांत महाराष्ट्रीय कवींनीं

आदरव्यक्ति भाषान्तर व अनुकरण इत्यादि निरनिराळ्या तऱ्हांनीं व्यक्त केलेली अभिप्रायदर्शनपद्धति समाविष्ट केली आहे.

मराठी कवींनीं ज्या कवितेविषयीं विचार व्यक्त केले आहेत, यांत त्यांनीं संस्कृत कवींच्या कृतींविषयीं किंबहुना कृतींच्या अंगाविषयीं जे विचार व्यक्त केले आहेत ते महत्त्वाचे आहेत.

भाषान्तरांची परंपरा मुक्तेश्वराच्या अगोदरच्या कालापासून सुरू होते, व मुक्तेश्वर आपणापेक्षां जुन्या कवींच्या भाषान्तरांवर टीका करतांना आपणांस दिसतो हें मागें दाखविलें आहेच.

भाषान्तरकारांविषयीं प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, त्यांनीं आधारग्रंथ एकच धरला नसतो. संस्कृतमधील एका विषयावरील एकच ग्रंथ घेऊन त्याची प्रतिकृति करावी ही कल्पना मुक्तेश्वरास रुचली नाहीं. त्यानें रामायण लिहितांना वाल्मीकि रामायण किंवा अध्यात्म रामायण यांची प्रतिकृति केली नाहीं तर रामायणाचा कथाभाग घेऊन जवळ जवळ स्वतंत्र रचना केली आहे व जें घ्यावयाचें तें अनेक ग्रंथांतून घेतलें आहे. यासंबंधानें कै. भावे यांची साक्ष येणेंप्रमाणें आहे. “ या ग्रंथांत आपल्या परिचयाच्या अनेक संस्कृत ग्रंथांतील कल्पनांचा कवीनें बराच उपयोग करून घेतला आहे. कांहीं ठिकाणीं तर जयदेवाच्या प्रसन्नराघवांतील, हनुमन्नाटकांतील व इतर संस्कृत ग्रंथांतील श्लोकांचीं भाषान्तरें करूनच तीं आपल्या ग्रंथांत योजिलीं आहेत.” ( महाराष्ट्र सारस्वत, पृ. १५० ). या प्रकारच्या रूपान्तरांत जो काव्यभाग कवीनें घेतला त्याविषयींची कवीची अभिज्ञता व्यक्त होते व त्या भागापुरतें मूळ आधारासाठीं घेतलेल्या मुख्य ग्रंथापेक्षां जास्त सरस असें दुसऱ्या कोणीं लिहिलें आहे याविषयींचें कवीचें मत व्यक्त होतें.

मुक्तेश्वरामध्यें जें स्वातंत्र्य दृष्टीस पडतें तें सर्व मूळ ग्रंथावरील आपलें मत व्यक्त करणारें नाहीं, किंवा सर्व दृष्टीनें समर्थनायदेखील नाहीं. भाषान्तर या दृष्टीनें मुक्तेश्वराची प्रतिकृति आपण तपासूं लागलों तर त्याचे कांहीं ठिकाणचे फरक असमर्थनीय होतात आणि स्वतंत्र काव्य या दृष्टीनें पाहूं लागलों तरी अर्वाचीन कालविषयक वर्णनें प्राचीन कालांत घालण्याचा दोष तरी राहतोच.

मुक्तेश्वरानें आपल्या भारतांत नवें काय घातलें आहे या विषयाची चर्चा करतांना रा. पांगारकर म्हणतात—

" मुक्तेश्वराच्या वाणींत जें अद्भुत ओज आहे त्याचें कारण सभोंवारच्या परिस्थितीकडे व समाजघटनेकडे राष्ट्रीय अभिमानानें पाहण्याचें अद्भुत सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें हें होय. हा विशेष लक्षांत ठेवला म्हणजे मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या भारतांची तुलना करतां येते. मुक्तेश्वरी भारतांत पोर्तुगीज, इंग्रज, रूमशाम, हबशान, अर्बस्तान, पठाण, जावी लोक वगैरेंचा उल्लेख येतां गोवध व देवब्राह्मणावज्ञा करणाऱ्या म्लेंच्छांना आर्य राजांनीं जिंकावें, अमात्यकोश जमवून किल्ले बांधावे, झुंजारबळा यांचे संघ करून त्यानें शत्रूंवर कोसळावें, शेतकीसाठीं कालवे बांधावे, परद्वीपींच्या अमोल्य वस्ता घेऊन स्वदेशपरदेशांचा व्यापार वाढवावा वगैरे प्रकारें खऱ्या आर्य राजांचें वर्णन मुक्तेश्वरी भारतांत आहे. तालमींतल्या कुस्त्यांचे डावपेंच, भोजन-शाखांतल्या विविध चटण्या व भाज्यांचीं कृतीसह वर्णनें, रात्र, प्रभातकाल, वर्षाकाल, राजा, प्रबळ मल्ल, तेजस्वी तपस्वी, रूपवती पतिव्रता, कुलटा, निर्झरोदकाचे पाट व गिरिकंदरें या सर्वांचीं अत्यंत ठसठशीत वर्णनें मुक्तेश्वरी भारतांत येतात." असें सांगून पुढें मोरोपंती भारताचें स्वरूप मुक्तेश्वरी भारताच्या स्वरूपापेक्षां निराळें आहे आणि मोरोपंत भारती वातावरण सोडून जात नाहीं वगैरे गोष्टी रा. पांगारकरांनीं सांगितलेल्या आहेत. भारतकथाकालीन वातावरण सोडून स्वकालीन गोष्टींचा उल्लेख करण्याविषयींचें मुक्तेश्वराविषयीं जें विधान हरिभक्त प. पांगारकरांनीं केलें आहे तेंच विधान शुभानंदाच्या महाभारताविषयीं करतां येईल. त्यानें भारतीयुद्धांत भाग घेणाऱ्यांमध्यें चीनमधून एक वीर आणला आहे. व इंग्रज, फ्रेंच वगैरे 'सप्तयवन' आणले आहेत. वरील प्रकारच्या फरकांमुळें कवीचें मूळ काव्याविषयींचें मत तर व्यक्त होत नाहींच. पण जें नवीनत्व घातलें आहे तेंदेखील कालविपर्यास करणारें आहे. त्याच्या योगानें कलेचा उत्कर्ष होतो कीं अपकर्ष होतो या वादांत आपणांस येथें पडण्याचें कारण नाहीं. तथापि मूळ ग्रंथास होतां होईतों चिकटून जेथें मूलग्रंथापेक्षां सुधारणा करण्याचें कार्य कवि करीत असतो त्या प्रकारच्या उल्लेखांकडे आपणांस लक्ष दिलें पाहिजे.

व म्हणून आपणांस मुख्यतः मोरोपंताकडेसच लक्ष दिलें पाहिजे. जातां जातां मुक्तेश्वराच्या माथीं कालविपर्यासाचा गुन्हा मारण्यापूर्वीं येथें हें सांगितलें पाहिजे कीं, झाडून साऱ्या संस्कृत कवींनीं हा गुन्हा केला आहे. रघुवंशांत रघूचा दिग्विजय वर्णन करतांना कालिदास स्वकीय काळांतली हिंदुस्थानची राजकीय स्थिति वर्णितो आणि पारसिकांना जिंकल्याचें सांगतो, व तीदेखील भूगोलविद्या बृहत्कथेंतून घेतलेली दिसते. कवीचा कालविपर्यास इतिहास-संशोधक इतका गृहीत धरतात कीं कवि जें वर्णितो तें वर्ण्यकालाचें चित्र न समजतां कविकालाचेंच समजावयाचें असें ठरलें आहे.

मोरोपंताची कविता पेशवाईच्या अंतिमकालापासून महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गांत बरीच प्रिय झाली असल्यामुळें जवळजवळ अव्वल इंग्रजीच्या काळा-पासून तिच्यावर विचार होत आहे. आणि त्या वेळेस जे वादविवाद झाले त्या वादविवादांत बरीच मंडळी गुंतली गेली. मोरोपंताची कविता ही प्रसिद्ध लेखमाला निबंधमालेंत चालू असतां विविधज्ञानविस्तारांत प्रत्युत्तरात्मक लेखमाला सुरू होती. तिचे लेखक कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर होते असें समजतें. त्या वेळेस मोरोपंताची व इतर मराठी कवींची कविता भाषान्तरात्मक कितपत आहे आणि स्वतंत्र कितपत आहे हा वादाचा मुख्य विषय होता. त्या वेळेस जो गुंजीकरांनीं उत्तरपक्ष केला त्यांतील कांहीं भाग आपणांस विचारार्ह आहे.

विविधज्ञानविस्ताराच्या १८८० सालच्या मे-जून-जुलैच्या अंकांत गुंजीकरांनीं असें दाखविलें आहे कीं मराठी कवींनीं कथासूत्रापेक्षां बरेंच जास्त संस्कृत ग्रंथकारांपासून घेतलें आहे. तरी त्यांच्या कृतीला भाषान्तर म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांना भाषान्तर करून यमकात्मक रचना करणें साधलें नसतें तें केवळ भाषान्तर नाहींच. संस्कृत ग्रंथांतील अनुक्रम, विचार, कल्पना व अलंकार हीं अनेक ठिकाणीं घतलीं आहेत पण त्यांत शब्दानुशब्द भाषान्तर नाहीं असेंहि अनेक उतारे घेऊन दाखविलें आहे. पुढें गुंजीकर असें दाखवितात कीं, मोरोपंतांनीं सप्तशतीसारख्या पुस्तकाचेंदेखील भाषान्तर करतांना नवीन अर्थालंकार घातले आहेत. मूळ ग्रंथांत कांहीं एक आधार नसतां पंतांनीं कोठें कोठें कथानकाचा संदर्भ रहावा, संगति बिघडूं नये

म्हणून स्वतःचा स्वतंत्र मजकूरहि घातला आहे. कांहीं ठिकाणीं मूळ ग्रंथांत दिसून येणाऱ्या विस्तारभीरुत्वाचाहि त्याग केला आहे. पण भगवद्गीतेसारख्या ग्रंथाचें मात्र भाषान्तरच केलें आहे. " गीतेशिवाय दुसरें भाषान्तर म्हटलें म्हणजे शंकराचार्यकृत प्रश्नोत्तरमालिकेचें आहे. व पंतांनीं 'रामगीते'चेंहि भाषान्तर केलें आहे असें आमच्या एका मित्राचें म्हणणें आहे. ह्या तीन ग्रंथांशिवाय पंतांचा भाषान्तररूप ग्रंथ आमच्या पाहण्यांत नाहीं. पंतांनीं 'गीते'चें भाषान्तर कां केलें या गोष्टीची उपपत्ति दुरूह आहे असें नाहीं. ह्या अध्यात्मविषयक ग्रंथांत शब्दालंकारास व अर्थालंकारास मुळींच अवकाश नाहीं. तेव्हां पंतांस भाषान्तर करणें हाच मार्ग पसंत पडला असावा. सप्तशतीमध्यें कथानकें असल्यामुळें भाषान्तर न करतां पंतांनीं आपल्या एकंदर काव्यसरणीचेंच अनुकरण केलें " गुंजीकरांचें हें विवरण आपणांस निराळ्याच तऱ्हेनें विचार करण्याजोगें आहे. या लेखांत मोरोपंतांनीं मूलकवीच्या लेखाचें भाषान्तर कोठें करावें आणि आपलें कवितास्वातंत्र्य कोठें दाखवावें याविषयीं आपली वृत्ति प्रगट केली आहे ती सामान्यपणें अशी मांडतां येईल. जेथें कथासूत्राला प्राधान्य असेल तेथें विचाराचा अपकर्ष होऊं नये म्हणून आपण आपली यमकाभिरुचिदेखील आडवी येऊं देऊं नये. यावरून मोरोपंत आपल्या भाषान्तरांत मूलार्थाच्या रक्षणा-साठीं मोठी काळजी घेत होता असें दिसून येतें.

मनुष्य जेव्हां काव्याचें भाषान्तर करतो त्या प्रसंगीं जेव्हां मूळापासून कांहीं फेरफार आपल्या रूपान्तरांत घालतो तेव्हां तो कांहीं फेरफारांत काव्य परीक्षणात्मक तत्त्वें वापरतो; सवच फेरफारांत वापरीत नाहीं हें वरील विवेचनावरून दिसून येईल; व त्याबरोबरच मूळ व भाषान्तर यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास आपणांस काव्यविषयक किती तरी नवीन गोष्टी समजतात हें लक्षांत येईल. प्रकृत प्रसंगीं आपला चौकशीचा विषय मर्यादित आहे. आपणांस भाषान्तर तपासतांना काव्यपरीक्षणात्मक विचार करून जे फेरफार केले असतील तेच लक्षांत घ्यावयाचे आहेत व मांडावयाचे आहेत.

मूळ कथेंत काव्याच्याच दृष्टीनें फेरफार करण्याचा संप्रदाय बराच जुना आहे. मूळ कथेंतील कांहीं भाग बदलण्याची क्रिया व ती करतांना मूळ

कवींवर आपला अभिप्राय व्यक्त करण्याचीदेखील क्रिया संस्कृत कवींनीं केली आहे. उदाहरणार्थ, वाल्मीकीनें सीतेचा जो शोकपर्यवसायी शेवट केला तो भवभूतीला पसंत पडला नाहीं, व त्यानें " भगवान् वाल्मीके, हाच तुझा काव्यार्थ काय ? " असे उद्गार काढून सीता व राम यांची भेट करवून दिली आहे. पण मोरोपंत रसोत्पत्तीसाठीं कथा बदलण्याइतकें स्वातंत्र्य घेत होता असें दिसत नाहीं; तर संक्षेप कोठें द्यावा, विस्तार कोठें करावा याविषयीं आपला भिन्न अभिप्राय क्रियेनें व्यक्त करीत आहे, तर कांहीं कथाप्रसंगानुसार आपले विचार व्यक्त करीत आहे. मूळ भारतीय वातावरणास चिकटून राहणाऱ्या मोरोपंताच्या ग्रंथाचें मूळ ग्रंथाशीं परीक्षण मराठी भाषान्तरतत्त्वें आणि भाषान्तरकाराचीं काव्यपरीक्षणतत्त्वें उत्तम तऱ्हेनें उजेडांत आणील यांत शंका नाहीं.

मोरोपंतांनीं आपले विचार महाभारताचें अवतरण करतांना जागोजाग व्यक्त केले आहेत त्याविषयीं ह. भ. प. पांगारकर मोरोपंतांचें चरित्र प्रकरण १५ यांत म्हणतात, " पंतांचें भारत वाचतांना मनोरंजनाबरोबर सदाचरणाचा बोध होऊन चित्त भक्तिरसांत वाहवतें. गुरु, शिष्य, पिता, पुत्र, राजा, बंधु, मित्र, वगैरेंचीं श्रेष्ठ कर्तव्यें काय आहेत, शान्ति, क्षमा, दया, परोपकार, कुलीनत्व, सत्त्व, धैर्य, इत्यादिकांपासून दुष्परिणाम काय आहेत; क्रोधादि षड्रिपु, दुराग्रह, द्यूत, कुसंगति इत्यादिकांपासून दुष्परिणाम काय होतात यासंबंधीं आपले विचार कधीं स्वतंत्रपणें अर्थान्तरन्यासाच्या पादांत आर्यार्धांत किंवा आर्येंत सहस्रशः घातले आहेत ते सर्व एकत्र केले म्हणजे मोरोपंत समाजांतले केवढ्या दर्जाचे नीतिशिक्षक होते हें समजतें "

वरील गोष्टी भाषान्तराची किंमत वाढवितात यांत शंका नाहीं; पण यांत कवीचा मूळावर अभिप्राय व्यक्त होत नाहीं, यासाठीं अभिप्राय स्पष्ट करणाऱ्या एका फरकाकडे लक्ष ओढतो.

कृष्णविजयांत श्रीकृष्णाचें चरित्र आहे. हें चरित्र लिहितांना मोरोपंतांनीं आपल्यापुढें ठेवलेला मूळ ग्रंथ भागवत हाच होय. या चरित्रांत श्रीकृष्ण-पुत्र सांब हा दुर्योधनसुता लक्ष्मणा हिचें हरण करतो, आणि पुढें लग्न होतें, असा कथाभाग आणला आहे. त्या कथाप्रसंगीं कौरवांच्या आणि यादवांच्या

बायका एके ठिकाणीं मिळून आपापल्या विवाहोत्सवकथा सांगतात असें दाखविलें आहे. हा प्रसंग मोहक आहे, आणि या प्रसगींच्या वर्णनास फार संक्षेप देऊन उपयोगी नाहीं असें मोरोपंताचें मत झाल्यामुळें मुळांत जरी हा प्रसंग थोडक्यांत सांगितला आहे तरी मोरोपंतांनीं त्याचें वर्णन सविस्तर दिलें आहे. याविषयीं पांगारकर म्हणतात, " रुक्मणी आपल्या विवाहाची कथा पहिल्यापासून मोठ्या आवडीनें, अभिमानानें, मोकळेपणानें, आपल्या मैत्रिणींना सांगत आहे या मनोरम प्रसंगाचें वर्णन करावयाला पंतांसारख्या गृहसुखाची गोडी जाणणाऱ्या प्रेमळ सुजनानें हातीं लेखणी धरावी. वैदर्भी-विवाहाची कथा मूळांत एकाच साध्या श्लोकांत आटपली आहे पण प्रस्तुत ग्रंथ कृष्णचरित्रपर होय हें तारतम्य जाणून पंतांनीं येथें तिचा फार मार्मिक-पणानें विस्तार केला आहे; व कृष्णविवाहाची गोष्ट उघडच रुक्मिणीला अधिक खरेपणानें स्वानुभवाच्या धिटाईनें व उल्हासानें सांगतां येईल हा भाव मनांत आणून पंतांनीं ती रुक्मिणीकडूनच वदविली आहे रुक्मिणी आपल्या विश्वासाच्या मैत्रिणीच्या मंडळांत स्त्रीस्वभावाला अनुसरून अशा साध्या गोडसरस वाणीनें ती सांगत आहे." ही कथा येथें देण्याचें कारण नाहीं. येथें दाखवावयाची गोष्ट हीच कीं पंतांनीं येथें मूळ ग्रंथभागावर मत व्यक्त केलें आहे. मोरोपंतांस असें वाटलें कीं प्रस्तुत प्रसंगाचा उपयोग कवीस कसा करून घेतां येईल याविषयीं मूळ ग्रंथकारास चांगली कल्पना आली नाहीं. येथें अर्थात् मोरोपंतांनीं मूळ ग्रंथांतील भागावर आपलें मत त्या ग्रंथाची अनुकृति करण्याचें नाकारून व्यक्त केलें आहे. आपणांस भाषान्तरां-पासून काव्यपरीक्षण काढण्यास असलींच स्थळें शोधलीं पाहिजेत.

मोरोपंतांनीं रूपान्तर करतांना जे फरक केले त्यांचा विचार करतांना प्रथम मोरोपंतांच्या महाभारतीय वृत्तीचा विचार केला पाहिजे.

महाभारत हा ग्रंथ असा आहे कीं, तो पूर्वीं बराच लहान होता आणि त्यांत अनेक गोष्टी पुढें घातल्या गेल्या जाऊन ग्रंथविस्तार झाला. निरनिराळ्या लोकांनीं आपापल्या हेतूसाठीं महाभारतांत आपल्या इच्छेला येईल तें घुसडावें हा प्रकार अनेक शतकें चालू होता. त्यामुळें महाभारत हा ग्रंथ तीनदां जरी संपादिला गेला तरी मूळ कथाभाग आणि आंत घालावयाचीं आख्यानें व

उपाख्यानें यांच्यामध्यें वर्णनकथनाच्या बाबतींत प्रमाणतत्त्वावलंबन राहिलें नाहीं. भाषान्तरकारापुढें हें वाङ्मय एकदमच पुढें राहिलें म्हणजे भाषान्तरकाराला प्रतिकृति करतांना प्रत्येक कथाभागाच्या लांबी-रुंदीविषयीं विचारच केला पाहिजे. भाषान्तरकाराला आपला ग्रंथ आकर्षक करावयाचा असतो. वाचक त्याचे परीक्षक असतात. ते मूळ ग्रंथाची प्रतिकृति मूळच्या प्रमाणांत झाली कीं नाहीं हें न पाहतां आकर्षक झाली किंवा नाहीं हेंच पाहणार. मोरोपंतास यासाठी भाषान्तर आकर्षक करण्याची जरूर होती; व म्हणून मोरोपंतांनीं सबंध भारताचा गोषवारा केला. पण त्यांनीं प्रत्येक भागांत संक्षेप सारखाच दिला नाहीं. मोरोपंत संक्षेप सारखाच देत गेले असते तर त्यांस केवळ भाषान्तरकार म्हणतां आलें असतें, तथापि त्यांनीं संक्षेप निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रमाणानें दिला आहे तर कित्येक ठिकाणीं विस्तारहि केला आहे. आपल्या बदलांनीं मोरोपंत आपलें महाभारताचें स्वरूप कसें असावें याविषयीं मत व्यक्त करतात काव्यसंग्रहाच्या संपादकांनीं मोरोपंतांच्या महाभारतांतील निरनिराळ्या भागांचा संक्षेप मूळाशीं ताडून पाहिला आहे. तो ताडून पाहतांना त्यांनीं मोरोपंत हा केवळ भाषान्तरकार नव्हता हेंच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे यासाठीं त्यांनीं चर्चेंत मोरोपंतांनीं नवीन अलंकार कोणते घातले वगैरे गोष्टींचाहि ऊहापोह केला आहे. आपणांस विशेष लक्ष देण्याजोगा भाग म्हटला म्हणजे मूळ ग्रंथाच्या मांडणींत कोठें संक्षेप हवा होता, कोठें विस्तार हवा होता याविषयींचें मोरोपंतांचें त्यांच्या भाषान्तरावरून व्यक्त होणारें मत हा आहे; आणि यासाठीं काव्यसंग्रहकारांच्या चर्चेंतील तेवढ्याच भागाकडे आपण लक्ष देऊं. संक्षेपविस्तारविषयक विवेचन काव्यसंग्रहकारांनीं महाभारताच्या प्रत्येक भागावर केलेलें नाहीं.

शल्यपर्वः—या पर्वाचा रा. नारायण चिंतामण केळकर यांनीं वामन दाजी ओकांनीं घालून दिलेल्या तौलनिक पद्धतीनें चांगला अभ्यास केला आणि त्या अभ्यासाचें फल त्यांनीं आपल्या मोरोपंताच्या शल्यपर्वाच्या प्रस्तावनेंत दिलें आहे. त्यांनीं मोरोपंताचा संक्षेप-विस्तार दाखविण्यासाठीं जें शल्यपर्वाचें मूळाशीं तुलना करणारें कोष्टक केलें आहे तें पुढें देतों.

| विषय | मोरोपंती आर्या | मूळ श्लोक | मूळ अध्याय | मोरोपंती अध्याय |
|---|---|---|---|---|
| धृतराष्ट्रमोह | ९ | ५५ | १ | अध्याय १ ला |
| धृतराष्ट्र विलाप | १९ | ७० | २ | |
| कौरवसैन्यपलायन | २ | ६१ | ३ | |
| कृपाचार्यांचें भाषण | ५ | ५१ | ४ | |
| दुर्योधनाचें भाषण | २५ | ५२ | ५ | |
| शल्य दुर्योधन संवाद | ८ | ३० | ६ | |
| शल्यास सेनापत्याभिषेक | १४ | ४६ | ७ | |
| व्यूहनिर्माण | ८ | ४५ | ८ | अध्याय २ रा |
| संकुल युद्ध | २ | ४७ | ९ | |
| ,, | ४ | ६८ | १० | |
| भीमसेन शल्य युद्ध | ९ | ६३ | ११ | |
| संकुल युद्ध | १५ | ६३ | १२ | |
| शल्ययुद्ध | ८ | ४८ | १३ | |
| संकुल युद्ध | १२ | ४८ | १४ | |
| ,, | ५ | ४३ | १५ | |
| शल्य व धर्म यांचें युद्ध | १६ | ६८ | १६ | |
| शल्यवध | २९ | ९१ | १७ | |
| संकुल युद्ध | १३ | ३० | १८ | अध्याय ३ रा |
| ,, | १९ | ६९ | १९ | |
| शाल्ववध | ५ | २७ | २० | |
| सात्यकी व कृतवर्म यांचें युद्ध | ५ | ३७ | २१ | |
| संकुल युद्ध | ४ | ४९ | २२ | |
| ,, | ३ | ९२ | २३ | |
| ,, | ३७ | ६६ | २४ | |
| दुर्योधनाचें पलायन | १९ | ६३ | २५ | |

| विषय | मोरोपंती आर्या | मूळ श्लोक | मूळ अध्याय | मोरोपंती अध्याय |
|---|---|---|---|---|
| धृतराष्ट्राच्या ११ पुत्रांचा वध | ५ | ४२ | २६ | अध्याय ४ था |
| सुशर्म्याचा वध | २२ | ५७ | २७ | |
| शकुनी व उलूक यांचा वध | १२ | ६८ | २८ | |
| ह्रदप्रवेश | ४८ | १०५ | २९ | |
| एकूण... | ३८२ | १६६७ | २९ | |

अश्वमेधपर्वः—या पर्वांतील संक्षेपविस्तारावर भिडे व जोशी यांचा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे—

" मूळ व्यासकृतीचें अवलोकन केलें असतां असें आढळतें कीं, अध्यायसंख्येच्या मानानें शान्तिपर्व अनुशासनपर्वाच्या दुप्पट आहे, व अनुशासनपर्व अश्वमेधपर्वाच्या पावणेदोनपट आहे. परतु पंतांच्या आर्याभारताचा सर्वच आखाडा निराळा. त्यांचा क्रम अगदीं उलट; म्हणजे अश्वमेधपर्व अनुशासनपर्वाहून मोठें, व अनुशासनपर्व शान्तिपर्वाहून मोठें ! परंतु ज्या विशिष्ट धोरणावर कटाक्ष देऊन पंतांनीं आपल्या आर्याभारताची उभारणी केली, त्या धोरणाशीं वरील प्रकार अगदीं सुसंगत आहे. आर्याभारतांत पांडवांचा सरळ आटोपशीर इतिहास द्यावयाचा, मधून मधून बोधप्रद, रसाळ व मनोरंजक अशीं अवान्तर आख्यानें समाविष्ट करावयाचीं, व वेदान्त, तत्त्वज्ञान, नीति इत्यादि विषयांसंबंधीं गहन, लांबट व सामान्य जनांस कंटाळवाणें होणारें विवेचन साफ गाळावयाचें, हें तत्त्व पतांनीं सतत आपल्या दृष्टीपुढें ठेविलें होतें. या मोरोपंती बाण्याचाच वरील परिणाम होय. शान्ति व अनुशासन या पर्वांत पांडवांचा इतिहास फारच अल्प असून तीं पर्वें बहुतेक तात्त्विक विषयांनींच खचलेलीं आहेत; परंतु अश्वमेधपर्वांत धर्माच्या व अर्जुनाच्या चरित्रांतील महत्त्वाचा भाग आला असून, तात्त्विक विषयांचा विन्यास त्या मानानें फारच संकुचित आहे. तेव्हां आर्याभारतांत पंतांना घेण्यासारखा

भाग शान्तिपर्व व अनुशासनपर्व यांपेक्षां प्रस्तुत पर्वांतच अधिक आहे व पंतांनीं जो भाग या पर्वांतून घेतला आहे त्यांत फारसा संक्षेप केला नाहीं, इतकेंच नाहीं तर ठिकठिकाणीं फारच रसाळ, समयोचित व आल्हादजनक वर्णनविस्तार केलेला आहे. यास्तव पंतांचें अश्वमेधपर्व उपरिनिर्दिष्ट दोन पर्वांपेक्षां सहज मोठें झालें आहे."

मूळ व्यासकृत महाभारतांत या पर्वांचे ९२ अध्याय आहेत. पैकीं, कृष्ण व धर्म यांचा तात्त्विक संवाद ( अध्याय ११ – १५ ), अनुगीता ( १६ – १९ ), ब्राह्मणगीता ( २० – ३४ ), व गुरुशिष्यसंवाद ( ३५ – १५ ) या गहन विषयांनीं ४० अध्याय व्यापिले आहेत. तेव्हां तेवढे अध्याय सोडून बाकीच्या ५२ अध्यायांवर पतांनीं चांगलीच विस्तृत टीका केली आहे. मूळांतील वर्णन साधें, बोजड व पाल्हाळिक असतें; परंतु मोरोपंतांचें वर्णन खुबीदार अलंकारिक, टापटिपीचें व मोजक्या शब्दांत विपुल अर्थ सांठून राहील अशा थाटाचें असतें, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे मोरोपंतांनीं केलेल्या विस्ताराचें खरें स्वरूप लक्षांत येईल. नुसत्या पद्यसंख्यांवरून संक्षेपविस्ताराविषयीं केलेले हिशोब बरोबर होणार नाहींत. कित्येक वेळां एका मोरोपंतांनीं गीतेचें संस्कृतांत भाषान्तर करावयाचें म्हटलें तर अनुष्टुभ् वृत्ताचे महाभारतांतील रचनापद्धतीचे तीन-तीन चार-चार श्लोक बनवावे लागतील. तेव्हां पद्यसंख्येवरूनच संक्षेपविस्ताराविषयीं केलेलीं विधानें अनेक वेळां भ्रामक ठरण्याचा संभव आहे, हें उघड आहे.

आश्रमवासिक धर्म :— मोरोपंतांच्या या पर्वांचें संपादन करण्याचें काम बाळकृष्ण अनंत भिडे व दत्तात्रेय केशव जोशी यांनीं केलें ते या पर्वाविषयीं लिहितात : " मूळ व्यासकृत महाभारतांत या पर्वांत एकंदर ३९ अध्याय आहेत. यांत कोठेंहि उपाख्यानांच्या व तात्त्विक विषयांवरील लांबच लांब ऊहापोहाच्या रूपानें विषयान्तर झालेलें नसून, धृतराष्ट्राच्या चरित्रांतील वरील कलमांत निर्दिष्ट केलेला कथाभाग विस्तारशः उतरलेला आहे या पर्वावरील पंतांची ही सताध्यायात्मक मराठी टीका चांगली विस्तृत आहे, व त्यांनीं मूळांतील कथाभाग कोठेंहि वगळलेला नाहीं. पर्वांतील दरोबस्त कथाभाग धृतराष्ट्रपांडवांच्या प्रत्यक्ष जीवनचरित्रांतीलच असल्यामुळें, पंतांनीं या

ठिकाणीं आपली संक्षेपाची कातर न चालवितां, विस्तारकलेचा स्वतंत्रतेनें प्रयोग केला आहे.''

मोरोपंती महाभारताच्या शेवटच्या तीन पर्वांचें प्रसिद्धीकरण करतांना संपादक ( भिडे व जोशी ) थोडेसे असंतुष्ट होऊन म्हणतात :—

" पंतांच्या सक्षेपकौशल्याचे आजपर्यंत टीकाकारांनीं अनेक वेळां बरेच गोडवे गाइलेले आहेत. परंतु आख्यानामागून आख्यानांचे निवळ नामनिर्देश करून त्यांना फांटा देणें यांत कौशल्य कोठें आहे हें आम्हांस समजत नाहीं. पांडवप्रताप पंतांनीं अगदीं विस्तृतपणें वर्णिला आहे. मधून मधून एखादें हरिदासांस उपयोगी असें चटकदार आख्यान आढळल्यास त्याचाहि त्यांनीं आदर करून विस्तार केलेला आढळतो. नलदमयंतीकथानक रामायणकथा, उत्तंकाख्यान, दुर्वासभिक्षा वगैरे कथानकें या तऱ्हेचीं आहेत. पांडवचरित्राशीं निकट संबंध असणारी ' विदुरनीति ' ' कणिकनीति ', ' कृष्णनीति ऊर्फ भगवद्गीता ', भीष्मांनीं केलेलें ' धर्मकथन ', ' उपगीता ', ' अनुगीता ', वगैरे सर्व प्रकरणें हरिदासापयोगी आख्यानें सजावण्याच्या कामीं नालायक व काव्यसरणीशीं विसंगत म्हणून सोडून दिलीं आहेत, हेंहि त्यांच्या मूळ धोरणाला धरूनच आहे. प्रसंग प्रस्तुत असताहि पंतांनीं कित्येक ठिकाणीं ग्रंथविस्ताराला भिऊन संक्षेप केलेला आढळतो आणि अशा स्थळीं ग्रंथसंक्षेप करण्याची त्यांची पद्धति जरा मजेची आहे. उदाहरणार्थ, विराटपर्वांत कर्णानें द्रोणाचार्यांची निंदा करून निष्कारण उपमर्द केलेला आहे. त्या वेळचें कर्णाचें आत्मप्रौढीयुक्त गरलकटुभाषण, पांच–सहा आर्यांत मोठ्या सफाईनें वठवून, पुढें पंत म्हणतात :—

**खळकृत गुरुनिंदेतें वर्णील कधीं न विस्तरें सुकवी ।**
**कीं ती श्रीगुरुभक्तिप्रेमामृत पादपांकुरा सुकवी ॥ ९ ॥**

पण पांडवचरित्राच्या अखंड सूत्राच्या रोखानें काव्यमार्ग आक्रमणाऱ्या पंतांनीं आजूबाजूचीं विस्तीर्ण स्थळें व गहनतत्त्वाच्या गुहा हीं टाळलीं, यांबद्दल त्यांचें कौतुक करणें, म्हणजे महाराजधानीचें सामग्र्यानें चित्र चितारणाऱ्या चिताऱ्यानें गहन अरण्यें, वन्य श्वापदें, साहरासारखीं वाळवंटें किंवा एकमेकांत घोटाळणारे लहानमोठे बोळ हीं चितारलीं नाहींत, म्हणून त्यांचें कौतुक करण्यासारखें तत्त्वदृष्टीला भासतें."

आतां मोरोपंताच्या कृष्ण विजयाच्याकडे वळूं.

मोरोपंताच्या महाभारतांत संकोचविस्तार कसा काय झाला आहे याविषयीं स्थूल विवेचन आतांपर्यंत दिलें आहे. आतां कांहीं विशिष्ट उदाहरणें घेऊन मोरोपंताच्या फरकांची समर्पकता व त्यावरून मोरोपंताचें मूलग्रंथवैगुण्य-विषयक मत लक्षांत घेऊं.

मोरोपंताच्या महाभारताचें जसें तौलनिक परीक्षण झालें आहे तसेंच त्यांच्या बृहद्दशमाचें म्हणजे कृष्णविजयाचेंदेखील वामन दाजी ओकांनीं केलें आहे. व त्यांनीं भाषान्तरकारानें मूळापासून केलेले फरक आपल्या आवृत्तीच्या टीपांत दाखविलेले आहेत. त्या टीपांच्या साहाय्यानें पुढील विवेचन केलें आहे.

( १ ) मथुरेवर जरासंध स्वारी करावयास येतो पण पराभव होऊन परत जातांना त्यास " विजनवनीं तप करावें " किंवा भूमिधर गुहेंत दडावें अशी इच्छा उत्पन्न होते. तथापि तो पुढें तसल्या इच्छेपासून परावृत्त होऊन पुन्हा कार्यास लागतो, असा कथाभाग आहे; तर पंताच्या मनानें त्यास पुन्हां कार्यप्रवृत्त होण्यास कोणी तरी प्रेरक झालें पाहिजे असें वाटलें, म्हणून पंत जरासंधास वनमार्गीं कोणी तरी राजे भेटवितात. ते राजे जरासंधास—

हो सावध नृपरत्ना पुनरपि विजयार्थ सिद्ध हा करी यत्ना ।
आम्ही सर्व सहाय, प्रभु तूं, यादव वराक ते किती काय ? ॥ २९ ॥
कोण पराभव नाहीं पावत हें नीतिबुद्धिच्या भवनाही ।
आणावें स्वमनींच, व्याकुळ होतात पावतां श्रम नीच ॥ ३० ॥

येणेंप्रमाणें उपदेश करतात असें मोरोपंतांनीं स्वेच्छेनें वर्णिलें आहे.

( २ ) जेव्हां रुक्मिणीकडून ब्राह्मण कृष्णाकडे जातो तेव्हां आपण काय कामासाठीं आलां हा प्रश्न विचारतांना कृष्णाच्या व्याख्यानाचा मोरोपंतांनीं संकोच केला आहे.

( ३ ) जरासंधानें रामकृष्ण ज्या पर्वतावर होते त्या पर्वताभोंवतीं लाकडें जमवून आग लावून दिली त्या वेळेस रामकृष्णांच्याविषयीं जो द्वेष जरा-संधाच्या मनांत होता तो व्यक्त करण्यासाठीं मूळापेक्षां वर्णन जास्त विस्तृत केलें आहे.

अनुक्रम क्रमांक नों: दि

( ४ ) कृष्णाकडे संदेश पोंचवून ब्राह्मण रुक्मिणीस भेटण्यासाठीं आला तेव्हां त्यास अरुणाची आणि कृष्णास सूर्याची व रुक्मिणीस नलिनीची उपमा दिली आहे. ही उपमा साधीच आहे, पण हा प्रसंग मोरोपंतांच्या दृष्टीनें अधिक काव्ययुक्त वर्णन करण्याजोगा होता व या प्रसंगीं मूळ ग्रंथानें तशी उपमा दिली नाहीं हें व्यंग आहे, असें मोरोपंतास वाटत असावें.

( ५ ) कृष्ण रुक्मिणीला रथांत घेऊन जातो, विदर्भसैन्य युद्धतत्पर होतें, अशा प्रसंगीं कृष्ण रुक्मिणीस धीर उत्पन्न होण्यासाठीं आपल्या सैन्याचें शौर्य व मोठेपणा सविस्तर वर्णन करतो; हें सविस्तर वर्णन मुळांत नाहीं म्हणून मोरोपंतांनीं वाढविलें आहे.

( ६ ) रुक्मिणीच्या उदरीं मदन जन्मला, त्या प्रद्युम्नास शंबर आकाशमार्गानें जन्मल्याबरोबर उचलून नेतो. हा प्रसंग उपमागौरवास लायक आहे असें मोरोपंतांस वाटून त्यांनीं या प्रसंगीं

" जैसा कीं मृगशावकास पळवी भक्षावया लांडगा "

अशी उपमा दिली आहे. म्हणजे या प्रसंगीं उपमा खर्चीं न घालण्यांत मूळ ग्रंथकारानें चूक केली असेंच मोरोपंतास वाटत होतें.

( ७ ) जेथें मूळ ग्रंथांतील वर्णन मोरोपंताच्या वर्णनापुढें अगदीं फिकें वाटतें असें एक स्थल कै. वामन दाजी ओक दाखवून देतात. तें म्हटलें म्हणजे जेव्हां प्रद्युम्नाची आणि रुक्मिणीची भेट होते तो प्रसंग होय. मोरोपंतांनीं या प्रसंगीं मूळ अगदींच बाजूला ठेवून आपल्या अभिरुचीप्रमाणें वर्णन केलें आहे. हा प्रसंग पुढीलप्रमाणें मोरोपंत वर्णितातः—

रुक्मिणी

म्हणे " हा कोण श्री यदुपतिसम श्री नरमणी
गमे या पुत्रास प्रसवलि नराची न रमणी ॥
अशा रत्नाची जी खनि जनि तिचा धन्य कुसवा
स्वयें याचें वृत्त प्रियसखि पुसा गे न पुसवा ॥
या लावण्यांबुधीला अनुसरलि असे जी अनन्या नईचें ।
पत्नीचें भाग्य लोकीं अतुलसुकृत जे मोजवे तें न ईचें ॥

ती धन्या होय ऐसे विमळ उपजलें रत्न ऐशा कुशीला ।
न स्पर्शावी तुला बा रुचिरतरतनो दृष्टि जी कीं कुशीला ।।
माझाही पहिला अनिर्दश शिशू नेला स्वगेहांतुनी
दैवें हारपला अनर्घ्य सुमणी जैसा पडे हातुनी ।
तो जीवंत असेल शंकरदयाधात्री निजांकी जरी
वाटे बुद्धिस येवढाचि सुवयें झाला असावा तरी ।।

याच्यापुढें आणखी चार श्लोकांत रुक्मिणीचें भाषण पुरें होतें. एवंच हा प्रसंग सविस्तर वर्णन करण्याजोगा आहे असें मोरोपंतास वाटलें.

रुक्मिणीच्या मनाला या प्रसंगीं जें काय वाटलें, किंबहुना जी शंका उत्पन्न झाली ती निवारण करण्यासाठीं कोणी तरी यावयासच पाहिजे होता. तसा कथेंत आला. कृष्ण 'विश्वसाक्षी' होता, त्यास सर्व 'कळे न परि तो वदे.' तेव्हां नारद आला आणि त्यानें सत्य सांगितलें असें मूळांत वर्णन आहे. पण मोरोपंताच्या मतें नारदाचें, सविस्तर वर्णन हवें होतें; तो नारद होता एवढेंच सांगणें पुरेसें नव्हतें म्हणून मोरोपंतांनीं 'जो लोकत्रितयीं फिरे' वगैरे वर्णन केलें आहे.

कृष्णविजयाच्या उत्तरार्धांतील पहिल्या थोड्या पानांत हीं फरकाचीं उदाहरणें सांपडतात, व असे फरक जागोजाग दिसत आहेत. आज आपणांस वाचतांना असें वाटतें कीं, मोरोपंतांनीं हे केलेले फरक योग्य आहेत आणि यावरून मोरोपंतांस मूळ ग्रंथांतील अनेक स्थलांची सौंदर्यदृष्टीनें अपूर्णता भासत होती हें उघड आहे. मोरोपंतांचें काम केवळ मूळ ठिकाणची अपूर्णता शोधावयाची एवढेंच नव्हतें. ती अपूर्णता जर त्यांनीं वारंवार दाखवून दिली असती तर तो भागवताचें काव्यदृष्टीनें परीक्षण करणारा ग्रंथच झाला असता. पण मोरोपंतांचें कार्य केवळ मूलकृतिपरीक्षण नसून नवकृतीकरण हें होतें. काव्यपरीक्षणाच्या पुढची कृति त्यास करावयाची होती. कल्पना करा कीं, एका इमारतीप्रमाणें दुसरी एक इमारत बांधली आहे. दुसरी इमारत बांधतांना स्थूलपणें जरी दोन्ही सारख्याच दिसल्या तरी पहिली व नंतरची या दोन्ही इमारतींत पुष्कळ फरक आहे. अशा वेळेस दुसरी इमारत बांधणाऱ्या मनुष्यास पहिल्या इमारतीवर टीकाच करावयाची नसते

तर त्याच्या दृष्टीनें जे दोष असतील ते नवीन इमारतींत टाळावयाचे असतात. या एका दृष्टीनें तो काम करतांना आपलें वास्तुपरीक्षणशास्त्र वापरीत असतो. तो प्रत्येक फरक करतो तो मूळांतील दोष आहे असें वाटूनच करीत नसतो, तर त्यास निराळ्या गरजांची जाणीव असते म्हणून तो कांहीं फरक करतो, तर कांहीं प्रत्यक्ष सौंदर्यविषयक सुधारणाच असतात. भाषान्तरकाराचेंहि तसेंच आहे. तो कांहीं फरक निराळ्या जनतेला विषय समजावून द्यावयाचा म्हणून करतो तर कांहीं फरक काव्य अधिक सुंदर करण्यासाठीं करतो. आणि यासाठीं भाषान्तरांतील फरकांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

दुसरी इमारत बांधणारा किंवा भाषान्तर करणारा हे दोघेहि मूळ कृतीचे टीकाकार आहेत; पण ते बेजबाबदार टीकाकार नाहींत, तर ते आपणास कृति करावी लागणार आहे तर आपणांस मूळ कसें सुधारतां येईल म्हणून विधायक विचार करणारे टीकाकार आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मोरोपंतांनीं जे फरक केले आहेत त्यांवरून त्यांचें काव्यविवेचकत्व चांगलेंच दिसून येतें. वर दिलेल्या उदाहरणांत जीं तत्त्वें दिसून येतात तीं येणेंप्रमाणें:—

( १ ) जेव्हां मनुष्य आपला बेत बदलतो आणि निराशेच्या क्षोभास दूर सारतो तेव्हां त्यास कर्तृत्वास प्रेरणा कशी झाली हें समजावून दिलें पाहिजे.

( २ ) कृष्णास जेव्हां रुक्मिणीचा निरोप कळवावयाचा होता तेव्हां वाचक तो निरोप ऐकण्यासाठीं उत्सुक असतो, आणि यासाठीं निरोप घेऊन येणाऱ्या मनुष्याच्या स्वास्थ्याच्या चौकशीचें व्याख्यान उपयोगी नाहीं.

( ३ ) नववधू नवऱ्याबरोबर जात असतां व त्यांत नवऱ्यावर संकट आलें आणि तें आपल्यामुळें आलें अशी भीति तिच्या मनांत वाटत असतां तिला धीर आणि नवऱ्यावर विश्वास हीं उत्पन्न होण्यासाठीं कांहीं तरी नवऱ्यानें सांगितलें पाहिजे. पण तें बढाईचें सांगून उपयोगी नाहीं, यासाठीं कृष्णानें यादवदळाच्या शौर्याचें वर्णन सविस्तर करणें अवश्य आहे.

( ४ ) ब्राह्मण रुक्मिणीस येऊन भेटतो तेव्हां त्याच्या आगमनानें तिला उल्हास उत्पन्न होतो, त्या प्रसंगीं उपमायुक्त वर्णन करण्यास कवीनें चुकूं नये.

( ५ ) नूतन जन्म पावलेल्या बालकाचें हरण होतें तेव्हां तो प्रसंग उपमार्ह आहे.

( ६ ) आईला आपलें नष्ट झालेलें बालक दिसतें पण त्यास ती एकदम ओळखीत नाहीं, पण तिला संदेह उत्पन्न होतो तेव्हां तो प्रसंग विशेष कौशल्यानें आणि विस्तारानें वर्णन करण्याजोगा आहे.

( ७ ) जेव्हां नारदासारख्याच्या वचनानें आई अगदीं अपरिचित तरुणाचा आपला मुलगा म्हणून स्वीकार करते तेव्हां नारदाचें महत्त्व विशेष सविस्तर वर्णिलें पाहिजे.

येणेंप्रमाणें मूळग्रंथाचें मोरोपंतांकडून परीक्षण होऊन त्यांनीं आपला कृष्णविजय लिहिला हें स्पष्टच आहे.

मराठींतील भाषान्तरें पुष्कळच आहेत, आणि त्या भाषान्तरांत कवीचें मूळग्रंथावर परीक्षण दिसून येतें. भाषान्तरांतील भेदस्थळें गोळा केलीं म्हणजे भाषान्तरकारांचीं मूळग्रंथविषयक मतें कळतात. भारत, भागवत, रामायण हे ग्रंथ मोठाले आहेत, त्यांत प्रसंग अनेक आणि अत्यंत विविध आहेत, आणि त्यांपैकीं अनेक प्रसंगीं भाषान्तरकारांना मूळग्रंथांतील वर्णन अपूर्व किंवा कमी सरस वाटून त्यांनीं आपापल्या मतीनें फरक केले आहेत. यांचा जसजसा जास्त अभ्यास होईल तसतसें भाषान्तरकारांचें मूळग्रंथपरीक्षण अधिक स्पष्ट होईल. तें परीक्षण आज अत्यंत व्यापकपणें करण्यास अवकाश नाहीं, तथापि मोरोपंतांच्या ग्रंथांतील फार थोड्या पानांच्या तौलनिक अवलोकनावरून एवढें तरी खात्रीनें पटतें कीं मोरोपंतांची काव्याभिरुचि उच्च तऱ्हेची होती. हातांशीं घेतलेला ग्रंथ काव्यदृष्टीनें निर्दोष नाहीं, तर त्यांत सुधारणेस अवकाश पुष्कळ आहे याची मोरोपंतांस चांगलीच जाणीव होती, आणि काव्यपरीक्षण इतिहासांत भाषान्तरकर्त्यांनीं दाखविलेलें काव्यपरीक्षण ही मोठी महत्त्वाची बाब आहे.

० ० ०

भाषान्तरकार मूळचा स्वीकार करून किंवा त्याग करून किंवा संक्षेप विस्तार करून आधारग्रंथाविषयीं आपलें काव्यपरीक्षण कसें व्यक्त करतात हें मागें दाखविलेंच आहे. या विवेचनामुळें कवींनीं काव्यपरीक्षणशक्ति वापरल्याचें आपणांस दिसून येईल. आतां चरित्रकारांनीं चरित्राविषयीं होणाऱ्या व्यक्तीच्या ग्रंथाविषयीं कितपत परीक्षणवृत्ति दाखविली आहे हें पाहूं. संतचरित्राचें वाङ्मय मराठींत सपाटून आहे हें पुढील आढाव्यावरून लक्षांत येईल.

मराठी संतकवींचे चरित्रकार कांहीं उपयुक्त काव्यचर्चा करीत असतील अशा अपेक्षेनें जर आपण त्यांचे काव्यग्रंथ चाळूं लागलों तर मात्र निराशा होईल. चरित्रकारांचें संत म्हणून व्यक्तींकडे लक्ष होतें, आणि अनेक चरित्रकार त्यांच्या ग्रंथाविषयीं कांहींच उल्लेख करीत नाहींत. किंबहुना त्या व्यक्ती त्या चरित्रकारांस लेखक म्हणून ठाऊक नसून संत किंवा भक्त म्हणूनच ठाऊक होत्या असें दिसतें. संतकवींचें सिंहावलोकन करणारा मोरोपंत हा कवि होता, व ज्याची काव्याभिरुचि प्रतिष्ठित प्रकारची होती असा गृहस्थ होता; पण त्याच्या सन्मणिमालेंतदेखील निश्चित काव्यमार्मिकता कोठेंच दिसत नाहीं, सर्वांचीच स्तुति करावी, प्रत्येकास कसलें तरी पदक बक्षीस द्यावें अशी सन्मणिभाषेंत मोरोपंतांची वृत्ति दिसते. फरक एवढाच कीं हें करतांना त्याची वृत्ति शाबासकी देणाराची नसून आदर व्यक्त करणाराची होती. पुष्कळ प्रसंगीं व्यक्तीचें जें गुणवर्णन होतें तें विशिष्ट यमक साधण्यासाठींच होत असल्यामुळें वैशिष्ट्यशोधक पहाणी मोरोपंताकडून मुळींच झाली नाहीं हें सविस्तर पुढल्या प्रकरणांत दाखविलें जाईलच. प्रत्येक कवीवर दुसऱ्या कवीनें काय लिहिलें आहे हें माझें पाहणें झालें नाहीं. आणि झाडून सारें वाङ्मय वाचून झालें नाहीं. प्रत्येक कवीवर काय वाङ्मय

आहे याची यादी आज असती किंवा अर्वाचीन चरित्रकारांनीं प्रत्येक कवीवर ग्रंथ लिहितांना दुसऱ्या कवींनीं त्याविषयीं काय म्हटलें आहे याची सविस्तर माहिती दिली असती तर माझें काम बरेंच सोपें झालें असतें. आजगांवकरांनीं आपलीं चरित्रें लिहितांना कोठून काय घेतलें हें सरळ सांगितलें आहे, तर याबद्दल त्यांचें साभार अभिनंदन केलें पाहिजे. परंतु भाव्यांनीं हा सरळपणा ठेवला नाहीं. आपली माहिती कोठून आणली याचें मोठें गूढ करण्यांत कै. भाव्यांस आनंद होत असावा असें दिसतें. आणि यामुळेंच यांच्या ग्रंथाची विश्वसनीयता पटत नाहीं.

प्रस्तुत प्रकरणांत चरित्रवाङ्मय तपासण्याच्या बाबतींत झालेल्या फारच अल्प प्रयत्नांचें फल देत आहें हें अर्थात् कबूल केलें पाहिजे. या अपूर्णतेचीं कारणें अनेक आहेत. हे ग्रंथ मिळविण्याचीच केवळ नव्हे तर उल्लेखिलेला ग्रंथ कोठें आहे हें जाणण्याची अडचण सध्यां फार आहे. बरींच चरित्रें अजून अप्रसिद्ध आहेत व त्यांचीं हस्तलिखितें मिळविणें सोपें नाहीं. भावे व चांदोरकर हे दोघेहि दिवंगत झाले आहेत व त्यांचे संग्रह कोणत्या स्थितींत आहेत हें सांगतां येत नाहीं. ज्यांचीं नांवें ठाऊक आहेत ते ग्रंथ वाचणें सोपें नाहीं.

मराठी काव्याचें उत्तरकालीनांनीं परीक्षण कसें केलें हें अगदीं सविस्तर सांगावयाचें झाल्यास प्रत्येक कवीवर जें वाङ्मय आहे त्याची पद्धतशीर सूचि उपलब्ध पाहिजे. तशा प्रकारची सूचि झाली नाहीं. व तिच्या अभावामुळें एकेक कवि घेऊन त्याच्यावर इतरांचें मत देणें बरेंच जड जाईल. काव्यपरीक्षणाच्या व चरित्रशोधनाच्या अगदीं पद्धतशीर अभ्यासास, पांगारकरांच्या मोरोपंत चरित्रासारखे अपवाद वगळतां, अजून सुरुवातच व्हावयाची आहे असें म्हणतां येईल. आज अर्वाचीन लेखकांनीं संतकवींचीं चरित्रें लिहिलीं आहेत. पण त्यांनीं कोणती माहिती कोणत्या आधारावर लिहिली याचें त्या चरित्रांत विधानच नसतें. भावे यांच्यासारख्या लेखकानें जरी मोठा आढावा घेतला आहे तरी आपल्या लिहिण्याची तपासणी करण्यास दुसऱ्यास सोपें जाऊं नये म्हणूनच कीं काय त्यांनीं ग्रंथाचे आधार देण्याची टाळाटाळ केली आहे. असो, झालें तें झालें. आतां पुढच्या कालांतील लेखकांनीं काय करावें त्याविषयीं एवढेंच लिहितों कीं, त्यांनीं

प्रसिद्ध ग्रंथाचें प्रसिद्ध स्थान व शक्य झाल्यास प्रकाशनकाल देण्यास विसरूं नये; व हस्तलिखिताचा उल्लेख करतांना तें हस्तलिखित कोणापाशीं आहे हें देण्यास चुकूं नये. जेव्हां कवींचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न होईल त्यांत पूर्वींच्या ग्रंथकारांनीं काय लिहिलें आहे, त्या लिहिणाऱ्या ग्रंथकारांनीं पूर्वींच्या कोणत्या ग्रंथापासून घेतलेल्या भागांत काय बदल केला आहे याचें पृथक्करण चांगलें दिलें पाहिजे.

प्रत्येक कवीस चरित्रकार मिळालेले आहेतच. कवीचे समकालीन लोक त्याविषयीं उल्लेख करीत तर उत्तरकालीन लोकहि उल्लेख करीत. कांहीं कवी स्वतःच आपल्यासंबंधानें माहिती देतात. संतचरित्रें एकत्र करण्याचें काम जर पूर्वीं कोणीं विस्तृत प्रमाणावर केलें असेल तर तें महिपतीनें होय. पण महिपतीच्या लेखाशिवाय साहित्य किती तरी आहे. त्या साहित्याच्या स्वरूपाची ओळख व्हावी म्हणून पुढील टांचण प्रसिद्ध करीत आहें. हें टांचण पूर्ण तर नाहींच, पण महत्त्वाच्या कवींसंबंधाचेंदेखील संपूर्ण नाहीं. तर प्रस्तुत अभ्यास चालू असतां जे कांहीं ग्रंथ हाताला लागले त्यांत येणाऱ्या कविचरित्र साहित्याची नोंद केली आहे. तर 'अभ्यास करीत असतां केलेलें हातटांचण' याशिवाय त्यास महत्त्व नाहीं. तथापि हें टांचण वाढविण्यास बरीच मेहेनत पडेलसें वाटतें. हें टांचण करतांना पूर्वींच्या ग्रंथांत आढळलेले अनेक ग्रंथनिर्देशविषयक दोष दूर केले आहेत. ज्यांस या प्रकारचा अभ्यास करावयाचा असेल त्यांस हे कांहीं दिवसांचे परिश्रम उपयोगीदेखील पडतील. उदाहरणार्थ, अनेक संतकवींचा उल्लेख अनेक याद्यांतून येतो. एक पूर्ण अशी यादी कोणतीच नाहीं. शिवाय प्रत्येक संत लेखक होता किंवा नाहीं हें आपणांस ठाऊक नाहीं. अनेक संतांचीं प्रथम संत म्हणूनच नांवें ठाऊक असतात व त्यांचे कांहीं ग्रंथ मागाहून सांपडले म्हणजे ते संतकवि म्हणून ठाऊक होतात. यासाठीं असल्या याद्या जमविणें व त्यांतून मिळालेली माहिती संतकविकाव्यसूची-सारख्या ग्रंथांत नसली तर ती नोंदून ठेवणें इत्यादि परिश्रम व्हावयास पाहिजेत. संतकविकाव्यसूचींत संदर्भ बरे दिले आहेत, पण त्यांत अपूर्णता पुष्कळच आहे. या सूचिकारांस कै. भाव्यांनीं आपल्यापाशीं विशिष्ट ग्रंथ नसतां तो आहे म्हणून गप्पा मारून चुकविलें असावें असा संशय येऊं

लागतो. संतचरित्रें व याद्या अनेक आहेत; तीं एकत्र करून ग्रंथांत उल्लेखिलेल्या सर्व व्यक्तींची सूची झाली पाहिजे, उल्लेखस्थळ दिलें पाहिजे. आणि यासाठीं आपल्याकडे जे जुने ग्रंथ आहेत ते सर्व सूचीसह प्रसिद्ध करण्याची परंपरा स्थापित झाली पाहिजे; तसें केल्यास चरित्रलेखनाचें व पुढील अभ्यासाचें काम पुष्कळच सोपें होईल. असो.

## संतचरित्रकार

संतचरित्रकारांत नामदेवाचा उल्लेख प्रथम केला पाहिजे. यानें जितकें संतचरित्रावर अगोदरचें साहित्य मांडलें आहे तितकें दुसऱ्या कोणींच मांडलें नाहीं. त्याचें म्हणून मांडलेलें सर्व साहित्य त्याचें नाहीं हें उघड आहे. कारण त्याच्या नांवावर खपणाऱ्या चरित्रांत उत्तरकालीन साधूंचादेखील उल्लेख आहे. पण विशिष्ट व्यक्तीवर वाङ्मय गोळा करतांना प्रथम तसले म्हणजे त्याच्या नांवावर खपणारे सर्व ग्रंथ जमा करून नंतरच ग्राह्याग्राह्य-विवेक केला पाहिजे. समकालीन ज्ञानेश्वराच्या चरित्राला नामदेवाचे अभंग उपयोगी म्हणून धरले जातात, नामदेवानें स्वतःवर लिहिलेंच आहे, पण त्याशिवाय मीराबाई, कबीर, कमाल, नरसीमेहता, जनाबाई, चोखामेळा यांचीं चरित्रें आहेत. चोखोबाच्या स्त्रीचें बाळंतपण म्हणून एक विशेष काव्य आलें आहे. जनजसवंत, बोधलेबोवा, राका कुंभार, गोरोबा कुंभार, भानुदास, जगमित्र नागा यांचीं चरित्रें आहेत. परसोबा–नामदेव संवाद म्हणून एक स्फुट आलेंच आहे. भानुदास व बोधलेबोवा यांचा उल्लेख ज्ञानेश्वर समकालीन नामदेव कसा करील ? हा प्रश्नच आहे, पण तें चरित्र-साहित्य आहे ही गोष्ट प्रथम लक्षांत घेतलीच पाहिजे. त्या साहित्याच्या कर्तृत्वाविषयीं संशय उत्पन्न होऊन तें नाकारणें ही क्रिया मागाहून होईल, एवढेंच.

संतचरित्रकारांमध्यें उद्धवचिद्घनाचा समावेश अवश्य केला आहे. यानें गाइलेले संत बरेच जुने दिसतात. त्याचे वर्ण्य संत म्हटले म्हणजे (१) नागनाथ, (२) हेमराज, (३) बहिरंभट, (४) मृत्युंजय, (५) गोरा कुंभार हे होत (काव्यसंग्रह ग्रंथ ३७). हीं सर्व चरित्रें साकी वृत्तांत आहेत. मृत्युंजयचरित्र हें बेदरच्या राज्यांत झालेल्या पुरुषावर आहे, आणि त्यांत लिंगायत आणि वैष्णव यांचा तंटा दाखविला आहे.

दासविश्रामधाम हें आत्मारामकृत समर्थांचें जरी चरित्र आहे तरी त्यांत इतर साधूंचा सपाटून उल्लेख असल्यामुळें हा ग्रंथ संतचरित्रांना उपयुक्त टीपा जोडण्यास फारच उपयोगी पडेल. यांत २०० वर व्यक्तींचे उल्लेख आलेले आहेत. त्यांतल्या त्यांत या ग्रंथास सूची आहे त्यामुळें शोधकास श्रम कमी पडतील. दासविश्रामधामांत अनेक ग्रंथकारांचे उतारे घेतले आहेत आणि त्यांवर धांवती टीका लिहिली आहे. त्यामुळें कोणते अभंग कोणाचे याविषयीं आत्मारामाचें मत दिलें गेलें आहे. ग्रंथग्रंथकारविवेकास या ग्रंथाच्या प्रसिद्धीमुळें फांद्या फुटणार आहेत. असा उपयुक्त ‘ उपद्व्याप ’ देवांनीं पुढच्या संशोधकांसाठीं करून ठेवला आहे.

## संतकवींच्या याद्या

संतकवींच्या अनेक याद्या उपलब्ध आहेत. त्यांपैकीं कांहीं याद्यांच्याच स्वरूपांत आहेत तर कांहींत याद्यांबरोबर कवींची त्यासंबंधानें वृत्ति दाखविणारीं वाक्यें आहेत. महाराष्ट्रकवि, ग्रंथांक ९ मध्यें ५।६ याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत त्या येणेंप्रमाणें—( १ ) संतमालिका, उद्धवचिद्घनकृत; ( २ ) संतमालिका, जयरामसुतकृत; ( ३ ) संतमालिका, शिवरामकृत; ( ४ ) संतनामावली, रंगनाथकृत; ( ५ ) संतमालिका, उद्धवसुतकृत; ( ६ ) संतमालिका, सिद्धचैतन्यकृत. प्रत्येक यादीला हेतु जोडलाच आहे. उदाहरणार्थ, उद्धवचिद्घन म्हणतो—

“ करितां भक्तांचें स्मरण । स्वयें तद्रुप होईजे आपण ।
जैसें हरिब्रीद संपूर्ण । श्रवणीं ऐकोनी बोलतसे.”

जयरामसुत म्हणतो—

“ हरिजन हे हरिगुरु भजनें, जन तारुनि आपण तरले ।
जे संसारसागरीं नौका । नामें त्यांचीं पावन ऐका । ”

सिद्धचैतन्य तर सरळपणें

“ उठोनिया प्रातःकाळीं । जपा संतनामावळी ।
स्मरतां किल्मिष अवघें जाळी । देवपाळी आज्ञेसी । ”

असें म्हणून जपासाठींच नामावळी करण्याचा हेतु सांगतो. ‘ भक्त-

विजयाची आरती ' म्हणून ३१ कडव्यांची आरती आहे. कर्ता गणेशसुत. हींत अनेक साधूंविषयीं सटीक माहिती आहे ( तुकारामतात्यांची नामदेव गाथा ). या प्रकारच्या नामावळ्या करण्याचा हव्यास संतकवींच्या काळापासून पेशवाई अखेरपर्यंत बराच असावा असें दिसतें. भक्तांच्या नामावळीवर होनाजी बाळानें एक लावणीदेखील केली आहे. तिच्यांत सुमारें १५० नांवें आहेत ( होनाजी बाळाकृत लावण्या, चित्रशाळा–१९०८, पृ. ७० ).

मालोकृत नाथनामावली: भुजंगप्रयात वृत्तांत आहे ( काव्य सं. ग्रंथांक ३८, पृ. १३९ ). हींत आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गैनिनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ ( ज्ञानेश्वर ), रंगनाथ, प्राणनाथ, गैबीनाथ, गुप्तनाथ, उद्बोधनाथ, केशरीनाथ, लक्षुमीनाथ, शिवदिन अथवा गोविंदभोळा, हरीनाथ आणि मालोनाथ अशी परंपरा दिली आहे व प्रत्येकावर कांहीं तरी—कवीच्या दृष्टीनें—समर्पक असा श्लोक आहे.

मोरोपंतांनीं ज्या संतकवींच्या याद्या दिल्या त्यांत सन्माणिमाला ही मुख्य आहे, पण दुसरीहि एक महत्त्वाची यादी आहे ती म्हटली म्हणजे सन्नामगर्भरामायण ही होय. हींत गणपति, सरस्वती, कुलदेव, गुरु, शिव, विधि, नारद, प्ऱ्हाद इत्यादि दैवतांचीं व पौराणिक पुरुषांचीं नांवें आहेत. तीं परीक्षितिपर्यंत आणल्यानंतर एकदम मराठी संतकवि घेतले आहेत. त्यांनीं ज्या संतकवींच्या नांवाचीं अक्षरें आपल्या आर्यांत गोंवून दिलीं आहेत ते संतकवी येणेंप्रमाणें—( १ ) निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, भानुदास, जनार्दन, एको, वामनस्वामी, श्रीधर, केशव, गणेश, अनंत, कृष्णदास, जयराम, आनंदमूर्ति, रंगनाथ, रामदास, कल्याण, उद्धवचिद्धन, केशवस्वामी, शिवराम, पुरंदर, दासोपंत, दामाजीपंत, रामानंद, कबीर, रोहिदास, मलुकदास ( ४९ व्या आर्येंत नांव नाहीं ). पीपाजी, धनाजाट, नानक, मीराबाई, कमाबाई, सेना न्हावी, माधवदास, तुळसीदास, मनसुखदास, रामप्रसाद, त्रिनयनवाणी, नरसिंह मेहेता, केवळ कूबाजी, श्रुतदेव, सुदामदेव, नामदेव, लाखाभक्त, जनी, गोरा कुंभार, सांवतामाळी, विसोबा खेचर, चिंचवडकर देव, दामोदर देव, तुकावाणी, बोधला, मालोपंत, मुद्गल, बहिरापिसा, परसा भागवत, हरिनारायण, मुकुंदराज, मुक्तेश्वर,

कृष्ण दयार्णव, जगमित्र नामा, आनंदतनय, निपटनिरंजन, मानपुरी, सूरदास, केशवदास, भक्तमालाकार, बिहारी, भक्तविजयकार, हरिविजयकार, वृंदावनवासी, अयोध्यावासी, काशीवासी, द्वारकावासी, सर्वक्षेत्रवासी, चोखामेळा, शंकराजी बाबा; नारायणबाबा, शिवदिन, प्रऱ्हाद बडवे, अमृतराय, पांडोबा आपा, गोविंद गोसावी, बाळकृष्णबाबा, विठोबादादा, सकल हरिजन, बाबूराय सदाशिव, कालिदास, यानंतर पंढरपूरवासी वैकुंठवासी वगैरे.

**संतकवींच्या याद्याच देणारीं पद्यें**

कवींच्या याद्या देणाऱ्या पदांचा उल्लेख मागें केलाच आहे पण त्यांशिवाय दुसरे कित्येक लेखक आहेतच. जयरामात्मज कवीनें एक कटिबंध लिहिला आहे त्यांत अनेक भक्त संत व ग्रंथकार यांचीं नांवें दिलीं आहेत ( का. सं. ग्रंथांक ३५, पृ. १०१ ). त्यांत प्राचीन ऋषिकाळापासून जी सुरुवात केली आहे ती शिवाजीच्या कालापर्यंत आणून सोडली आहे. या कवीस याद्याच देण्याची आवड दिसते. व याद्या देण्यास कांहीं कारण शोधावें आणि यादी द्यावी म्हणजे याचा कटाव झाला. वरील नांवें देण्यास तो प्रस्तावना येणेंप्रमाणें करतो—

" तारक मार्ग दाविती लोकां । बोधें हरिती भवभयशंका ।
जे संसारसागरीं नौका । त्यांचीं नामें पावन ऐका...... "

ही १०५ वैदिक व पौराणिक नांवांची यादी झाल्यानंतर दुसऱ्या एका यादीस निमित्त म्हणून

" झाले मुक्तचि निजज्ञानें । धाले बोध सुधारस पानें ।
त्यजिलें कामक्रोध अभिमानें । त्यांचीं परिसावीं अभिधानें । "

असें म्हणून श्री शंकराचार्यांपासून सुरुवात करून ज्ञानेश्वरकालापर्यंत यादी आणून त्यांत ९१ नांवें घालतो. यांत अनेक संतकवी उल्लेखिले आहेत, त्यांचीं नांवें इतरत्र सांपडत नाहींत म्हणून ही यादी महत्त्वाची आहे. पुढें एकनाथापासून रामदासाच्या कालापर्यंत ४६ संतकवींचा उल्लेख करतो व त्यासाठीं जें प्रस्तावनावाक्य लिहितो तें येणेंप्रमाणें आहे—

" कोणी ब्रह्मनिष्ठ गुरुभजनी । कोणी वीतरागी रत सगुणीं ।
भाविकनाम कीर्तन कोणी । सज्जन, श्रवण करावें श्रवणीं ॥ "

पुढील एका कटिबंधांत हरीचीं नांवें जपतां भवसागर लोक तरले म्हणून विष्णूची नामावलि देतो व पुढें एका कटिबंधांत द्रौपदीचें संकट कृष्णानें कसें दूर केलें म्हणून सांगतांना अनेक प्रकारच्या साड्यांची यादी देतो. ही यादी कवीच्या काळच्या बाजारांत स्त्रियांच्या वस्त्रांचा माल पुष्कळच विविध येत होता असें दाखविते. सुमारें १०० प्रकार या कटावांत वर्णिले आहेत.

रा. भावे यांच्या महाराष्ट्रसारस्वतांत खालील संतचरित्रकार ( प्रकरण २३ ) व त्यांचे ग्रंथ उल्लेखिले आहेत.

( १ ) नाभा–भक्तमाला. नाभा इ. स. १६७८ च्या सुमारास होऊन गेला. भक्तमालेंत १९७ छप्पा आहेत. भक्तमालेंत फक्त याद्याच आहेत.

( २ ) प्रियादास–भक्तिरसबोधिनी. प्रियादास नाभाचा शिष्य होता व प्रस्तुत ग्रंथ भक्तमालेवर टीका आहे. म्हणजे जरा सविस्तर वर्णनें आहेत. प्रियादासाच्या ग्रंथांत ज्ञानेश्वर, नामदेव व एकदोन संत खेरीज इतर संत महाराष्ट्राबाहेरचे आहेत.

( ३ ) मार्तंडबुवा—भक्तिप्रेमामृत, प्रियादासाच्या ग्रंथावरून मराठींत केलेला ग्रंथ.

( ४ ) उद्धवचिद्घन—याचीं ( १ ) जीं किरकोळ चरित्रें या प्रकरणांत उल्लेखिलीं आहेत त्यापेक्षां निराळा संतचरित्रात्मक ग्रंथ असावा अशी भाव्यांची खात्री होत नाहीं. माधवदास अलक्ष निधनांत उद्धवचिद्घनानें ( २ ) 'भक्तमालिका' लिहिली असें सांगतो. चरित्रात्मक ग्रंथाचें नांव 'भक्तकथामृतसार' किंवा असेंच दुसरें कांहीं असेल असेंहि भाव्यांस वाटतें. असा ग्रंथ पाहिल्याचें भिंगारकरबुवा सांगतात व उतारा देतात. पण त्यावर भाव्यांचा विश्वास बसत नाहीं. ( ३ ) संतमाला ग्रंथ प्रसिद्ध आहे. पण हा यादीसारखाच जवळजवळ आहे. उद्धवचिद्घन हा नाभाशिवाय महिपतीचा भक्तविजय लिहितांना मुख्य आधार होता. भक्तकथामृतसार हा ग्रंथ भावे यांच्यापाशीं आहे असें सं. क. का. सू. कारांनीं दिलें आहे. पण तो ग्रंथ आपल्यापाशीं नाहीं म्हणून भावेच सांगतात. तसेंच भक्तकथातत्त्व हें उद्धवचिद्घनाचें पुस्तक भावे यांच्या संग्रहांत असल्याचा सूचीकार उल्लेख करतात, पण भावे यासंबंधानें कांहींच माहिती दाखवीत नाहींत.

भिंगारकरांपाशीं पुस्तक आहे व तें आपणाला मिळेलच अशा समजुतीनें भावे यांनीं आपणापाशीं तें पुस्तक आहे असें चांदोरकरांस सांगितलें असावेंसें दिसतें.

(५) दासोदिगंबर– संतविजय ग्रंथ उपलब्ध आहे. यांत कवीनें नाभाजीच्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. बऱ्याच नवीन आख्यायिका आहेत.

(६) महिपतीबोवा ताहराबादकर–(१) भक्तविजय. हा ग्रंथ नाभा व उद्धवचिद्धन या दोघांच्या आधारें लिहिला असें महिपती म्हणतो. तरी याखेरीज इतर माहिती बरीच आहे. ती कोणती व कशाच्या आधारानें लिहिली असावी याचा ऊहापोह भाव्यांनीं केला आहे. (२) पांडुरंग-माहात्म्य यांत पुंडलिकाचें चरित्र आलें आहे. (३) संतलीलामृत, शके १६८९ मध्यें पुरा केला. (४) भक्तलीलामृत, १६९६ मध्यें पुरा केला. (५) संतविजय हा पूर्ण नाहीं. यांत रामदासस्वामी व बाबाजी गोसावी या दोघांचींच चरित्रें आहेत. भक्तमंजरी नांवाचें महिपतीचें एक पुस्तक सं. क. का. सू. प्रश्नचिन्ह करून उल्लेखिते.

(७) भीमस्वामी– ग्रंथ भक्तलीलामृत, अभंगमय शके १७१९ मध्यें लिहिला. श्रीसमर्थांचीं दोन जुनीं चरित्रें या पुस्तकांत छापलीं आहेत. यांत श्रीसमर्थ संप्रदायाची अनेक मंडळी त्याप्रमाणेंच भानुदास, एकनाथ, वामन-स्वामी, नामदेवसारख्या मोठ्या व्यक्तींची व रामभट पोळे, दोन कृष्णाजी-पंत यासारख्या सामान्य व्यक्तींचीं चरित्रें आहेत. चरित्रसंख्या ४१.

(८) राजारामप्रासादी– ग्रंथ भक्तमंजरी, १०९ अध्यायांचा ग्रंथ. "साधारणपणें महिपतिबावांनीं वर्णिलीं नाहींत अशा साधुपुरुषांचीं चरित्रें गाण्याचा कवीचा अभिप्राय दिसतो. माहिती कशी मिळविली हें नीटसें कळत नाहीं. पण ती बरीच प्रयासानें मिळविलेली दिसते. ग्रंथांत परंपरा समकालीन संत व जन्मुमृत्यु वगैरेचे शक राजारामबुवांनीं अनेक ठिकाणीं सांगितले आहेत." ग्रंथपूर्णता शके १७५६ म्हणजे अव्वल इंग्रजींत झाली. या ग्रंथाचें नांव भक्तमंजरीमाला असें चांदोरकर सूचींत सांगतात. व हा देवांच्यापाशीं आहे असा स्थानसंदर्भ देतात.

(९) नरहरी धुंडीराज माळू – ग्रंथ (१) माळूतारण व (२) भक्ति-

कथामृत. भक्तिकथामृतांत ६४ अध्याय आहेत. ग्रंथकार मोठा पण काल्पनिक व पूर्ण खोटा. चुकीची माहिती गोळा केली असें नसून बरीच काल्पनिक माहिती तयार केली असें भावे सांगतात. हा ग्रंथ छापला आहे, सं. क. का. सू. सांगते. हा मी पाहिला नाहीं. मालुतारण हाहि ग्रंथ खेळखंडोबांनीं भरला आहे असें भावे सांगतात. कै. भावे यांनीं उल्लेखिलेल्या चरित्रग्रंथांपैकीं मार्तंडबुवा, दासोदिगंबर, राजाराम प्रासादी आणि नरहरी मालु यांचे ग्रंथ मी वाचले नाहींत. याशिवाय या प्रकारचेच दुसरे कांहीं ग्रंथकार व ग्रंथ संतकवि काव्यसूचींत उल्लेखिले आहेत ते येणेंप्रमाणें— हे ग्रंथदेखील मी पाहिले नाहींत.

विसा खेचर—संतमणिमाला ( चांदोरकर संग्रह ).

मेरु—संतमाला.

विठ्ठल—संतचरित्र ( चांदोरकर संग्रह ).

उद्धव मुल्हेरकर—संतमाला ( चांदोरकर संग्रह ).

श्रीधर संतप्रताप—( महाराष्ट्रकवि ).

मालो—संतचरित्र ( कोठें उपलब्ध झाला हें सांगितलें नाहीं ).

भीमयशवंतसुत—संतचरित्र-रचनाकाल शके १७१९.

दिगंबर—संतविजय ( चांदोरकर ).

पेवदास चैतन्यांकित—संतमालिका. रचनाकाल शके १६०८ ( काव्यसंग्रह ).

वस्वलिंग—संतमालिका ( चांदोरकर संग्रह ).

रंगानुजात्मज—संतमालिका ( देव सं. ).

सदानंद—संतमालिका ( चांदोरकर सं. ).

संतदास—संतवैभव; रचनाकाल शके १६३४ ( चांदोरकर सं. ).

भावे यांच्या महाराष्ट्रसारस्वत या पुस्तकांत दोन सूची दिल्या आहेत. त्यांपैकीं पहिली सूचि ही या ग्रंथाची सूचि मुळींच नाहीं. कवींचीं नांवें व त्यांच्या नांवावर खपणारीं पुस्तकें यांची नोंद त्यांत आहे. त्यांत जे अनेक लेखक सांगितले आहेत त्यांचा 'महाराष्ट्रसारस्वत' ग्रंथांत उल्लेख नाहीं, व ग्रंथांत दिलेल्या अनेक लेखकांचा या यादींत उल्लेख नाहीं. उदाहरणार्थ, अवचितसुतकाशी यांचा उल्लेख या यादींत नाहीं. म्हणजे ही

सूचि पुस्तकांत आलेले सर्व ग्रंथकार देणारी व आणखीहि ग्रंथकार सांगणारी मुळींच नाहीं. शिवाय अमुक कवीचें नांव कोठून मिळालें, ग्रंथासंबंधानें माहिती कोठून घेतली यासंबंधानें कांहींच उल्लेख नाहीं. मुख्य दोष हा कीं त्यांनीं ग्रंथ प्रकाशित आहे कीं अप्रकाशित आहे याचें स्पष्टीकरण केलें नाहीं. एवढेंच नव्हे तर उपलब्ध आणि अनुपलब्ध यांची भिन्न मांडणी केलेली नाहीं. तथापि यांत उल्लेखिलेल्या ग्रंथांचा पत्ता लावणें आणि कै. भावे यांनीं ज्या चुका केल्या आहेत त्या तपाशीत बसणें हा उद्योग त्यांनीं पुढच्या अभ्यासकांसाठीं ठेवला आहे. भाव्यांच्या याद्यांत, रामदास आणि रामदासी ग्रमालेंत आणि संतकविकाव्यसूचींत मिळून पुढील चरित्रकारांचीं आणि त्यांच्या ग्रंथांचीं नांवें सांपडतात—

अमृतराय—दामाजीपंत ( का. सं ).

आत्माराम स्वामी—रामदास स्वामीचरित्र ( प्रकाशित ); दासविश्रामधाम ( प्रकाशित ).

आदिनाथ—नाथलीलामृत ( भावेसंग्रह ).

आनंदतनय—कविवर्णन ( भावेसंग्रह ).

आनंदनाथ—भक्तिमंजरी. हें पुस्तक भावे यांच्यापाशीं आहे अशी समजूत स. क. का. सू. दाखविते. पण या पुस्तकासंबंधानें भावे कांहींच सांगत नाहींत.

उद्धवचिद्धन—रामदासचरित्र ( छापलें आहे ).

उद्धवदास—संतमाला.

उद्धवसुतकृत—समर्थचरित्र ( प्रकाशित ).

केशव—एकनाथचरित्र. रचनाकाल श. १६८२ ( मुद्रित ).

खंडेराय—एकनाथ, तुकाराम, नामदेव यांचीं चरित्रें, तुकारामचरित्र ( का. सं. ).

खानवलकर गंगाधर नारायणकृत—रामदासचरित्र ( उपलब्ध अप्रकाशित ).

गिरिधर—श्रीसमर्थप्रताप.

गोविंद—नामदेवचरित्र ( चांदोरकरसंग्रह ).

गंगाधर बावाकृत—रामदासचरित्र उपलब्ध ( अप्रकाशित ).

जनार्दन–दामाजीचें चरित्र ( का. सं. ).

जयरामात्मज–संतमालिका.

तुकाविप्र–भानुदासचरित्र ( चांदोरकर-संग्रह ) एकनाथस्तोत्र.

दासबाबा–कबीर-आख्यान.

दिगंबर–संतविजय.

धुंडिसुतकुमार–भक्तिसार, मालोतारण. [ हा ग्रंथकार नरहरि धुंडिराज मालू हाच तर नसेल ना ? या ग्रंथकाराचें नांव पहिल्या सूचींत कै. भाव्यांनीं दिलें आहे पण त्याविषयीं आपल्या पुस्तकांत कांहींच लिहिलें नाहीं. यावरून हें पुस्तक भाव्यांनीं पाहिलें होतें किंवा नाहीं हें कळत नाहीं. नरहरि मालोच्या नांवावर पुढें भाव्यांनींच भक्तिकथासार आणि मालोतारण हे ग्रंथ दिलेच आहेत. आणि ते दोन्ही ग्रंथ अविश्वसनीय आहेत असें त्यांचें मत पूर्वीं दिलेंच आहे. नरहरि व धुंडिसुतकुमार हे दोघे एकच असावेत असें वाटतें. म्हणजे या ग्रंथकाराचे चरित्रपर दोन ग्रंथ होतात; ते म्हटले म्हणजे भक्तिकथासार व नवनाथचरित्र हे होत. भक्तिसार हे नवनाथचरित्र या पुस्तकाचेंच दुसरें नांव आहे आणि याचा रचनाकाल शके १७४० म्हणजे सन १८१८ आहे असें सं. क. का. सू. म्हणते ].

नरहरिसुत–मुकुंदराजचरित्र ( देव ).

नामदेव ( ? )–मिराबाई ( छापलें ).

नामा पाठक–नामरत्नमाळ.

नारायण कवि–कबीराख्यान.

निरंजन–केशवचैतन्यकथा.

निरंजनमाधव–ज्ञानेश्वरविजय.

परशुराम–आनंदमूर्तिवर्णन, गुरुचरित्र, गुरुचरित्रसार वगैरे.

पांडोबा–रामदासचरित्र ( भावेसंग्रह ).

बहिराजातवेद–संतनामावलि.

बहिरवनाथ–नाथलीलामृत ( कविचरित्र ).

बाबुसुत–गोमाउचरित्र.

बाळ–श्रीभक्तमालिका.

बाळकराम–दामाजीची रसद ( देवसंग्रह ).

ब्रह्मगिरि–दामाजीपंताची बखर ( का. सं. ).

भीमस्वामी शिरगांव मठाधिपति, भक्तलीलामृत; यासंबंधानें सविस्तर हकीकत मागें दिलीच आहे.

भीमस्वामी— शहापूरकर तंजावर मठपति; श्री समर्थचरित्र. याचें एक संतचरित्र आहे म्हणून भावे आपल्या पहिल्या सूचींत सांगतात. [ एकंदर तीन भीमस्वामी भावे उल्लेखितात; व त्यांच्या ग्रंथांसंबंधानें त्यांनीं घोटाळा केलेला आहे. दुसऱ्या सूचींत भीमस्वामी या नांवाच्या दोन मंडळींचा उल्लेख केला आहे. ]

मध्वमुनि— धनेश्वरचरित्र, सखुचरित्र.

मन्मथशिवलिंग— गुरुचरित्र.

माधव— सखुचरित्र.

मालो— नाथनामावलि ( ग्रंथसंग्रह ३८ ).

मुकुंद— एकनाथचरित्र ( प्रसिद्ध ).

मुक्तेश्वर — एकनाथचरित्र ( का. संग्रह ).

मुकुंद ( १ )— रामजी गोसावी ( चांदोरकर संग्रह ).

मुकुंद ( २ )— ताबाजी बाबावर्णन.

महिपती— सविस्तर वर्णन दिलेंच आहे.

मुद्गल अनंतसुत— नामदेवचरित्र ( चांदोरकर संग्रह ).

मृत्युंजय— गुरुलीला.

मेरु— समर्थाष्टक, संतमाला. हीं पुस्तकें भावे उल्लेखितात पण तीं खरोखर यांस उपलब्ध होतीं किंवा नव्हतीं हें कळत नाहीं. मेरुस्वामीकृत समर्थांचें कसलेंहि चरित्र उपलब्ध नाहीं म्हणून देव सांगतात ( समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें पृ. ११ ).

मोरोपंत— सविस्तर विवेचन पुढें आहेच.

रंगनाथ— भानुदासचरित्र ( महाराष्ट्रकवि ).

रत्नाकर— गुरुपरंपरा ( चांदोरकरसंग्रह ) सद्गुरु अष्टक, संगमचरित्र.

रमावल्लभदास— गुरुवळी.

रघुनाथ— रामदासवर्णन.
राघव— दामाजीचें चरित्र ( का. सं. ).
राघवदास— रमावल्लभदास महिमा.
राजाराम प्रासादी— भक्तिमंजरीमाला.
रंगनाथ निगडीकर— संतमालिका.
लक्ष्मण बावाकृत श्रीसद्गुरुस्तवराज— ( उपलब्ध अप्रकाशित ).
वामन पंडित— तुकारामस्तुति.
विठ्ठल बीडकर— कबीरकथा, सखूचरित्र, भानुदासचरित्र ( का. सं. ).
विठ्ठल केरीकर— कबीरकथा ( आर्यावृत्त ).

[ भावे यांनीं दोन्ही विठ्ठलांच्या नांवावर कबीरकथा घातली आहे. पण पुस्तकांत बीडकर विठ्ठलाच्या कबीरकथेविषयीं कांहीं एक उल्लेख नाहीं व दोन विठ्ठलांच्या दोन कबीरकथा होत्या असेंहि सांगितलें नाहीं. ]

वेणीस्वामीकृत श्री समर्थ प्रताप. अप्रकाशित, अगदीं थोडा भाग उपलब्ध ( देव ).

व्यंकटेशसुत— बोधलेबोवांचें चरित्र.
शामजी गोसावी— चांगदेवचरित्र.
शिवराम— संतमालिका.
शिवरामबुवा— संतमालिका.

[ १ ह्या सूचींत शिवराम नांवाचे दोन कवी देऊन संतमालिका नांवाचीं प्रकरणें दोघांच्याहि नांवावर घातलीं आहेत आणि त्याबद्दल पुरावा पुस्तकांत कोठेंच नाहीं. एका शिवरामाच्या संतमालिकेचा उल्लेख मागें केलाच आहे. ]

शिवसुतप्रभु— संतनामावळी.
शंकरदास— निरंजनचरित्र.
श्रीधर— चोळराजचरित्र.
श्रीधर— दासोपंतचरित्र ( प्रसिद्ध ).
श्रीरंग नारायण— शालिसुमनचरित्र.
सच्चिदानंद— ज्ञानेश्वरचरित्र ( ? ).
सरस्वती गंगाधर— गुरुचरित्र.

सत्यामलनाथ— नवरत्नमाला ( ज्ञानेश्वरचरित्र ).

सदानंद— संतमालिका.

संतदेव— संतवैभव.

हनुमंत स्वामीकृत— रामदासचरित्र ( प्रकाशित ).

आतां अनेक कवींचा परामर्ष घेणारें आणि याद्या देणारें वाङ्मय सोडून विशिष्ट कवीवर कोणकोणतें वाङ्मय आहे याविषयीं अर्धेकच्चें केलेलें टिपण पुढें मांडतों. प्रथम ज्ञानेश्वरावर असलेलें वाङ्मय उल्लेखितों.

### ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरचतुष्टयाच्या चरित्राला त्यांचे ग्रंथ हेंच महत्त्वाचें चरित्रसाहित्य आहे. कारण त्यांत स्वकुटुंबीय गोष्टींचा उल्लेख आहे. इतर ग्रंथकारांचें साहित्य मांडतांना नामदेवास अग्रस्थान दिलें पाहिजे. तुकारामतात्याकृत नामदेवाच्या गाथेंत ज्ञानेश्वरचरित्रविषयक अनेक प्रकरणें आहेत. (१) ज्ञानदेवाच्या भेटीसाठीं नामदेवाची आळ, (२) ज्ञानेश्वराच्या भेटीस नामदेव आले ते अभंग, (३) तीर्थावळीचे अभंग, (४) ज्ञानदेव आणि सोपानदेव यांच्या समाधीचे अभंग, (५) वटेश्वरनमन, (६) मुक्ताबाईच्या समाधीचे अभंग, निवृत्तिनाथ यांच्या समाधीचे अभंग, ज्ञानदेव-नामदेव संवाद इत्यादि. विसोबा खेचर, सेना न्हावी हे नामदेवास उल्लेखितात आणि चोखामेळा मुक्ताबाईस उल्लेखितो, कान्हुपात्रा ज्ञानेश्वराची स्तुति करते.

### रामदास

रामदासदेखील ज्ञानेश्वराचा उल्लेख करतो. " बोलविला वेद रेडा ज्ञानेश्वर वचनासाठीं । कबीराचे मागीं बैसे जाठ्याचे शेत राखीं । सूरदास मिराबाई, गुंतलासि त्यांचे भाकीं । पैठणी एकनाथ गंधाचा वाहे धाकी । शबरीचीं उच्छिष्ट बोरें आवडीनें देव चाखी । बोधल्या तुकोबाची दाविली साक्ष जगाशीं ॥ विसोबा खेचराचीं पाऊलें देव सोशी ॥ "

यांत कांहीं नवीन माहिती नाहीं. तथापि हें अवतरण करण्यांत हेतु असा आहे कीं, ज्ञानेश्वरापासून जो भक्तिसंप्रदाय स्थापन झाला त्यांत आणि रामदासस्वामींत कांहीं विरोध होता अशी समजूत चुकीची आहे हें प्रत्यक्ष

रामदासांच्या शब्दांनीं सिद्ध व्हावें. रामदासस्वामीकडेच जाण्यास तुकारामानें शिवाजीला सांगून त्यांच्याविषयीं आदर व्यक्त केला आहे तर ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतच्या सर्व संतकवींच्याविषयीं रामदासांनीं आदर व्यक्त केला आहे हें वरील रामदासोक्तीवरून समजून येईल.

### शिवदिन केसरी

ज्ञानेश्वरावर पद लिहितो त्यांत, "अद्वैतबोधें डोला। ज्ञानदेव ज्ञानदेवबोला," "ज्ञानी विज्ञानी राजा। ज्ञानदेव सद्‌गुरु माझा" अशीं वाक्यें आहेत. (काव्यसंग्रह ग्रंथांक २५).

### मालोनाथ

मालोनाथकृत नाथनामावलींत (काव्यसंग्रह ग्रं. ३८, पृष्ठ १४०) ज्ञानेश्वराविषयीं "प्रतापें गुणें आगळा सूर्य जैसा। स्वयंजोति शुद्धप्रकाशीत तैसा। जयाची असे या जगीं पूर्ण सत्ता। नमस्कार माझा तया ज्ञाननाथा॥" असे उद्‌गार आहेत.

### निळोबा

निळोबानें ज्ञानदेवाच्या परंपरेवर लिहिलें आहे आणि तींत आदिनाथ आणि श्रीशंकर यांचें ऐक्य दाखविलें आहे. आरतीमध्यें भिंत चालणें, पशूकडून वेद बोलविणें, १४०० वर्षें चांगदेवाचें जगणें यांचा उल्लेख केलाच आहे. चांगदेवाचें चरित्रदेखील निळोबांनीं लिहिलें आहे.

### कबीर

याच्याविषयीं उल्लेख चोहोंकडे पसरले आहेत. तथापि एका चरित्राकडे त्यांतील एक उतारा देऊन येथें लक्ष ओढतों. हा उतारा त्याच्या काव्याविषयीं अभिज्ञता दाखविणारा आहे.

"स्नान करुनि गंगेचें गेला तो भक्त कबिरभवनातें।
मग सद्‌गुरुप्रसादें नित्य करितसे विचित्र कवनातें॥
विद्वज्जनमान्य असे कबिररचित कवन दोहरा सरस।
श्रीहरि, टाकुनि धांवे यच्छ्रवणप्राप्तमोह रासरस॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ................ विः ................


शिवहि म्हणे गिरिजे तूं कविराचा एक दोहरा परिस
जो ऐकिल्या परमसुख मज देतो कोटि मोहरांपरिस ॥
(नारायणकृत कबीरजन्मचरित्र. काव्यसं. ग्रं. ३८)

### चांगदेव

चांगदेवचरित्र—लेखक शामजी गोसावी मरुद्गण (महराष्ट्रकवि आणि काव्यग्रंथ, ग्रंथांक १) हें चरित्र ज्ञानेश्वरप्रतिस्पर्धी आणि मुक्ताबाईचा शिष्य चांगदेव याचें नव्हे तर ग्रंथकाराचा दहावा पूर्वज चांगदेव मुधेश याचें आहे; व ग्रंथकार यास चांगावटेश्वर याचा अवतार समजतात. तथापि या चरित्रांत ज्ञानेश्वर–चांगदेव–आख्यान प्रारंभींच आहे. तथापि हेंच पुस्तक महिपतीच्या हातीं लागून त्यानें यावरूनच भक्तलीलामृतांतील ९ वा व १० वा अध्याय लिहिला असें भावे प्रस्तावनेंत सांगतात. (काव्यसंग्रह ग्रं. ४७).

निळोबाचें चांगदेवचरित्र मागें उल्लेखिलेंच आहे.

### नामदेव

खंडेराय कवीनें नामदेवाचें जें अभंगमय चरित्र लिहिलें आहे त्यांत नामदेवाला बापानें आपलें कापड विकावयास पाठविलें, तेव्हां तें नामदेवानें गणपतीस दिलें आणि एक महिन्यानें पैसे द्या असें सांगितलें. मुदत गणपतीनें पैसे आणले नाहींत तेव्हां त्या गणपतीस आणखी एका महिन्याची मुदत दिली, तरी गणपतीनें पैसे आणून दिले नाहींत. म्हणून त्यानें शेवटीं 'कूळ'च उचलून आणलें आणि घरीं देव्हाऱ्यांत ठेवलें पण त्याचें सोनें झालें इत्यादि कथा आहे.

### मोरोपंत

मोरोपंताची 'नामदेवस्तुति' १५ आर्या आहे (तुकारामतात्या नामदेवगाथा). या गाथेंतच कबीराचे नामदेवावर ९२ दोहे आहेत व गोराकुंभाराचे ४ अभंग अगोदर दिले आहेत. नामदेवाचें चरित्र दाखविणारे

त्याचेच समजले जाणारे अनेक अभंग आहेत. उदाहरणार्थ-( १ ) नामदेवास गुरु करण्याविषयीं देवाचा बोध, ( २ ) नामदेवाचे गुरु विसोबा खेचर यास नामदेवाचा बोध, ( ३ ) नामदेवचरित्र ( ? ), ( ४ ) नामदेवाचा देवाबरोबर संवाद, ( ५ ) नामदेवाचा संकल्प व त्यास अभंग करण्याविषयीं देवाचें साहाय्य.

### संतसखूबाई

विठ्ठलकविविराचित सखूचरित्र साकीवृत्तांत आहे. यांत केवळ भक्त म्हणून तिचा उल्लेख केलेला आहे ( काव्यसंग्रह, ४७ ).

### भानुदास

विठ्ठलकवीनें भानुदासचरित्र साक्यांत लिहिलें आहे, त्यांत विद्यानगरच्या म्हणजे विजयानगरच्या राजाचा वृत्तान्त आणला आहे ( काव्यसंग्रह, ४७ ).

### एकनाथ

मुक्तेश्वराचें एकनाथचरित्र ९४ ओव्यांचें आहे. हें चरित्र अगोदरचें असल्यामुळें आणि मुक्तेश्वर हा एकनाथाचा नातू होता हें लक्षांत घेतां याचें महत्त्व विशेष आहे. याशिवाय मुक्तेश्वरानें एकनाथ, ज्ञानदेव यांच्यावर आरत्या लिहिल्या आहेत. एकनाथाचें एक चरित्र खंडेराय कवीचें आहे, तें साकीवृत्तांत आहे. या चरित्रांतील पालुपद आज सर्वतोमुखीं झालें आहे. तें म्हटलें म्हणजे " बरवीं संतचरित्रें हो । पावन परम पवित्रें हो । " हें होय. या पालुपदाचा ' गावीं संतचरित्रें हो ' असाहि पाठ ऐकूं येतो. याचें एकनाथी भागवतावरदेखील काव्य आहे असें काव्यसंग्रहसंपादक लिहितात ( काव्यसंग्रह ग्रंथांक १४, पृ. १५८ ). " बरवीं संतचरित्रें हो । " हें लोकप्रिय झालें यांचें कारण हेंच ध्रुवपद अनेकांनीं वापरलें आहे. उद्धवचिद्घनानें, नागनाथाच्या व इतर चरित्रांच्या आरंभीं हेंच ध्रुवपद घातलें आहे ( काव्यसंग्रह ग्रं. ३७, पृ. ५ ). हें खंडेरायांनीं उद्धवचिद्घनापासून उसनें घेतलें असावें असा तर्क होतो. एकनाथावर निळोबांनीं आरती लिहिली आहे ( निळोबा गाथा, पृ. ३३५ ). तींत त्यास महाविष्णूचा अवतार म्हटलें आहे व तींत भागवती टीका, नारायण आत्मबोध यांचा उल्लेख आहे.

महिपतीचें एकनाथ-चरित्र भक्तलीलामृतांत आहे ( अध्याय १३–२४ ).

## रामदास

रामदासांच्या संप्रदायांतील सर्वांत मोठा रामदासचरित्रावर ग्रंथ म्हटला म्हणजे दासविश्रामधाम हा होय. रामदासाचीं चरित्रें विसाच्या वर आहेत. उपलब्ध आणि उल्लेखित पण अनुपलब्ध अशा चरित्रांची यादी देवांनीं रामदास-रामदासींत दिली आहे. रामदासांच्या रामजयंतीचें महत्त्व एक आज नांव ठाऊक नसलेला कवि वर्णन करतो ( काव्यसंग्रह, ग्रंथांक १४ ), त्यांत " आरंभिति मग रामजयंती अवलोकिति जन संत निधान । ठायीं ठायीं कथापुराण । साधुजनां हें वृत्त समजतां करित अले पथि हरिगुण गान । ध्याति सतत हो हनुमत्प्राण । रंगनाथ, शिवराम, निरंजन, केशव, आनंदमूर्ति महान् । तुकाराम, जयरामहि मान । शेख महंमद, वामन पंडित शिवदिन साधू सर्वसमान । किति गायक पंडित विद्वान् ऐसे अनंतसंतहि दासा भेटुनि पाहती भगवद्ध्यान ॥ " असें वर्णन केलें आहे त्यावरून रामदासाचा सज्जनगड हें एक संतसंमेलनाचें स्थान झालें होतेंसें दिसतें.

यांत तुकोबा सज्जनगडीं दिसत असत असा उल्लेख आहे. या उल्लेखावरून व तुकोबाविषयीं रामदासांनीं जीं मागें प्रशस्तिवाक्यें लिहिलीं होतीं त्यावरून रामदास व तुकाराम यांत द्वैत होतें या प्रकारच्या संशयास जागाच उरत नाहीं. अर्वाचीन कोशकार रघुनाथशास्त्री गोडबोले यांनीं रामदास–तुकाराम द्वैतकल्पनेचा निषेध पूर्वीं केला आहे.

## तुकाराम

तुकारामावर वाङ्मय पुष्कळच आहे. खुद्द तुकारामाच्या अभंगांतच त्याचें आत्मचरित्र पुष्कळ येतें. येथें कांहीं तुरळक लेखांकडेसच लक्ष ओढीत आहें.

काव्यसंग्रह ग्रंथांक ४७ मध्यें खंडेरायकृत तुकारामचरित्र आहे. त्यांत एक तुकारामाची कथा वर्णन केली आहे. सुप्यामध्यें वेळोजीपंतांचें राज्य होतें. त्या वेळोजीपंतानें गांवांतल्या एका विठ्ठल नांवाच्या ब्राह्मणाच्या सुंदर स्त्रीचा अभिलाष धरला आणि ती वश होईना म्हणून सूड घेण्यासाठीं विठ्ठलावर २०० रुपये खोटी बाकी काढली. त्या प्रसंगीं तुकारामानें आपला कसा त्या ब्राह्मणास दिला इत्यादि कथा त्यांत आहे.

महिपतीनें तुकारामाचें चरित्र भक्तविजय अध्याय ४८-४९ यांत दिलें आहे.

शिवदिनकेसरीनें

" धन्य तुकोबा कीं । वा धन्य तुकोबा कीं " असें एक पद लिहिलें आहे ( का. सं. ग्रंथांक ३५ ).

तुकारामाची निळोबांनीं जी स्तुति केली आहे ( आपटे-निळोबा गाथा, पृ. १९५ ) तींत तुकारामविषयक माहिती नाहीं. तींत तुकोबाविषयीं आपली भक्ति व्यक्त केली आहे.

" वसंताच्याईक्षणमात्रें, पल्लवपत्रें फळें वृक्षा "

याप्रमाणें गुरुप्रसादानें आपणांस कवित्व आलें अशी भावना तो दाखवितो. शिवाय

" पशुमुखें ज्ञानेश्वर । कराविला उच्चार वेदघोषु ।। तैसेच तुम्ही मजही केलें । सामर्थ्यें वदविलें आपुलीया."

असें सांगतो, तो तुकारामाच्या अभंगांच्या बुडविलेल्या वह्या तरल्याची कथा तेथें सांगत आहेच. निळोबांनीं तुकारामाची एक आरतीदेखील लिहिली आहे. ( निळोबागाथा, पृ. २३५ ).

## दासोपंत

दासोपंतचरित्र ( ग्रंथकार अनिश्चित; प्र. महाराष्ट्र कवि पु. २ ) हें चरित्र श्रीधर नाझरेकर कवीचें आहे असें म्हणणें चूक आहे असें प्रकाशक सांगतात.

## निरंजनमाधव

याच्या सांप्रदायपरिमळांत याचें आत्मचरित्र आहे.

जुन्या कवींचे भोक्ते पुष्कळ ठिकाणीं आहेत. आणि जरी अर्वाचीन कवींनीं आपल्या अस्तित्वाचें समर्थन केलें आहे तरी जुन्या कवींचा भोक्ता वर्ग वाढतच आहे. मी महाराष्ट्रभर प्रवास करीत असतां मला जुन्या कवींचे ग्रंथ एकत्र जमून वाचणारी अशी मंडळी पुष्कळच भेटली; आणि ती

निरनिराळ्या वर्गांत आहेत. पोस्टमेनपासून डेप्युटी कलेक्टरांपर्यंत या प्रकारची मंडळी सांपडतात व ती वाचनासाठीं एकत्र जमतात हें पाहून मोठें समाधान वाटलें. कांहीं मंडळी कवींचें एकान्तांत वाचन करतांना दिसतात, कांहीं मंडळी संध्याकाळीं संतकवींचे ग्रंथ वाचण्यासाठीं एकत्र जमतात. अशा तऱ्हेनें जागोजाग नांव न दिलेलीं अभ्यासकमंडळें आहेत. त्यांना माझी ही सूचना आहे कीं, एक कवि दुसऱ्या कवीचा उल्लेख करतो. असे उल्लेख दिसल्याबरोबर काढणें आणि एकाच व्यक्तीविषयीं निरनिराळ्यांनीं काय लिहिलें असेल तें ताडून पाहणें यांसारख्या क्रिया अवश्य कराव्यात. तसलीं टांचणें प्रसिद्ध केल्यास तीं वाङ्मयाच्या ऐतिहासिक अभ्यासकास उपयोगी पडतील.

० ० ०

## १५ : महिपति आणि मोरोपंत

मोरोपंत व महिपति या दोघांना निराळें काढण्याचें कारण एवढेंच कीं, एक चरित्रकार या नांवानें प्रख्यात आहे तर दुसरा रसिक लेखक या दृष्टीनें प्रख्यात आहे; सन्मणिमालेंत संतकवींवर अनेक शेरे असल्यामुळें प्रत्येकाच्या कवितेवर कांहीं तरी अभिप्राय मोरोपंतांनीं व्यक्त केला असेल अशी तें काव्य न वाचणाराची समजूत असते; तर महिपति व मोरोपंत या दोघांनीं आपल्या प्रशस्त्यांत काव्यगुणाभिज्ञता कितपत दाखविली आहे याचा सविस्तर विचार प्रस्तुतसारख्या पुस्तकांत वाचक अपेक्षितात.

मोरोपंतांनीं संतकवींसंबंधानें केवळ सन्मणिमाला लिहिली असें नाहीं तर ज्ञानदेव, चांगदेव, नामदेव, कबीर, नरसिंह मेहेता, एकनाथ, श्रीनाथ, रामदास, वामनपंडित, तुकाराम, तुळसीदास, माधवदास, महिपति इत्यादींवर स्वतंत्र काव्यें लिहिलीं आहेत. सन्मणिमालेंत मोरोपंतांनीं फार मोठ्या संतसमूहावर केवळ पुष्पवृष्टि केली आहे. ‘ पुष्पवृष्टि ’ म्हणण्याचें कारण हें कीं त्यांत गुण–दोषविषयक परीक्षण करण्याचा हेतु नसून गौरव करण्याचा हेतु होता. कवीच्या मनांत फक्त गुणवर्णन करावयाचें होतें एवढ्यामुळेंच आपणांस बिचकण्याचें कारण नाहीं. परीक्षकवृत्तीचा मनुष्य स्तुति करतां करतांच व्यक्तीस भिन्न तऱ्हेची स्तुति देऊन त्यांच्यावर अभिप्राय व्यक्त करूं शकतो. तसें मोरोपंतांनीं केलें होतें काय हें आपणांस पाहिलें पाहिजे. आणि यासाठीं सन्मणिमालेचें अधिक बारीक अवलोकन करण्याची आवश्यकता आहे.

प्रत्येकाची स्तुति करूनहि मार्मिकता दाखविण्याचा प्रयत्न करणें हें मोरोपंतांना शक्य होतें. पण मोरोपंतांची इच्छा परीक्षणदृष्टीची नव्हती. तर केवळ काव्य करण्याची इच्छा होती. त्यांचें निरनिराळ्या व्यक्तींवर लिहिणें

कोठें शब्दावर श्लेष करण्याच्या इच्छेनें तर कोठें प्रास साधण्याच्या इच्छेनें नियमित झालें आहे.

सन्मणिमालेंतील पहिल्या चार आर्या निवृत्ति, ज्ञानदेव इत्यादि चार भावंडांवर आहेत, त्या आर्यांतच सन्मणिमालेचें पूर्ण स्वरूप व्यक्त होतें त्या यणेंप्रमाणें—

" सद्योगगुणमणींची ज्याच्या हृदयीं सदा सुखनि वृत्ति ।
तो मज दीना दासा देऊ दावुनि पदा सुख निवृत्ति ॥ १ ॥
जो ज्ञानराज भगवान् श्रवणीं सुज्ञान दे वदे वाचा ।
अवतार गमे अकरावा कां सुज्ञान देवदेवाचा ॥ २ ॥
नमन असो त्या ज्याचीं वचनें वैकुंठसदनसोपानें ।
सोपानें यश केलें कीं ज्याच्या मोहगद न सोपानें ॥ ३ ॥
जरि शुचिमूर्ति सुवृत्ता मान्या श्रवणोचितें गुणें मुक्ता ।
विद्धा जडाहि ते; हे अगुणाही तीस करि उणें मुक्ता ॥ "

या चार आर्यांमध्यें कोणावरहि मोठें मार्मिक विधान मयूरांनीं केलें नाहीं. निवृत्तिनाथाला लावलेलें विशेषण म्हटलें म्हणजे ज्याच्या हृदयांत नेहमीं चांगल्या योगगुणांची खनि आहे, हें होय. खनि म्हणण्याचें कारण त्या शब्दाशेजारीं वृत्ति शब्द वापरून निवृत्तीशीं यमक साधलें पाहिजे एवढेंच होतें. ज्ञानेश्वराला अकरावा अवतार म्हणावें, आणि तो सुज्ञान देतो म्हणून सांगावें यांत मोठी मार्मिकता व्यक्त होत नाहीं. सोपान देवाविषयीं लिहितांना त्याच्या नांवाला अर्थ उत्पन्न करण्यासाठीं त्याच्या वचनाला वैकुंठसदनसोपान म्हटलें आहे. हें विशेषण निवृत्तीच्या वचनाला लावलें तर काय बिघडलें असतें ? शब्दालंकार होत नाहीं एवढेंच. नांवावर शब्दालंकार करणें म्हणजे व्यक्तीविषयीं मार्मिक मत देणें मुळींच नाहीं. शिवाय सोपानविषयक सर्व विधान यमकावलंबी झालें आहे. ज्याच्या पानें मोहगद उत्पन्न होत नाहीं असें म्हणण्यांत मोहगद हा शब्द 'पान' या शब्दामुळें आलेला आहे आणि पान शब्द सोपान याशीं यमक जुळविण्यासाठीं आला आहे. आणि सोपानदेवाला एकंदरींत सर्टिफिकीट काय मिळालें कीं ( १ ) ज्याचीं वचनें वाचलीं तर मनुष्यास मोहगद उत्पन्न

होणार नाहीं ! मुक्ताबाईवर मोरोपंत काय लिहिणार हें मुक्ताबाईच्या कार्यवैशिष्ट्यावरुन न ठरतां ‘ मुक्ता ’ नांवावरूनच ठरलें आहे आणि त्यामुळें सुवृत्ता, विद्धा, अगुणा, श्रवणोचित इत्यादि शब्द आले आहेत.

ज्ञानेश्वरचतुष्टयासारख्या महत्त्वाच्या व्यक्तींचा निकाल या तऱ्हेनें लावला आहे तर इतर कवींवर अभिप्राय मोठे मार्मिकतेचे नसणार हेंहि उघड आहे. आश्चर्याची गोष्ट एवढीच कीं संतकवींचें महत्त्व सांगतांना एवढेंच नव्हे तर त्यांच्या काव्यासंबंधानें लिहितांना मोरोपंतांचा अभिप्राय मांडला जातो हा होय. यमकसाधू मोरोपंताच्या अभिप्रायास महत्त्व देण्याची चुकी फार लोकांकडून झाली आहे.

सन्मणिमालेंत नामदेवाचा उल्लेख विसोबा खेचर याच्या अनुषंगानें आलेला आहे. एकनाथाच्या काव्यावर मत कांहीं नाहीं. त्याच्या शान्तीवर मत आलें आहे. रामदासाचें वर्णन करतांना ‘ रामदासाची ’ याशीं यमक करण्यासाठीं ‘ कामदासाची ’ हे शब्द आले. कामदा शब्द आल्यामुळें कामदा हें स्त्रीलिंगी शब्दाचें विशेषण करावें लागलें तो स्त्रीलिंगी शब्द कीर्ति हा निवडला गेला; आणि रामदासाची कीर्ति ‘ कामदा ’ कशी तर कल्पतरु, कामधेनु, सुरनदी यांहिपेक्षां अधिक असें वर्णन बनलें. या प्रसंगीं कीर्तीच्या ऐवजीं कृपा, दया हे शब्द अधिक शोभले नसते काय ? पण हे शब्द मोरोपंतांना सुचले नसणें शक्य नाहीं. वृत्तासाठीं कल्पना बाजूस टाकली असावी; म्हणजे सत्कीर्ति हे शब्द वापरण्यांत हेतु एवढाच कीं शब्द वृत्तांत बसविण्याइतक्या मात्रांचा असला पाहिजे आणि सत्कीर्ति हा शब्द अवश्यमात्रांचा आहे.

एवंच सन्मणिमालेंत कोणत्याहि कवीवर मोठें मार्मिक मत नाहीं किंवा संत या दृष्टीनेंदेखील वैशिष्ट्यावगमन झालेलें दिसत नाहीं. कमी महत्त्वाचे जे साधू आहेत त्यांच्याविषयीं कांहींहि लिहिलेलें चालतें. या सन्मणिमालेंतील वर्णनावरून दुसऱ्या एका गोष्टीची आठवण होते. एकदां एका कॉलेजांतील मंडळी प्रोफेसरला मानपत्र देत होती, त्यांत प्रोफेसरचे सर्व गुण मोठ्या अतिशयोक्तीच्या स्वरूपांत वर्णिले होते. तेव्हां कांहीं मानपत्र देणारी मंडळी म्हणाली कीं, या मानपत्राच्या प्रती त्यावर प्रोफेसरचें नांव न घालतां छापून काढाव्यात आणि जो प्रोफेसर जाईल त्याचें नांव त्यांत घालावें म्हणजे

प्रत्येक वेळेस छपाईचा खर्च वांचेल. एखादें ठराविक वर्णन वाटेल त्या योद्धयाच्या किंवा कवीच्या संबंधानें दडपून द्यावें ही वृत्ति फारच बोकाळली आहे. बरींचशीं संतवर्णनें एका ठराविक सांच्याचीं बनविलीं असतात आणि तीं त्या संतकवींच्या ग्रंथांच्या प्रस्तावनेंत असतात. दुसऱ्या एखाद्या कवीच्या ग्रंथाला प्रस्तावना लिहितांना तेंच वर्णन कायम ठेवून संतकवीचें नांव बदललें म्हणजे झालें. या तऱ्हेचीं संतकवींचीं लागेल त्या गौरवयुक्त शब्दांनीं युक्त वर्णनें दडपून देण्याचा प्रघात फार पडला आहे. या 'दडपिश्रसे' संप्रदायांच्या मंडळींना आपल्या अभिप्रायसंप्रदायाची पूर्वपीठिका मोरोपंतां-पर्यंत भिडविण्यास कोणतीच अडचण नाहीं. सन्मणिमालेंतील मोरोपंतांचें मुक्तेश्वर कवीसंबंधानें मत देऊन मुक्तेश्वरास मोरोपंत कवींत श्रेष्ठ समजत होता असें दाखविण्याचा प्रयत्न दोन लेखकांनीं केला आहे. मला तर त्यावरून कांहीं एक सिद्ध होईल असें वाटत नाहीं. सन्मणिमालेंत कोठेंच मार्मिकता दिसून येत नाहीं आणि मुक्तेश्वरावर मोरोपंतांची भक्तीहि दिसत नाहीं. मुक्तेश्वरावर मोरोपंतांनीं लिहिलेली आर्या येणेंप्रमाणें आहे—

"श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ।
बंदी लक्ष जयाचे, त्याचें यश भव्य जेंवि संदील ॥"

या आर्येंतील 'कविवर' शब्दास महत्त्व देण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. यांत एवढेंच समजावयाचें कीं मुक्तेश्वरास संत म्हणण्याऐवजीं कवि म्हणण्याकडे मोरोपंताच्या मनाची प्रवृत्ति होती. मुक्तेश्वरास खुद्द मोरोपंत कविवर म्हणतो यावरून तो त्याचें कवींत उच्चत्व मान्य करतो आणि आपल्यापेक्षां त्याची कविता उच्च आहे असा कबुलीजबाब देतो असें म्हणण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. व त्यावरून मुक्तेश्वराची मोरोपंतापेक्षां उच्चता ठरविणें म्हणजे लेखकवर्गांतील स्वाभाविक परंपरा लक्षांत न घेणें आहे. जुन्या सर्व लोकांस उत्तरकालीनांनीं मान देणें अवश्य असतें. कारण त्यांतच सौजन्य असतें; किंबहुना उत्तरकालीनानें तसें केलें नाहीं तर त्याची निंदाच होईल. मुक्तेश्वरावरील वर दिलेल्या अभिप्रायांत ज्याचे लाखों लोक प्रशंसा करणारे भाट आहेत असें विधानदेखील वस्तु-स्थिति दर्शविणारें किंवा मोरोपंताचा अभिप्राय दर्शविणारें आहे असें

म्हणतां येत नाहीं. ' बंदी लक्ष ' हे शब्द वंदील आणि मंदील यांशीं अनुप्रास साधण्यासाठीं आले आहेत, आणि त्यामुळें त्यांस महत्त्व देतां येत नाहीं.

सन्मणिमालेंत ज्या आर्या केवळ संतकवींच्या चमत्कारासंबंधानें किंवा त्यांच्या लोकांना तारण्याच्या शक्तीसंबंधानें नसून कवित्वावर किंवा ग्रंथावर आपला सन्मानयुक्त अभिप्राय वर्णन करणाऱ्या आहेत किंवा निदान ग्रंथांचा उल्लेख करणाऱ्या किंवा विशिष्ट व्यक्तींचा कवि या शब्दानें वर्णन करणाऱ्या आहेत त्या येणेंप्रमाणें—

( १ ) " नमिला साष्टांग श्रीपति-भक्तिरसज्ञ वामनस्वामी ।
रसभवना तत्कवना मानी या तेंवि वाम न स्वामी " ॥१७॥

( २ ) " मान्य पुरंदर विठ्ठल सुकविकुळीं पदपराज नाक वनीं ।
ज्याचें प्रेम हरिपदी तैसें हरिपद पराजना कवनीं " ॥२१॥

( ३ ) " दासोपंतीं केला गीतार्णव मानवा सवालाख ।
ग्रंथ परम दुस्तर तो न तयाचि, जसें न वासवाला ख " ॥२३॥

( ४ ) " भव्य कथाकल्पतरु, क्षितिवरि सर्वत्र सुलभ जो लावी ।
डोलावी देवसभा तद्बहुमतता अशीच बोलावी " ॥२४॥

[ या आर्यांत लेखकाचें नांव नाहीं पण या कथाकल्पतरूचा लेखक कृष्ण याज्ञवल्की म्हणून होता असें संपादक वामन दाजी ओक आपल्या टीपांत म्हणतात ( काव्यसंग्रह ग्रंथांक २९ ). ]

( ५ ) " हरिविजय ग्रंथातें मग आधीं श्रीधरास वंदीन ।
शिववंदनकामां हीं लंघावा प्रथम देव नंदी न " ॥३१॥

[ यांत श्रीधराचें ग्रंथकर्तृत्व फक्त सुचविलें आहे, सांगितलें नाहीं. ]

( ६ ) " श्री मुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ।
बंदी लक्ष जयाचे त्याचें यश भव्य जेंवि मंदील " ॥३२॥

( ७ ) " उद्धवचिद्घन केवळ मी मोर तयासमोर हर्षानें ।
तांडव करितों, होउनि गतताप तदीय सूक्तिवर्षानें " ॥३७॥

( ८ ) "कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा" ॥४४॥

( ९ ) "भक्तांत भवांत पुन्हां भेटि न व्हाया कदापि वैरा गी ।
ज्याची निर्मी; ऐसा रामानंद प्रसिद्ध बैरागी " ॥५९॥

(१०) "माया हे संसृतिची जाळूनि सशोक तो कबी रमला ।
रामपदाब्जीं आलिसा; बहुमत सुमुदोक तो कबीर मला " ॥६०॥

(११) "विष्णुपदीं विष्णुपदें जरि वाहे रसपदेंहि ' मानपुरी ' ॥६५॥

(१२) " ' बहुसुप्रसन्न ' म्हणतो सुकवि म्हणुनि ' सूरदास मजला हो '

(१३) " केशवदास महाकवि सम, हा कविता सलक्षणा करितो " ॥६९॥

( या केशवदासासंबंधानें कांहीं माहिती नाहीं म्हणून ओक सांगतात. )

(१४) " साधु बिहारीलाल ख्यात करी ग्रंथ सप्तशत दोहा " ॥७०॥
(१५) " आनंदतनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं " ॥७३॥
(१६) " विठ्ठलकविच्या भलता लंघू न शकेंचि चित्रकूटातें " ॥७४॥
(१७) बहुशोभला शिवाजीबावा शुद्ध सद्वृत्त लेण्यांत ।
महिमहिलेच्या नाकीं मौक्तिकमणि साधुरूप लेण्यांत ॥८७॥

[ यांत उल्लेखिलेल्या शिवाजीविषयीं ' साधुविशेष ' एवढीच माहिती ओक देतात. ' सद्वृत्त ' या शब्दाचे दोन अर्थ होऊं शकतात. त्यामुळें हा कवि होता कीं केवळ साधु होता हें सांगतां येत नाहीं. ]

(१८) " बा तुळसीदास न जरि वाल्मीकिसमान मानवा तुळशी ।
तरि रामदूत कीं ती ही उक्तिसमान मान वातुळशी " ॥९४॥

(१९) " बोले मधुर मनोहर, मृदु शाहहुसेन नामक फकीर
तेवि न वाणीचाही, कंठीं नसतांहि लेश कफकीर ॥ १०० ॥

सन्मणिमालेंत ज्या व्यक्तींच्या ग्रंथकर्तृत्वाचा उल्लेख आहे अशा व्यक्ती इतक्याच. यांसदेखील ज्या व्यक्तींच्या काव्यांतील गुणांसंबंधानें आपलें मत मोरोपंतांनीं व्यक्त केलें अशा व्यक्ती म्हटल्या म्हणजे ( १ ) आनंदतनय, ( २ ) विठ्ठल, ( ३ ) अमृतराय, ( ४ ) वामन. वामनाची आणि अमृतरायाची तारीफ रसाबद्दल केली आहे, तर आनंदतनयाची यमकाबद्दल केली

आहे, व विठ्ठलाची चित्रकूटांबद्दल केली आहे; व हीदेखील केवळ अशी आहे कीं, तितपत मत व्यक्त करणें अगदीं सामान्य मनुष्यास शक्य आहे.

आतां मोरोपंतांच्या विशिष्ट कवींवर लिहिलेल्या काव्यांकडे वळूं.

ज्ञानेश्वरसं. " विश्वास प्रिया तुझ्या ओंव्या " ( ज्ञानदेवस्तव ८ ).

नामदेव सं. " स्वप्रेमाचाचि लेश दे वास " ( नामदेवस्तव १३ ).

वामनपंडितसं. " साजविली साधुसभा,
भाषा, कविकवनशक्ति लाजविली."

रीति समश्लोकींची अतुला साधेल काय भव्यास ?
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास ?
वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला
याच्या सद्रसभवनें कवनें तो नाचलाचि नाकर्षी
हरिजन, हरिजनहृदया जैसा चुंबक अयास आकर्षी
अन्यत्र नसे, कवनीं यावे रस सर्व, हा नियम कांहीं
केली, भाषाकवि जे, त्यांची तो गर्वहानि यमकांहीं.
( वामनपंडितस्तुति ५–९ ).

तुकारामासंबंधीं

ज्याच्या सदभंगातें जन, जेंवि बाल आत्म्यातें
... ... ... ... ... ... ... ...
शोभे कथा अभंगा पावुनियां जेंवि दीपका शाला
सदभंग कथेंत नको तरि मग शालेंत दीप काशाला ? "
( तुकारामस्तुति १८ व २१ ).

महिपतीसंबंधीं—

" सत्य तुकारामाचा या महिपतिवरि प्रसाद काय असे
सदनुग्रहाविणें हे निघतिल उद्गार सार काय असे
ज्ञानोबाची जैसी एकोबाची सुधा जशी वाणी
कीं मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तशी प्राणी "

या वरील अभिप्रायाखेरीज विशिष्ट व्यक्तीवर लिहिलेल्या स्तवांस्तुतीं-मध्यें कवित्वावर मत व्यक्त करणारे उल्लेख नाहींत. या दिलेल्या उल्लेखांत काव्यावर मतदेखील बेताचेंच व्यक्त झालें आहे. ज्ञानेश्वराच्या ओंव्या जगास प्रिय आहेत हें विधान मोरोपंत करतो, त्याप्रमाणें नामदेवाच्या कवितेंत जें ईश्वरप्रेमाचें प्राधान्य दिसून येतें त्याविषयीं मोरोपंत आपली अभिज्ञता दाखवितो. मोरोपंत कवित्वाच्या दृष्टीनें ज्याविषयीं प्राधान्यानें उल्लेख करतो असा कवि म्हणजे वामनपंडित होय. वामनाच्या कवितेनें "साधुसभा सजविली, भाषा सजविली, कविकवनशक्ति लाजविली. समश्लोकीची रीति भलत्यास साधेल काय ?" या प्रश्नानें मोरोपंत काय म्हणतात हें नक्की कळत नाहीं. मला ती साधेल काय अशा तऱ्हेची कल्पना त्यांच्या मनांत असावीसें वाटतें.

## महिपतीचें ग्रंथकर्तृत्व

महिपतीनें कोणत्या ग्रंथाच्या आधारानें आपले ग्रंथ लिहिले हें खात्री-पूर्वक सांगतां येत नाहीं. भक्तविजयाच्या पहिल्या अध्यायांत "तरी उत्तर देशीं साचार । नाभाजी विरींचि अवतार । तेणें संतचरित्र ग्रंथ थोर । ग्वाल्हेरी भाषेंत लिहिला असे ।। आणि मान देशीं उद्धवचिद्धन त्यांहीं भक्तचरित्रें वर्णिलीं जाण । दोहींचें संमत एक करून भक्तविजय आरंभला' ( अध्याय १, ओं. ३८–३९ ) असें सांगितलें आहे, तथापि या ग्रंथाचें अवलोकन करतां महिपतीनें आपल्या पदरचें पुष्कळच घातलें आहे, त्याचें रा. भावे यांनीं थोडेंसें विवेचन केलेंच आहे. महिपतीनें जें आहे तें बऱ्याच अंशीं अगदीं काल्पनिक घातलें आहे असें वाटूं लागतें. जें त्यानें काल्पनिक घातलें आहे त्याचें पृथक्करण करतां बऱ्याच गोष्टी बाहेर निघतील. कांहीं गोष्टी देतांना इतिहासाचें अज्ञान बरेंच दाखविलें आहे. नरसी मेहेत्यास ज्ञानेश्वराच्या पूर्वींच्या काळांत घातलें आहे, पृथ्वीवर पाप माजलें तें दूर करण्यासाठीं वैकुंठांत विष्णूनें जी योजना केली त्या योजनेंत "शंकरासि सांगे विश्वकर्ता । तुम्ही व्हावें नरसी मेहेता । जुनागडीं भक्तिमार्ग कथा । जना समस्तां ऐकवी ।। तुम्ही पुढें व्हावें सत्वरें । मीहि मागून येतों त्वरें । ज्ञानेश्वररूपें निर्धारें । अर्थ गीतेचा सांगेन ।। " ( अध्याय १, ओं. ९५–९६ ).

महिपतीच्या भक्तविजयांत अनेक चरित्रें आलीं आहेत :त्यांतून प्रस्तुत पुस्तकांत घेण्याजोगें थोडेंच आहे.

महिपतीनें नाभाजीच्या ग्रंथापासून आपला ग्रंथ निराळ्या स्वरूपाचा कसा तयार केला त्याविषयीं भावे सांगतात—

" चरित्रग्रंथ लिहितांना नाभाजीच्या ग्रंथाबरहुकूम आपला ग्रंथ लिहावा असें प्रथमारंभीं कवीच्या मनांत होतें असें दिसतें. व प्रारंभींचीं चरित्रें तशींच लिहिलीं आहेत. परंतु नामदेव–ज्ञानेश्वरादि कवींच्या चरित्रांपर्यंत आल्यावर नाभाजीपेक्षां या पुरुषासंबंधानें या प्रान्तांत जास्त व भिन्न माहिती प्रचलित आहे असें पाहून महिपतीनें नाभाजीचा ग्रंथ सोडून इकडील ग्रंथांच्या आधारें हीं चरित्रें लिहिण्याचें योजिलें. कांहीं अध्याय नामदेवाचे तीर्थावळीवरून रचले." याशिवाय भावे असें सांगतात कीं भानुदास व तुकाराम यांच्यासंबंधानें माहिती वंशजांकडून मिळविली आणि यांत तुकारामाचा भाग सर्वांत सरस आहे.

तुकारामाची कथा येथें देण्यांत तात्पर्य नाहीं. तुकारामाचीं चरित्रें म्हणून जो माल आपणांस सांपडतो तीं बहुतेक महिपतीच्या तुकारामचरित्राचीं रूपान्तरें आहेत.

भक्तविजयाच्या प्रारंभीं एक आख्यायिका आली आहे ती येथें जरा सविस्तर देणें अवश्य वाटतें. कारण ती प्रकृत विषयावर आहे आणि तीवरून काव्याभिज्ञतेच्या बाबतींतदेखील दैवी उपाय वापरावेत अशी लोकांची मनोवृत्ति होती असें दिसतें. चरित्रग्रंथांमध्यें काव्यपरीक्षणविषयक आख्यायिकांचें उदाहरण आलें आहे तें येथें देतों. यांत आलेल्या जयदेवकथेचें ऐतिहासिक महत्त्व कांहीं एक नाहीं हें निराळें सांगावयास नकोच. जयदेव कवीच्या गीतगोविंदावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठीं जयदेवास महिपतीनें व्यासाचा अवतार केलें आहे. ग्रंथाच्या उत्कृष्टतेसंबंधानें कांहीं लिहून त्या ग्रंथाचा राजाला मत्सर कसा झाला याबद्दल एक दंतकथा दिली आहे ( अध्याय २ ).

" रंकामाजी जैसा राव । कीं सकलसाधनांत शुद्ध भाव । तैसा ब्राह्मणवंशीं जयदेव । निपुणवक्ता दिसतसे ।। श्रुतिशास्त्रें धुंडाळून । पाहिलीं पुराणें संपूर्ण।

तयामाजी मुख्य साधन । हरिकीर्तन कलियुगीं ।। उद्धवांसी सांगे रुक्मिणी-रमण । कलियुगीं करावें माझें भजन । म्हणोनि जयदेव कवीनें कवन । गीतगोविंद ग्रंथ केला ।। " ( ओव्या १०–१२ ).

ग्रंथ कां चांगला झाला हें महिपती सांगतो—

" पद्मपुराणींचा इतिहास । त्यांत वर्णिला राधाविलास । गोकुळी क्रीडला जगन्निवास । कृष्ण अवतारीं निजलीलें ।। आधींच श्रीहरीचें गुण जाणा । त्यावरी जयदेवें केली पद्यरचना । सुवर्णाचिया कंकणा । रत्न कोंदणा बसविले ।। " ( १३–१४ ).

यानंतर ग्रंथाची प्रसिद्धि कशी झाली तिचें स्वरूप महिपति वर्णितो—

" गीतगोविंद ग्रंथ केला । तों सकल लोकीं लिहून नेला । पाठ करून हरीची लीला । घरोंघरीं गाताती ।। १५ ।। "

जगन्नाथपुरीच्या राजाला त्या ग्रंथाच्या योगानें मत्सर झाला असें महिपति पुढें सांगतो त्यानेंहि जयदेवाच्या ग्रंथासारखाच एक ग्रंथ केला आणि " त्या ग्रंथाच्या करूनि प्रती । लोकांस पाठवी भूपति । म्हणे पाठ करावा समस्तीं । या ग्रंथाचा निर्धारें ।। १८ ।। " पण त्यामुळें ब्राह्मण रागावले आणि त्याची निर्भर्त्सना करिते झाले, आणि पुढें दोहोंमध्यें चांगला ग्रंथ कोणता यावर दैवी निकाल मागावा असें ठरलें. दोन्ही ग्रंथ देवापुढें ठेवले गेले. जो ग्रंथ देव स्वीकारील तो चांगला या पद्धतीनें उच्चता ठरवावी असें राजानें सांगितलें. पंडितांसदेखील तें मान्य झालें. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं

" जयदेवाचा ग्रंथ उत्तम । जवळीं ठेवी पुरुषोत्तम ।।
राजाचा अवमानून परम । टाकिला बाहेर देखती ।। ३० ।। "

पण पुढें जेव्हां तो राजा आत्महत्या करावयास निघाला तेव्हां " राजयाचे ग्रंथांतून । चोवीस श्लोक घेतले जयदेवाचे ग्रंथीं लिहून । तत्काळ ठेवी जगजीवन ।। राजयाचें समाधान । इतुकेन झालें तेधवां ।। ४८ ।। "

या प्रकारच्या आख्यायिकांवरून काय काढावयाचें ? गीतगोविंदांत चोवीस श्लोक राजाचे आहेत ते कोणते ह्याची चौकशी करण्याचें कारणच

नाहीं; कारण त्यांत चोवीस श्लोकच नाहींत. गीतगोविंदाचें अवलोकन महिपतीनें केलेलें नसावें हें या २४ श्लोकांच्या उल्लेखावरून "गीर्वाण भाषा नेणें मी" (अध्या. १ ओं. ८), म्हणून महिपति जो कबुलीजबाब देतो तो सौजन्याचा निदर्शक नसून वस्तुस्थितीचा निदर्शक असावा हें उघड होतें.

## संतविजय

या पुस्तकांत फक्त रामदासचरित्र आहे. तें भक्तविजयांत आहे पण या ग्रंथांत संतवचनाचा आधार अधिक देत आहे. या चरित्रांतील दोन ठळक गोष्टींकडेसच लक्ष ओढतों आणि त्या गोष्टी म्हटल्या म्हणजे महिपतीसारख्या चरित्रकाराचा ग्रंथकर्तृत्वनिर्णयास उपयोग व या ग्रंथांत दिसून आलेला नागर आणि अनागर वाङ्मयाचा संबंध या होत. या चरित्रामध्यें मधून मधून रामदासाचीं काव्यें घातलीं आहेत व रामदासाचे चमत्कार, त्याची व मारुतीची भेट व त्यास मोह घालण्यासाठीं प्रयत्न इत्यादि गोष्टी वर्णिल्या आहेत. दहाव्या अध्यायांत रामदास–तुकारामसंबंध आणिला आहे व तुकारामाचें कीर्तन ऐकून रामदासांनीं कीर्तन केलें वगैरे सांगितलें आहे. चौदाव्या अध्यायांत गागाभट्टाची मराठी ग्रंथाविषयीं तुच्छता दाखविली आहे. यांत रामदासाचा द्वेष कोण करीत असत, वेणूबाई रामदासांच्या नादीं लागली त्यामुळें तिच्यावर आईबापांचा कसा क्रोध झाला वगैरे गोष्टी घातल्या आहेत. यांत रामदासाच्या काव्याविषयीं जी अभिज्ञता दाखविली आहे ती सपाटून उतारे घेऊन दाखविली आहे. हे उतारे एक तर रामदासांच्या चरित्रावर किंवा मनोवृत्तीवर किंवा तत्त्वज्ञानावर प्रकाश पडणारे आहेत. वाचतांना हे उतारे समर्पक आणि योग्य असेच वाटतात. रामदासाचीं जीं काव्यें आपणापुढें एकदम संपूर्ण तऱ्हेनें उभीं राहतात तीं एकदांच लिहिलीं नसून त्यांतील तुकडे निरनिराळ्या काळीं आणि प्रसंगानें कसे उत्पन्न झाले याविषयीं आख्यायिकात्मक जी माहिती महिपतीस होती ती समाविष्ट केली आहे. जेव्हां आज आपण एखाद्या कवीची गाथाच पहातों तेव्हां त्या कवीचेंच तें काव्य असेल काय अशी आपणांस शंका उत्पन्न होते. व आज आपणांस त्यांच्या कर्तृत्वानिश्चयास साधनेंहि फारशीं नाहींत. महिपतीनें दिलेले उतारे त्या त्या बाबतींत कर्तृत्वनिश्चयास मदत करतील. महिपतीनें जे अभंग

अगर श्लोक रामदासांनीं अमुक प्रसंगीं म्हटले किंवा केले म्हणून सांगितलें तेवढ्यावरून रामदासांनीं ते श्लोक केले असतील इतकेंदेखील खात्रीनें म्हणतां येत नाहीं. आणि ते विशिष्ट प्रसंगीं तयार झाले असें मुळींच सांगवत नाहीं. तथापि महिपति सांगतो तो ग्रंथभाग त्या वेळेस रामदासाचा म्हणून समजला जात होता एवढेंच म्हणतां येईल. पण ही गोष्टदेखील थोड्या महत्त्वाची नाहीं. स्फुट अभंगाच्या कर्तृत्वाच्या निश्चयाचा प्रश्न फारच कठिण आहे. एखादें आख्यान सपाटून वाढण्याचा संभव नाहीं. त्यांत अंतर्गत संगति पहावी लागते, व क्षेपक श्लोक आंत शिरले तर ते अगदीं बेतानें शिरण्याचा संभव असतो. पण जेव्हां कविता स्फुट प्रकारची असते तेव्हां प्रकाशकाच्या हाताशीं येईल ती कविता गाथेंत दडपली जाण्याचा संभव असतो., सर्वच गाथा शंकास्पद आहेत, आणि अशा प्रसंगीं ग्रंथकर्तृत्व तपासण्यासाठीं जितकी मदत मिळेल तितकी हवी आहे. आणि यासाठीं कथा व उतारे हीं दोन्ही एकत्र देणाऱ्या ग्रंथांचा उपयोग मोठा आहे. महिपतीनें आपल्या ग्रंथांत अवतरण केलेले उतारे सर्वच फुटकळ नाहींत तर कांहीं जास्त लांब अशा काव्याचे भाग आहेत आणि यामुळें ज्यांतून उतारा घेतला तें प्रकरण खरोखरच रामदासाचें आहे असें समजण्यास कांहीं तरी आधार आहे. दासविश्रामधाम हें जितपत ग्रंथाच्या कर्तृत्व संशोधनाला प्रमाण म्हणून उपयोगितां येईल तितपत तरी हें महिपतीचें संतविजय रामदासीय ग्रंथ निर्णयास उपयोगी पडेल यांत शंका नाहीं.

संतविजयांत रामदासाच्या रसाळ कीर्तनाविषयीं वर्णनें आहेत, तसेंच इतर समकालीन साधूंविषयीं उल्लेख आले आहेत. वामनाच्या कवित्वाविषयीं

" वामन उठले कीर्तनास । जो कलियुगामाजीं अवतरला व्यास ।
कवित्वीं रस निरुपम " ( अ. २३ वा ).

असे उद्गार काढले आहेत.

संतविजयांत रामदासांचे उतारे आहेत, वामनाचे उतारे आहेत, वेणूबाईचे व आकाबाईचे अभंग अवतरिले आहेत. पण या अभंगांत त्यांचें नांव नसून ' दास म्हणे ' असें कित्येक ठिकाणीं आहे.

" संकल्प विकल्प होय नोहे वाटे
तेंचि मन खोटें काल्पनीक ।

अहंकारासवें देह चालताहे
दास म्हणे पाहे अनुभवें । ”

हा अभंग आकाबाईचा म्हणून दिला आहे पण शेवटीं ‘ दास म्हणे ’ असें आहे. वेणूबाईच्या म्हणून दिलेल्या पुढील अभंगांत तोच प्रकार आहे.

“ हाता चढे सर्व वेदशास्त्रबीज
गुरु गूज गुह्य योगीयांचें ।
योगियाचें गूज सहजींसहज
दास म्हणे नीज ठायीं पडे ॥ ”

तथापि प्रत्येक ठिकाणीं दास म्हणे असेच शब्द नाहींत.

“ परलोकीं पुण्यशील होती धन्य
रामदासीं मान्य हरिभक्ति ”

यावरून असें दिसतें कीं, दास म्हणे असें अभंगांत केवळ रामदासच घालीत होते असें नाहीं तर रामदासांच्या शिष्यांनींदेखील आपल्या गुरूचें म्हणणें आपल्या अभंगाच्या शेवटीं सांगावें ही गोष्ट महिपतीस स्वाभाविक वाटत होती आणि रामदासांचें नांव शेवटीं असतांहि ते अभंग रामदासाचे नसून त्याच्या शिष्यांचे असणें शक्य आहे अशी माहिती महिपति आपणांस सांगतो.

रामदासाचे शिष्य आपलें नांव घालीत नसत असें नाहीं. बहिणाबाईच्या म्हणून दिलेल्या अभंगांत बहिणाबाईचें नांव आहे.

“ बहिणी म्हणे ज्यासी नाहीं आत्मज्ञान तें जाणावें श्वान जन्मा आलें. ”

तुकारामाचे म्हणून दिलेले कांहीं अभंग यांत आलेच आहेत. तथापि

“ अभंग बोले शिवाजी नृपती ते सादर संतीं परिसजे ” ॥ २७ ॥

म्हणून ज्या अभंगांस महिपती अवतारितो त्यांस ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. ते अभंग येणेंप्रमाणें—

“ प्रातःकाल झाल्या राम आठवावा हृदयीं धरावा क्षण एक ।
हेळामात्रें रामनामें होय गती भाग्यवंत घेती सर्वकाळ ।
सर्वकाळ राम मानसीं धरावा वाचें उच्चारावा नामघोष ।
नामघोष वाचें श्रवणीं कीर्तन चरणीं गमन देवालया ।

देवालया जातां सार्थक तें झालें कारणीं लागलें कलेवर ।
कलेवर त्वचा जोडोनि हस्तक ठेवावा मस्तक रामपायीं ।
रामपायीं शीला झाली दिव्य बाळा तैसाची सोहळा मानवांसी ।
मानवासी अंतीं रामनाम गती सांगे उमापती महादेव ।
महादेव जप सांगे पार्वतीसी तोचि तो विश्वासी दास म्हणे । ”

या अभंगांसंबंधानें लिहितांना महिपतीनें गागाभट्टाच्या वृत्तीसंबंधानें जें लिहिलें आहे तें जरा मौजेचें आहे म्हणून तें येथें देतों.—

“ ऐसे अभंग गाय भूपती । पद श्लोक नाना रीती । पायीं घुंगरू बांधोनि प्रीति । नृत्य करिती हरिकीर्तनीं ॥२८॥ सांडोनि लज्जा मान लौकिक । गुण धरिला शुद्ध सात्विक । संतमहंत पावती सुखें । वाटे कौतुक तयासी ॥२९॥ मागिले युगीं थोर थोर । वैष्णव भक्त झाले नृपवर । आणिक कलियुगामाजीं साचार । वैष्णव वीर शिवाजी ॥३०॥ संतमहंत कीर्तन ऐकती । तयांसि आनंद वाटे चित्तीं । गागापंडित कुसमुसी चित्तीं । म्हणे आमुचा भूपती वेडावला ॥३१॥ सोडोनिया व्यासवाणी । महाराष्ट्र जत्या (?) गातो वाणी। ऐसे म्हणे आपुलें मनीं । परी न बोले वदनीं सर्वथा ॥३२॥ राजा चालवितो संसार । द्रव्य वस्त्रें देतसे अपार ।। त्या आशेस्तव द्विजवर । न बोले उत्तर सर्वथा ॥३३॥ ”

गागाभट्टाविषयीं या पुस्तकांत असलेले उल्लेख पाहतां गागाभट्टाविषयीं संतमंडळींचें मत चांगलें असावें असें दिसत नाहीं व याचें कारण त्यानें शिवाजीस क्षत्रिय ठरविलें व कायस्थ प्रभूंस क्षत्रिय ठरविलें अशा प्रकारच्या कृतींमुळें नसून हा संस्कृतचा अभिमानी ब्राह्मण भक्तिमार्गी संतांचा तिरस्कार करणारा अशी संतकवींची समजूत होती हें असावें. संतमंडळींस सांस्कारिक प्रश्नांचें महत्त्व नव्हतें; तें कर्मठ वर्गास होतें. गागाभट्टासंबंधानें झालेल्या कर्मठ मंडळींच्या वृत्तीसंबंधानें आपणांस कर्तव्य नाहीं. मराठी ग्रंथाविषयीं तुच्छता गागाभट्टाच्या मनांत होती हें चौदाव्या अध्यायांत दाखविलें आहे. त्या ठिकाणचे कांहीं उतारे येथें देतों.—

“ रामदासाची ऐकोनि कीर्त । गागापंडित कुसमुशी ॥ ६८ ॥ तंव एके दिवशीं करोनि स्नान । देवघरीं बैसे नृपनंदन ॥ दासबोध ग्रंथ सोडून ।

निजप्रीतीनें वाचित ।। ६९ ।। तंव गागापंडित अवधारी । अकस्मात पातले देवघरीं ।। अभ्युत्थान देउनि सत्वरीं । आसनावरीं बैसविला ।। ७० ।। ब्राह्मण रायासि पुसत । कोणतें शास्त्र, सोडिला ग्रंथ । संस्कृत किंवा प्राकृत । हें मज त्वरित सांगावें ।।७१।। राजा सांगत ये क्षणीं । दासबोध केला समर्थांनीं । पंडित म्हणे प्राकृतवाणीं । ऐकतां श्रवणीं महादोष ।।७२।। तुज जे इच्छा असेल मनीं । तें मी सांगतों व्यासवाणी । तरी महाराष्ट्र ग्रंथ आजपासोनी । देईं टाकोनी नृपनाथा ।।७३।। स्त्री-शूद्र इतर जन । प्राकृत ग्रंथ त्याजकारणें । ब्राह्मण क्षत्रियांसि पुराणें । जीं द्वैपायनें वर्णिलीं ।।७४।। यावरी राजा उत्तर देत । त्यासी हीं वेदशास्त्राचें संमत । येथें बहुत जडली प्रीत । तुम्ही ग्रंथ समस्त पहावा ।।७५।। ऐसें वदतां नृपनंदन । पंडित जाहला क्रोधायमान । रायासि म्हणे आजपासुनि । न सांगो पुराण तुज घरीं ।।७६।। इतकें बोलेनि ते अवसरा । पंडित गेला आपुल्या घरा । परी विकल्प नये रायाच्या अंतरा । गुरुभक्त पुरा तो एक ।।७७।। इतुका निषेध पडतां तेथ । हा समर्थांसि कळला वृत्तांत । मग समुदाय घेउनि समस्त । येउनि बागांत उतरले ।।७८।। मग स्नानसंध्या सकळिकांनीं । करोनि बैसले उपवनीं । इकडे राजा उदित मनीं । दर्शनालागीं जावया ।।७९।। तों जासूद आले घेउन मात । समर्थ उतरले बागा आंत । राजा घाबिरा तेव्हां उठत । पायीं चालत अनवाणीं ।।८०।। अष्टप्रधान पायीं धावत । नगरवासी निघाले समस्त । वैदिक पंडित ब्राह्मण बहुत । दर्शनासि त्वरित चालले ।।८२।। नावेक उभा राहुनि तेथ । मंडळी विलोकीं नृपनाथ । तो गागापंडित नाहीं दिसत । मग आज्ञा करित प्रधानां ।।८३।। मग घोडा-कारकून देउनि त्वरित । निरोप सांगे नृपनाथ । म्हणे समर्थांचे भेटीस त्वरित । यावें बागांत लवलाहें ।।८४।। स्वार घरासि जातां पाहे । पंडित तयासि म्हणताहे । आतां भोजनाचा असे समय । येतां नयेचि यास्तव ।।८५।। समर्थ आले नगरांत पाही । भेटीस येऊं कीर्तनसमयीं । निरोप घेउनि लवलाही । रायासि सर्व सांगितला ।।८६।। ”

यानंतर समर्थांचा सत्कार शिवाजीनें कसा केला, इतर ब्राह्मणांनीं कसा केला इत्यादि कथा सांगून समर्थांचें कीर्तन महिपति वर्णन करतो—

रामदास कीर्तनास बाहेर आले तेव्हां “ समर्थ येउनि सत्वर । विप्रांसि

केला नमस्कार । देखतांचि उठले द्विजवर । आनंद थोर मानसी ।।१०९।। गागापंडित अभिमानी । उठला नाहीं तये क्षणीं । विद्यागर्व त्याचे मनीं । यास्तव फुगोनि बैसला ।। " पुढें रामदासांनीं कीर्तन आरंभलें.

" श्रीराम माझा सिद्धांतवक्ता । रघुराज माझा सिद्धांतवक्ता । श्रीराम माझी प्रसाद कविता । आणिक सर्वथा असेना ।।११५।। ऐसे म्हणोनि तये वेळीं । नामघोषें पिटिली टाळी । जय-जयकार केला सकळीं । नाद निराळीं कोंदला ।।१६।। समर्थ उभे राहिले जेव्हां । सभा तटस्थ झाली तेव्हां । कीर्तनरंग वोढवला बरवा । काय सांगावा निजमुखें ।।१७।। वेदशास्त्राचेनि संमतें । नाममहिमा वर्णिला बहुत । मुखें बोलोनि श्रीभागवत । प्रांजल अर्थ सांगती ।।१८।। ऐकोनि गागापंडित म्हणत । हा तरी मानवी नव्हे समर्थ । दृष्टीनें स्वरूप न्याहाळित । तों दिसे साक्षात् मारुती ।।१९।। मग कर्माभिमान विद्याभिमान । ज्ञानाभिमान सोडला तेणें । अनुताप धरोनियां मनें । करितसे नमन रामदासा ।।१२०।। समर्थें उठवोनि वरच्यावर । आलिंगन देत दोन्ही करें । पंडित बोले मधुरोत्तरें । तूं साक्षात् अवतार मारुतीचा ।।२१।। विश्वोद्धार कराया निश्चितीं । सगुण अवतार दिसतो क्षिती । परी तूं केवळ ब्रह्ममूर्ति । निश्चय चित्तीं बाणला ।।२२।। मग समर्थें हातीं धरोनि त्यांस । सन्मुख बैसविलें पंडितास । हें चरित्र देखतां विशेष । रायासि उल्हास वाटला ।।२३।। "

कीर्तनभाग कांहीं सांगून व त्यांत रामदासांच्या कांहीं अभंगांचें अवतरण करून शेवटचा भाग महिपती पुढीलप्रमाणें वर्णितो. या वर्णनांत एकनाथी भागवताची छटा स्पष्ट उमटली आहे—

" ऐसा समर्थांचा कीर्तनगजर । प्रासादिक अभंग वरच्यावर । कर्म उपासना साचार । अनुभव प्रकार ज्ञानाचा ।। २८ ।। वेदांत आणि सिद्धांत । यांचाहि निश्चय केला समर्थें । तटस्थ झाले सकळ पंडित । उत्तर तयांतें सुचेना ।। २९ ।। तयांसि म्हणती रामदास । महाराष्ट्रभाषा गौण दिसे । परी प्राकृत आणि संस्कृतास । अर्थ दिसे सारखा ।। १३० ।। तथापि संस्कृत वाचिलें पुराण । परी अर्थ प्राकृत लागे सांगणें । जसें रायाचें महत्त्व जाण । प्रजेवांचून न वाढे ।। ३१ ।। लोह निःशेष त्यागितां जाण । तरी न कळे

परिसाचें महिमान । छप्पन्न भाषा ईश्वरानें । आधींच निर्मोन ठेविल्या ॥३२॥ परी रामकृष्णादि नामें पाही । या शब्दांचा पालट नाहीं । जे त्यास वाल्मीकि महाकवी । पुराणी ग्वाही विचारा ॥ ३३ ॥ संस्कृत वाणी केली देवें । आणि प्राकृत चोरापासोनि नव्हे । असें सर्वज्ञीं न म्हणावें । हें अनादि आघवें स्वतःसिद्ध ॥ ३४ ॥ प्राकृत न बोलतां साचार । तरी पुराणिकांचें पोट न भरे । ऐकोनि समर्थांचें उत्तर । पंडित सर्व हांसती ॥ १३५ ॥"

ही सर्व कथा मौजेची आहे खरी पण तिच्या विश्वसनीयतेसंबंधानें प्रश्नच उत्पन्न होईल. गागाभट्ट हे शिवाजीचे पुराणीक बनले होते अथवा होऊं पहात होते असें या कथेंत दर्शविलें आहे. ती कल्पना खरी धरण्याचें कारण नाहीं. गागापंडित महाराष्ट्रांत किती वर्षें होते यासंबंधानें पक्की माहिती नाहीं. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं ते आले असावेत आणि कांहीं काळानंतर गेले असावेत; शिवाय भक्तमंडळी आपल्या गुरूचे गोडवे गातां गातां त्यास लघुत्व कसें देतात याचीहि ही कथा निदर्शक आहे. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या नंतरच्या कालांत म्हणजे रामदासस्वामींची कीर्ति चोहोंकडे पूर्णपणें प्रस्थापित झाली होती अशा काळांत गागाभट्टाचें गर्वहरण करण्यासाठीं रामदासस्वामी आपलें स्थान सोडून मुद्दाम शिवाजीच्या शहरांत जातील हेंहि संभाव्य वाटत नाहीं. रामदासस्वामींचा हा परिपक्व बुद्धीचा आणि संपादित कर्तृत्वाचा काळ होता, आणि या काळांत आपल्यासंबंधानें कांहीं लोक विरुद्ध मत देत आहेत एवढ्यासाठीं धांवून आपलें महत्त्व स्थापण्यासाठीं जावें अशी रामदासांची वृत्ति असेल असें सांगणें म्हणजे रामदास अत्यंत दुर्बल मनाचे होते असें दाखविणें आहे.

ही कथा जरी अविश्वसनीय आहे तरी ती कथा त्या काळच्या पंडित वर्गाच्या मनोवृत्तीची दर्शक आहे यांत शंका नाहीं. ब्राह्मणवाङ्मय व प्राकृतजनवाङ्मय हीं भिन्न होऊं लागलेल्या काळाच्या मनोवृत्तीची ही कथा निदर्शक आहे.

ब्राह्मणवाङ्मय आणि ब्राह्मणेतरवाङ्मय यांच्या एकमेकांशीं असलेल्या संबंधाची हकीगत पुढें येईल.

० ० ०

लोकांच्या काव्याभिज्ञतेचा ग्रंथांवर एक परिणाम आपणांस चोहोंकडे दिसून येतो. तो परिणाम म्हटला म्हणजे, ग्रंथकारानें जें लिहिलें असेल त्याचें शिष्टीकरण होय. जेव्हां एखादें काव्य सामान्य जनांत उद्भूत होतें तेव्हां त्यांत ग्राम्य भाषा किंवा जानपदभाषा असण्याचा संभव असतो. अश्लील शब्द व खेडवळ भाषा आंत घातल्यानंतर तो ग्रंथ लोकांत अधिक प्रसृत होतो, आणि जेव्हां काव्य लोकांना आवडूं लागतें तेव्हां त्या काव्यास सुशिक्षित वर्गांत प्रसृत करण्यासाठीं ठाकठिकी आणण्यांत येते.

ही कृति सर्व देशांत आणि सर्व प्रकारच्या वाङ्मयांत होते जें पुस्तक मरत नाहीं तें बदलत जातें असें म्हणतां येईल. जर ग्रंथ पिढ्यान् पिढ्या लोकोपयोगी राहूं लागला तर त्याचें स्वरूप बदललेंच पाहिजे. ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादि कवींच्या अभंगांची भाषा आपणांस जितकी जुनाट वाटावी तितकी वाटत नाहीं. याचें कारण त्या अभंगांची लोकप्रियता आणि तीमुळें ते अभंग वापरणारांकडून झालेला बदल होय. महाभारत हा मूळचा सूतवाङ्मयांतील ग्रंथ. हा आज ब्राह्मणांच्या भाषेंत प्रसृत झाला आहे. आणि त्यामुळें मूळ ग्रंथाचें शिष्टीकरण करण्याची क्रिया आज हजारों वर्षें चालू आहे. अनेक ठिकाणीं मूळांत फेरफार करण्याची क्रिया नवीन संपादक करीत आहेत. त्यांत असेंहि झालें आहे कीं, कित्येक ठिकाणीं महाभारतांत भाषेचें संस्कृतीकरण करण्यासाठीं संपादकांनीं मूळांत फेरफार केल्याचीं उदाहरणें पुष्कळच सांपडतात. मूळ महाभारतामध्यें दोन शब्दांचे संधी करण्याकडे दुर्लक्ष होतें. उत्तरकालीन हस्तलिखित लेखक आणि संपादक व विशेषेंकरून आवृत्तीकार हा दोष काढून टाकीत. अक्षरें कमी होतात म्हणून हि किंवा च असें अक्षर मध्येंच घुसडीत. मूळ महाभारतांत अनेक ठिकाणीं प्राकृत रूपें जशींच्या तशींच ठेवून दिलीं असावींत. पुढें तीं प्राकृत रूपें काढण्याचाहि प्रयत्न झाला आणि त्यांच्या जागीं संस्कृत शब्द घालण्यांत आलें. असें करतांना वृत्त चुकूं लागलें. उदाहरणार्थ, 'होत्ति'चें 'भवति'

होऊं लागलें तेव्हां नऊ अक्षरांचा अनुष्टुप् दिसूं लागला. या तऱ्हेनें महाभारताचें संस्कृतीकरण अनेक शतकें किंवा सहस्रकें चालूच आहे. महाभारताच्या भाषेसंबंधानें डॉ. सुखटणकर यांच्याकडून जेव्हां पंडितलेख बाहेर पडेल तेव्हां सूत जातीच्या मनुष्यानें लिहिलेल्या ग्रंथाचें शिष्टीकरण करण्यासाठीं व्याकरणशुद्धता पाहूं इच्छिणाऱ्यांनीं काय काय फेरफार केले हें आपणांस सविस्तर समजेल.

मूलपाठसंशोधनार्थ जो परिश्रम होतो त्याचा उपयोग दोन तऱ्हेचा आहे. कवीचा मूळ ग्रंथ कसा होता हें शोधणें महत्त्वाचें आहेच, पण तें संशोधन झाल्यानंतरहि पाठभेद आणि क्षेप यांचें साहित्य निरुपयोगी होत नाहीं. त्याचा वाङ्मयाभ्यासास जो उपयोग होतो तो ग्रंथोत्पत्तीच्या पुढील काळच्या सामाजिक आणि बौद्धिक गरजांमुळें झालेले फेरफार समजावून देण्यास व जुनें अशिष्टांचें वाङ्मय शिष्टांचें कसें झालें हें सांगण्यास आणि काव्य या दृष्टीनें लोकांनीं त्यांत फेरफार कसे केले हें स्पष्ट करण्यास होतो. भवभूतीच्या उत्तररामचरितांत ‘ रात्रिरेवंव्यरंसीत् ’ असें होतें व पुढें कालिदासाच्या आग्रहावरून “ रात्रिरेवंव्यरंसीत् ” असें भवभूतीनें केलें ही कथा प्रसिद्ध आहे. ती देऊन तिची असत्यता विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं दाखविली आहे. आपणांस त्या कथेवरून निराळीच एक गोष्ट दिसते. जुन्या कवितेंत फरक करून तो फरक आख्यायिकांनीं फरकांभोंवतीं गौरवाचें वातावरण करून समाजाच्या पचनीं पाडण्याचा प्रयत्न या कथेंत दिसून येतो. कालिदास व भवभूति व यांच्यासारख्या व्याकरण–अलंकार पाहून काव्य लिहिणाऱ्यांच्या काव्यामध्यें फरक करण्यास जर काव्यचहाते सोडीत नाहींत तर व्याकरण व अलंकार यांच्याकडे कमी दृष्टि ठेवणाऱ्या कवींच्या ग्रंथांस त्यांचे चहाते संस्करण केल्याशिवाय कसे सोडणार ? असो.

मराठी ग्रंथांचे पाठभेद व संस्करणें या विषयावर माझा अभ्यास झाला नाहीं, तथापि काव्यसंस्करणाचे अनेक मासले मीं पाहिले आहेत. त्याविषयीं येथें जास्त विवेचन करीत नाहीं. पाठभेदांचा आणि संस्करणाचा अभ्यास हें एक महत्त्वाचें क्षेत्र आहे, एवढें दाखविण्यासाठींच प्रस्तुत विवेचन पुरेसें आहेसें वाटतें. ब्राह्मणेतरवाङ्मयास ब्राह्मणवाङ्मय करण्याची क्रिया या संस्करणाच्या मागें आहे. तीविषयीं विवेचन पुढें येईलच.

० ० ०

## १७ : महाराष्ट्राची काव्यग्राहकता

काव्य आणि ग्राहकता यांविषयीं येथें थोडेंसें तात्त्विक विवेचन केलें पाहिजे. काव्यपरीक्षण हें परीक्षकाच्या अभिरुचीचें द्योतक आहे आणि लोकांत अभिरुचि उत्पन्न करण्याचें साधन आहे. लोकांची अभिरुचि हीदेखील दुय्यमच गोष्ट आहे. ती लोकांकडून जें काव्यग्रहण होतें तें ठरविण्याचें यंत्र आहे. समाजशास्त्रीय दृष्ट्या समाजाची ग्राहकता अनेकविध व्हावयास पाहिजे व अधिक सुशिक्षित झाली पाहिजे. समाजाकडून होणारें वस्तुग्रहण जसें जास्त कार्यकारी होतें तसा तो समाज अधिक समर्थ होतो. उदाहरणार्थ अन्न घ्या. समाज जितकें अधिक पौष्टिक अन्न खाऊं लागेल तितकी समाजाची अन्नग्राहकता सुधारेल, आणि समाज अपायकारक अन्नें किंवा पेयें यांचें ग्रहण करूं लागेल तर तितकी त्याची ग्राहकता कमी योग्यतेची ठरेल; यासाठीं समाजाकडून जें प्रत्यक्ष काव्यग्रहण होतें तो विषय चर्चेचा केला पाहिजे.

महाराष्ट्रीय जनतेच्या ज्या अनेक गरजा असतात त्यांत वाङ्मय ही किंवा काव्य ही गरज कितपत आहे ही गोष्ट आपण जाणली पाहिजे आणि तीवरून समाजाची या बाबतींतील उच्चनीचता ठरविली पाहिजे. ज्या समाजाला अधिक वाङ्मयाची गरज आहे तो समाज अधिक विकास पावलेला असें समजण्यास हरकत नाहीं. काव्याची गरज काढतांना काव्याचें सामाजिक कार्य ओळखलें पाहिजे. तें कार्य उत्पन्न झालेल्या काव्यवाङ्मयानें जितकें अधिक चांगलें होईल तें काव्यवाङ्मय अधिक कार्यकारी होय. महाराष्ट्रीय काव्यग्राहकता तपासावयाची म्हणजे पुढील गोष्टींसंबंधानें विचार करावयाचा—

( १ ) समाजाच्या एकंदर व्यापारसमूहांत काव्य हें कोणतें कार्य करतें ?

( २ ) काव्याचा जो हेतु असेल तो हेतु काव्याच्या एकंदर कार्यांत समाविष्ट होतो काय ? तो हेतु जास्त कार्यकारी होण्यास काय करावें लागतें ?

( ३ ) काव्य नांवानें जी कृति उत्पन्न होते तिचें समाजाकडून ग्रहण होतें काय ? म्हणज तें काव्य समाजाच्या मनोरचनेचा भाग होतें काय ?

( ४ ) वस्तूचा खप हें ग्रहण आहे काय ?

( ५ ) समाजाकडून जें ग्रहण होतें त्यांत तात्कालिक ग्रहण कोणतें व चिरकाल ग्रहण कोणतें ?

या प्रश्नांस उत्तरें येणेंप्रमाणें देतां येतील.—

समाजांतील काव्याचें कार्य काय हें सांगावयाच्या पूर्वी काव्य याचा अर्थ कांहीं तरी निश्चित आहे असें गृहीत धरावयास पाहिजे; आणि कित्येक असें म्हणतील कीं, काव्य या शब्दाची कायमची व्याख्या तर ठरलीच नाहीं. आपल्याकडे तरी बऱ्याच लोकांचा ' वाक्यं रसात्मकं काव्यं ' इतपत विचारनिश्चय झाला आहे. इंग्रज साहित्यशास्त्रांत तितपतदेखील निश्चय झाला नाहीं. तर मग काव्य समाजांत काय कार्य करतें याचें विवेचन कसें करणार ? याला उत्तर असें आहे कीं. व्याख्या जरी लोकांस करतां आली नाहीं तरी अमुक कृति काव्य आहे काय हें लोकांस समजतें. स्त्री सुंदर आहे किंवा नाहीं हें लोक सांगू शकतात. त्यांस सौंदर्याची व्याख्या करतां येत नाहीं; पण तशीच ही गोष्ट आहे. तर प्रस्तुत प्रसंगीं काव्य काय आहे या वादांत न शिरतां मी ' लोकास आकर्षक अशी पद्यमय रचना ' या अर्थानें हा शब्द वापरीत आहें एवढेंच सांगतों. पद्यमय काव्य लोकांस अगोदर परिचित असतें; त्यांत त्यांना पद्यस्वरूपाशिवाय दुसऱ्या गोष्टींतहि कांहीं साहश्य वाटतें; आणि काव्यास काव्यत्व पद्यस्वरूपामुळें न येतां दुसऱ्याच कांहीं गोष्टींमुळें येतें असें ते म्हणूं लागतात. काव्य हें गद्य असूं शकतें हा नंतरचा विचार उत्पन्न होतो, आणि त्या दृष्टीनें जरी गद्य काव्य हें काव्य आहे असें शास्त्रज्ञ सांगतात तरी त्यास लोक मानीत नाहींत. तें म्हणणें साहित्यशास्त्रज्ञापाशींच राहतें. जेव्हां आकर्षक असा मजकूर पद्यांत असतो तेव्हां त्याला लोक काव्य म्हणतात. ती रचना ' रसात्मक ' असली म्हणजे लोकांस आकर्षक होते हेंदेखील सत्य नसून आकर्षकतेचें

अनुक्रम ..........

क्रमांक .......................... नों: दि: ..................

कारण शोधून काढण्याचा प्रयत्न आहे. पद्यस्वरूप, उपमा, इतर अलंकार, रस या सर्व गोष्टी वाक्यास काव्यत्व देतील.

आकर्षकता हा सामुच्चयिक परिणाम आहे. काव्य जें लोकांस आकर्षक होतें तें अनेक कारणांनीं होतें. कित्येकदां सुगम अर्थामुळें काव्य आकर्षक होतें, तर कधीं कधीं गूढ भाषेमुळें होतें ज्ञानेश्वरी हें काव्य नाहीं तथापि ज्ञानेश्वरींतील बरींच अंगें काव्य आहेत ही गोष्ट कोणी नाकबूल करणार नाहींत. साधीच गोष्ट किंवा साधेंच वाक्य पद्यांत सांगितलें असतां तें लोकांच्या मनात लवकर अडकतें व आकर्षकहि होतें. धातूंच्या कारिका किंवा संस्कृत शास्त्रीय ग्रन्थ पद्यमय असतात, म्हणून ते काव्य होत नाहींत, वगैरे म्हणणें खरें आहे; आणि काव्य गद्यांत असणें शक्य आहे हेंहि खरें आहे; पण हीं दोन्ही आत्यंतिक स्वरूपाचीं उदाहरणें सोडून दिलीं तर काव्याला काव्यत्व येण्यास पद्यमय रचना उपयोगी पडते हेंहि कबूल केलेंच पाहिजे. केवळ पद्यमय रचनाच नव्हे, तर अलंकारशास्त्रांत ज्यांस हलके अलंकार समजतात, असे जे अनुरूप यमकादि अलंकार त्यांची योजना गद्यात झाल्यामुळें गद्य-देखील आकर्षक होऊं शकतें. जेव्हां आपण वश्या, वैद्य, व वकील, ही त्रयी उच्चारतों, तेव्हां त्या तीन गोष्टींमध्यें कांहीं तरी संबंध आहे आणि तो अनुप्रासाचा आहे, एवढेंच नव्हे तर दुसरा कांहीं सारखेपणा त्यांमध्यें आहे असा लोकांत आभास होतो. मनुष्याच्या वित्ताचे हे तीन चोर, अशी कल्पना ही शब्दत्रयी उत्पन्न करणाऱ्याच्या मनांत वावरत असली पाहिजे. असा अनुप्रासयुक्त शब्दसमुच्चय तयार झाला म्हणजे तो लोकांत पसरतो. तो लोकांत पसरतो याचें कारण त्यांत वकील आणि वैद्य यांच्या उपहासाची भावना असते, प्रास असतो वगैरे अनेक कारणें असतात; व यामुळें या तीन शब्दांच्या एकत्र स्थितीस काव्य म्हणतां येईल. लोकांस त्यांना हें कां आवडतें हें सांगतां येणार नाहीं पण ते शब्दसमुच्चय आवडून ते ते पसरवितात हें मात्र खरें. लोकांमध्यें काय ग्रहण होईल याविषयींची वस्तुस्थिति पाहून काव्यनियम काढण्याची कृति अजून झाली नाहीं. लोक-प्रियता अगर लोकग्रहण या काव्याच्या अन्तिम कसोट्या ठरवून धैर्यानें त्याप्रमाणें प्रत्यक्षमूलक शास्त्ररचना करणें ही क्रिया साहित्यशास्त्रांत अजून

व्हावयाचीच आहे. या दृष्टीनें आपणांस अभ्यास करावयाचा झाल्यास पुस्तकांचा खप, नाटकास गर्दी यांची मोजदाद वगैरे गोष्टी उपयोगी पडतील.

समाजाच्या व्यापारग्रामांत काव्य हें जें काम करतें, तें विचार किंवा कथा यांस मोहक करून ती समाजास ग्राह्य करण्याचें होय. ज्याप्रमाणें अन्न ही मनुष्याची आवश्यक गोष्ट आहे पण गोडी ही अन्नग्रहणास साहाय्य करते, त्याप्रमाणेंच काव्य हें विचार व कथा यांची ग्राह्यता वाढवितें. विचार, कथा वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टींस गोडी ज्या ज्या कारणांनीं उत्पन्न होते त्या त्या गोष्टी काव्य होत. तथापि ज्याप्रमाणें आपणांस भाव अथवा गुण पदार्थानें व्यक्त होतो, पदार्थनिरपेक्षगुण आपणांस बुद्धिगोचर होत नाहीं, त्याप्रमाणेंच काव्य आपणांस वस्तूशिवाय म्हणजे कृतीशिवाय गोचर होत नाहीं. यासाठीं काव्याचें भाववाचक वर्णन म्हणजे कवित्व लोक चटकन् ओळखत नाहींत ते कृतीसच ओळखतात. मनुष्यास प्रथमतः वस्तूच दृग्गोचर होते; व सदृश गोष्टी अनेक दिसल्या म्हणजे त्यांत असलेला गुण मनुष्यास कळूं लागतो; विचार आणि कथा या गोष्टी लोकांस परिचयाच्याच आहेत, त्यांस लोक काव्य म्हणत नाहींत; पण त्यांची विशिष्ट तऱ्हेनें मांडणी झाली म्हणजेच लोक त्यांस काव्य म्हणतात, व त्या स्थितींत विचार आणि कथा लोकांस अधिक ग्राह्य होतात. तर काव्याचें कार्य म्हटलें म्हणजे समाजाच्या ज्या इतर अनेक गरजा आहेत त्यांमध्यें माधुर्यानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी आकर्षकतेनें ग्राह्यता उत्पन्न करणें हें होय. समाजामध्यें लोकांस उपदेश पाहिजे. लोकांस जी संस्था टिकवावयाची असेल, ती संस्था टिकविण्यासाठीं तिच्याभोंवतीं तेजोमंडळ निर्माण झालें पाहिजे, आणि यासाठीं त्या संस्थेशीं संबद्ध ज्या व्यक्ती असतात त्या गौरविल्या पाहिजेत. समाजास जुन्या आठवणी राखावयाच्या असतात. तर त्या आठवणी आकर्षक रीतीनें लोकांपुढें आल्या पाहिजेत, यासाठीं उपदेश, संस्थासंबद्ध व्यक्ती, जुन्या आठवणी, यांमध्यें जो गुण किंवा द्रव्य मिसळावयाचें तो गुण किंवा तदाश्रयी द्रव्य हें काव्य होय. तर समाजांतील काव्य आपलें इष्ट कार्य करीत आहे किंवा नाहीं हें पहावयाचें म्हणजे ज्या गोष्टी समाजांत अवश्य आहेत त्या गोष्टींचें संरक्षण करण्याकरितां त्यांसंबंधीं वाङ्मयांत काव्य हें द्रव्य मिसळलें आहे किंवा नाहीं हें म्हणजे आकर्षकता मिसळली आहे किंवा

नाहीं हें पहावयाचें, व त्या दृष्टीनें समाजास लागणारें वाङ्मय पुरवीत रहावयाचें. जर हें कार्य चांगल्या रीतीनें बजावलें गेलें नाहीं तर समाजांतील कविताकौशल्य उत्तम रीतीनें खर्चीं पडलें नाहीं असें समजावें.

काव्य या गुणाचा उपयोग अधिक कार्यकारी रीतीनें होण्यासाठीं आपण जे प्रश्न उत्पन्न करावयाचे ते हे कीं, ( १ ) समाजग्राह्य अशा ज्या गोष्टी आहेत त्यांपैकीं जितक्या अनेक गोष्टींत काव्य मिसळलें जाईल तितक्या अनेक गोष्टींत काव्य मिसळलें गेलें आहे किंवा नाहीं ? ( २ ) काव्य मिसळलें गेल्याच्या योगानें जो इष्ट परिणाम व्हावयाचा तो झाला आहे किंवा नाहीं ? या दोन दृष्टींनीं विचार केला तर समाजाची काव्यशक्ति उत्तम तऱ्हेनें कारणीं लागली नाहीं असें म्हटलें तरी चालेल. स्वराज्यास व स्वसाम्राज्यास कवींनीं उत्तेजन दिलें नाहीं व राज्यकर्त्यांनीं कवींचें या बाबतींतील महत्त्व ओळखलें नाहीं असें शिवकालोत्तर कालाकडे पाहिलें असतां वाटतें. शिवकालीं मात्र कवींचा उपयोग करण्यांत आला. मराठी राज्याच्या स्थापनेनंतर त्या राज्यास स्थैर्य देण्यासाठीं जी गोष्ट अवश्य होती ती म्हटली म्हणजे शिवाजीसारख्या राज्यसंस्थापकाविषयीं लोकांच्या मनांत आदर उत्पन्न करणें. हा आदर उत्पन्न करावयाचा होता. तो शिवाजी-भोंवतीं तेजोवलय उत्पन्न करण्यासाठीं करावयाचा होता. आणि शिवभारत-कारांकडून यासाठीं शिवाजीला ईश्वरांश किंवा अवतारी पुरुषपणा देण्यांत आला. शिवाजीकालीं जें तेजोवलय निर्माण करण्यांत आलें तें वाढवितां येण्याजोगें होतें, ही गोष्ट, या राजघराण्याविषयीं आदर सर्व हिंदुस्थानभर पसरला होता, व शाहूस बंगाली काव्य महाराष्ट्रपुराण यांत नंदीचा अवतार बनविलें होतें यावरून स्पष्ट होईल. एवंच काव्यगुणाचा शासनसंस्थेच्या अभिवृद्धीसाठीं नियमित कां होईना पण उपयोग झाला; तसेंच भक्तिधर्माचें महत्त्व लोकांत स्थापन करावयाचें होतें, यासाठीं भक्तांभोंवतीं त्यांच्या चमत्कारांचीं तेजोमंडळें निर्माण करण्यांत आलीं. व या दोन गोष्टींनीं समाजांतील काव्यशक्तीचा उपयोग झाला व हे दोनहि परिणाम बरेच स्थायी स्वरूपाचे झाले. महानुभाव, जैन इत्यादि संप्रदायांनीं आपापल्या पुरुषांचा तसाच गौरव केलेला आहे.

आतां महाराष्ट्राच्या प्रत्यक्ष काव्यग्रहणाकडे वळूं.

काव्याचा खप व काव्यग्रहण या गोष्टी भिन्न आहेत. पुस्तकाचा खप होणें म्हणजे ग्रहण नव्हे; ग्रहण म्हणजे वाचनहि नव्हे, तर ग्रहण वाङ्मयांतील भाग समाजानें उपयोगी करून घेणें होय; या दृष्टीनें वाङ्मयाचें अवलोकन झालें पाहिजे.

मराठी राज्यांत जरी या दोन बाबतींत काव्याचा उपयोग पुष्कळ झाला, तरी जें काव्य निर्माण झालें त्यांतील शब्द चिरजीवि झाले नाहींत. काव्याचा एकंदर गोळाबेरीज परिणाम मात्र चिरजीवि झाला, व पूर्वींचीं जीं कथानकें होतीं, तीं कथानकें ज्या व्यक्तींवर होतीं, त्या व्यक्तींत शिवाजीमहाराज व संतमंडळी यांखेरीज इतर मंडळाची भर पडली नाहीं, याचें कारण राजपुरुष व कवि यांची एकमेकांच्या कार्यमहत्त्वासंबंधानें अनभिज्ञता हें तर आहेच, पण दुसरींहि कारणें आहेत. शिवाजीइतकी दुसरी कोणतीच व्यक्ति महाराष्ट्रीय मनावर परिणामकारी झाली नाहीं. संभाजीच्या वधामुळें त्यास एक तऱ्हेचें कवीस प्रेरणा करण्याजोगें गौरव आलें होतें. परंतु संभाजीकडे लोकांचें लक्ष गेलें नाहीं याचें कारण संभाजीची क्रूर वृत्ति लोकांच्या नजरेंत होती हें होय. संभाजी व कलुषा हे दोघेहि हिंदी कवितेचे आश्रयदाते होते पण मराठीचे नव्हते हेंहि कारण असावें. ताराबाईचा पक्ष हा संभाजीच्या वंशपरंपरेच्या विरुद्धच होता. त्याच्यानंतर पेशवे आले पेशव्यांस महाराजपद नव्हतेंच, आणि लाकांची भक्ति त्यांच्या एकंदर वैभवावर जडली नाहीं. बऱ्याचशा लोकांस पेशवे केवळ परराज्य आणि परद्रव्य यांचे अभिलाषीच वाटले. व त्यामुळें त्यांच्याभोंवतीं तेजावलयें निर्माण झालीं नाहींत. असो.

ऐतिहासिक वीरपुरुषांस महापुरुषत्व यावें याशिवाय लोकांची दुसरी गरज होती ती म्हणजे सामान्य उपदेशाचीं वाक्यें होत; तर त्या बाबतींमध्यें अनेक काव्यांमधून लोकांनीं आपणांस आवडणारे अंश काढून घेतले व ग्रहण केले असा सामान्यपणें लोकांच्या काव्यग्रहणाचा अगदीं स्थूल इतिहास देतां येईल. वस्तूंचा खप हें ग्रहण आहे काय, व तात्कालिक ग्रहण व चिरकालीन ग्रहण या मुद्दयांकडे सध्यां वळत नाहीं. महाराष्ट्रीय समाजांत चालू असलेलें वाङ्मयग्रहण अधिक तपासलें पाहिजे.

काव्य हें समाजाची प्राथमिक गरज नाहीं असें पुष्कळांस वाटेल पण तशी स्थिति नाहीं अगदीं रानटी लोकांतदेखील काव्य असतें, व चित्र असतें. तें काव्य फार सुंदर असतें अशांतला भाग नाहीं. आणि तो मनाला चेतना देणारा विषय असतो असेंहि नाहीं. उलट रानवट लोकांचीं गाणीं पाहिलीं म्हणजे तीं देवांची स्तुति, जादू, व्यावहारिक गोष्टी वगैरे सत्रा पंधरा गोष्टींची भेसळ असते. त्यांच्यामध्यें भक्ति फार असते असेंहि नाहीं. त्यांचीं देवस्तोत्रें उलट ‘ देवा, तूं जर मला हें देशील तर तुला मी तें देईन ” म्हणून सांगणारींच असतात. पुष्कळ असंस्कृत लोकांचीं प्रेमकाव्यें म्हणजे मीं तुला काय देईन हेंच प्रेमपात्र झालेल्या स्त्रीस सांगणारीं असतात. पण अगदीं जंगली लोकांचेंदेखील वाङ्मय बरेंच असतें. त्यांचीं गाणीं, त्यांच्या पूर्वजचरितांच्या कथा, स्तोत्रें इत्यादि गोष्टी त्यांच्यापाशीं असतातच. त्यांच्या वाङ्मयांतदेखील कांहीं वाङ्मय धंदेवाइकांचें व कांहीं प्रत्येक मनुष्याचें असतें गोंड वगैरे लोकांमध्यें त्यांच्या बड्या देवाच्या कथा प्रत्येक गोंडास ठाऊक असतात असें नाहीं. पण एक दोन गाणीं प्रत्येक मनुष्यास येत असतातच. पण त्यांच्यांतील उपाध्येवर्गास पुष्कळच जास्त गोष्टी ठाऊक असतात. आजच्या महाराष्ट्रीयांचें वाङ्मय संस्कृत, मराठी व इंग्रजा या तीन भाषांत आहे. आणि तें अनेक प्रकारचें आहे. प्रत्येक पांढरपेशा महाराष्ट्रीय मनुष्याकडून वापरलें जाणारें वाङ्मय हें बरेंच असतें. त्याचा आढावा घेऊं.

हें विशेषेंकरून पंचवीस वर्षांपूर्वीच्या पिढीविषयीं सांगतों. सध्यां स्थिति बदलत आहे व अनेक गोष्टींचा लोप होत आहे; व नवीन परिस्थितीची घडी बसली नाहीं अशी स्थिति आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं साधारण स्थिति होता ती येणेंप्रमाणें :—

( १ ) अर्भक लहान असतां ‘ अडगुलं मडगुलं ’ वगैरे कांहीं अर्थ न समजणारीं वाक्यें आईकडून मूल ऐकत अस. शिवाय आई मुलाला पाळण्यांत घालून तुळशीखालीं पोथी वाचणाऱ्या रामाच्या कांहीं ओंव्या म्हणत असे.

( २ ) लहान मुलगे मुंजीपूर्वीं स्तोत्रें पाठ करीत, व कांहीं निवडक श्लोक पाठ करीत. कांहीं ठिकाणीं भूपाळ्या सकाळीं म्हणण्याचा प्रघात होता.

( ३ ) मुली गाणीं पाठ करीत. तीं गाणीं राम, कृष्ण वगैरेंचीं असत.

याशिवाय निश्चयात्मक नित्य वापरलें जाणारें कोणतेंच मराठी वाङ्मय सर्वतोमुखीं नाहीं.

नैमित्तिक पाठ झालेलें वाङ्मय म्हटलें म्हणजे आरत्या होत.

ब्राह्मणांच्या रोजच्या वाचनांत येणाऱ्या ग्रंथांमध्यें गुरुचरित्र, दासबोध व शिवलीलामृत हे ग्रंथ होते. मुक्तेश्वर सर्वश्रेष्ठ मराठी असेल पण घरोघर शिरलेलें आख्यानवाङ्मय श्रीधराचें होतें. नित्य वापरल्या जाणाऱ्या संस्कृत वाङ्मयामध्यें संध्या, पुरुषसूक्त व पूजामंत्र यांचा अंतर्भाव करतां येईल. स्त्रियांच्या नैमित्तिक वाङ्मयामध्यें मंगळागौरीची आरती वगैरे वाङ्मय घालतां येईल. "तपेलींची लांब दोरी । तपेली संबळपुरी" वगैरे महामंत्र या सदरांत येतात.

महाराष्ट्रीय पांढरपेशा समाजाची गरज म्हणून असलेलें वाङ्मय पण जें धंदेवाइकांच्या हातीं गेलेलें होतें असें म्हटलें म्हणजे—

( १ ) संस्कारप्रसंगीं किंवा श्रौतस्मार्त किंवा पौराणिक कर्में करण्याच्या प्रसंगीं लागणारे मंत्र वगैरे.

( २ ) लग्नमुंजीनंतर घातला जाणारा गोंधळ. या वेळेस पवाडे म्हटले जातात.

नैमित्तिक पण धार्मिक किंवा रुढीची सक्ति नसलेलें पण स्वेच्छेचें असें वाङ्मय.

( १ ) जेव्हां चार बायका गव्हले, शेवया करण्यास किंवा वाती करण्यास जमत तेव्हां प्रत्येक बाई आपणांस ठाऊक असलेलें गाणें म्हणून दाखवी. असल्या गाण्यांत सीता–सावित्री वगैरेंचीं गाणीं येत.

( २ ) पुराण व कीर्तन यांचें श्रवण. पुराण व कीर्तन हीं देवळें व मठ यांशीं संयुक्त असतात किंवा खाजगी होतात. या पुराणामार्फत रामायण, महाभारत व पुराणें, व विशेषेंकरून महात्म्यें यांची ओळख लोकांस होत असे.

( ३ ) भोजनप्रसंगीं म्हणावयाचे श्लोक.

पुराण व कीर्तनें यांत अनेक प्रकारचें वाङ्मय येत असे. भागवताचे सप्ताह चालत व रामायणाचेहि चालत, त्यामुळें हे दोन ग्रंथ ऐकवले जातच होते.

शिवाय जर कधीं चांगला पंडित आला तर विद्यारण्यांच्या पंचदशीवर-देखील 'पुराण' चालत असे. तसेंच कांहीं कीर्तनांतून कथाभाग मुळींच न येतां केवळ ब्रह्मनिरूपणाचीं कीर्तनें चालत. जास्त उच्च प्रकारचें जें वाङ्मय आहे तें खासगी रीतीनें जो तो घरीं वाची. तथापि सामाजिक चाल म्हणून आवश्यक झालेलें वाङ्मय एवढेंच. येणेंप्रमाणें वाङ्मयोपयोग मोठ्याशा शहरांतून असे.

महाराष्ट्रांत ग्रहण होणाऱ्या वाङ्मयाचा मी वर समाजांत वाङ्मय वापरल्या जाणाऱ्या प्रसंगाचा आढावा दिला आहे तो एकदेशीय म्हणजे शहरांत राहणाऱ्या ब्राह्मण व पांढरपेशा समाजाचा आहे. शेतकरी लोकांच्या दैनिक आयुष्यक्रमांत वाङ्मयोपयोगाचे प्रसंग निराळे असतात; त्यामुळें ब्राह्मणी वाङ्मय व अ-नागर वाङ्मय असे वाङ्मयाचे दोन भेद लक्षांत घेऊन पृथक्करण केलें पाहिजे. प्रत्येक समाजांत सामान्यजनवाङ्मय आणि पंडितवाङ्मय किंवा उच्चजनवाङ्मय असे वाङ्मयग्रहणाच्या दृष्टीनें भेद आहेत. या भेदांचें कारण केवळ दोघांचे विषय भिन्न, किंवा अभिरुची भिन्न, किंवा दोघांच्या सभ्यतेच्या मर्यादा भिन्न हें नव्हतें. त्या भिन्नतेंत कांहीं अंशीं जातिभेदाचा वास येतो. जें वाङ्मय कुणबी वापरतात तें ब्राह्मणांनीं कसें वापरावयाचें अशी वृत्ति समाजांत होती व आहे. ब्राह्मणांचें व सामान्य जनतेचें वाङ्मय असा भेद वारंवार दृष्टीस पडतो, तो वेदकालापासून आजतागाईत चालू आहे. मधून मधून लौकिक वाङ्मयावर संस्कार होऊन सामान्य जनांचें जें वाङ्मय आहे तें ब्राह्मणांचें वाङ्मय होत असे. संगीतशास्त्रांत असें झालें आहे कीं, वैदिकांचें सामसंगीत चालू असतांच लौकिक गानास शास्त्र लागून संगीतरत्नाकरादि ग्रंथ निर्माण झाले. त्या संगीतास ब्राह्मणांनीं आश्रय दिल्यानंतर सामसंगीत बुडालें. तसाच इतिहास वाङ्मयाचा आहे. वैदिक वाङ्मय लोकप्रचारांतून जाण्याची क्रिया सूतवाङ्मयास ब्राह्मणी संस्कार मिळाल्यानें झाली, आणि सूतवाङ्मय म्हणजे महाभारत व पुराणें यांच्यासारखे ग्रंथ झाले. तीच कथा उपासनापद्धतींतहि झाली. लोकांचीं दैवतें हींच ब्राह्मणांचीं दैवतें झालीं, आज खंडोबा हें झाडून साऱ्या देशस्थ ब्राह्मणांचें दैवत बनलें आहे.

ब्राह्मणी वाङ्मय नेहमीं उच्च दर्जाचें होतें असें नाहीं; पण त्यांत भाषाशुद्धि

जास्त असे. त्यांत मराठी ग्रंथांच्याऐवजीं संस्कृत ग्रंथांचा उपयोग जास्त होई. उदाहरणार्थ, रामरक्षा व संस्कृत स्तोत्रें यांची वाङ्मयाच्या दृष्टीनें व धार्मिक वाङ्मय या दृष्टीनें योग्यता मराठी भक्तिवाङ्मयापेक्षां कमीच आहे; पण तींच ब्राह्मणांमध्यें प्रचलित आहेत.

कुणब्यांचें वाङ्मय अश्लील असतें व ब्राह्मणांचें नसतें असें नाहीं. ब्राह्मणांचें प्राकृत वाङ्मय सामान्यतः प्रतिष्ठित दिसतें. पण तो प्रतिष्ठितपणा भाषेच्या स्वरूपांतच काय तो असतो. वामनाचें राधाविलास, राधाभुजंग या काव्यापेक्षां होनाजी बाळाच्या लावण्या खास अश्लील नाहींत. उलट अनेक लावण्यांत उत्तम प्रकारचें काव्य सांपडतें. त्यांत जितके प्रेमी जनांच्या अंतःकरणांतील उमाळे व्यक्त केले आहेत तितके वामनाच्या राधाविलास किंवा राधाभुजंगांत नाहींत. त्यांत नुसतेंच संभोग शृंगाराचें वर्णन आहे. लावण्याविषयीं तुच्छता दाखवावयाची आणि वामनपंडितादि कवींच्या श्लोकबद्ध शृंगारिक कवितेला प्रतिष्ठित वाङ्मय मानावयाचें हा समाजांतील सांपत्तिक दृष्ट्या व शिक्षणदृष्ट्या कनिष्ठ वर्गाच्या व गरीब जातींच्या तुच्छतेचा प्रकार आहे, दुसरें कांहीं नाहीं. संस्कृत कवी तर प्राकृत कवींपेक्षां फारच अश्लील आहेत. संस्कृत काव्य सामान्यांना समजत नाहीं, तेव्हां संस्कृत जाणणाऱ्या मंडळींना आपापसांत अत्यंत अश्लील भाषण करावयास सांपडावें, आपण तसें करतांना आपल्याला रसिक म्हणवून घ्यावें, आणि संस्कृतज्ञांच्या कोंडीबाहेर पडल्यानंतर गंभीर मुद्रा धारण करावी, आणि अत्यंत सभ्यपणाच्या गोष्टी बोलूं लागावें, असा हा अव्वल इंग्रजींतल्या शास्त्री मंडळींचा परिपाठ होता. तो परिपाठ सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वर्गांत अजून चालू आहे. तो परिपाठ एका पूर्वींपासून आलेल्या सामान्यजनवाङ्मयाच्या तिरस्काराचा परिणाम होता. आणि त्या प्रकारची वृत्ति अजूनदेखील दृष्टीस पडते.

ब्राह्मणांचें वाङ्मय आणि शूद्रांचें वाङ्मय हा भेद केवळ शृंगारिक वाङ्मयांत होता असें नाहीं, धार्मिक वाङ्मयांत होताच. आणि यामुळें संस्कृत स्तोत्रांसारख्या कमी भावनेच्या वाङ्मयाचीच किंवा संस्कृत शब्दमिश्रित प्राकृत वाङ्मयाची ब्राह्मणांत चहा होती. ब्राह्मणांमध्यें संत व भक्त बरेच झाले आहेत, पण ब्राह्मणांची एकंदर वृत्ति भक्तीकडे फारशी दिसत नाहीं.

पांडित्य आणि भक्ति यांची थोडीशी फारकत दिसते; आणि या फारकतीचा परिणाम काव्याभिरुचीवर होई. जें काव्य संस्कृत शब्दांनीं युक्त व प्रतिष्ठित वृत्तांत रचलेलें असेल त्याची ब्राह्मणांत चहा होई. एवढेंच नव्हे तर जें काव्य गूढ अर्थाचें असेल त्याचा अर्थ सांगण्याच्या पैजा लावाव्यात, एकानें तो गूढ अर्थ उकलून सांगण्याची ऐट करावी, असले प्रकार कोंकणातल्या व त्याप्रमाणें वऱ्हाडांतल्या ब्राह्मणांच्या ओस्र्यांवर पंचवीस वर्षांपूर्वीं नेहमीं चालत असलेले दिसत असत; व अजूनहि हे प्रकार खुद्द पुण्यामध्यें कांहीं ठिकाणीं दिसतात.

हे ब्राह्मणवाङ्मय आणि ब्राह्मणेतरवाङ्मय असे जरी भेद केले तरी दोहोंतील अंतर दूर करण्याची क्रियादेखील होतच आहे; आणि तिची परंपरादेखील फार जुनी आहे. ब्राह्मणांतला अशिक्षित वर्ग आणि ब्राह्मणेतर वर्ग या दोहोंमध्यें बौद्धिकदृष्ट्या फारसा फरक नसल्यामुळें कांहीं वाङ्मय या दोघांनादेखील सामान्यच आहे. शिवाय सुशिक्षित ब्राह्मणांमध्यें जो गुणग्राहकवर्ग असतो तो अशिष्ट काव्याचादेखील स्वीकार करतो. तुकारामाच्या चहात्यांमध्यें ब्राह्मणवर्गहि होता. तथापि, तुकाराम शूद्र म्हणून त्याचे अभंग म्हणूं नयत अशा तऱ्हेच्या भावना मधून मधून व्यक्त होत होत्या. तसली भावना व्यक्त करणारें एक पत्र राजवाड्यांनीं भारतेतिहाससंशोधकमंडळापुढें वाचलें आहे, आणि 'तुकाराम देहूकर याची ब्राह्मणांत किंमत' असा त्या पत्राला मथळा दिला व त्या मथळ्यामुळें मंडळांत बरीच चर्चा झाली होती. भा. इ. सं. मं. अहवाल १८३८ पृष्ठ १९९ मथळा लेखप्रसिद्धीच्या प्रसंगीं संपादकांनीं बदलला आहे.

नागरवर्गाचें बरेंच वाङ्मय आपणांस उपलब्ध आहे. पण अ-नागरवर्गाचें अत्यंत अल्प वाङ्मय आपणांस उपलब्ध आहे. नागरवर्गांत प्रसिद्ध अशा अनेक ग्रंथांतून अ-नागर वाङ्मय शिरतें; पण त्या वर्गांतलें फारच थोडें वाङ्मय आपल्या हातीं आलें आहे. लावण्या, पवाडे हे लोकांत प्रचलित आहेत त्यांपैकीं आपल्या हातीं फारच थोडे लागले आहेत. तें वाङ्मय मूळ स्वरूपांत हातीं लागलेंच नाहीं. त्यावर प्रसिद्ध होतांना बरेच ब्राह्मणी संस्कार होऊन तें प्रसिद्ध झालें आहे. तें अ-नागरस्वरूपांत जसेंच्या तसेंच देण्याचा प्रयत्नहि

चालू आहे. कै. भाव्यांनीं तुकारामाची गाथा जी प्रसिद्ध केली आहे, तो अ-नागरवाङ्मय मूळ स्वरूपांत देण्याचा प्रयत्न होय. या प्रकारचा आणखी एक प्रयत्न म्हटला म्हणजे भारतेतिहाससंशोधकमंडळामध्यें रा. वा. दा. मुंडले वगैरे मंडळींनीं प्रसिद्ध केलेलीं गाणीं होत. हीं गाणीं जेव्हां बरींचशीं गोळा होतील व लोकांच्या तोंडांत बसलेलीं गाणीं आणि नागर वाङ्मयांतील लोकांच्या तोंडीं असलेला भाग हीं प्रत्यक्ष अवलोकन करून नोंदिलीं जातील तेव्हां प्रचलित वाङ्मयापैकीं समाजांत कोणतें वाङ्मय जिरून पचनीं पडतें याची बरोबर कल्पना होईल, व लोकांच्या काव्यग्राहकतेविषयीं महत्त्वाचे नियम हातीं लागतील. हा एक मोठा अभ्यास आहे, व या अभ्यासाकडे लक्ष ओढण्यापलीकडे प्रस्तुत प्रसंगीं कांहीं करतां येत नाहीं.

मराठी राज्याच्या कालांत महाराष्ट्रांतील सामान्य जनतेमध्यें काव्याभिरुचि काय असते, व ती कोणकोणत्या वर्गांत कोणकोणत्या प्रकारें असे, व त्या निरनिराळ्या वर्गांच्या काव्याभिरुचीचें स्वरूप कसकसें बदलत गेलें हे प्रश्न-देखील संशोधनपूर्वक विचार करण्याजोगे आहेत. याविषयीं आज माहिती अगदींच मिळण्याजोगी नाहीं असें नाहीं. पण तसें करण्यास आजचें लोकांत पसरलेलें काव्य गोळा करून पाठीमागच्या काळाकडे शोध नेला पाहिजे. अनेक दरबारीं पत्रांतून कारकुनास अमुक काव्य पाठवा, तमुक काव्य पाठवा अशा तऱ्हेचे उल्लेख पुष्कळच आहेत. तथापि, ते उल्लेख आज काढल्यानें सामान्य जनांची अभिरुचि स्पष्ट होत नाहीं. कारण हा पत्रव्यवहार जो उपलब्ध आहे तो दरबारी मंडळींचा आहे. खरेशास्त्री यांनीं जे आपले पत्रव्यवहाराचे खंड प्रसिद्ध केले आहेत, त्यांत पुस्तकें मिळविण्याचे व पाठविण्याचे अनेक उल्लेख आहेत, तसेंच ते राजवाड्यांच्या खंडांतहि आहेत. यावर रा. आबा चांदोरकर एक स्वतंत्र लेख लवकरच लिहिणार आहेत. सामान्य जनांची अभिरुचि त्यांच्यासमोर जें वाङ्मय येतें त्यांतून ते जे श्लोक किंवा पद्यें किंवा अभंग ग्रहण करतात व आपल्या मनाच्या कोठ्यांत सांठवून ठेवतात त्यावरून व्यक्त होतें. सामान्यजन जें वाङ्मय ग्रहण करतात तें अत्यंत नियमित असतें. सामान्य जनमनावर कवितेचा गोळाबेरीज परिणाम तेवढा टिकतो. उदाहरणार्थ, कृष्णाचें स्वरूप घ्या. भागवतानें कृष्णाचें जें बाल्य वर्णिलें आहे तें सामान्य जनांच्या मनास अत्यंत आकर्षक होतें; आणि त्यांत

जें रूप उत्पन्न केलें जातें तें समाज स्वायत्तीकृत करतो. तसेंच निरानिराळ्या कवितांमध्यें जीं म्हणीसारखीं वाक्यें उत्पन्न होतात तीं सार्वजनिक होतात. एखादें गाणें सर्वतोमुखीं होतें; तर सर्वतोमुखीं झालेलें वाङ्मय शोधून काढून समाजाची काव्यग्राहकता अजमाविली पाहिजे. कोणतें वाक्य कोठून आलें हें समाजास ठाऊक नसतें. 'कठिण समय येतां, कोण कामास येतो' हें मद्रास इलाख्याच्या तामीळ नाडूंत उत्पन्न झालेलें वाक्य इकडे निरक्षर बायकांच्यादेखील तोंडीं पुष्कळांनीं ऐकलें असेल! 'ब्रह्मा वेडझवा म्हणूनि विभवा देतो अशा गाढवा!' हें देवनाथाचें वाक्य कोंकणांतदेखील जवळजवळ अशिक्षित अशा ब्राह्मणांच्या तोंडींदेखील मी ऐकलें आहे.

समाज ग्रहण काय करतो याविषयीं स्थूलपणें पुढील गोष्टी सांगतां येतील. (१) काव्याचा परिणाम होऊन व्यक्तींच्या भोंवतीं जें तेजोवलय उत्पन्न होतें त्याचें लोण पिढ्यानूपिढ्या पोंचविलें जातें. (२) ज्या काव्यांगास शहाणपणाच्या वाक्यांचें स्वरूप आहे तें काव्यांगदेखील तसेंच पोंचविलें जातें. (३) लोकांच्या नित्यनैमित्तिक व्यवहाराला उपयोगी पडणारें वाङ्मय म्हणजे देवावरचीं गाणीं, स्तोत्रें, भूपाळ्या, भक्तिपर अभंग हीं पोंचविलीं जातात. (४) जानपद काव्यांत अंतर्भाव होईल अशीं रोजच्या व्यवहाराचीं गाणीं व शृंगारिक गाणीं हींदेखील पोंचविलीं जातात.

आतां पिढ्यानूपिढ्या न पोंचविल्या जाणाऱ्या वाङ्मयाविषयीं विचार करूं. जें काव्य गूढ कल्पनांचें असेल आणि दुर्गम असेल तें फारसें टिकतच नाहीं. सामान्य जनतेची वाङ्मयग्रहणशक्ति अगदीं नियमित आहे. आजकाल दोन आणे, तीन आणे, चार आणे माला रोज वाचल्या जातात पण त्यांतील गोष्टी लोक वाचल्याबरोबरच विसरून जातात. म्हणजे तें वाचन मनावर परिणाम करीत नाहीं, आणि त्यामुळें तें लोकांच्या स्वायत्तीकृत वाङ्मयाचा अंश होत नाहीं.

समाजाचें नित्यनैमित्तिक वाङ्मय मागें दिलेंच आहे. समाजानें ग्रहण केलेलें वाङ्मय वाढवावयाचें किंवा बदलावयाचें म्हटलें म्हणजे त्यास परिश्रम पुष्कळच पाहिजे. तथापि तें बदलतें हें खास. गुरुचरित्र, शिवलीलामृत वगैरे ग्रंथ लोकप्रिय होण्यापूर्वीं एक तर त्यांच्या अगोदर वाचले जाणारे ग्रंथ

निराळे असणार, किंवा या ग्रंथानंतर लोकांच्या वाङ्मयग्रहणांत वृद्धि झालेली असणार. बदल दोनहि बाजूंनीं शक्य आहे. नवीन होणाऱ्या वाङ्मयास जुन्याचें स्थान पटकावणें किंवा आणखी स्थान पटकावणें या दोन्ही गोष्टी शक्य असतात, व दोन्ही क्रिया आज आपल्या दृष्टीस पडत आहेत. माझ्या लहानपणीं मीं जीं बायकांचीं गाणीं ऐकलीं, तींच आजच्या मुलींच्या तोंडीं नाहींत, कांहीं जुनींच आहेत, तर कांहीं नवीन भर पडली आहे. नवीन गाणीं अनेक ठिकाणांहून आलीं आहेत. कांहीं शाळांच्या क्रमिक पुस्तकांतून आलीं आहेत व कांहीं नाटकांतून आलीं आहेत. गणपतीचे मेळे अनेक निघतात, दरसाल त्या मेळ्यांचीं गाणीं बदलतात, परंतु एखादेंच गाणें सर्वतोमुखीं होतें. तशीच गोष्ट नाटकांतील गाण्यांची आहे. गेल्या पिढींत कविताप्रसाराचें काम हरिदास करीत असत, पण आज हरिदासापेक्षां नाटकें, मेळे व क्रमिक पुस्तकें या गोष्टी अधिक बलवान् झाल्या आहेत.

लोकांनीं ग्रहण केलेलें वाङ्मय काढावयाचें हा मोठा अभ्यास आहे म्हणून मागें सांगितलें. तर त्या अभ्यासास येथें केवळ प्रारंभच करतों.

काव्याचे तुकडे लोकांत प्रसृत होतात त्यांपैकीं अनेकांचे कर्ते कोण आहेत याचीदेखील लोकांस माहिती नसते. अशीं कांहीं उदाहरणें—

“ कांट्याच्या अणीवर वसति तीन गांव ।
दोन ओसाड एक वसेचिना ॥ ”

( का. सं. ग्रंथांक १३ )

हें पद ज्ञानेश्वराचें आहे हें पुष्कळांस ठाऊक नसेल.

( १ ) “ भीमकबाळा म्हणे नृपाळा त्या शिशुपाळा मी नवरी ।
कमलनयन हरि विमलचरित तो नवरा त्याची मी नवरी ॥ ”

( २ ) “ हरिची भगिनी म्हणे सुभद्रा रुक्मिणिवहिनी दया करा ।
दादांना तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥ ”

( काव्यसंग्रह ३५ )

या दोन पदांचा जो कर्ता काशी कवि त्याचें नांवहि पुष्कळांस ठाऊक नसेल.

" भाव धरारे । अपुलासा देव करारे " ( काव्यसंग्रह ३५ )

हें पद लोकांस ठाऊक असेल व शिवदिन केसरीहि लोकांस ठाऊक असेल पण हें पद शिवदिन केसरीचेंच म्हणून लोकांस ठाऊक नसेल.

" पाहतां पाहतां धर्म बुडाला अधर्म झाला चहूंकडे ।
जिकडे तिकडे कली मातला कठिण काळ हा आला पुढें ॥ "
( काव्यसंग्रह ग्रं. ३५ )

हें पद महिपतीचें म्हणून ज्यांस ठाऊक असेल असे वाचक थोडे.

" नेदी चित्ता शांती ऐशी विद्या काशाला ।
न घे हरिचें नाम ऐशी जिव्हा काशाला ॥ "
हरिकविकृत पद ( का. सं. ग्रं. ३५ )

कवीच्या नांवापेक्षां काव्य जेव्हां अधिक परिचित असतें असें हें वर दिलेलें आणखी एक उदाहरण आहे.

" प्रभुविण कोण कुणाचा वाली " ( का. सं. ग्रं. ३५, पृ. १३८ )

या ओळीचें कर्तृत्व माणिकप्रभूचें आहे ही गोष्ट फारशी कोणास ठाऊक नाहीं. तीच गोष्ट—

" गडे हो कृष्णगडी आपुला राजा मथुरेचा झाला "
( का. सं. ग्रं. ३५, पृ. १४२ )

या प्रेमाबाईच्या ओळीविषयीं कवीपेक्षां कृति अधिक परिचित असेंच म्हणतां येईल. आणि—

" धांव विभो करुणाकर माधव । देवदयानिधे देवकिनंदन ॥ "
( का. सं. ग्रंथांक १३ )

या केशवस्वामीच्या पदाविषयीं वरील टीकाच करतां येईल.

" अरे गाढवाच्या लेका संसार गेला फुका
संतालागीं नमन करितां लाज वाटे चित्ता

संतचरण नावडती आवडती बायकोच्या लाथा ”

“ एडका मदन । तो केवळ पंचानन ”

( काव्यसंग्रह ग्रंथांक १३, पृ. २७, ५१ )

या ओळी पुष्कळांच्या तोंडीं आढळतात पण त्यांस या एकनाथाच्या आहेत ही माहिती असेल काय ?

पुष्कळदां असें होतें कीं, एक कवि जुन्या काव्याचें पठण करतो आणि त्यामुळें तो जुन्या कवीचें वाक्य आपलेंच म्हणून न जाणतां प्रसृत करतो. याला एकच उदाहरण घेतों—

“ ऐसा पुत्र देगा देवा । जग म्हणे त्याला बावा ।
ऐसा भक्त राजगुंडा । त्याचा तिहीं लोकीं झेंडा ”

( चोखामेळा, तुकारामतात्यांची नामदेवगाथा )

या ओळी रामदासांच्या कानीं पडल्याशिवाय “ पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ” या ओळी रामदासांनीं लिहिल्या असतील काय ?

अनेक उदाहरणें पाहतां हा अप्रत्यक्ष परिणाम किती होतो व कसा सहज होतो हें लक्षांत येऊन मोठी मौज वाटते. कित्येक प्रसंगीं मनुष्य एखाद्या संस्कृत कवीचें भाषान्तर करीत असतो, पण भाषान्तरांत जुन्या मराठी कवींचे शब्द मात्र येऊन जातात. हें दाखविण्यासाठीं देवलांच्या मृच्छकटिकांतील एक उदाहरण घेतों. देवलांनीं भिक्षु झालेल्या संवाहकाच्या तोंडीं—

“ आधीं मनमुंडा मन मुंडा कां व्यर्थ मुंडितांमुंडा ”

हें पद घातलें आहे. तथापि त्या शब्दांत जुन्या कवीचे शब्द आले आहेत.

“ आधीं मन मुंडा । बा मन मुंडा । मग तुम्ही ब्रह्मचि धुंडा ।
मनाचि मुंडलें नाहीं तेथें सद्‌गुण करील कायी ॥ ”

( काव्यसग्रह ग्रंथांक ३५, पृ. ७३ )

हें गोपाळनाथकृत पद ज्यानें वाचलें असेल त्यास देवलांच्या मनावर परिणाम होऊन मृच्छकटिकांतील पद उतरलें असें वाटतें. असो.

प्रस्तुत प्रकरणांत आलेल्या दोन अभ्यासविषयांकडे लक्ष ओढण्यासाठीं त्याचें पुनःकथन करतों.

( १ ) समाजांत जिरणारे वाङ्मयांश व समाजांत ग्राह्य होणारें वाङ्मय किंवा नाट्य यांचें प्रत्यक्षावलोकन करून नंतर साहित्यशास्त्रास चालन देण्याचें काम व्हावयाचें आहे.

( २ ) एका समाजांगांत किंबहुना खालच्या दर्जाच्या समाजांगांत वाङ्मय उत्पन्न होतें तें कालान्तरानें सार्वजनिक व शिष्ट वाङ्मय बनतें; ही क्रिया समाजाच्या वाङ्मयग्रहणाच्या इतिहासांत महत्त्वाची आहे. हिचें अवगमन ब्राह्मणब्राह्मणेतर संबंधावर प्रकाश पाडितें. अशिष्ट वाङ्मयाचें शिष्टीकरण करण्याची क्रिया राष्ट्रीय वाङ्मयांत नाविन्य उत्पन्न करिते. या क्रियेचें महत्त्व भारतीय वाङ्मयाच्या इतिहासांत जितकें प्रामुख्यानें मांडलें पाहिजे तितकें अजून मांडलें गेलें नाहीं.

० ० ०

इंग्रजी राज्यापूर्वीं चालू असलेलें परीक्षण खुद्द ग्रंथोत्पत्ति कारणारांकडूनच झालें. त्यामुळें ग्रंथरचनाकाराची व परीक्षण करणारांची दृष्टि एकच होती. तीमुळें ज्या ग्रंथोत्पत्तीस मर्यादा उत्पन्न झाल्या त्याच मर्यादा ग्रंथपरीक्षणास-देखील उत्पन्न झाल्या. ज्या प्रकारचे ग्रंथ लोक करीत त्या प्रकारचेच ग्रंथ त्यांस आवडतात. ते हरिभक्तीचीं काव्यें करीत, आणि ज्या काव्यांत हरिभक्ति नसेल त्या काव्यास नांवें ठेवीत तर काव्यपरीक्षकांची मनोभूमिका समजावून घ्यावयाची झाली तर ग्रंथकाराचीच मनोभूमिका समजावून घेतली पाहिजे. आणि ग्रंथकाराची मनोभूमिका समजावून घ्यावयाची म्हणजे ज्या सामाजिक आणि वैज्ञानिक परिस्थितींत ती मनोभूमिका उत्पन्न झाली ती परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. ग्रंथाभिरुचि व ग्रंथक्षेत्र हीं वैज्ञानिक त्याचप्रमाणें सामाजिक कारणांनीं मर्यादित झालीं आहेत.

लोकांच्या मनोवृत्तीचा आणि काव्योत्पादनाचा निकट संबंध आहे. काव्याचें परीक्षण लोक आपल्या मनोवृत्तीप्रमाणेंच करणार, व लोकांची मनोवृत्ति काव्योत्पत्तीची नियामक होणार; एकंदर वाङ्मयोत्पत्तीचें स्वरूप लोकांच्या गरजा आणि मनोवृत्ति यांमुळें ठरत असतें. तर मराठी वाङ्मयाचें स्वरूप ठरविणारी जी एकंदर जनतेची सामाजिक स्थिति आणि सामाजिक व्यापारविषयक मनोवृत्ति होती त्यांचें स्वरूप नीट लक्षांत घेऊन त्यांचा ग्रंथोत्पत्तीवर आणि परीक्षणावर काय परिणाम झाला हें मांडलें पाहिजे.

सामाजिक परिस्थितीचा परिणाम पाहतांना मराठी भाषा कोणत्या सामाजिक व्यापारांकडे लावली गेली व गेली नाहीं, आणि कोणत्या बाजूंनीं मराठी वाङ्मयाची वाढ आणि संकोच हीं झालीं या बाबतींत पाहिला पाहिजे. मराठी वाङ्मयाची वाढ सर्व बाजूंनीं न होतां कांहीं बाजूंनीं तेवढीच झाली. धार्मिक विधि, राजकारण इत्यादि गोष्टींवर मराठींत ग्रंथ

झाले नाहींत. विधि संस्कृतमध्येंच राहिले, व राजकारणविषयक पत्रव्यवहार प्रथम फारसींत होत होता व तो मागाहून थोडाबहुत मराठींत होऊं लागला होता. मराठींत उच्च स्वरूपाचें वाङ्मयच झालें नाहीं. कारण समाजाची गरजच त्या प्रकारची होती. उच्च प्रकारचें शास्त्रीय वाङ्मय ज्यासाठीं होतें त्यांना सर्व हिंदुस्थानशीं संबंध ठेवावयाचा होता. यासाठीं त्यांना शास्त्रांची भाषा संस्कृतच ठेवावी लागली. आतां संस्कृत शास्त्रांचा आढावा घेऊन मराठींत त्यांचा कितपत अंश येणें असलेल्या परिस्थितीस शक्य होतें, आणि जास्त येण्यास काय पाहिजे होतें हें पाहिलें पाहिज, आणि नंतर मराठींत जें वाङ्मय ज्या स्वरूपांत आलें त्याचीं कारणें पाहिलीं पाहिजेत.

संस्कृत शास्त्रांपैकीं कांहीं शास्त्रें भाषासंबद्ध आहेत. अशीं शास्त्रें म्हटलीं म्हणजे शिक्षा, व्याकरण. निरुक्त, छंद, साहित्य आणि मीमांसा हीं होत. न्याय आणि वैशेषिक दर्शनें हीं कांहीं अंशीं भाषासंबद्ध तर कांहीं अंशीं विचारसंबद्ध शास्त्रें आहत. या शास्त्रांचा अभ्यास संस्कृत ग्रंथांच्याच अनुषंगानें व्हावयाचा, व मराठींत न्यायावर वाङ्मय व्हावयाचें तें प्रथम टीकारूपाचेंच व्हावयाचें व तसें थोडेंसें झालेंहि आहे. साहित्यशास्त्रविषयक तुरळक पोथ्या सांपडतात, तसेंच तर्कसंग्रहासारख्या पुस्तकांचें भाषान्तर इंग्रजीपूर्वींच्या काळांत झालेंच आहे. तरी त्यांचें विशेष महत्त्व नाहीं. संस्कृत भाषेचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करतां करतां जें भाषाशास्त्रज्ञान उत्पन्न झालें त्यापैकीं मराठी भाषेच्या अभ्यासाला किती लागलें हें पाहतां असें दिसतें कीं, मराठी भाषेचा शास्त्रीय तऱ्हेनें अभ्यास होण्यास महानुभावांनींच थोडीशी सुरुवातहि केली होती. ज्योतिष आणि वैद्यक या शास्त्रांनीं मराठीचा अल्प प्रमाणांत आश्रय केलाच. वैद्यकाचीं बाडें बऱ्याच जुन्या काळापासून सांपडतात, पण पद्धतशीर वैद्यक यांत नाहीं. जर मराठी राज्यानें शास्त्रीय शिक्षणाकडे लक्ष दिलें असतें तर अनेक शास्त्रीय विषयांवर मराठी वाङ्मय उत्पन्नहि झालें असतें. पण हेंहि प्रथम टीकारूपाचेंच असतें. तथापि त्यांत नावीन्य नसतेंच असें नाहीं. संस्कृत टीकांत जशी पुष्कळ ठिकाणीं नवीन माहिती असते तशी यांतहि आली असती.

ज्योतिषावर मराठींत ग्रंथ झाले, पण ते अगदीं थोडे आहेत. पहिला मराठी ग्रंथ म्हणून उपलब्ध असलेलें श्रीपतीचें रत्नमाळ हें पुस्तक ज्योतिषावरच आहे. लोकांना ज्योतिषाची जरूर दोन कारणांमुळें पडते; नाक्षत्रज्योतिष त्यांस पावसाविषयीं अंदाज करण्यास आणि पिकें पिकविण्यास पाहिजे होतें; व कुंडल्या करण्यास, लग्नें जुळविण्यास, अरिष्टें टाळण्यास आणि आशा उत्पन्न करण्यास फलज्योतिष पाहिजे होतें. त्यामुळें या दोहोंवरहि वाङ्मय उत्पन्न झालें. सहदेवभाडळीच्या नांवावर खपणारीं पुस्तकें, व किरकोळ फलज्योतिषावर लिहिलीं गेलेलीं गद्य चोपडीं या स्वरूपांचा प्रयत्न दाखवितात. कल्पशास्त्र म्हणजे श्रौत व गृह्य धर्मांचें शास्त्र; हें ज्या कर्मांसाठीं उत्पन्न झालें तीं कर्में बंद पडत चाललीं होतीं; आणि मराठी वाङ्मयाचा एकंदर भर तीं कर्में बंद पडावींत याच तऱ्हेचा होता; तर यांवर मराठींत ग्रंथ नसणें रास्तच आहे.

शिक्षण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुरू झालें असतें तर शास्त्रीय विषयावर मराठींत वाङ्मय वाढलेंहि असतें.

धर्मशास्त्रदेखील मराठींत वाढलें नाहीं. व्यवहारधर्म बरेच दिवस मुसलमानांच्या ताब्यांत होता. व्यवहारधर्म वगळतां उरलेला धर्म म्हटला म्हणजे आचारधर्म व प्रायश्चित्त धर्म. आचारधर्म हा ज्यांस ज्या कर्मांचा अधिकार असेल त्यांसाठींच होता. अगोदरच आचारधर्माचा लोकांस कंटाळा आणि तो करावयाचा झाल्यास तो करण्यास 'अधिकाराचा प्रश्न' उत्पन्न होणार. अर्थात् या स्थितींत त्याचा प्रसार होणें शक्य नव्हतें. आतां उरला प्रायश्चित्तधर्म; यावरहि वाङ्मय उत्पन्न होण्याची जरूरी नव्हती. ज्या व्यक्तीच्या मनास आपण कांहीं वाईट केलें अशी रुखरुख लागेल त्या व्यक्तीनें प्रायश्चित्त मागण्यासाठीं ब्राह्मणाकडे जावें व ब्राह्मणांनीं पोथी पाहून निकाल द्यावा, या तऱ्हेची स्थिति होती; त्यामुळें धर्मशास्त्रावरदेखील वाङ्मय उत्पन्न होण्याची आवश्यकता नव्हती. आतां येऊन जाऊन उरलेला वाङ्मयप्रकार म्हणजे सामान्य जनाच्या करमणुकीसाठीं लागणारें किंवा त्याच्या मनांत कांहीं तरी चांगल्या भावना उत्पन्न करण्यास अवश्य असणारें वाङ्मय. तें मात्र मराठींत झालें.

ब्रिटिश कालापूर्वीच्या मराठी ग्रंथरचनेचें एकंदर स्वरूप पाहतां त्याचें पुढीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल—

( १ ) आध्यात्मिक वाङ्मय.
( २ ) पौराणिक कथावाङ्मय.
( ३ ) बखरी स्वरूपाचें गद्यवाङ्मय.
( ४ ) पोवाडे.
( ५ ) लावण्या.
( ६ ) प्रेमवाङ्मय.
( ७ ) संतचरित्रात्मक वाङ्मय.
( ८ ) ऐतिहासिक व्यक्तीसंबंधानें पोवाड्याखेरीज काव्यवाङ्मय.
( ९ ) कथावाङ्मय.
(१०) शिक्षणात्मक गद्यवाङ्मय.
(११) शास्त्रीय वाङ्मय.

या वर सांगितलेल्या यादीवरून सर्व तऱ्हेचें मराठींत वाङ्मय आहे असें वाटेल. तथापि आध्यात्मिक वाङ्मय, पौराणिक कथावाङ्मय व संतचरित्रात्मक वाङ्मय यांचाच भरणा पद्यवाङ्मयांत सपाटून आहे. पोवाडे, लावण्या हें अल्प आहे, आणि पोवाड्याखेरीज ऐतिहासिक व्यक्तींवर अनंतफंदीच्या माधवग्रंथासारखें काव्यवाङ्मय तर अत्यंत अल्प आहे. प्रेमवाङ्मयामध्यें लोलिंबराजाच्या रत्नकलेवरील वाङ्मय व लावण्यांसारखें कांहीं स्वतंत्र वाङ्मय आहे तर बिल्हणचरित्रासारखें कांहीं भाषान्तरवाङ्मयहि आहे. पण हें बखरी स्वरूपाचें वाङ्मय जरी बरेंच आहे तरी त्याचें उत्पादनविषयक विवेचन करण्याचें कारण नाहीं. बखरी लिहिणें ही राज्यांत कारकुनीच्या नोकऱ्या करूं इच्छिणारांची गरजच होती. शास्त्रीय वाङ्मयाची कथा मागें सांगितलीच आहे. शिक्षणात्मक गद्यवाङ्मय थोडेंसें तयार होत असावें. याला उदाहरण, राजवाड्यांच्या चौथ्या खंडांत सवाई माधवरावाच्या शिक्षणासाठीं झालेलें पुस्तक देतां येईल.

काव्यवाङ्मय हें लोकांचें मनोरंजन करणारें किंवा लोकांचें मनोरंजन करतां करतां कर्त्याचा दुसरा कांहीं हेतु साधणारें वाङ्मय होय. हें मराठींत

झालें पण त्याची व्याप्ति फार नियमित होती. वाङ्मयाला जें कांहीं स्वरूप आलें तें येण्यास कारणें होतीं. संस्कृत ग्रंथ ज्या प्रकारचा धर्म सांगत त्यापेक्षां निराळ्या प्रकारचा धर्म प्राकृत जनांस हवा होता; या कारणामुळें निराळें धार्मिक वाङ्मय तयार झालें. तें वाङ्मय भक्तिस्वरूपाचें होतें; आणि भक्तीचें शास्त्रदृष्ट्या समर्थन करणारें होतें. शंकराचार्य हे 'ज्ञानदेव तु कैवल्यं' म्हणत व मंडनमिश्र ज्ञानोत्तर स्थितींत कर्ममार्ग चालूच ठेवावा म्हणत; तर तोच सिद्धान्त मराठी आध्यात्मिक वाङ्मयांत ज्ञान झालें तरी भक्ति चालू ठेवावी या रूपांत मांडला गेला.

या परिस्थितींत काव्यास जें क्षेत्र मिळालें तें भक्तीचें मिळालें, आणि काव्य आपली भक्तिस्वरूपाची भावना व त्याबरोबर आपले विचार प्रगट करण्याकडे लागलें; आणि यामुळें मराठी कवितेस संस्कृत कवितेपेक्षां निराळेपणा आला. काव्यानें जे पुरुष गौरवावयाचे तेदेखील निराळेच बनले. शंभर क्रतू करवून इंद्रपद मिळवूं पाहणारे राजे किंवा उग्र तपश्चर्या करून सिद्धि पावणारे पुरुष हे चरित्रविषय न होतां भक्त व संत चरित्रविषय झाले.

काव्य म्हणजे कोणतेंहि वर्णन किंवा कथन आकर्षक तऱ्हेनें करणें. समाजाचे पुढारी जें पूज्य आहे म्हणून ठरवितात तेंच कवी आकर्षक करतात. सामान्य वस्तुवर्णनविषयक काव्य हें वारंवार झाल्यानें त्यांतील रहस्य नाहींसें होतें. प्रातःकाळचीं शेंकडों वर्णनें समाजांत कधींच जिरत नाहींत. व्यक्तिविषयक काव्याची मागणी समाजांत नेहमींच असते; त्या व्यक्ती खऱ्या असोत अथवा काल्पनिक असोत. व्यक्तिविषयक काव्य उत्पादन व ग्रहण हीं मोठ्या प्रमाणावर व्हावींत म्हणून पद्यसमुच्चयाचें रूप सोडून गद्यकथेचें किंवा कादंबरीचें रूप पत्करतें, आणि व्यक्तिविषयक काव्याचा विकास त्या तऱ्हेनें दृष्टीस पडतो. कविता जेव्हां मनुष्याश्रयी असते तेव्हां जो वर्ग अगर ज्या व्यक्ती समाजाला पूज्य बनवावयाच्या असतात त्या व्यक्तींच्या भोंवतालीं काव्य जमा होतें. बुद्धसंप्रदायामुळें बुद्धाभोंवतीं तेजोवलय निर्माण करावें लागलें आणि विविध प्रकारचें काव्य बुद्धाश्रयी बनलें. ब्राह्मणांस व ब्राह्मणानुयायी जनतेस काव्य दोन प्रकारचें करावें लागलें; एक तर ब्राह्मणांची महति वर्णन करणारें व दुसरें ब्राह्मणानुयायी क्षत्रियांची महति गाणारें. ब्राह्मणवर्गास पूज्य

करण्यासाठीं परशुरामानें एकवीस वेळ पृथ्वी निःक्षत्रिया केली, विश्वामित्र राजा ब्राह्मणत्वाची आकांक्षा धरीत होता, आणि मोठ्या कष्टानें त्याची आकांक्षा पूर्ण झाली, ब्राह्मणांस त्रास देणाऱ्या लोकांचा वध ज्या क्षत्रियांनीं केला ते क्षत्रिय खरोखर ईश्वरी अवतार होते, म्हणजे ब्राह्मणांस त्रास होऊं नये ही परमेश्वरी इच्छा आहे, अशा दृष्टीनें काव्य रचलें गेलें. दुर्वासासारखे ब्राह्मण रागावले म्हणजे ते देवांनादेखील शाप देऊन पंचायतींत पाडतात, व यासाठीं ब्राह्मणांना भ्यालें पाहिजे वगैरे कथा सांगण्यांत आल्या. क्षत्रिया-संबंधानें काव्य लिहावयाचें म्हणजे त्यांचे पराक्रम वर्णन करणारें काव्य लिहावयाचें. तें लोकप्रिय होण्यास किंबहुना राष्ट्रीय ग्रंथ होण्यास कांहीं गोष्टी अवश्य आहेत. पण त्या काव्याला स्तुतिपाठक काव्याचें स्वरूप येऊं नये म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. तें काव्य समकालीन राजावर लिहिलें न जातां पूर्वकालीन राजावर लिहिलें गेलें पाहिजे, आणि त्या राजाचें वैभव स्थानिक किंवा विशिष्ट राज्यविषयक न राहतां आतिराष्ट्रीय झालें पाहिजे. तसा काळ काव्यविषयक राजा दिवंगत झाला म्हणजे अनेक पिढ्यांनीं उत्पन्न होणार, ताबडतोब उत्पन्न होत नाहीं. कालान्तरानेंच लोकांस तो पूज्य होतो तर क्षत्रियगौरव करणारें राष्ट्रीय महाकाव्य मराठींत तयार होण्यास सवड झालीच नाहीं.

ब्राह्मणगौरवात्मक वाङ्मय न होतां संतगौरवात्मक झालें याला कारणें होतीं. मुसुलमानी राज्य आलें तेव्हां ब्राह्मण हे पूज्यविषय करण्यासाठीं काव्य करण्याची आवश्यकता नव्हती. कारण हिंदूंमध्यें ब्राह्मणांस प्राधान्य आलेंच होतें. आणि मुसलमान राजांमध्यें ब्राह्मणभय उत्पन्न करण्याची शक्यता नव्हती. हिंदूमध्येंदेखील ब्राह्मणशक्तीसंबंधानें अतिशयोक्तीचें विधान करतां आलें नसतें. ब्राह्मण हे शापानें वाटेल त्यास भस्म करूं शकतील अशी कल्पनाच मांडणें शक्य नव्हतें. अशा बाता जर ब्राह्मणांस गौरव देऊं इच्छिणारे कवी मारूं लागले असते तर लोक म्हणणार कीं, उगाच खोट्या गमजा कशाला करतां. रोज मुसलमान उरावर बसत आहेत तर ब्राह्मणांची शत्रूस भस्म करण्याची शक्ति कोठें गेली आह ? ब्राह्मणांचे पूर्वीप्रमाणें पराक्रम वर्णन करणें शक्य नव्हतें. ब्राह्मणवर्गाच्या अभिमानी लोकांनीं तसे प्रयत्न केलेहि नाहींत. हा संतमंडळीचा भक्तिप्रधानवर्ग संस्कृत विद्येच्या अभिमान्यां-

कडे साशंक वृत्तीनें पहात होता. त्यांना आपल्या वर्गाचा गौरव करावयाचा होता. त्यामुळें जें काव्य निर्माण झालें तें भक्तगौरवात्मक निर्माण झालें. भक्तांच्या अंगीं दैवी शक्ति दाखविण्यांत आली. तथापि ही शक्ति 'कर्तुम-कर्तुं' अशी दाखविण्यांत आली नाहीं. मुसलमानांची लाथ दररोज मिळतच होती, त्यामुळें मुसलमानांस भस्म करण्याची शक्ति संतांत आहे अशा तऱ्हेचें-देखील काव्य झालें नाहीं. संतांचा परमेश्वर हिंदूंसाठीं भांडणारा मुळींच दाखविला गेला नाहीं. तर जो भक्त संकटांत पडेल त्याला सोडविणारा झाला. म्हणजे संतांच्या परमेश्वराची ताकददेखील संकटांतून सोडविण्या-पुरतीच झाली.

"समर्थाचिया सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥"

अशा तऱ्हेचें निर्भय अंतःकरणाचें वाक्य बोलण्याची ताकद रामदासाखेरीज कोणाच्या वाक्यांत दिसत नाहीं.

"मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास कठीण वज्रांस भेदूं ऐसे"

असलीं वाक्यें तुकारामाच्या अभंगांत जरी सांपडलीं तरी तुकारामाच्या अभंगांत निर्भय मनोवृत्तीच्या व्यक्तीचें तेज मुळींच दिसत नाहीं.

पौराणिक धर्म ज्ञानेश्वराच्या पूर्वीं अनेक शतकें आला होता व त्यांतील अनेक व्रतादींचा परिणाम हेमाद्रींत दिसत आहे. पण लोकांच्या भावनांस दिशा सर्व पुराणांनीं दिली नसून फार थोडक्या पुराणांनीं दिली. त्यांत भागवत पुराणास प्राधान्य आहे, आणि भविष्यकालीन वाङ्मयाचें बीज गीता आणि भागवत या दोन ग्रंथांत आहे. मराठींत ग्रंथरचनेस जी दिशा लागली ती ज्या विशिष्ट मनोवृत्तीमुळें लागली ती मनोवृत्ति तेराव्या शतकापूर्वीं-पासून तयार झाली होती.

मराठी संतकवींचा धर्म जरी पूर्वकालीन लोकांच्या धर्मापेक्षां अधिक उच्च तऱ्हेचा भासतो तरी त्या धर्मामध्येंदेखील बरेंच वैगुण्य होतें. धार्मिक भावनांमध्यें केवळ भक्तीच नव्हती तर खुळ्या समजुतीदेखील होत्या. संत-मंडळींमधील मोठे पुरुष चमत्कार करणारे म्हणून प्रसिद्ध होते. ते चमत्कार करण्याची शक्ति त्यांस ईश्वरी कृपेमुळें येते अशी त्यांची कल्पना होती. आणि त्या चमत्कारांच्या अनेक कथांमुळें या संप्रदायास भक्तिदृष्ट्या थोडेंसें गौण स्वरूप आलें आहे.

भागवतामध्यें ज्या कथा आहेत त्या कथांचेंच मराठी संतमंडळीचा संप्रदाय हें विस्मरण होतें. भागवतामध्यें कर्ममार्गी ब्राह्मणांचा उपहास केला आहे व ब्राह्मणपत्न्यादेखील कृष्णाच्या लीलांमध्यें चित्तग्रस्त झाल्या असें दाखविलें आहे. हीच परंपरा ज्ञानेश्वरादिकांपासून संवर्धिली गेली. भक्ति हा योग आहे. भक्तांसाठीं ईश्वर वाटेल तें करतो एवढेंच नव्हे तर भक्त वाटेल तें करूं शकतो असें दाखविलें आहे. हा भक्तिसंप्रदाय त्यांस गौरवावयाचा होता, आणि त्यासाठीं सर्व काव्य खर्चीं पडलें. भक्तिमार्ग आणि वेदविद्या यांमध्यें जो विरोध भागवतामध्यें दाखविला आहे तो संतकवींच्या काळांतदेखील चालूच होता; आणि हा विरोध गागाभट्टाचा उपहास करून महिपतीनें दाखविला आहे.

पूर्वोक्त विवेचनाचा मथितार्थ येणेंप्रमाणें देतां येईल.—धार्मिक वाङ्मय आणि संतचरित्रें आणि पौराणिक कथा यांखेरीज इतर विषयांवर ग्रंथोत्पत्ति होण्यास महत्त्वाच्या अडचणी होत्या. धार्मिक वाङ्मयाचें क्षेत्रदेखील नियमित झालें होतें. हिंदुस्थानच्या पारमार्थिक प्रयत्नाच्या इतिहासांत संतकवींचा जो काल होता तो इतर पारमार्थिक मार्गांची अनुपयुक्तता वाटून भक्तीकडेसच वळण्याचा काल होता. व या काळांतील महापुरुष म्हणजे भक्तच होते, व यामुळें जेव्हां पौराणिक विषयाखेरीज काव्य करावयाची वेळ आली तेव्हां लेखक भक्ताच्या चरित्रांकडेसच वळले. व हें कार्य करण्यास त्यांस स्वाभाविक प्रेरणा झाली. तिचें कारण कांहीं अंशीं तरी आत्मभावनाकथनविषयक काव्य अगोदरच झालें हें होतें.

सामाजिक व वैज्ञानिक परिस्थितीचा वाङ्मयोत्पादनावर झालेला परिणाम आतांपर्यंत दिलाच आहे. आतां त्याच परिस्थितीचा काव्यपरीक्षणावर परिणाम कसा झाला तें दिलें पाहिजे. काव्यपरीक्षणरूपी जें कार्य मुद्रणपूर्वकालांत झालें तें आदरव्यक्ति, अनुकरण, मराठी ग्रंथांचें भाषान्तर, संस्कृत ग्रंथांचें मराठींत भाषान्तर होतांना होणारें मूलपरीक्षण आणि अशिष्ट वाङ्मयाचें शिष्टीकरण, आणि सामान्य जनांकडून होणारें काव्यग्रहण इतक्या बाजूंनीं झालें आहे. एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास हें सर्व परीक्षण अहेतुक झालें आहे. यापेक्षां निराळ्या तऱ्हेनें म्हणजे सहेतुक झालें नाहीं.

याचें कारण संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासकांना मराठी ग्रंथांचें स्वरूप समजलें नाहीं, किंवा त्यांनीं समजून घेण्यासाठीं फिकीर केली नाहीं हें होय. त्यांना देशी कथावाङ्मयाचा अंगिकार करतां आला. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें मराठी वाङ्मयास अभिज्ञता उत्पन्न होण्यास जरा निराळें साहित्यशास्त्र लागत होतें. तर देशी वाङ्मय पाहून त्याचें साहित्यशास्त्रीय परीक्षण करून साहित्यशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याइतका विद्वान् मुद्रणपूर्वकालीन महाराष्ट्रांत निघालाच नाहीं. शिवाय चरित्रकार बनणें वगैरे क्रिया संप्रदायप्रकर्षासाठीं झाल्या. त्या संप्रदायवृद्धीच्या भावनांमुळें लेखकाच्या परीक्षणवृत्तींतहि दौर्बल्य आलें होतें.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ............... वि: ...........
क्रमांक ............................ नों दि ...........

## १९ : ग्रंथाभिरुचि आणि ग्रंथविक्रय

मराठी काव्याभिरुचीचा इतिहास देतांना ग्रंथप्रसाराचा इतिहास दिला असतां काव्याभिरुचीचेंच केवळ नव्हे तर वाङ्मयाभिरुचीचें थोडें स्पष्टीकरण अधिक होईल. म्हणून ग्रंथप्रकाशन आणि ग्रंथविक्रय यांच्या धंद्यावर एक लहानसें टिप्पण येथें देत आहें. येथें जी माहिती देत आहें तिचें प्रकृत विषयाचा भाग म्हणून समर्थन दूरान्वयानेंच करतां येईल. ही माहिती देण्यांत स्वत:ची कौटुंबिक माहिती देण्याचा मोह हें एक कारण आहेच; तथापि ती माहिती वाङ्मयाची जोपासना व प्रसार हीं मुद्रणपूर्वकाळांत कशीं होत होतीं हें दाखविण्यास उपयोगी पडेल, व कांहीं वाचकांना तरी ही माहिती मनोरंजक होईल.

ग्रंथांचा प्रसार आणि ग्रंथविक्रय या गोष्टी भिन्न आहेत. मोरोपंतांच्या आर्या पुराणिकांनीं व हरिदासांनीं लोकप्रिय केल्या पण त्यांनीं ग्रंथाच्या प्रती करवून त्यांचा प्रसार केला नाहीं. ग्रंथप्रसार कोण करीत असत या विषयाचा आपणांस प्रस्तुत प्रकरणांत विचार करावयास पाहिजे. या विषयावर फारशी माहिती मिळत नाहीं. एवढें मात्र दिसतें कीं पुण्यासारख्या मोठ्या शहरांत निरनिराळ्या ग्रंथाच्या प्रती सांपडत असत आणि निरनिराळी संस्थानिक मंडळी पुण्याहून ग्रंथांच्या नकला करवून घेत असत. अशी नकल करतांना नकला करणाऱ्यास नकल करण्याचा खर्च मिळत असला पाहिजे यांत शंका नाहीं. पण आपल्यापाशीं ग्रंथ बाळगून वाटेल त्या ग्रंथाची नकल करवून देण्याचा धंदा पुण्यांत होता किंवा नाहीं याविषयीं निश्चयात्मक माहिती नाहीं. तथापि असा धंदा असला पाहिजे असें वाटतें.

पेशवाईच्या काळामध्यें किंवा मराठी राज्यामध्यें ग्रंथांचा प्रसार कसा होत असे याविषयीं माहिती फारशी नाहीं. तथापि प्रत्येक मोठ्या शहरांत हस्तलिखितांचा सांठा पुष्कळांपाशीं होता हें हस्तलिखितें जमा करणाऱ्यांच्या

अनुभवावरून दिसून येतें. अनेक हस्तलिखितें जीं आज उपलब्ध होत आहेत त्यांवरून मोठमोठे जमीनदार लोक आपल्या पदरीं ग्रंथलेखक बाळगीत, व कित्येक शास्त्री–पुराणिक कांहीं ग्रंथ स्वतः लिहून काढीत असें दिसतें. माझ्या परिचयाच्या एका घराण्यामध्यें दोन चार पुरुषांनीं एक-दोन पिढ्यांमध्यें शेंसवाशें ग्रंथांची स्वतःच नक्कल केलेली आहे. अशामुळें कौटुंबिक ग्रंथसंग्रह गरीब भिक्षुकांच्या घरींहि तयार झाले आहेत, ते मीं पाहिलेले आहेत. याशिवाय विक्रीसाठीं नकला तयार करून ठेवणारे लोकहि मीं पाहिले आहेत. अजूनहि ओरिसासारख्या मागासलेल्या भागांत हस्तलिखितें तयार करण्याची परंपरा राहिली आहे. कांहीं मंडळी फावल्या वेळांत एकाच ग्रंथाच्या दोन तीन नकला करतात व कांहीं प्रसंगीं एकाच ग्रंथाच्या एखादा मनुष्य दहा बारा नकला करून ठेवतो, अशीं हीं उदाहरणें क्षेत्रांतून दिसतात. जगन्नाथ-पुरी येथें मी विक्रीसाठीं हस्तलिखितें तयार करण्याचा प्रकार पाहिला, एवढेंच नव्हे, तर ताडपत्रांवर ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्तिहि शिल्लक राहिलेली पाहिली आहे. कागद चिंध्यांचा असल्यामुळें पुष्कळांना कागदी पोथी सोंवळ्यांत चालत नाहीं. म्हणून ताडपत्राची परंपरा ओरिसांत अजून आहे. हस्तलिखितें जीं तयार होत तीं प्राप्तीच्या आशेनें होत. भाविक लोक असले ग्रंथ विकत घेऊन ब्राह्मणांस दान देतात, व यामुळें पुष्कळ लोक रिकामपणाच्या वेळांत ग्रंथ लिहून ठेवीत असतात. हा किरकोळ धंदा झाला. ग्रंथप्रकाशक याच्या संबंधाची पेशवाईतील अत्यंत जुन्या काळची माहिती उपलब्ध होत नाहीं. अव्वल इंग्रजींत मुद्रणकला आल्यानंतरदेखील हस्तलिखितांचा व्यापार चालूच असे. त्या काळाची माहिती देण्याचें ऐकीव साहित्य मजपाशीं आहे. महाराष्ट्रांतील अत्यंत जुन्या प्रकाशकांपैकीं माझे आजोबा गोविंद रघुनाथ केतकर हे असल्यामुळें त्यांच्या संबंधाची कांहीं माहिती जी मला माझ्या चुलत्यांपासून ( कै. नारायण गोविंद केतकर वकील, उमरावती यांच्यापासून) कळली ती येथें मांडीत आहें. गोविंद रघुनाथ केतकर यांचा जन्म व मृत्यु यासंबंधानें मला माहिती नाहीं. १८१८ नंतर जे पेशव्यांचे कांहीं धनको बुडाले त्यांतच त्यांचे वडील रघुनाथ महादेव केतकर होते, व आपले ऋणको पेशवे बुडाले व धनको मात्र पैसे मागत आहे असें पाहून त्यांनीं गांगरून जाऊन संन्यास घेतला व ते काशीस जाऊन

राहात होते. गोविंद रघुनाथ केतकर यांनीं त्या वेळेस जितकें देणें देतां येईल तितकें देऊन टाकलें व घरांतील बायकांचे दागिने व पोथ्या यांवरच संसार आरंभला, व त्यांचा आयुष्यक्रम एकंदर फिरण्यांत बराच गेला. ते अंजनवेलीस आपल्या घरच्या मंडळीस ठेवून चोहोंकडे प्रवास करीत असत. आणि सत्तावन्न सालच्या पूर्वीं त्यांचा व्यापार बराच वाढला होता. त्यांच्या झाडून सर्व मराठी दरबारांत ओळखी होत्या व त्यांचा पुस्तकांचा धंदा त्या ओळखीवरच चालत असे. त्या वेळची पुस्तकविक्रीची पद्धत येणेंप्रमाणें होती–

आमचे आजोबा नेहमीं दहापासून वीसपर्यंत खटारे घेऊन फिरत. या खटाऱ्यांतून पुस्तकें भरलेलीं असत. आणि पुष्कळदां एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणावर जातांना त्यांनीं सुरक्षितपणें पोंचावें म्हणून ज्या संस्थानांतून ते निघत तें संस्थान बरोबर स्वारहि पाठवी. व दुसऱ्या संस्थानच्या अधिकाऱ्यांच्या हवालीं त्यांस करून देई. एका गांवांतून दुसऱ्या गांवीं जातांना मध्यें मोठमोठ्या गांवीं मुक्काम होई. आणि त्या प्रसंगीं घोड्यांची व बैलांची दाणावैरण गांवच पुरवीत असे; व असला एक पुस्तकसंग्रहवाला आला, म्हणजे त्याच्या सर्व मंडळीचें स्वागत गांवाकडून चांगल्या तऱ्हेनें होत असे. अशा वेळीं लहानशा गांवांतदेखील पुस्तकें खपत असत. आणि या रीतीनें पुस्तकें घेऊन येणारा व्यापारी क्वचितच येत असल्यामुळें ती वेळ साधून कांहीं तरी बरींच पुस्तकें घेऊन ठेवावीं अशी लोकांची प्रवृत्ति होई. जमनिदार वगैरे लोक पुस्तकें घेत असत; परंतु भिक्षुक मंडळींना पुस्तकें घेणें शक्य नसे. तेव्हां भिक्षुकांस पुस्तकें दान करण्याकरितां म्हणून श्रीमंत लोक पुस्तकें घेऊन ठेवीत.

एखाद्या संस्थानिकाच्या गांवांत हे ग्रंथविक्रेते गेले म्हणजे तो संस्थानिक त्यांची चांगली बडदास्त ठेवी. रहावयास घर मिळे, भांडींकुंडीं मिळत, धान्य, तूपसाखर वगैरे सर्व जिन्नस मिळत. व हे पुस्तकविक्रेते–आमचे आजोबा यांच्या व संस्थानिकांच्या भेटी व परतभेटीहि होत. व सहकुटुंब असल्यास त्यांच्या कुटुंबाच्या व संस्थानिकांच्या घरच्या मंडळीच्या भेटी व परतभेटीहि होत. संस्थानिकांस पुस्तकें कोणतीं घ्यावयाचीं हें सर्व खावकाश ठरत असे. कारण संस्थानिकापाशीं जीं पुस्तकें नसतील तीं घ्यावयाचीं

एवढेंच नसे तर भांडारांत असलेल्या प्रतीपेक्षां एखादी चांगली नक्कल असेल तर तीहि व्यावयाची असा रिवाज होता. बडोद्यास असतांना आमचे आजोबा ५०–६० ब्राह्मण लेखक ठेवीत व त्यांच्याकडून नवीन नकला करवून घेत. त्या वेळेस या ब्राह्मण लेखकांस दरमहा तीन रुपये देण्यांत येत असत. असें कळतें. याचें कित्येकांस आश्चर्य वाटेल; पण वस्तुस्थिति लक्षांत घेतली असतां तीन रुपये ही बरीच बिदागी होत असावी, असें दिसतें. कारण त्या वेळेस या ब्राह्मणांस खिचडी दरबारांतूनच मिळत असे, आणि ही जी तीन रुपयांची मिळकत होत असे ती खरोखरच त्यांची शिल्लकच पडत असे. आणि त्या वेळेस बरीच स्वस्ताई होती. ग्रंथांच्या किंमतींविषयीं माहिती आहे ती अशी—महाभारत सुमारें १५० पासून २५० रुपयांपर्यंत विकलें जाई, व भगवद्गीतेची पोथी २ पासून तीन रुपयांस विकली जात असे. महाभारताचें दान म्हणजे मोठें दान समजलें जात असे, व त्याबरोबर एक मोहोर तरी दक्षणा दिली पाहिजे असा रिवाज होता. संस्थानिक मंडळी पुस्तकें घेतांना केवळ पुस्तकाची किंमत दिली म्हणजे झालें असें समजत नव्हती. तर आमच्या आजोबांची बिदागी वैयक्तिक दृष्ट्या व कौटुंबिक दृष्ट्याहि होत असे. बायकांना जरीकांठी लुगडीं मिळत, मुलांना एखादे वेळेस सल्ल्यांची जोडी मिळे, व आमच्या आजोबांस पागोटें, शाल-जोडी व कधीं कधीं हिऱ्याची आंगठी या वस्तू मिळत. त्या वेळेस रेल्वे वगैरे नसल्यामुळें इतक्या अडचणींतून ग्रंथप्रसाराचें काम–म्हणजे विद्याप्रसाराचें काम हे करीत आहेत अशी त्यांच्याविषयीं पूज्य भावना संस्थानिक व इतर गिऱ्हाईक बाळगीत.

इ. स. १८५३ सालापूर्वींच गोविंद रघुनाथ केतकर यांनीं सर्व हिंदुस्थानचा प्रवास केला असावा असें दिसतें. तथापि ५४–५५ सालीं ते नापत्ता झाले ते ५८–५९ सालानंतर पुन्हां आपल्या गांवीं प्रगट झाले. पण आमचे चुलते असें सांगतात कीं, तुम्ही चार–पांच वर्षें कोठें होतां हें विचारण्याची त्यांच्या बायकोचीदेखील प्राज्ञा झाली नाहीं. या प्रकारच्या गोष्टींची चवकशी करण्याचें बायकांना कांहींच कारण नाहीं असेंच ते समजत. हे नापत्ता होण्यापूर्वीं ते काशीस असल्याचें घरांत कळलें होतें, त्यामुळें या गृहस्थाची सर्व दरबारांत ओळख आहे, म्हणून बंड उठावणीच्या विचारा-

साठीं यांचा नानासाहेबांनीं उपयोग करून घेतला असावा, अशी चुलत्यांची कल्पना होती. इ. स. ५७–५८ च्या सुमारास ते तंजावरास होते, असें व्ही. पी. मल्हारीराव (व्ही. पी. माधवराव यांचे थोरले बंधु) यांनीं मी त्यांच्याकडे पाहुणा असतां मला सांगितलें होतें, व त्यानीं असेंहि सांगितलें होतें कीं, तुम्ही तुमचे आजोबा उतरले होते त्याच घरांत उतरलां आहांत. व्ही पी. मल्हारीराव यांनीं हें घर मागाहून घेतलें. तें घर तंजावर इस्टेटीच्या मालकीचें असतां त्या घरांतच आजोबा उतरले होते. तथापि तेवढ्यावरून त्यांचा तंजावरांत येण्याचा हेतु बंडाची उठावणी करण्याचा होता, असें मात्र निश्चयानें सांगवत नाहीं. असो. इ. स. १८५८–५९ सालीं जेव्हां ते घरीं आले त्यानंतर त्यांनीं शिळाप्रेसवर पुस्तकें छापून घेऊन तीं विकण्याचें काम सुरू केलें. त्या वेळेचीं कांहीं छापलेलीं पुस्तकें आमच्या घरांत होतीं, व त्यांवर गोविंद रघुनाथ केतकर हें नांव होतें. छापखान्याचें नांव आठवत नाहीं, पण ज्ञानसागर असावें असें वाटतें. गीतगोविंदाच्या दीडशेंच प्रती काढीत असें कळतें. यांच्या ऑफिसमध्यें कै. माधव चन्द्रोबा हे कारकून म्हणून प्रथम आले व पुढें ते कांहीं दिवसांनीं भागीदार झाले. कांहीं दिवसांनीं माधव चन्द्रोबांनींच एकंदर सर्व धंदा विकत घेतला. येणेंप्रमाणें मुद्रणपूर्वप्रकाशन व मुद्रणोत्तर प्रकाशन यांच्या संधिकालांतील या धंद्यांतील एका व्यक्तीचें चरित्र देतां येईल. दुसऱ्या ठिकाणाहून मिळणाऱ्या माहितीशीं ताडून पाहण्याच्या उद्देशानें कै. माधव चन्द्रोबा यांचे चिरंजीव कै. वामन माधव डुकले, प्रोप्रायटर प्रभाकर ब्रदर्स, फोर्ट, यांस माधव चन्द्रोबाच्या पूर्ववृत्तान्ताच्या माहितीबद्दल विचारलें, परंतु वामनरावांनीं आपणांस कांहींच माहिती नसल्याचें सांगितलें; त्यांनीं याशिवाय असें सांगितलें कीं, "आमचे वडील वारले त्या वेळेस मी दहा वर्षांचा होतों, व आमच्या वडिलांच्या हातचें एक पोस्टकार्डहि मीं पाहिलें नाहीं. किंवा फोटोहि मजपाशीं नाहीं." असो.

आमच्या घरच्या ग्रंथसंग्रहाची थोडीशी हकीकत देतों. आमच्या आजोबांचा संग्रह मोठा होता आणि ते वारल्यानंतर जितकीं पुस्तकें लोकांना देतां आलीं तितकीं दिलीं. लोकांनीं रामायण व महाभारत असलेच ग्रंथ घेतले. यामुळें आमच्या घरीं अप्रसिद्ध कवींचेच ग्रंथ राहिले. हा ग्रंथसंग्रह

आमच्या वडिलांच्या हातीं आला, व तो दहापंधरा पेटारे मीं पाहिलेले आहेत. त्यांच्या आंतून बुरुडी काम असे, आणि बाहेरून ते कातड्यानें मढविलेले असत. व त्यांची लांबी साधारणपणें ५ फूट, रुंदी ३ फूट, व उंची अडीच फूट असे. माझ्या वडिलांनीं एके दिवशीं त्या पेटाऱ्यांतील हस्तलिखितें काढलीं व सुमारें २ पेटारे भरून हस्तलिखितें ठेविलीं, आणि उरलेल्या सर्व हस्तलिखितांस आग लावून दिली असें ऐकतों. ऐकतों म्हणण्याचें कारण ही क्रिया माझ्या जन्माच्या पूर्वीं झाली होती. त्या वेळेस त्यांच्या या कृत्याबद्दल त्यांस लोकांनीं दोष दिला, तेव्हां त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, या सर्व पुस्तकांची हावर्डच्या इंग्रजी पहिल्या पुस्तकाइतकीदेखील किंमत नाहीं. यानंतर जे दोन पेटारे मीं अमेरिकेस असतां आणि आमचे बंधु अनेक ठिकाणीं नोकरीनिमित्त फिरत असतां एका खोलींत अनेक वर्षें पडले होते त्यांना पावसाळ्यांत वाळवी लागून ते पेटारे वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडले. या पेटाऱ्यांत शिवरामस्वामींची एकादशस्कंधावरील टीका होती, व शिवाय स्वामींचे दुसरे अनेक ग्रंथ होते. त्यांच्या वर्णनावर मी जो एक लेख २८ वर्षांपूर्वीं ( हायस्कुलांत असतांच ) लिहिला त्याचा उल्लेख मागें केलाच आहे.

आमच्या वडिलांच्या वर सांगितलेल्या कृत्याबद्दल त्यांस आमच्या कुटुंबांतल्या पुष्कळ मंडळींनीं दोष दिला. तथापि पुस्तकांची काळजी घेण्याचें काम पत्करावयास कोणीच पुढें आलें नाहीं. हे पेटारे नोकरींत असतां बरोबर घेऊन हिंडणें आमच्या वडिलांस शक्य नव्हतें. आणि त्या वेळेस रेल्वेचाहि प्रसार चोहोंकडे झाला नव्हता. व जेथें वडील जात तेथें ते पेटारे ठेवण्यास जागा नव्हती. व ग्रंथ कोणास दिले तर ते घेण्यास तयार अशा संस्थाहि नव्हत्या. यावरून आमच्या वडिलांनीं जी ग्रंथसंभारास आग लावली ती निरुपायानें लावली असावी असें मला वाटतें. त्यांनीं त्या वेळेस जे उद्गार काढले ते त्यांच्या मन:प्रवृत्तीचे व्यंजक होते कीं आपल्या करण्याचें आग्रहानें कसें तरी समर्थन करावें म्हणून होते हें समजत नाहीं.

० ० ०

## २० : उपसंहार

मराठी संतकवी हे संस्कृत कवींच्या परंपरेंतील नसून निराळ्याच परंपरेंतील मराठींत जे लोक लिहीत त्यांस आपलें मराठींत लिहिण्याचें समर्थन करावें लागे, आणि मराठींत लेखनाचें समर्थन करण्याची परंपरा स्थापन करण्यासाठीं मराठी लेखकांस जो अट्टाहास करावा लागला तो या ऐतिहासिक अवलोकनांत अगोदर दिला आहे.

एक कवि दुसऱ्या मान्य कवीच्या कवित्वावर मत देत नसे; तसें करणें म्हणजे एक तऱ्हेचा उद्धटपणा करण्यासारखें आहे असें त्यांस वाटत असावें. ज्या कवींविषयीं त्यांना आदर वाटत असे त्यांचें ते अनुकरण करीत, त्यांच्या प्रशस्ती लिहीत, किंवा त्यांच्या कवितेचें संस्कृतमध्यें भाषान्तर करीत. सामान्य लोक आवडत्या कवीची कविता पाठ करीत व नक्कल करून घरीं नेत. या तऱ्हांनीं ते अभिज्ञता व्यक्त करीत असत. उत्तरकालीन कवी पूर्वकवींचीं चरित्रेंहि लिहीत. ते संतकवींकडे या दृष्टीनें पहात, व त्यांनीं त्यांचीं चरित्रें ते संत या दृष्टीनेंच लिहिलीं आहेत. कांहीं संतचरित्रांत प्रसंगांचें स्पष्टीकरण करण्यासाठीं कवीच्या काव्यांतून अवतरणेंदेखील घेतलीं आहेत. मराठी संतकवींसंबंधानें अभिज्ञता उत्तरकालीनांनीं त्यांच्या ग्रंथांचीं संस्कृत रूपान्तरें करून व्यक्त केली, तर संस्कृत कवींच्या ग्रंथांचीं मराठींत रूपान्तरें करतांना भाषान्तरकारांनीं जे फरक केले त्यावरून संस्कृत कवींच्या काव्यांतील निरनिराळ्या भागांविषयीं प्रमाणयुक्त गुणग्राहकता त्यांनीं व्यक्त केली. मराठी कवींनीं आपल्या पूर्वगामींचीं चरित्रें इतकीं लिहिलीं आहेत कीं तें एक स्वतंत्र वाङ्मय बनलें आहे. त्याचा विस्तार किती आहे तो या प्रकरणांत दाखविलाच आहे. पूर्वगामींचें चरित्र लिहिणें किंवा चरित्रसाहित्य रक्षून ठेवणें या बाबतींत मराठी वाङ्मय संस्कृत वाङ्मयापेक्षां उच्चता दाखवितें. थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, बहुतेक संतकवींमध्यें पूर्वगामींच्या कृती-

विषयीं आदर व्यक्त करण्याची पद्धति होती, व ते आदर दाखविण्यासाठीं व्यक्ती निवडीतदेखील होते. पण पूर्वगामींच्या काव्याचें पृथक्करण करून गुणावगुणांचें परीक्षण करण्याची पद्धति नव्हती. तसें जर कोणीं केलें असतें तर इतर संतकवींनीं त्यांस नास्तिक, संतांविषयीं आदर नसलेला अशा तऱ्हेनेंच त्याचें वर्गीकरण खास केलें असतें. एवंच व्यक्तीवर केलेल्या श्रद्धेच्या मागणीमुळें परीक्षणपरता दुर्बल झाली होती.

संतकवींस आपल्या वैशिष्ट्याविषयीं जाणीव होती, आणि आपण ईश्वरी कृपेमुळें, प्रेरणेमुळें ( व शिवराम कवि तर ईश्वराच्या बलात्कारामुळें ) बोलत आहों अशी वृत्ति दाखवीत. हा प्रयत्न कांहीं अंशीं आपल्यावरील परीक्षण चुकविण्यासाठीं होत असावा असें पुष्कळदां वाटूं लागतें.

दुसऱ्याचें परीक्षण करणें उद्धटपणा होईल म्हणून त्या पापाला जरी कवी भीत होते तरी ते आत्मप्रशंसा करण्यास तितके भीत नव्हते असें दिसून येतें. तथापि हें आत्मग्रंथावलोकन आत्मपरीक्षणरूपी झालेलें नाहीं. त्यांच्यामध्यें आपल्या स्वतःच्या काव्यावर अभिप्राय व्यक्त करण्याची पद्धति होती ती सर्व प्रसंगीं विनयपूर्ण होती असें नाहीं. व आत्मश्लाघा करून ते थांबत असें नाहीं. आत्मस्तुति व परनिंदा यांचा संपर्क तुकारामासारख्यासहि झाला आहे.

मत्सर उत्पन्न झाला म्हणजे श्रद्धेचा अभाव सिद्धच झाला. व अशा प्रसंगीं परीक्षणपरता वाढावी, पण ती क्रियादेखील फारशी झाली नाहीं. मत्सरानें जेव्हां तुकाराम प्रेरित होतो तेव्हां तो ‘ लोकमान्य ’ता मिळवूं पाहणाऱ्या खोटें कवित्व करणाऱ्या कवीस रौरव नरकांत पाठवीत आहे. यावरून तुकारामाच्या अंगीं मत्सरामुळें परीक्षक बनलेल्या व्यक्तीच्या भावना दिसत होत्या, पण सुशिक्षिततेच्या अभावामुळें तो मत्सर झांकून तत्त्वें पुढें सारून तत्त्वासाठीं दुसऱ्याची कविता गौण ठरविणारा टीकाकार तुकाराम बनूं शकला नाहीं. तुकाराम मत्सरानें जेव्हा प्रेरित झाला तेव्हां तो सामान्य खेडवळाप्रमाणें शिव्या देणारा आणि दुर्बल विधवेसारखीं बोटें मोडणारा टीकाकार बनला.

परीक्षण करण्यासाठीं जें मानसिक स्वातत्र्य अवश्य लागतें तें मानसिक स्वातंत्र्य संप्रदायबद्ध संतकवींना नव्हतें. आपल्या संप्रदायांतील पूर्वगामींची स्तुति करावयाची एवढेंच कर्तव्य त्यांच्यापुढें होतें.

या विशिष्ट स्थितीमुळें काव्यग्रहण, भाषान्तर, संपादन इत्यादि क्रिया करतांना जें परीक्षण उत्पन्न होतें तेवढेंच इंग्रजीपूर्वींच्या मराठी ग्रंथांत आलें आहे. वैरुद्धयाची भावनादेखील खोल परीक्षण करण्याइतपत वाढली नाहीं. मराठी व संस्कृत हीं दोन्ही महाराष्ट्राचीं वाङ्मयें होतीं, आणि अभिमानामुळें एका वर्गानें दुसऱ्यावर शिंतोडे उडविले पण काव्यपरीक्षण केलें नाहीं. संस्कृत कवींनीं प्राकृत ग्रंथकारांस माकडें म्हणावें, आणि प्राकृत ग्रंथकारांनीं पूर्वींच्या एका प्राकृत ग्रंथकारानें पांडित्याभिमानी संस्कृत ग्रंथकाराचें गर्वहरण दैवी चमत्कारानें कसें झालें तें दाखवावें, इतपतच दोघांच्या एकमेकांच्या कृतींकडे व वृत्तीकडे अवलोकन करण्याच्या मर्यादा होत्या. मराठी गाण्यांकडे संगीतरत्नाकरकाराचें संगीत म्हणून लक्ष ओढलें. पण ती परंपरा पूर्वींपासूनच होती. लौकिक संगीत आणि सामसंगीत या दोन्ही संगीतशाखा एकमेकीं-पासून स्वतंत्रपणें वाढत होत्या, आणि संगीतरत्नाकरकारानें त्या बाबतींत पूर्वकालीन ग्रंथकारांचें अनुकरण केलें.

या पुस्तकांत अप्रत्यक्ष मतव्यक्तीचे व परीक्षणाचे जे प्रकार आहेत त्या प्रकारांनीं मराठी वाङ्मयांत जे काव्यपरीक्षण किंवा ग्रथपरीक्षण झालें त्यामध्यें ग्रहण, अनुकरण, व विस्तरण हे मुख्य होत. ग्रहणाच्याच पठण आणि संपादन या शाखा आहेत. पठण करतांना पाठभेद उत्पन्न होतात. हे पाठभेद पुष्कळदां सहेतुक असतात. कारण कांहीं पाठभेद मूलग्रंथ अधिक चांगला करण्याच्या हेतूनें उत्पन्न होतात जर आपणास एखाद्या कवीचा अस्सल स्वहस्तलिखित ग्रंथ आणि अनेक नकला हीं मिळतील तर प्रत्येक पाठभेदातील हेतु आपणांस काढतां येईल. मूळ अक्षर न समजल्यामुळें किंवा कारकुनी चुकीमुळें उत्पन्न झालेले पाठभेद निराळे, आणि जो ग्रंथ एखाद्या संपादकाच्या हातीं सांपडून त्याच्या दुरुस्त्यांमुळें होणारे पाठभेद निराळे. आपल्याकडे ग्रंथाचें संपादन आणि संशोधन होतें. आणि पुष्कळदां तें अनेक हस्तलिखितें एकत्र गोळा करून होतें, आणि अशा प्रसंगीं संपादकांची वृत्ति संपादकांचें शिक्षण व अभिरुचि यास अनु-सरून भिन्न प्रकारची होते. कित्येक संपादक कोणता पाठभेद शुद्ध भाषेचा व रस चांगल्या तऱ्हेनें दाखविणारा पाठभेद कोणता हें पाहतात, तर कांहीं ऐतिहासिक दृष्टीचे संपादक मूळ ग्रंथकारानें जें लिहिलें असेल तें शोधण्याचा

प्रयत्न करतात. ऐतिहासिक पाठशोधन हें नवीन आहे. संपादकाचा प्रयत्न विशेषेंकरून शोभनार्थ–पाठशोधनाकडेसच आहे.

मराठी कवींमध्यें पाठभेदांचें प्राचुर्य अत्यंत लोकप्रिय कवीच्या बाबतींतच दिसून येतें. जी कविता अधिक लोकप्रिय तिच्यावर संस्करण फार व्हावयाचें, आणि जी कविता लोकांत फारशी प्रिय नाहीं ती शुद्ध स्वरूपांत सांपडावयाची. या तऱ्हेनें संस्करण हें अभिरुचीचें चांगलेंच दर्शक आहे. त्याचेंहि विवेचन मागें केलेंच आहे.

इंग्रजी राज्यामध्यें जें शिक्षण मिळालें त्यानें संस्कृत ग्रंथांचें पुनरवलोकन निराळ्या दृष्टीनें झालें, आणि इंग्रजी वाङ्मयाची अभिरुचि असलेला वर्ग निर्माण झाला. त्यामुळें या वर्गामध्यें अधिक व्यापक दृष्टि उत्पन्न झाली. या वर्गानें त्यास पटलें तें साहित्यशास्त्र संस्कृत व पाश्चात्य या दोन्ही विकासांतून घेतलें, आणि जुन्या व त्याचप्रमाणें नवीन होऊं पाहणाऱ्या वाङ्मयाचें आपल्या अभिरुचीप्रमाणें परीक्षण केलें आहे. त्यांच्या परीक्षणाचें अवलोकन करणें हा स्वतंत्र विषय आहे. तो प्रस्तुत पुस्तकाच्या उत्तरभागांत विवेचिला जाईल.

० ० ०

# महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण–सूचि

[ ' महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षणा 'च्या पहिल्या आवृत्तीला ' संतकवि व ग्रंथकार ' यांची सूचि जोडलेली आहे. परंतु तिच्यामध्ये कांही उणीवा, विसंगति राहिलेल्या आहेत, अपुरेपणा उरलेला आहे. त्या उणीवा, विसंगति दूर करून अपुरेपणा काढून टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत सूचींत केलेला आहे.

मूळ सूचि मुख्यतः व्यक्तिनामांची आहे; थोडीं ग्रंथनामें आहेत; आणि तुरळक विषय-नोंदी आहेत. कांही व्यक्तिनामांच्या, अनेक ग्रंथनामांच्या नोंदी राहिलेल्या आहेत. त्यात संगति राखण्यासाठी कांही ग्रंथनामें ( उदा० जीवनंदन नाटक ), किंवा विषयनोंदी ( उदा० ज्ञानेश्वर–काल, ज्ञानेश्वर–संप्रदाय ) गाळल्या आहेत. मूळांतील कांही उल्लेख अगदी स्थूल, सर्वसामान्य आहेत ( उदा० ब्राह्मण, भोंसले, क्षत्रिय ). तेहि गाळून टाकले आहेत. आणि आरंभीं व्यक्तिनामांची सूचि सलग देऊन, पुढे ग्रंथ व विषय यांच्या नोंदी [ त्या फार थोड्या आहेत ] केल्या आहेत.

कांही नोंदी सर्वस्वी अनावश्यक होत्या ( उदा० बळी, राम, लक्ष्मी, सीता ) त्या गाळून टाकल्या, तसेंच कांही नोंदी नव्यानें केल्या आहेत.

मात्र गाळलेल्या नोंदी प्रस्तुत सूचीच्या समाप्तीनंतर नोंदवून ठेवल्या आहेत; आणि नवीन घातलेल्या नोंदी * अशा चिन्हानें निर्दिष्ट केल्या आहेत.

प्रथमावृत्तीच्या सूचींत एकाच व्यक्तीचे निर्देश अनेक नांवांखाली झाले आहेत. ( उदा० केतकर—गोविंद रघुनाथ, कल्याण–कल्याण ( शिष्य ), चिपळूणकर विष्णुशास्त्री—विष्णुशास्त्री चिपळूणकर, जनाबाई–जनी, तुकाराम–तुकोबा, परमानंद–परमानंद नेवासेकर–' शिव भारत '-कार, मेरुकवि–समर्थ मेरुकवि, रघुनाथपंडित–रघुनाथ हणमंते–हणमंते, रामदास–समर्थ ). अशा निर्देशांत एकसूत्रता आणली आहे.

एकाच व्यक्तिनामाचें लेखनहि अनेक तऱ्हांनी झालेलें आढळतें. ( उदा० एकोजी राजा–व्यंकोजी राजा, कान्हूपात्रा–कान्होपात्रा, नरसिंह मेहेता–नरसी मेहता, मत्स्येन्द्रनाथ–मच्छिंद्रनाथ, मानपुरी–मानफुरी ). त्यांमधील संबंधहि सूचित केले आहेत.

मूळ सूचींतील नोंद आणि प्रत्यक्ष ग्रंथांतील उल्लेख यांतहि कांही ठिकाणीं विसंगति निर्माण झालेली आहे. ( उदा० आनंदराय मखिन, दामोदर मित्र, दिनकर नरसिंह, नृपकृष्ण, शुकेश्वरनाथ, श्यामकवि अशा सूचिनिर्दिष्ट नामांऐवजीं ग्रंथांत अनुक्रमें आनंदराय मखिन्, दामोदर मिश्र, दिवाकर नरसिंह, नृसिंह कृष्ण, शुक्लेश्वरनाथ, श्याम गुसाई असे निर्देश आहेत. ) अशा ठिकाणींहि संदर्भ शोधून निश्चितता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

—'आग्रिनदास शाहीर', 'आकवर्थ', 'जान्सन' हे उल्लेख 'आगीनदास शाहीर', 'ऑकवर्थ', 'जॉन्सन' असे असावयास पाहिजेत. परंतु प्रस्तुत सूचींत त्यांत बदल केला नाहीं.

—कांही चुकीचे, किंवा अर्धवट निर्देश सुधारून घेतले आहेत. 'चंद्रात्मज', 'राजाराम' या नोंदी अपुऱ्या असून त्या 'चंद्रात्मज रुद्र', 'राजाराम प्रासादी' अशा पाहिजेत.

'दास', 'द्वैपायन', 'पंडित', 'रामदासी' यांसारख्या नोंदींना अर्थ नाहीं. त्या गाळून टाकल्या.

'सूरदास केशव' ही नोंद चुकीची पडली आहे. 'सूरदास' एवढेंच हवें.

'अभिनवतिलक' ही नोंदहि चुकीची असून 'मदनतिलक' अशी नोंद हवी.

इतरहि कांही जरूर ते लहानसान बदल, सुधारणा केल्या आहेत. प्रथमावृत्तीची सूचि व प्रस्तुत सूचि यांची तुलना केल्यानंतर त्या लक्षांत येण्यासारख्या आहेत. मात्र या सर्व पुनःसंस्करण— संपादनामध्यें प्रथमावृत्तींतील सूचीचें धोरण, किंवा स्वरूप न बदलतां तिच्यांत अधिक निश्चितता, सुसूत्रता, कांटेकोरपणा आणावा एवढाच हेतु आहे.—अर्थात् येथेहि तारतम्याचा वापर अटळ होतोच !

—**सु. रा. चुनेकर** ]

## व्यक्तिनाम-सूचि


अतिरात्रयाजिन्–१०१
अनंत–१५४
अनंत केशव–१०४
अनंत देव–२४
अनंत नरायन ( नारायण )–१०९
अनंत फंदी–२०९
अनंत मुनि–४७
अनंत स्वामी–९८
अनाजी रंगनाथ मलकरे–१२५
अपय्या दीक्षित–१०२
अफझल–११६
अंबाबाई–९७
अमृतराय–१५५, १५९, १७५
अम्मालाचार्य–१०३
अयोध्यावासी–१५५
अल्लीखान*–१०९
अवाचितसुत काशी–९८, १५८
अहोबल–१०५
आकवर्थ–९९
आकाबाई–१८१, १८२
आग्निनदास ( आगीनदास ) शाहीर ९९, ११८
आजगांवकर ज. र.–४२, १५०
आत्माराम–१५३, १५९
आदिनाथ–३०, १५४, १५९
आनंदतनय कवि–१०४, १२५, १५५, १५९, १७५
आनंदनाथ–१५९
आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर–९६, १५४
आनंदराय मखिन्–१०२
आशाधर*–२३
इब्राहिम आदिलशहा–११४
उदय–२५
उदोतचंद–१०७
उद्धव–९७,१२४
उद्धवचिद्धन – ९५, १५२, १५४, १५६, १५७, १५९, १६६
उद्धवदास–१५९
उद्धव मुल्हेरकर–१५८
उद्धवसुत–१५३, १५९
उद्बोधनाथ–१५४
उद्भट–२३
उमापतिधर–२१
एकनाथ–७, १४, ३१, ३५, ३६, ३७, ४४, ४७, ५०, १५५, १५७, १६६, १७०, १७२, २०४
एको–१५४
एकोजी ( व्यंकोजी ) राजा–११०, १११, ११९
ओक वामन दाजी–१३९, १४४, १४५, १७४, १७५
औरंगझेब–१०७

कबीर–१५२, १५४, १६४, १६५, १७०
कमलाकर नरसिंह–१०४
कमाल*–१५२
कर्णपार्थ–२५
कर्माबाई–१५४
कल्याण ( रामदास-शिष्य )– ९७, १२४, १५४
कल्हण–२१
कवीश्वर–२५
कान्ति कवयित्री–२५
कान्होपात्रा ( कान्हूपात्रा )*–४४, ४५, १६३
कालिदास–१९, ६४, ६५, ६७, १३२, १३५, १५५, १८८
काशीकवि–२०२
काशीवासी–१५५
कीर्तिवर्मा–२५
कृष्णदत्त मैथिल–१०३
कृष्णदयार्णव–१५५
कृष्णदास–१५४
कृष्णयाज्ञवल्कि–१७४
कृष्णस्वामी–२९
कृष्णाजी*–१५७
केतकर गोविंद रघुनाथ-२१६-२१९
केरेय–२६
केवळ कूबाजी–१५४
केशरीनाथ–१५४
केशव–१५४, १५९
केशव ( विवाहवृंदावनकार )*–१५
केशवदास*–१५५, १७५
केशवस्वामी ( मारकीनाथ-शिष्य )* –९६, १५४
केशवस्वामी–२३, २०३
केशवस्वामी भागानगरकर–९६
केसरिदास कवि–१०९
केळकर नारायण चिंतामण*–१३९
कोकीळ–९८
कोट्टा पोबराय–१०९
कोंडभट्ट–१०५
कोनेर पाठक–९९
कोयाजी–११०
कौपर–५८
खंडेराय–१५९, १६५, १६६, १६७
खरे वासुदेवशास्त्री–१४, १६, २००
खाडिलकर कृ. प्र.–१४
खानवलकर गंगाधर नारायण–१५९
गंगाधर–९६
गंगाधरबावा–१५९
गडकरी बाळकृष्ण संतुराम–१४,१५
गणेश–१५४
गणेश केशव–१०४
गणेशनाथ–९६
गणेशसुत*–१५४

गयंद कवि–१०९
गहिनीनाथ ( गैनिनाथ )–३०, १५४
गागाभट्ट ( पंडित )–१०३, १८०, १८३–१८६, २११
गिरिधर–१५९
गिरिधर रामदासी–१०१, १०२
गुंजीकर रामचंद्र भिकाजी–१३५–१३६
गुणधर्म ( पहिला )–२५
गुप्तनाथ–१५४
गैबीनाथ–४५, १५४
गोडबोले रघुनाथशास्त्री*–१६७
गोपाळनाथ*–२०४
गोपाळनाथ मळगांवकर–९८
गोरक्षनाथ–३०, १५४
गोरा कुंभार–४४, ४५, ५७, १५२, १५४, १६५
गोवर्धन–२१
गोवर्धनाचार्य–१०९, ११०
गोविंद–१२५, १५९
गोविंद गोसावी–१५५
गोविंद नीलकंठ–१०४
गोविंद भोळा–[ पहा, शिवदिन ]
गोविंद रघुनाथ–[ पहा, केतकर गोविंद रघुनाथ ]
गोसावीनंदन कवि–१२५
घनशाम कवि–१०९
चक्रदत्त–२४
चंद्रराज–२५
चंद्रात्मज रुद्र–९८, १२२
चांगदेव–१५४, १६५, १७०
चांदोरकर आबा*–२००
चांदोरकर गो. का.–१५०, १५७
चिंचवडकर देव–१५४
चिंतामणि कवि–१०७
चिपळूणकर विष्णुशास्त्री–१०, ११, ६३, ६४, ७३, १८८
चोखा मेळा–४४, १५२, १५५, १६३, २०४
छत्रसाल–१०७
जगज्जोतिर्मल्ल–१०२
जगन्नाथकवि–१०५
जगन्नाथराय–१, ६२, १२०
जगमित्र नागा–१५२, १५५
जदुराय कवि–१०९
जनजसवंत–१५२
जनार्दन–१२५, १५४, १६०
जनाबाई ( जनी )–४५, १५२, १५४
जयचंद–२१
जयदेव–२३, २८
जयदेव (गीतगोविंदकार)–२१, २२, १७८–१७९
जयदेव (प्रसन्नराघवकार)–२२, १३३
जयबंधु–२५

जयराम पिंड्ये कवि–१०४, १०८–
११३, १२१, १५४
जयरामसुत–१५३
जयरामस्वामी–९६, १०१, १०३,
१२१
जयराम स्वामी वडगांवकर*–१२२
जयरामात्मज–१५५, १६०
जान्सन ( डॉ. )–६६
जीवविबुद्ध–१०३
जोशी दत्तात्रेय केशव–१४१, १४२,
१४३
टिळक ( लो. बा. गं. )–७४
ठाकूर चतुरद कवि–१०९
ठाकूर शिवदास*–१०९
ढुढरी कवि–१०९
तार्किक सिंह–१०२
तुकाब्रह्मानंद–९८, १२३
तुकाराम ( तुका वाणी, तुकोबा )–
६, ८, १४, ३१, ५१, ५२,
५३, ६५, ७०, ७१, ७२,
७३, ७४, ७५, ७६, ७७,
९१, ९२, ९३, ९५, १०८,
११८, ११९, १२२, १२३,
१२४, १५४, १६४, १६७,
१६८, १७०, १८०, १८२,
१९९, २००, २१२, २२२
तुकारामतात्या–१५४, १६३
तुकाविप्र–१६०
तुका सुंदरदास–९९
तुळशीदास–१५४, १७०
तुळशीदास शाहीर–९९
त्रिनयनवाणी–१५४
त्रिंबक गगनी–१२५
त्र्यंबक–९६
त्र्यंबक गोसावी–१२५
त्र्यंबकसुत–९६
दंडी–२३, २७
दत्ताजीपंत वाकेनवीस–१२५
दाजीस्वामी [ पहा, शिवाजी ]–११३
दांडेकर [ प्रो. शं. वा. ]–२९, ३०
७३, ७६
दामाजीपंत–१५४
दामोदर देव–१५४
दामोदर मिश्र–१०५
दासबाबा–१६०
दासो दिगंबर–१५७, १५८
दासोपंत–३४, ३५, ३७, ३८,
३९, ४०, ४२, ४४, १५४,
१६८
दिगंबर–१५८, १६०
दिनकर गोसावी–९९
दिवाकर नरसिंह*–१०४
दिवेकर स. मा.–१०८
दुर्ग ठाकूर कवि–१०९
दुर्गसिंह–२५
दुर्विनीत–२५

देव ( शं. श्री. )–७८, ९९, १५३, १५७, १६१, १६७
देव कवि–२६
देव काशीकर कवि–१०९
देवदास–९७, १२५
देवनाथ–१०, २०१
देवल गो. ब.–२०४
द्वारकादास कवि–१०९
द्वारकावासी–१५५
धनंजय–२३
धना जाट–१५४
धुंडिसुतकुमार–१६०
धोई–२१
धोंगडा–९६
नयसेन–२५
नरसी ( नरसिंह ) मेहता–१५२, १५४, १७०, १७७
नरहरि ( एकनाथशिष्य )–९६
नरहरि मोरेश्वर*–४१
नरहरि धुंडिराज माल्ह–१५७, १५८, १६०
नरहरिसुत–१६०
नरहरि सोनार*–४४, ४५
नागचंद्र ( किंवा अभिनवपंप )–२५
नागनाथ–१५२
नागवर्मा दुसरा–२५
नागार्जुन–२५
नागेश–९७
नाथदास ऊर्फ हरिदास–९९
नानक–१५४
नाभा–१५६, १५७, १७८
नामदेव–२९, ३१, ४३, ४४, ४६, ४७, ४८, ५३, ६५, ६६, ६८, १५२, १५४, १५६, १५७, १६०, १६३, १६५, १६६, १७०, १७२, १८७
नामा पाठक–१६०
नायकीण–११०
नारायण कवि–१६०
नारायणबाबा शिवादिन–१५५
नारायणबुवा चक्रपाणी–१२५
नारायणभट्ट गुरु कवि–१०९
नित्यानंद देवदत्त–१०४
निपटनिरंजन–१५५
निंबराज–९५
निरंजन–१६०
निरंजन ( शिवरामशिष्य )–९८
निरंजन ( समर्थशिष्य )–९७
निरंजनमाधव–१२७, १६०, १६८
निवृत्तिनाथ–३०, ४४, १५४, १६३, १७०

निळोबा–५३, ५५, ५९, ६५, ९९, १२३, १६४, १६५, १६६, १६८
नीलकंठ कवि–१०७
नीलकंठ दीक्षित–१०१
नृपतुंग–२५, २६
नृसिंह कृष्ण*–१०४
पटवर्धन ( मा. त्रिं. )–१२७
पणाभी विश्वनाथ–९६
पद्यरस–२६
पंप–२५
परमानंद नेवासेकर (' शिवभारत '-कार )–१००, १०४, १०८, ११३–११७, १९३
परशुराम–१२८, १२९, १६०
परसा भागवत–४६, १५४
पांगारकर ल. रा.–६३, ६४, १३४, १३७, १३८, १५०
पांडोबा–१६०
पांडोबा आप्पा–१५५
पालिकुरकेसोम–२६
पीपाजी–१५४
पुरंदर–१५४
पेरिअप्पा–१०३
पेवदास चैतन्यांकित*–१५८
पोन्न–२५
प्रल्हाद बडवे–४७
प्राणनाथ–१५४
प्रियादास–१५६
प्रेमाबाई–९७, २०३
फादर स्टीफन्स*–१००
फ्रान्सिवास द गमारिस–१००
बयाबाई रामदासी–९७
बर्गी कवि–१०९
बलदेव नरायन ( नारायण ) कवि–१०९
बलभद्र कवि–१०९
बस्वलिंग–१५८
बहिणाबाई–७३, ७६, ९७, १८१, १८२
बहिरवनाथ*–१६०
बहिरंभट–१५२
बहिरा जातवेद–१६०
बहिरा पिसा–१५४
बाक्रे नारायण महादेव–१२९
बाजी प्रभु–११७
बाजी फसलकर–९९
बाणभट्ट–२६
बाबुराय सदाशिव–१५५
बाबुसुत–१६०
बालकवि*–१०९

बाळ–१६०
बाळकराम–९८, १२५, १६१
बाळकृष्णबाबा–१५५
बिल्हण–१९, २१, २२, १०७
बिल्हण मल्लयपुत्र–१०४
बिहारी–१५५, १७५
बोधलेबावा–९५, ९८, १५२, १५४
बोपदेव–११, १२, २४, २५, २७, ३५
ब्रह्मगिरि–१६१
ब्रह्मशिव–२५
'भक्तमाला'कार–१५५
'भक्तविजय'कार–१५५ [पहा, महिपति]
भट्ट नारायण*–१२०
भट्टोजी दीक्षित–१०५
भवभूति–८, ९, १०, २६, १३७, १८८
भानुदास–१५२, १५४, १५७, १६६
भावे वि. ल.–९५, ९७, ११७, १२४, १२५, १२७, १३३, १५०, १५१, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६५, १७७, १७८, २००
भास्कराचार्य–२४, २७.
भिंगारकर–११, १५६, १५७.
भिडे बाळकृष्ण अनंत–१४१, १४२, १४३.
भीमकवि–९८.
भीमयशवंतसुत*–१५८
भीमस्वामी–१५७, १६१
भूषणकवि–१०६, १०७
भोज–२१
मंख–२१, २३
मत्स्येन्द्रनाथ [मच्छिन्द्रनाथ]–३०, १५४
मतिराम–१०७
मदनकवि*–२२
मध्वमुनि–१६१
मनसुखदास–१५४
मन्मथशिवलिंग–१६१
मम्मट–२३, ८४
मलिक अंबर–११४
मलूकदास–१५४
मल्लारि दिवाकर–१०४
मसूद–११७
महादेव–२४
महादेव*–१०१
महादेव परशुराम–१२४
महादेवात्मज कृष्ण–१०४

महिपति*–४४, ५६, ९४, १५१, १५५, १५६, १५७, १६१, १६५, १६६, १६८, १७०, १७६, १७७–१८६, २०३, २१३
महेश्वर*–२३
माणिक प्रभु–२०३
माधव–१६१
माधव कवि–१२५
माधव गोविंद–१०४
माधव चंद्रोबा ( डुकले )*–२१९
माधवदास–१५४, १५६, १७०
मानफुरी ( मानपुरी )–१५५, १७५
मार्तंडबुवा–१५६, १५८
मालो–१५४, १५८, १६१
मालोजी–१०८, ११४
मालोनाथ–१५४, १६४
मालोपंत–१५४
मित्र काशीनाथ रघुनाथ–१५
मिनवेल दि आल्मेडा–१००
मिल्टन–६६
मीराबाई–१५२, १५४
मुकुंद ( १ )–१६१
मुकुंद ( २ )*–१६१
मुकुंदराज–३०, ३१, ३३, ३४, ३५, ५१, १५४
मुक्ताबाई–४४, ९५, १५४, १६३, १७२
मुक्तेश्वर–१४, ४०, ४१, ६९, ९४, ११८, १२७, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १५४, १६१, १६६, १७३, १९६
मुचकुंद–९८
मुंज–२१
मुडुंब नृसिंहाचार्य*–२०
मुंडले वा. दा.*–२००
मुद्गल–१५४, १६१
मुनीश्वर रंगनाथ–१०४
मुरारिकवि–४१, ४२, ५१
मृत्युंजय–१५२, १६१
मेरुकवि ( समर्थ मेरुकवि )–१०१, १०३, १५८, १६१
मैथिल कृष्णदत्त–१०३
मोगरे गं. रा.*–१०
मोदलराय–१०९
मोरया गोसावी–९६
मोरिना भाट–१०९
मोरोपंत–४६, ६३, ६४, ६७, ९४, १३०, १३१, १३४,

१३५–१४८, १४९, १५४, १६१, १६५, १७०–१७७, २१५
यमाजी शाहीर–९९
यादवप्रकाश–२३
रंगनाथ–१५३, १५४, १६१
रंगनाथ नरसिंह–१०४
रंगनाथ बल्लाळ–१०४
रंगनाथस्वामी ( निगडीकर )–९६, १२१, १५४, १६२
रंगानुजात्मज–१५८
रघुनंदनकवि–१०९
रघुनाथ–३०
रघुनाथकवि–१२५, १६२
रघुनाथपंडित ( रघुनाथ हणमंते )–१००, १०५
रघुनाथ व्यास–१०९
रत्नकला–११८, १२२
रत्नकंठ शंकर–१०४
रत्नाकर–१६१
रत्न–२५
रमावल्लभदास–९५, १६१
राका कुंभार–१५२
राघव–९८, १६२
राघवदास–१६२
राघवस्वामी–९८
राघवांक–२६
राजचूडामणि दीक्षित–१०२
राजवाडे वि. का.–१६, २९, ७८, १०८, १२०, १९९, २००, २०९
राजशेखर–२१, २६
राजांकरुय्यक–२३
राजादित्य–२५
राजाराम प्रासादी–१५७, १५८, १६२
रानडे–( न्या. म. गो. )–४२, ६३, ६४
रामकवि–९८
रामचंद्र–१२५
रामचंद्र बडवे*–६, १५५
रामचंद्र सुमुनुवंशमाणि–१०२
रामदास–१४, १६, १७, ४७, ४८, ५०, ५१, ६०, ६६, ६८, ७६, ७८–९२, ९३, ९६, १०४, १०८, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२८, १३२, १५४, १५५, १५७, १६३, १६४, १६७, १७०, १७२, १८०, १८१, १८३–१८६, २०४, २१२

रामप्रसाद–१५४
रामभट पोळे*–१५७
रामभट्ट–१०३
रामभट्ट अनंत–१०४
रामभद्र*–१०३
रामभद्र दीक्षित–१०२
रामानंद–३०, ३१, १५४
रुद्रभट*–२३
रुस्तुमजमान–११६
रोहिदास–१५४
लछीराम–१०९
लक्षुमीनाथ–१५४
लक्ष्मणबावा–१६२
लक्ष्मणसेन–२१
लक्ष्मीनारायण कल्याण–१०३
लाखाभक्त–१५४
लालमणी–१०९
लोलिंबराज–९४, ९५, १००, १०३, ११८, १२२, २०९
वंगसेन–२४
वरदकवि–१०२
वाग्भट–२३
वामनपंडित स्वामी–११, १४, ५०, ६९, ७०, ७५, ९३, ९४, ९७, १०३, ११९, १२०, १२१, १२४, १५४, १५७, १६२, १७०, १७५, १८१, १९८
वामन माधव ( डुकले )–२१९
वाल्मिकी–१३७
विक्रमशहा–११२
विजयचंद–२१
विठोबादादा–१५५
विठ्ठल–९४, १५८, १६६, १७५, १७६
विठ्ठल केरीकर–१६२
विठ्ठल चैतन्य*–३०
विठ्ठलदास–९६
विठ्ठल बीडकर–९७, १६२
विमल–२५
विश्वनाथ–६०
विश्वनाथ दिवाकर–१०४
विश्वनाथभट्ट–१०३
विश्वंभर भाट–१०९
विष्णु दिवाकर–१०४
विष्णुशास्त्री चिपळूणकर [ पहा, चिपळूणकर विष्णुशास्त्री ]
विसोबा खेचर–३१, १५४, १५८, १६३, १७२
वृत्तविलास–२५

वृंदावनवासी*–१५५
वेद*–१०२
वेणाबाई (वेणीस्वामी)–९६, १६२, १८०, १८१, १८२
व्यंकट कृष्ण दीक्षित–१०१
व्यंकटेशसुत–१६२
व्यंकोजी राजा–[ पहा, एकोजी राजा ]
व्यास–१४१, १४२
शंकर गोसावी–१२५
शंकरदास–१६२
शंकराजीबाबा–१५५
शहाजी ( तंजावरकर )*–१०२
शहाजी ( भोंसले )–१०७, १०८, १०९, ११०, ११४, ११५, ११९
शामजी गोसावी–१६२
शामाराध्य–९५, १०५
शार्ङ्गदेव–२७
शार्ङ्गधर*–२५
शास्ताखान–११६, ११७
शाळिग्राम–९९
शिद्दी जोहार–११७
शिवकल्याण–९५, १५४
शिवदास*–२२
शिवदास कुंडेश–९६
शिवदिन ( अथवा गोविंद भोळा )–१५४
शिवदिन केसरी–१६४, १६८, २०३
' शिवभारत 'कार [ पहा, परमानंद नेवासेकर ]
शिवराम–९५, १२५, १५३, १५४, १६२
शिवरामकवि–२२२
शिवरामबुवा–१६२
शिवरामस्वामी ( पूर्णानंदशिष्य )–९८, २२०
शिवरामस्वामी कल्याणीकर*–१०४, ११९, १२१
शिवसुतप्रभु–१६२
शिवाजी–१२, ७७, ८९, ९३, ९४, १००, १०७, १११, ११२, ११३ ( दाजीस्वामी ), ११४, ११५, ११६, ११७, ११९, १२०, १२१, १२५, १२६, १८२, १८४, १८६, १९३, १९४
शुक्लेश्वरनाथ–१०२
शुभानंद–१३४
शेखमहंमद–९६
शेष चिंतामणी–१०२

शेषव्यास–१०९
श्याम गुसाई–१०९
श्रीधर–४२, १३१, १३२, १५४, १५८, १६२, १६८, १७४, १९६
श्रीनाथ–१७०
श्रीपति–२०, २४, २९, २०८
श्रीरंग नारायण–१६२
श्रीविजय–२५
श्रीशंकराचार्य–२९, ९५, १३६, १५५, २१०
श्रीहर्ष–२१
श्रुतदेव–१५४
सकलहरिजन*–१५५
सखुबाई–१६६
सच्चिदानंद–१६२
संतदास–१५८
संतदेव–१६३
संताजी–९६
सत्यामलनाथ–१६३
सदानंद–१५८, १६३
सदाशिव–१२५
संभाजी ( शहाजीपुत्र )–१०९
संभाजी ( शिवाजीपुत्र )*–१२, १२६, १९४
संभुस्वामी–१२५
समर्थ–[ पहा, रामदास ]
समर्थमेरु–[ पहा, मेरुकवि ]
सर्वक्षेत्रवासी*–१५५
सरस्वतिनिवास–१०२
सरस्वती गंगाधर–१६२
सहजानंद–१०३
सहदेव भाडळी–२०८
सामराज दीक्षित–१०२
सालोमालो–७४
सावता माळी–४४, ४५, १५४
सिद्धचैतन्य–१५३
सिद्धिनरसिंह–१०२
सीताराम–९८
सुखटणकर ( डॉ. )–१८८
सुखलालकवि–१०९
सुदामदेव–१५४
सुबुद्धिराव–१०९
सुभट–२२
सूरदास–१५५
सेना न्हावी–४४, ४५, ९६, १५४, १६३
सोपानदेव–४४, १५४, १६३, १७१
सोमदेव–२१
सोमशहा–११२
स्कॉट वेरिंग–१२६
हणमंते–[ पहा, रघुनाथपंडित ]
हनुमंतस्वामी–१६३

हनुमान–१२५
हरि कवि–२०३
हरिदास–१२३
हरिनाथ–३०, १४
हरि नारायण–१५४
‘ हरिविजय ’कार*–१५५
हरिस्वामी–१२५
हरिहर–२६
हाल–१२, ३३
हेगराज–१५२
हेमचंद्र–२३
हेमाद्रि–१२, २५, २७, ३५, ७७, २१२
होनाजी बाळा*–१५४, १९८
क्षेमेंद्र–२१, २३, १०५
ज्ञाननाथ–[ पहा, ज्ञानेश्वर ]
ज्ञानेश्वर [ ज्ञानदेव ]–१०, ११, १२, २०, २७, २८, २९, ३०, ३१, ३३, ३४, ३५, ३६, ४३, ४४, १२१, १२७, १५२, १५४, [ ज्ञाननाथ ], १५६, १६३, १६४, १७०, १७१, १७७, १८७, २०२, २१२

## [ ग्रंथ व विषय—सूचि ]

अफझलखान वध–९९
अमृतानुभव*–१४, ४७, ९५
मदनतिलक*–२५, २६
महानुभाव–३१, ३२, ३३, ९९, १२२, २०७
माधवानंद–कामकंदला ( कादंबरी )* –२१
रसगंगाधार*–१
राजतरङ्गिणी–२१, १२२
हनुमन्नाटक*–२२, १३३
ज्ञानेश्वरी*–२, १४, १९, ३३, ४५, ४७, ९५, ११८, १३०, १९०

[ प्रथमावृत्तीच्या सूचींतील अनावश्यक, सामान्य, अर्धवट, चुकीच्या नोंदी ]

आनंदराय–१०२
आवटे–५९
कल्याण ( शिष्य )–९७
गंभीरराव–११०
गोवर्धनदास लक्ष्मीदास–१०८
चंद्रात्मज–
तानाजी–९९
दास–१८२
दिनकर नरसिंह–

द्वैपायन–१८४
निजामशहा–११४
पंडित–१८४
पेशवे–१९४
प्रतापमल्ल–१०२
बळी–६३
भर्तृहरि–९८
भोंसले–१०८
राजाराम–
राम–६५
रामानुज–२३, १०२
लक्ष्मी–६५
वरुण–११६
वसिष्ठ–६९
शुक्र–६९
शुक्र–११६
शुक्राचार्य–६३
सीता–६५
सोळंकी–९८

जीवनंदन नाटक–१०२
ब्राह्मण–१८३, १८४, १८६
रामदासी–
क्षत्रिय–१८३, १८४
ज्ञानेश्वरकाल–२७, १२६
ज्ञानेश्वरसंप्रदाय–

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक ९३०२८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........
REFBK-0013727

...चें
...नाच
... (आणि
... त्यांची वाङ्मया-
...न डॉ. केतकरांनीं या
...चा स्वतःच्या काव्यावर प्रकट
...च्या कृति विषयीं त्यांनीं व्यक्त केलेलें मत, संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करतांना निवड, संक्षेप, विस्तार याविषयींचें दिसणारें धोरण यांतून त्यांची वाङ्मयाभिरुचि व्यक्त झालेली आहे. त्यांतूनच मराठी कवींची काव्यनिर्मितीमागील भूमिका, प्रेरणा, प्रयोजन, संस्कृत काव्य-निर्मितीमागील भूमिका, प्रेरणा, प्रयोजन यांच्यापेक्षां वेगळे कसे होते तेही दिसून येते.

या ग्रंथांत व्यक्त झालेल्या डॉ. केतकरांच्या वाङ्मयविषयक मतांनाही वेगळें महत्त्व आहे. भरपूर ऐतिहासिक माहिती हा 'ज्ञानकोश'कारांचा विशेष. वाचकांच्या रूढ समजुतींना धक्के देऊन त्यांना स्वतंत्र विचारास प्रवृत्त करणें हा डॉ. केतकरांच्या लिखाणाचा धर्म. याचा प्रत्यय याही ग्रंथांत येतो. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या ज्या अनेक दिशा या ग्रंथांत डॉ. केतकरांनीं दाखविल्या आहेत त्या आजही मार्गदर्शक ठरणार आहेत.

♧ ♧ ♧

व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २